(१४०) अवघी तिर्थे ही तीर्थरूप खरी परंतु ती सर्व विठ्ठलाच्या पायाचे स्वरूप होय. विठ्ठलाला पाहिले असतां सर्व जीवजंत पवित्र होतात ॥१॥ असे हे पांडुरंगरायाचे पंढरीक्षेत्र होय.ते सर्व तिर्थामध्यें अभंग आहे. तेथें संत सग केला असतां सर्व दोष नाहीसे होतात ॥२॥ आणि म्हणून त्वरीत हरि किर्तन करा. या योगेच तुमचा उद्धार होईल. ज्यांनी या पांडुरंगरायाचा आश्रय केला त्या सर्वांना वैकुंठलोक प्राप्त झाला ॥३॥ नामदेवराय नित्यशा रामकृष्णाच्या नामावळीचा जप करितात आणि ते आपल्या हृदय-कमळामध्यें विठ्ठल विठ्ठल नामाचा जप नित्य करितात ॥४॥

केशव आराध्य देवाचाही देव । पंढरीचा राव पांडुरंग ॥१॥
पांडुरंगाविण नाहीं त्रिभुवनी । भोळया चक्रपाणी वांचूनियां ।२
नामा म्हणे ध्यानी ध्यावें विठोबासी । अखंड मानसीं भजा देवा ।३

(१४१) केशवराय हा वंदनीय पूजनीय असा देवाचाहि देव होय. व तोच पांडुरंग पंढरीक्षेत्र चा राजा आहे ॥१॥ भोळया भाविक जनांना या त्रिभुवनामध्यें चक्रपाणी पांडुरंगाशिवाय दुसरा आधार नाही ॥२॥ या विठ्ठलरायाचें चित्तांत ध्यान करावें आणि या देवरायाचें मनानें नित्य भजन करावें, असें नामदेवराय म्हणतात ॥३॥

अनंत म्हणती माझिया स्वामीतें । अनंत गुण त्यातें म्हणोनियां ।१
पतित पावन म्हणता माझिया स्वामीतें उद्धरी पतितातें म्हणोनियां २
विश्वंभर म्हणती माझिया स्वामीतें । पोशितो विश्वातें म्हणोनियां ३
जग जीवन म्हणती माझिया स्वामीतें । जीवन जगातें म्हणोनियां ४
हृषिकेश म्हणती माझिया स्वामीतें । चाळी इंद्रियातें म्हणोनियां ५
नामा म्हणे केशव म्हणती स्वामीतें । नासितो क्लेशातें म्हणोनियां ६

(१४२) माझ्या या स्वामीच्या ठिकाणी बहुविध गुण आविष्कृत होण्यानें त्यास अनंत म्हणतात ॥१॥ हा माझा स्वामी पापी जनांचा उद्धार करितो म्हणून त्यास पतितपावन म्हणतात ॥२॥ माझा हा स्वामी अखिल विश्वाचें पोषण-रक्षण करितो म्हणून त्याला विश्वंभर म्हणतात ॥३॥ जगाला जीवन देऊन त्याचे रक्षण करितो म्हणून माझ्या स्वामीला

जगजीवन म्हणतात ॥४॥ अखिल इंद्रियांना चलन-गति देतो म्हणून माझ्या स्वामीला हृषीकेश म्हणतात ॥५॥ अखिल दुःखांचें भंजन करितो म्हणून माझ्या स्वामीला केशवराय असें नामाभिधान दिलें असें नामदेवराय म्हणतात ॥६॥

संपूर्ण विश्वाचा आत्म्याचा जो निज आत्मा । तोचि हा परमात्मा विटेवरी ॥१॥ द्वादश लिंगांचें जें कां आत्मलिंग । ते हे पांडुरंग विटेवरी ॥२॥ अनंत सुर्यांची ज्योतीची नीजज्योती । तीही उभीं मूर्ती विटेवरीं ॥३॥ अनंत शक्तीची जी निज शक्ती । ती ही उभीं मूर्ती विटेवरीं ॥४॥ अनंत ब्रह्मांचें जे कां निज ब्रह्म । तें हें परब्रह्म विटेवरी ॥५॥ अवघ्या चैतन्याचें जें कां निज चैतन्य । तें हें समाधान विटेवरीं ॥ ६ ॥ अनंत विराटाचें स्वरुपाचें निजरूप । तें हें चिद्स्वरूप विटेवरीं ॥७॥ अनंत वेदांचा अर्थाचा निज अर्थ । तोचि महा सिद्धांत विटेवरीं ॥ ८ ॥ अनंत शात्रांचें पुराणांचें सार । त्याचे हि जिव्हार विटेवरी ॥९॥ अनंत सिद्धींची जी कां निज सिद्धी । ते हे महासिद्धी विटेवरी ॥१०॥ चहूं वाचेची जी निज वाचा । ते हे अनिर्वाच्य विटेवरी ॥११॥ भक्तीची नीज भक्ति मुक्तीची निज मुक्ति । शांतीची निज शांती विटेवरीं ।१२ क्रोधाचा महाक्रोध बोधाचा महाबोध । शुद्धाचा ही शुद्ध विटेवरी १३ काळाचा महाकाळ वेळेची महावेळ । फळाचें महाफळ विटेवरी ।१४ अनंत पिंडांचें ब्रह्मांड सहीत । सांठवण सत्य विटेवरीं ॥१५॥ अनंत तत्त्वाचें जें कां निज सत्व । सत्वाचें निज सत्व विटेवरी ॥१६॥ सर्व संबंधाचा जो कां निज संबंध । आनंदाचा कंद विटेवरीं ।१७ नामा म्हणे सर्व सुखाचा आराम । धामा परम धाम विटेवरीं ॥१८॥

टीपः– या ठिकाणीं व्यष्टि आणि समष्टि यांचीं साम्यता दाखवून पर्यायाने 'तत्वमसि' महावाक्याचा उपदेश असून व्यापक स्वरुपाचा बोध आहे.

(१४३) माझा जो स्वात्मा तोच संपूर्ण विश्वाचा आत्मा आहे. तोच विटेवर उभा असलेला परमात्मा होय ॥१॥ बारा लिंगांमध्यें मुख्य जें आत्मलिंग आहे तोच हा विटेवर उभा असलेला पांडुरंगराय होय ॥२॥ जो आत्मप्रकाश तो सर्वसूर्य प्रकाशापेक्षां श्रेष्ठ आहे. तीच ही विटेवर उभी असलेली मूर्ति होय ॥३॥ अनेकविध शक्तींमध्यें असलेली जी आत्मशक्ति तीच ही विटेवर उभी असलेली मूर्ति होय ॥४॥ अनेक ब्रह्मांमध्यें स्थित जें आत्मब्रह्म तेंच परब्रह्म विटेवर उभें आहे ॥५॥ सर्व चैतन्यांमध्यें स्थित जें आत्मचैतन्य तेंच शांतस्वरूप विटेवर उभें आहे ॥६॥ अनंत विश्वरूपामध्यें स्थित जें निजरूप आहे तेंच चैतन्यस्वरूप विटेवर उभें आहे ॥७॥ बहुविध वेदांचा जो मतितार्थ. तोच स्व अर्थरूप आहे. असा हा महासिद्धांत विटेवर उभा आहे ॥८॥ सर्व शास्त्रांचें व पुराणांचें जें सार, त्याचेंहि जें मर्म तेंच हें विटेवर उभें आहे ॥९॥ बहुविध सिद्धींमध्यें स्थित जी स्वसिद्धि तीच महासिद्धि विटेवर उभी आहे ॥१०॥ चारी वाणीमध्यें स्थित जी मुख्य वाणी तिचें जें अनिर्वाच्य स्वरूप तें हें विटेवर उभें आहे ॥११॥ भक्तीचें स्वारस्य आणि मुक्तींतील मुक्ति व शांतीची असलेली निज शांति, ती विटेवर उभी आहे ॥१२॥ क्रोधामध्यें असलेला श्रेष्ठ क्रोध आणि बोधामध्यें असलेला महाबोध, तसेंच पवित्रतेमध्यें जी पवित्रता ती ही विटेवर उभी आहे ॥१३॥ काळामध्यें असलेला महाकाळ आणि वेळामध्यें स्थित असलेला महावेळ, तसेंच फळामध्यें स्थित जें श्रेष्ठ फळ, तें हें विटेवर उभें आहे ॥१४॥ ज्या सत्य स्वरूपामध्यें अनंत पिंडे, ब्रह्मांडासहित सांठवलेलें आहेत तेंच खरोखर विटेवर उभें आहे ॥१५॥ अनंत सत्वांमध्यें जें निजसत्व आहे, तसेंच तत्वामध्यें स्थित जें स्वतत्व आहे तेंच विटेवर उभें आहे ॥१६॥ बहुविध संबंधांमध्यें स्थित जो स्वसंबंध, असें हें आनंदाचें बीज विटेवर उभें आहे ॥१७॥ सर्व सुखाचें आराम-स्थळ असें जें श्रेष्ठ धाम-मुख्य स्थळ, तेंच विटेवर उभें आहे, असें नामदेवराय म्हणतात ॥१८॥

अहो त्रिभूवना माझारीं । भूवैकुंठ पंढरी । चंद्रभागा [1] सरोवरीं । विटेवरीं नीट उभा ॥१॥ उभा कैवल्य नायक । दृष्टी सन्मुख

१ टिप:-.समवेत-असाहि अर्थ होतो.

पुंडलीक । ज्याचे ब्रह्मादिक सेवक । इतरां कोण पाड ॥२॥ सुरंग रंगें चरण तळे । रातलीं रानोत्पलें । जिंकिलीं माणिक निळे । मज पाहतां बाई ॥३॥ पद अंकुश पताका । ध्वज वज्रांकित रेखा । तेथे लक्ष्मी रतली देखा । सिंधुतनया बाई ॥४॥ अनुपम्य गे माय अनुपम्य सार । परब्रह्म वो साकार । मंत्रमय त्रिअक्षर । विठ्ठल नाम बाई ॥५॥ तें गा प्रत्यक्ष ध्यान । सर्व सुखाचें निधान । दृष्टीं पाहतांचि मन । माझें परतेना ॥६॥ नें लागे पालयासी पातें । लक्ष लागलें निरुतें । सुख झालें वो मनातें । तें मी काय सांगों वो माय ॥७॥ मन इंद्रियें वेधलीं । पर वृत्ती रिघालीं । काया स्वानंदा मुकलों । वेगळे पणें ॥ ८ ॥ पद द्वयांची ठेवणी । इंद्रनीळ गुल्फ मणी । गंगा मिरवत चरणीं । वांकी तोडर पायीं ॥ ९ ॥ सरळ आंगोळियावरी । नखें वर्तुळ साजरी । चंद्र देखोनि अंबरी । झाला कळा हीन ॥ १० ॥ पोटरीया जानु जंघ । मर्गज मणीचे ते स्तंभ । कैसें वोळलें स्वयंभ ओघ जैसे कालिंदीचे ॥ ११ ॥ पितांबर माळ गांठीं । रत्नकिळा बरवंटी । विद्युलतेच्या थाटीं । जैशा मेघ मंडळीं ॥१२॥ वीर कंकणें मनगटीं । कांडो वाडीं मुद्रिका दाटी । माज सामावे जो मुठी । वरी कटीं कटिसूत्र ॥१३॥ नाभीं सरोज गहन । ब्रम्ह याचें जन्मस्थान । वरी त्रिवळी लक्षण । कैसे शोभे रोमराजी ॥१४॥ काय वाणू तें उदर । सांठवलें चराचर । ब्रह्म गोळ निरंतर । जया रोम रंध्रीं ॥१५॥ तनु मृदु श्याम निर्मळ । प्रभा दिसती सोज्वळ । जेवीं ओळलें से जळ । जैसे घनमंडळी ॥१६॥ शुद्ध चंदन पातळ । आंगीं चर्चिला निर्मळ । जेवीं इंद्रनीळ किळ । गुल्फ मोतियांचे ॥१७॥ पदक बाहु भूषणें । नवरत्नांचें खेंवणें । कैसें सर्वां झालें पणें । लेणें लेणियासी ॥१८॥ कौस्तुभ

मिरवे कंठीं । माजी रत्नांचिये दाटी । तेथें सुरवरांच्या दृष्टी । भाळलिया ॥१९॥ श्रवणीं कुंडलें झळकती । जैशा विजुव तळपती । कंठीं माळ वैजयंती । सह तुळसी दळेसी ॥२०॥ विशाल नयन कृटी । ठेऊनिया नासापुटीं । दावी योग कसवटी । योगीयांसी गे मायें ॥२१॥ लिंग स्वयंभू शीर स्थळीं । रश्मी मुगुट झळाळी । बेटी मोर पिसातळीं । मृग नाभी तिळक ॥२२॥ स्मित अधर सुरेख । कैसे निमासुर मुख । तेथें मदन पर्यक । कोटी कुरवंड्या ॥२३॥ विष्णुदास नामा जिवें । ओंवाळी सर्व भावें । अनुभव अनुभवें । अनुभविजे सदा ॥२४॥

(१४४) हा पांडुरंगराय, भूवैकुंठ जें पंढरपुर क्षेत्र तेथें चंद्रभागेच्या सरोवराकाठी विटेवर नीट उभा आहे ॥१॥ हा कैवल्याचा स्वामी असून त्याच्या दृष्टी समोर पुंडलिकराय आहे. ब्रह्मादिक देव हे त्याचे सेवक आहेत तेथें इतरांची काय किंमत आहे ॥२। अहो बाई, ह्याच्या पायाचीं तळवटें हीं जणुं काय तांबड्या रंगाच्या कमळाप्रमाणें सुरंग रंगानें रंगलेलीं आहेत. मला तर खरोखर असें वाटतें कीं याच्या तेजापुढें नीळ मणीच्या माणिकांचें तेज लुप्त झालें ॥३॥ ज्याच्या तळवटीं अंकुश, ध्वज, पद्म, पताका व वज्रांकित रेषा उमटलेल्या आहेत अशा ह्याच्या चरण कमळीं समुद्राची कन्या लक्ष्मी ही रममाण झाली ॥४॥ अहो बाई यांना हा साकार परब्रह्म स्वरूप (पांडुरंग) खरोखर पहाता उपमा रहित असें अमोलिकाचें सार होय. तीन अक्षरीं जो विठ्ठल मंत्र तो सर्व मंत्रांतील राजा होय ॥५॥ असें हें प्रत्यक्ष ध्यान असून सुखाचा तर ठेवाच होय. त्याला पाहण्यानें माझें मन तेथें समरस झालें ॥६॥ अहो बाईयांनो त्याचा लक्ष्यवेध होण्याचें त्याला पाहणाऱ्या माझ्या डोळ्यांच्या पापण्या तटस्थ झाल्या (त्या काहीं मिटत नाहींत) आणि मनाला जो सुखाचा गोडा लाभला तो अनिर्वाच्य होय ॥७॥ अशा या स्वरूपाला पाहून इंद्रियांसहित मन वेधलें म्हणून त्यानें वृत्तीच्या घरीं प्रवेश केला. तीं वेगळेपणें न राहतां या स्वरूपामध्यें समरस झालीं ॥८। ज्याचे घोंटे इंद्रनीलमण्याप्रमाणें असून ज्याच्या चरणांपासून गंगा वाहात आहे, ज्याच्या पायांत वांकी तोडर

शोभा देत आहेत; अशी ही दोन पायांची ठेवण आहे ॥९॥ ज्याच्या सरळ बोटांना गोलाकार नखें शोभा देत आहेत अशा या स्वरूपाला पाहून आकाशस्थ चंद्र हा प्रकाश रूप असतांहि कळाहीन-निस्तेज झाला ॥१०॥ त्यांच्या पोटऱ्या, जानु व जांघा हे जणुं काय हिरव्या रंगाच्या पाचेच्या स्तंभाप्रमाणें असून जसे काय कालिंदी नदीच्या प्रवाहा सारखे आहेत ॥११॥ कटीवर खचलेल्या पीतांबराला दिलेल्या गांठी व माला ह्या जणुं काय मेघमंडळांत चमकणाऱ्या विद्युल्लते प्रमाणें शोभा देत आहेत ॥१२॥ ज्याच्या मनगटाला वीरकंकणें बांधलीं असून ज्याच्या प्रत्येक बोटामध्यें आंगठ्या घातल्या आहेत, आणि कमरेला बांधलेला कडदोरा हा मुठीमध्यें मावेल इतका जाड आहे ॥१३॥ ज्याचे नाभी कमल- हे ब्रम्हदेवाचें जन्म स्थान आहे; ज्याच्या त्रिवलीनें युक्त अशा बेंबीवर केशपंक्ती शोभत आहेत ॥१४॥ चराचर ज्यामध्यें सांठवलेलें आहे अशा पोटाचे काय हो वर्णन करावें? ज्याच्या रोमरंध्रामध्यें अखंड ब्रह्मांडें सांठविलेलीं आहेत ॥१५॥ जळानें व्याप्त असलेल्या मेघमंडलाप्रमाणें ज्याचें शरीर मृदु, श्याम, निर्मळ अशा सौंदर्यानें प्रकाशमान होत आहे ॥१६॥ ज्याच्या अंगाला निर्मळ अशा शुद्ध चंदनाचा पातळ लेप केला आहे. ज्याचे गुल्फ (पायाचे घोटे) इंद्रनील मण्याच्या प्रकाशासारखे आहेत ॥१७॥ नवरत्नांच्या कोंदणांत खोंवलेली अशीं पदकें ज्याचीं बाहुभूषणें आहेत, किंबहुना सुवर्णालंकारांनीं ज्याचें शरीर आच्छादित झालेलें आहे ॥१८॥ ज्याच्यामध्यें अनेक रत्नें आहेत असा कौस्तुभ ज्याच्या कंठास शोभा देत आहे, ज्याला पाहून देवादिकांचीहि दृष्टि मोहित झाल्या ॥१९॥ जशा विजा चमकाव्या तद्वत कुंडलें ज्याच्या कानांत झळकतात व ज्याच्या कंठांत तुळशीपत्रांसह वैजयंतीची माळा आहे॥२०॥ ज्यानें आपले विशाल नेत्र नासाग्रीं ठेविलेले आहेत व त्यायोगें तो जणुंकाय योग्यांना योगाची परीक्षा—प्राविण्य दाखवीत आहे ॥२१॥ ज्याच्या मस्तकीं स्वयंभू लिंग असून तेजस्वी अशा मोरांच्या पिसाऱ्यानें वेष्टित असा मुकुट झळकत आहे आणि कपाळावर कस्तुरीचा टिळा लावलेला आहे ॥२२॥ ज्याचे हास्ययुक्त ओष्ट सुंदर असून सर्वाकर्षक (हिमासूर) असे मुख आहे. त्यावरून कोटयावधी मदनांच्या राशि ओवाळाव्या ॥२३॥ अशा देवरायाला विष्णुदास नामा हा जीवभावानें ओवाळणी करितो आणि नित्यशः अनुभवाचा अनुभव अनुभवानें घेतो ॥२४॥

श्री विठ्ठल-पुंडलिक-संवाद

पितयाची भक्ति पुंडलिकें केली । मात हे ऐकिली देवरायें ॥१॥
नव लक्ष गोधनें पांचसे संवगडे । रामकृष्ण पुढें चालताती ॥२॥
उठा चला जावो पुंडलिक पाहो । देव म्हणे भावो पाहो त्याचा ३
गोकुळिहुनि देव पंढरपुरा पातला । त्वरित पातला वेणूनादीं ४
तेथूनि परतला वाळवंटीं आला । तंव देव देखिला पुंडलिकें ॥५॥
देव उभा आहे पुंडलिक पाहे । चतुर्भुज स्वयें देखियेला ॥६॥
देखियेला हरी शंख चक्र करीं । आयुधें तीं चारीं झळकतीं ॥७॥
चतुर्भुज मूर्ती देखियेली दृष्टी । पुंडलिके वीट टाकियेली ॥८॥
विटेवरीं उभा राहिला विठ्ठल । ठसा मिरवला त्रिभुवनीं ॥९॥
पुंडलिक भाव पाहूं आला देव । प्रसन्न झाले सर्व पुंडलिका ॥१०॥
वैकुंठ कैलास आणिल हा येथें । नामा म्हणे हित झालें आम्हां ११

(१४५) पुंडलीकरायानें आपल्या वडिलांची सेवा एकनिष्ठपणानें केली ही गोष्ट देवरायांच्या श्रवणांत आली ॥१॥ तेव्हां रामकृष्ण आपले पांचशे बाळमित्र व नऊलक्ष गाई घेऊन पुंडलीकरायाकडे जाऊं लागले ॥२॥ अहो बाळमित्रानो, उठाहो आपण पंडलीकरायाकडे जाऊंया आणि त्याच्या भक्तीची कसोटी पाहूंया, असें देवराय म्हणाले ॥३॥ देवराय हे गोकुळांतून निघून पंढरीक्षेत्रीं आले आणि तेथून वेणुनादाकडे त्वरित पोंहोचले. ॥४॥ तेथून ते परतून वाळवंटामध्यें आले असतां तेथें देवरायांना पुंडलीकानें पाहिलें ॥५॥ चतुर्भुज असे देवराय आपल्या संमुख उभे असलेले पुंडलीक रायानीं पाहिले ॥६॥ हरीच्या चारी हातांमध्यें शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें झळकत आहेत असें पुंडलीकरायानीं पाहिलें ॥७॥ देवरायाच्या चतुर्भुज मूर्तीला पाहतांच त्यांच्या संमुख पुंडलीकरायांनी वीट टाकिली ॥८॥ देवराय त्या विटेवर उभे राहिले आणि त्रिभुवनामध्यें कीर्तीचा ठसा-शिक्का-मोर्तब केली ॥९॥ देवराय हे पुंडलीकरायाचा भाव पाहण्याकरितां

प्रत्यक्ष आले हें जाणून पुंडलीकाविषयीं सर्वांनी आदर व्यक्त केला ।।१०।। या पुंडलीकरायानें वैकुंठ व कैलासच जणुंकाय या पंढरपुरक्षेत्रीं अवतारित केले. त्या योगें आमचें हित झालें असें नामदेवराय म्हणतात ।।११।।

पुंडलीकालागुनी म्हणे पांडुरंग । सखा जीवलगा तूंची माझा ।।१।।
न पाहसी वास बोलसी उदास । सांडोनियां आस सर्वस्वाची ।२
वैकुंठ सोडोनी आलों तुजपाशीं । कां गा न बोलसी भक्तराया ।३
पितृ भजनाचा झालासी अधिकारी ! केली बा पायरी वैकुंठासीं ४
माग बापा कांही आवडे तें घेई । मज वाटतें हृदयीं घालावाची ५
नामा म्हणे देवा स्वामि मुगुटमणीं । उभा कर ठेवुनी कटीवरीं ६

(१४६) तूंच माझा प्रिय सखा आहेस असें पुंडलीकरायांना देवराय म्हणाले ।।१।। तूं कोणाची वाट पहात नाहीस व उदासवाणें भाषण करीत आहेस ।।२।। अरे वेडया भक्तराया, मी वैकुंठाचा त्याग करून तुझ्याकडे आलों असतांहि एका शब्दानेहि तूं माझ्याशी भाषण करीत नाहींस ।।३।। हे पुंडलीकराया, खरोखर तू पितृभक्तीच्या परीक्षेंत उत्तीर्ण झालास आणि वैकुंठाची पायरी हस्तगत केलीस ।।४।। तुला पाहून मला असें वाटतें कीं तुला माझ्या हृदयांत सांठवावें, तुला जी कांहीं आवड असेल ती माझ्याकडून मागून घे. तुझ्यावर मी पूर्ण प्रसन्न झालों आहे ।।५।। हा माझा मुकुटधारी पांडुरंग स्वामी कटीवर हात ठेऊन उभा राहिलेला आहे असें नामदेवराय म्हणतात ।।६।।

एक वेळ भेटीं आलो भक्तराया । स्फुरती माझ्या बाह्या क्षेमालागीं १
ऊठ पुंडलीका परतोनिया पाहें । जीवीचें आर्त काय सांग मज ।२
जीवाची पारणी फेडी डोळयांचीं । वास श्री मुखाची पाहूं देई ३
हेंची आर्त धरोनी आलों असें जीवीं । तें तूं सर्व पुरवीं भक्तराया ४
नामयाचा स्वामि कृपेचा कोंवळा । म्हणऊनि उतावळा भक्तालागीं ५

(१४७) हे भक्तराया, तुझी एकवेळा तरी भेट व्हावी म्हणून माझे बाहु तुला अलिंगन देण्याकरितां स्फुरण पावतात ।। १ ।। हे

पुंडलीकराया ऊठ आणि पाठमोरा होऊन माझ्याकडे पहा. आणि तुझ्या अंतःकरणांत कोणत्या वस्तूची आवड आहे तें स्पष्ट सांग ।।२।। तुझ्या मुखाचें दर्शन दे आणि माझ्या डोळ्याचें पारणें फेडून अंतःकरणाची इच्छा पूर्ण कर ।।३।। हे भक्तराया, मनामध्यें हीच इच्छा धारण करून मी तुझ्याकडे आलों आहें. तिची पूर्तता कर ।।४।। नामयाचा स्वामी हा कृपेचा सागर होण्यानें तो भक्ताला भेटण्याकरितां उतावळा झाला आहे. —भक्ताला भेटण्याची त्याला उत्कंठा झाली आहे ।।५।।

सांडूनी वैकुंठ न धरत पातलों । तुज भेटावया आलों पुंडलिका १
प्रीतीचा वोरसु हृदयी दाटला । नुठेची कां वहिला आलिंगना ।२
भक्त शिरोमणी आमचा जीवलग । म्हणे पांडुरंग पुंडलीका ।।३।।
स्फुरती भुजा दंड आणि वृक्षःस्थळ । हरूषें नयनकमळ विकासलें ४
आनंदें रोमांच उद्‌भवले आंगीं । क्षेमा देई वेगी भक्तराया ।।५।।
मज नाम रूप तुमचेनी संभ्रमें । केली जन्म कर्मे असंख्यात ।।६।।
तुमचीया आवडी असें मी अंकीला । सांग कोण्या बोला रुसलासी ।७
हृदयींचे निज गुज सांगरे सकळीक । तेणें मज सुख होईल जीवा ।८
परतोनियां दृष्टी पाहे आळुमाळु । तेणें हरेल सकळ श्रम माझा ।९
ऐसा भक्त जन वत्सलु भक्तांचा विसावा । भक्तांचिया भावा भाळलासे ।। १० ।। कटा वरी दोन्ही हात उभा पुंडलीका द्वारीं । नामया स्वामी हरि विनवितसे ।।११।।

(१४८) हे पुंडलीकराया, कोठेंहि न थांबतां तुला भेटण्याकरितां वैकुंठाहून त्वरित आलों आहे ।।१।। तुला आलिंगन देण्याकरितां माझ्या अंतःकरणांत प्रेमाचा डोंब उफाळला असतांहि अद्याप तूं आपुलें आसन सोडीत नाहींस ।।२।। हे पुंडलीक राया, तूं माझा जिवलग असा भक्त शिरोमणि आहेस, असें पांडुरंगराय म्हणाले ।।३।। अरे पुंडलीकराया, तुला भेटण्याकरितां माझे भुजादंड आणि वक्षःस्थळ स्फुरण पावत असून माझीं नेत्र कमळें हीं उल्हासानें विकासली आहेत ।।४।। आनंदाच्या आधिक्या-

रणानें सर्वांगावर रोमांच उभारले गेले आणि म्हणून हे भक्तराया, त्वरित मला आलिंगन दे ।५। अरे मी अनाम अरूप खरा, परंतु तुमच्या प्रेम-भक्तीनेंच ना मी अनेक नामें आणि रूपें धारण करितों आणि असंख्य असे अवतार धारण केले ना ?।६।। तुमच्या प्रेमानेंच ना मी बांधलों गेलो ? कोणत्या कारणास्तव तूं अबोला धारण केला आहेस ? ।।७।। तुझ्या हृदयांतील गौप्य गोष्टीचा माझ्याजवळ स्फोट केल्यानेंच मला समाधान वाटेल ।।८।। तूं आपली दृष्टि पाठमोरी करून किंचित तरी मजकडे पहा त्यायोगें माझ्या सर्व श्रमांचा परिहार होईल ।।९। भक्तांचें विश्रांति स्थळ असा हा भक्त जनाचा वत्सल तो प्रेमानें वेडा झाला ।।१०।। हा नामयाचा स्वामी हरी, आपले दोनो हात कटीवर ठेऊन पुंडलीकराया जवळ प्रार्थना-विनंति करीत आहे ।।११।।

माझिया पितयाचा होईल निद्रा भंग । न घडे प्रसंग बोलायाचा ।१
क्षण एक मौन धरूनिया रहा । शरणांगत पहा कृपा दृष्टी ।।२।।
करूनि निर्धार आले ती जेणें भावें । जतन करावे वचन देवा ।।३
नच जावें देवा माझें गांवेंहुनि । मागतों प्रार्थुनीं हेंचि तुम्हां ।४
माझें सुख पहावें मागेन ते द्यावें । माझें गांवीं व्हावें अधिपती ।५
नामयाचा स्वामी भक्तीसी भुलला । पुंडलीके राहविला पंढरीये ।६

(१४९) माझे वडील शांत झोपलेले आहेत. तुमच्या व माझ्या भाषणानें त्यांची निद्रा भंग पावेल म्हणून मी बोलण्याचा प्रसंग टाळीत आहें ।।१।। हे देवराया, तुम्ही क्षणभर स्तब्ध रहा. शरणांकित झालेला जो मी त्याच्याकडे कृपादृष्टीनें पहा ।।२।। हे देवराया, तुम्ही जो संकल्प करून माझ्याकडे आलां आहांत त्या वचनाचें परिपालन करा--तें वचन सत्य करा ।।३।। हे देवराया, तुम्ही माझ्या गांवाहून अर्थात येथून जाऊं नका हीच माझी तुम्हाला प्रार्थना आहे ।।४।। माझ्या गांवचे तुम्ही अधिपति व्हावें त्यायोगें मला आनंद होणारा आहे. ही जी माझी मागणी आहे ती तुम्ही पूर्ण करा ।।५।। नामयाचा स्वामी जो पांडूरंगराय तो भक्तीला वश झाला. या पढरीरायाला पुंडलीकानें पंढरीस स्थाईक केलें।।६।।

आलासि आरते धरिलासि चित्तें । आतां तुज मागुतें जावों नेदी ॥१॥ शरीर प्राणाचा देईन मी बळी । तुज हृदय कमळीं सांठवीन ॥२॥ धरिलासि तूं एक आणि वैकुंठ नायक । म्हणे पुंडलीक पांडूरंगा ॥३॥ इह लोकीचे सुख न मागे सकळीक । आणिक परलोक चाड नाहीं ॥४॥ पंढरीस राही रखुमाई समवेत । तेणें मनोरथ पूर्ण होती ॥५॥ तुझें रूप दृष्टी नाम स्मरण पुटीं । मना चरणीं मिठी पडोनि गेली ॥६॥ तुझे चरणी आर्त हृदयीं नामामृत । तेणें मी समर्थ मिरवे जगीं ॥७॥ संता सोयरियांची व्हावया भेटी । म्हणोनि वाळवंटीं वस्ती केली ॥८॥ परब्रह्म पुतळा देखिलासि डोळां । समाधि सुख सोहळा पांडुरंगा ।९ कटी ठेऊनि हात आपण पंढरीनाथ । भक्तांचा एकांत श्रवण करी ॥ १० ॥ उभारे म्हणोनि दिधलें आपणांतें । संबोखून नाम्यातें प्रेम दिलें ॥११॥


(१५०) माझ्या संमुख उभा असलेल्या तुला मी माझ्या चित्तांत बंदिस्त केलें आहे. आता मी तुला येथून जाऊं देणार नाहीं ॥१॥ मी माझ्या शरीराचा व प्राणाचा बळी देईन आणि तुला माझ्या हृदयकमळा-मध्यें सांठवून ठेवीन ।।२।। हे पांडूरंगा, तू जो एक वैकुंठनायक आहेस त्या तुला मी बंदीस्त केलें आहे असें पुंडलीकराय म्हणाले ॥३। मला इहलोकाच्या किंवा परलोकाच्या सुखांची अपेक्षा मुळींच नाहीं ॥४॥ तुम्ही या पंढरीक्षेत्रीं राई रुक्मिणी सहित राहिल्यानेच माझे मनोरथ पूर्ण होणारे आहेत ।।५।। माझ्या नेत्राला तुमचें रूप आणि मुखाला तुमच्या नामामृताचा छंद लागला असून तुमच्या पायाला मी घट्ट मिठी दिली ॥६॥ तुमच्या चरणीं असलेल्या प्रेमानें आणि हृदयामध्यें स्थित असलेल्या तुमच्या नामामृतानें मी या जगामध्यें समर्थपणें नांदेन ॥७॥ सखे जे संतजन त्यांची

सकळ भेट व्हावी म्हणून मी या वाळवंटामध्यें निवास केला ॥८॥ हा पांडुरंगराय जणूं काय समाधिसुखाचा अविष्कार असा परब्रह्माचा पुतळा मी माझ्या डोळयांनीं प्रत्यक्ष पाहिला ॥९॥ हा पंढरीनाथ आपले हात कमरेवर ठेऊन भक्तांचें गुह्य भाषण श्रवण करीत आहे ॥१०॥ मीं तुझ्या करितां येथे सतत उभा आहे असें विठ्ठलरायांनी पुंडलीकरायांना अभिवचन दिलें व नामदेवरायाला क्षेम दिले ॥११॥

म्हणे पुंडलीक देवा शिरोमणी । परिसावी विनवणी एक माझी ॥१॥ संसार बंधन तोडीरे दारुण । हे एक मागणें तुजपाशीं ॥२॥ ऋद्धी सिद्धि मोक्ष संपत्ति विलास । सांडियेली आस त्यांची जीवें ॥३॥ पंच महा पातकी विश्वासघातकी । त्यासी यमादिकीं गांजियेंल ॥४॥ ऐसिया पतीता करीरे सनाथ । पुरवी माझे आर्त पंढरीराया ॥५॥ हेंचि माझे काज अंतरींचें गुज । उद्धरीं सहज महादोषी ॥६॥ नामा म्हणे वर दिला नारायणें । विठ्ठल दर्शनें मोक्ष होय ॥७॥

(१५१) देवामध्यें श्रेष्ठ अशा विठ्ठलराया, माझी आपणा जवळ एक प्रार्थना आहे ती ऐकावी असे पुंडलीकराय देवरायाला म्हणाले ॥ १ ॥ अनेक जन्मामध्यें भयंकर अशा संसारांत मी बंदिस्त झालों आहें, त्यांतून मला मुक्त करावें, हीच एक तुमच्या जवळ मागणी आहे ॥ २ ॥ मोहित करणाऱ्या ज्या ऋद्धि सिद्धि आणि मोक्ष संपत्तीचा विलास, यांच्या इच्छेला मी माझ्या अंतःकरणांतून हद्दपार केले ॥ ३ ॥ जे कोणी महापापी अथवा विश्वास घातकी आहेत, ज्याना यमाने दारुण दु:ख दिलें ॥४॥ हे पांडुरंग-राया, अशा पापी जनांना तुम्ही सनाथ करा, ही माझी इच्छा आपण पूर्ण करावी ॥ ५ ॥ महादोषीयांचा सहज उद्धार करावा हेंच माझे तुमचे जवळ काम असून माझें अंतस्थ गुज हेंच आहे ॥ ६ ॥ विठ्ठलरायांचे दर्शनानें क्षणांत मोक्ष होईल असा पुंडलीकरायांना नारायणानें वर-अभिवचन दिलें, असें नामदेवराय म्हणतात ॥ ७ ॥

श्री विठ्ठलाची भक्तवत्सलता



अवताराची राशी । तो हा उभा विटेवरी

श्री विठ्ठलाची भक्तवत्सलता

अवतारांची राशी तो हा उभा विटेवरी । शंक चक्र गदा पद्मसहित करीं ॥१॥ देखिला देखिला देवा आदि देव बरवा । समाधान जीवा पाहतां वाटे गे माये ॥२॥ सगुण चतुर्भुज रूपडें तेज पुंजाळती । वंदी चरणरज नामा विनवी पुढती गे माय ॥३॥

(१५२) जो अवतारांची राशी आहे; ज्याच्या हातामध्यें शंख, चक्र, गदा, पद्म आहे असा हा पांडुरंगराय विटेवर उभा आहे ॥१॥ असा हा सर्वांगसुंदर देवादि देव त्याला मी प्रत्यक्ष पाहिलें असतां माझ्या अंतःकरणाला जें सुख झालें, हे माय, तें मला सांगतां येत नाहीं ॥२॥ हे माय, हें सगुण चतुर्भुज स्वरूप जणुं काय प्रकाशानें धवल झालेलें आहे. त्याच्या चरणाचें वंदन करून पश्चात् नामदेवराय विनंति करीत आहेत ॥३।

भक्तांसाठीं देव अवतारी धरी । कृपाळू श्रीहरि साच खरा ॥१॥
तो हा महाराज चंद्रभागेतीरीं । उभा विटेवरी पांडुरंग ॥२॥
ब्रह्मयाचे वेद चोरी शंखासुर । मत्स्य अवतार तया लागीं ॥३॥
समुद्रमंथनी मंदर बुडाला । कूर्मरूप झाला तये वेळीं ॥४॥
हिरण्याक्ष धरा नेतां रसातळा । वराह रूपें त्याला वधियेलें ॥५॥
प्रल्हादासी पिता गांजी नानापरी । स्तंभी नरहरी प्रगटला ॥६॥
देवकाजीं झाला वामन भूतळीं । बळीसी पाताळीं घातियेला ॥७॥
भूमि भार झाला क्षत्रियांचें कुळ । केलेंसे निर्मूळ परशुरामें ॥८॥
सीतेचियां काजा रावण मर्दिला । सूर्यवंशीं झाला रामचंद्र ॥९॥
गोकुळीं जन्मला श्रीकृष्ण आठवा । होऊनियां पांडवां साह्यकारी ॥१०
व्रतभंगासाठी बौद्ध अवतार । झाला दिगंबर अवनिये ॥११॥
कल्की अवतार होणार श्रीहरि । तेव्हां पृथ्वीवरी तृण न उरे ॥१२॥
नामा म्हणे ज्याचे अनंत अवतार । काय मी पामर बोलूं वाचे ॥१३॥

(१५३) हा हरि खरोखर कृपाळू आहे. कारण तो भक्तकार्यार्थ युगायुगांत अवतार घेत असतो ।।१।। असा हा पांडुरंग महाराज चंद्रभागेच्या तटीं विटेवर उभा आहे ।।२।। शंखासुरानें ज्यावेळेस ब्रह्मदेवाचे चारी वेद चोरून समुद्रामध्यें पलायन केलें तेव्हां हे देवराया, तुम्हीं मत्स्यावतार धारण केला ।।३।। देव दानव हे समुद्रमंथन करीत असतां मंदराचळ पर्वत जळांत बुडत असतांना त्याच्या संरक्षणार्थ तुम्हीं कूर्मावतार घेतला ।।४।। हिरण्याक्ष, ह्या पृथ्वीला रसातळांत नेत असतां, तुम्हीं वराहरूप धारण करून त्याचा वध केला ।।५।। प्रल्हादाची त्याच्या वडिलानें अतिगांजणूक केली असतां त्याच्या रक्षणार्थ हे देवराया, तुम्हीं स्तंभांतून प्रकट झालांत ।।६।। बळी राजानें सर्व देवांना बंदीत टाकलें असतां त्यांना मुक्त करण्याकरितां तुम्ही वामन अवतार घेतला आणि बळीला पाताळांत घातलें ।।७।। भूमीला भार झाला असतां तुम्हीं परशुरामाचा अवतार धारण करून क्षत्रियांच्या सर्व कुळांचा नाश केला ।।८।। रावणानें सीतेला हरण करून तिचा छळ केला असतां तुम्हीं रघुवंशामध्यें रामावतार घेऊन सीतेला मुक्त केलें व रावणाचा वध केला ।।९।। पांडवांच्या साह्यार्थ श्रीकृष्ण हे गोकुळामध्यें आठव्या अवतार रूपानें अवतीर्ण झाले ।।१०।। दिगंबर रूपानें या भूतलावर व्रतभंगाकरितां बौद्धावतार धारण केला ।।११।। ज्या वेळेस हा श्रीहरी कलंकीरूपानें अवतार घेईल तेव्हां पृथ्वीवर गवतहि शिल्लक राहणार नाहीं ।।१२।। ज्या श्रीहरीचे असे अनंत अवतार होतात त्या विषयीं मी जो पामर त्यानें त्याचें किती वर्णन करावें, असें नामदेवराय म्हणतात ।।१३।।

दश अवतार स्थानें

होसी भक्तांचा कोंवसा । तुझी ब्रीदें हृषिकेशा । निवविले सायासा, कृपा सिंधु मुरारी ।।१।। अंब ऋषि कारणें । दहा वेळ गर्भवासा येणें । अवतार धरिला नारायणें । गजापूर नगरीं ।।२।। अंकुरायाच्या घरीं । बाळ जळ सेनाच्या कुमरीं । मत्स्यरूप अवतार धरी वेदहरण कैवारी नारायण ।।३।। विद्यापूर नगरीं । अंधरू

राजा राज्य करी । श्रियादेवी त्या सुन्दरी । उदरीं कुमर जन्मला ॥४॥ पृथ्वी रसातळवटीं । जातां थोर अंदोळली सृष्टी । धांवण्या धांवले जगजेठी । धरा पृष्ठी सावरिली ॥५॥ मर्गजपुरीं पुरपती । हिरण्याक्ष चक्रवर्ती । अग्नि असे जनवंती । घरीं बाळ वराह ॥६॥ त्रिदश देवश्रिया चाडा । हिरण्याक्ष वधिला गाढा । भूगोल धरुनियां दाढ़ा । केला निवाडा स्वर्गीचा ॥७ कर्पूरपुर पाटण । हरि भक्तोचें हें स्थान । सदया देवी प्रिया नंदन उदरीं नृसिह जन्मला ॥८॥ पित्या पुत्रा झाली कळी । स्तंभी प्रगटला तये वेळीं । असुर मारिला कर कमळी । भक्त प्रल्हाद रक्षिला ॥९॥ कश्यपनंदन वर्धन । कोंवळा दशाचा वामन । खुजट रूप धरून । महेंद्रपुरीसी आला ॥१०॥ दानें तपें व्रतें बळी । तोही घातला पाताळीं । अद्यापि राहिला जवळी । चरणातळी पद देऊनी ॥११॥ रेणापुरी देवी रेणुका । लाधली जमदग्नीस देखा । तिचें उदरीं विश्व तारका । परशुराम जन्मला ॥१२॥ असुरीं वधियेली माया । म्हणे धांवें पुत्रराया । अवचित पातला धांवया । सहस्त्रार्जुन मारिला ॥ १३ ॥ अयोध्या नाम नगरी । जन्म कौसल्ये उदरीं । देव भक्तांचा कैवारी । दशरथ नंदन राघव ॥१४॥ राम त्रैलोक्यीं वीर दारुण । तेणें वधियेला रावण। अढ़ळ पद देऊन । राज्यीं बिभीषण स्थापिला।१५ मथुरा नामें नगरीं । वसुदेव देवकी उदरीं । कृष्ण आठवा अवतारी। लीला विग्रहि जन्मले ॥१६॥ कंस चाणूर मर्दिले । यिमळार्जुन उन्मळिले । सप्त गर्भाचे सूड घेतले । रक्षिलें गाई गोपाळीं ॥१७। बौद्ध श्रीवत्साच्या घरीं । जन्म शांभत्रीच्या उदरीं । राजा कांतिये नगरीं । निरंतर रूपें राहिला ॥१८॥ ध्यान मुद्रा मांडूनियां । वस्त्रें शस्त्रें त्यजूनियां । राहिला पै निरंजनिया । भक्तिभाव

ओळखे ती ॥१९॥ कल्कि जसरायाचा पुत्र । सावित्री देवीचा कुमर । शंभलापुरी करील अवतार । दाही रूपें प्रगटला ॥२०॥ ऐसा अमूर्त मूर्ति विटेवर । उभा राहिला निरंतर । विष्णुदास नाम्याचा दातार । वर विठ्ठल पंढरीये ॥२१॥

(१५४) हे हृषीकेशा, भक्तांचें रक्षण करणें ही तुमची ब्रीदावळी होय. हे कृपासिंधु मुरारि, तुम्हीं भक्तांना सर्व प्रकारें साह्य करून त्यांना सुख दिलें ॥१॥ हे नारायणा, तुम्हीं गजापुर नगरीमध्यें अंबरीषीकरितां दहा अवतार घेतले ना ? ॥२॥ हे नारायणा, अंदुरायाच्या घरामध्यें वेदाचे रक्षण करण्याकरितां जळामधील असलेल्या (जलसेनेच्या) कुमारीच्या पोटीं मत्स्यरूप धारण केलें ना ? ॥३॥ विद्यापूर नगरामध्यें अंघरु राजा राज्य करीत असतां सौंदर्ययुक्त असलेल्या तारुण्यवती श्रियादेवीच्या पोटीं तुम्ही जन्म घेतला ॥४॥ हे जगजेठी, जेव्हां पृथ्वी रसातळांत जाऊं लागली तेव्हां सर्व सृष्टीचा हलकल्होळ झाला. तेव्हां तिच्या रक्षणार्थ कच्छरूप धारण करून तुम्ही धांवत आलां आणि सर्व सृष्टीचा भार तुम्हीं आपल्या पाठीवर घेतला ना ? ॥५॥ मगंज नगरीचा राज्यपति जो चक्रवर्ती हिरण्याक्ष अग्निवत असा जनवंत तेथें तुम्हीं गोंडस असें वराह अवताराचें रूप धारण केलें ना ? ॥६॥ तीस कोटी देवता बंदिस्थ झाल्या असतां त्यांच्या कार्यार्थ तुम्हीं हिरण्याक्षाचा वध करून स्वर्गास पाठविलें व सर्व पृथ्वीचा भार तुम्हीं आपल्या दाढेवर धरला ना ? ॥७॥ कर्पूरपूर पाटण हें जणुं काय हरिभक्तीचें स्थानच होय. तेथें दयाळू अशा सदया देवीचे पोटीं नरसिंह अवतार धारण केला ना ? ॥८॥ पिता पुत्रामध्यें भांडण झालें असतां त्या काळी तुम्हीं खांबामध्यें प्रकट झालां आणि हिरण्यकश्यपूला तुम्हीं नखांनी विदीर्ण करून भक्त प्रल्हादाचें रक्षण केलें ॥९॥ कश्यपनंदन वर्धन असा बालवयाचा जो वामन तो खुजट रूप धारण करून महेंद्रपुरीला आला ॥१०॥ आणि दान, धर्म व व्रतें यामध्यें निपुण असलेल्या बळीस त्यानें पाताळांत घातले व आतांपर्यंत त्याच्या जवळ तुम्हीं पाताळांत राहिला ॥११॥ रेणुकापुरीमध्यें असलेली रेणुका ती जमदग्नीस मिळाली आणि तिच्या उदरीं विश्वाला तारक अशा परशुरामानें जन्म घेतला ॥१२॥ त्याच्या आईस असुरानें मारलें असतां ' हे पुत्रराया, धांव रे'

[illegible] तिनें धांवा केला असता तो तेथें अवचित प्रकट होऊन त्यानें सहस्रार्जुनास मारिलें ॥१३॥ अयोध्या नगरीमध्यें राज्य करणारा जो दशरथ, त्याची भार्या जी कौसल्या, तिच्या पोटीं देवभक्तांचा कैवारी जो राघव, त्यानें जन्म घेतला ॥१४॥ श्रीराम हे त्रिलोकांत अतिशय शूर होते. त्यांनीं रावणाचा वध करून बिभीषणाला राज्यपद देऊन अढळ पदीं बसविलें ॥ १५ ॥ मथुरा नामक नगरीमध्यें वसुदेवाची स्त्री देवकी हिच्या पोटीं अनंत लीला करणारा असा जो आठवा अवतार श्रीकृष्ण, त्यानें जन्म घेतला ॥ १६ ॥ त्यानें कंस व चाणूर अशा दुष्ट राक्षसांचा नाश केला. त्यानें आपल्या पदस्पर्शानें वृक्षांना नष्ट करून यमलार्जुनांना पुनर्जन्म दिला. कंसानें केलेल्या सात भ्रूबाळ हत्येचा सूड उगविला आणि गाई गोपाळांचें रक्षण केलें ॥ १७ ॥ बौद्ध हा श्रीवत्साच्या घरामध्यें शांभवीच्या उदरामध्यें जन्मून राजा कांतीच्या नगरामध्यें सतत राहिला ॥ १८ ॥ वस्त्रें व शस्त्रें यांचा त्याग करून जो वनांत ध्यान मुद्रेमध्ये रममाण झाला. मात्र तो भक्तिभावाला पूर्ण जाणत होता ॥ १९ ॥ जस रायाचा मुलगा जो सावित्री देवीचा कुमर असा हा कल्की तो शंभलापुरामध्यें अवतार घेईल. अशा प्रकारें दशावतार रूपाने हा देवराय प्रकट झाला ॥ २० ॥ असा हा देवराय अमूर्त खरा; परंतु तोच विटेवर साकार रूपानें निरंतर उभा राहिला हा पंढरीचा वर देणारा विठ्ठलराय विष्णुदास नामयाचा दातार होय ॥ २१ ॥

प्रथम अवतारी देव मच्छ झाले सागरी । वधोनि शंखासुर वैरी आणिलें वेद ॥१॥ कूर्म अवतारी सांवरीली सृष्टी । वराह द्विज नेहटी धरणी धरु ॥२॥ प्रल्हाद कैवारा स्तंभांभितरीं । वैंळी बंधन हरी प्रगट झाला ॥३॥ रेणुका नंदन द्विजकुळ पाळण । त्रिंबक भजन रघुनाथ ॥४॥ गोकुळी अवतारु सोळा सहस्र वरु । आपण योगेश्वरु बौध्यरूपीं ॥५॥ कल्की अवतारु वदतसे बरु । नामया दातारु केशिराज ॥६॥

(१५५) देवरायांनीं प्रथम अवतारामध्यें मत्स्य या रूपानें सागरामध्यें जन्म घेतला आणि त्यांनीं शंखासुराचा वध करून वेद परत आणले.

॥ १ ॥ कूर्म अवतारामध्यें सृष्टीचा भार आपल्या पाठीवर घेतला आणि वराह अवतारामध्यें आपल्या दाढेवर पृथ्वीचें रक्षण केलें ॥ २ ॥ प्रल्हादाचा रक्षक जो नरसिंह तो खांबामध्यें प्रकट झाला. बळीला बंधन करणारा असा हा हरि वामन रूपानें प्रकट झाला ॥ ३ ॥ ब्राह्मण कुळाच्या रक्षणार्थ रेणुकेचा पुत्र परशुराम यांनीं जन्म घेतला व शंकर भक्त श्रीरामानें कौसल्येच्या उदरीं जन्म घेतला ॥ ४ ॥ सोळा सहस्र स्त्रियांचा पति जो श्रीकृष्ण त्यानें गोकुळामध्यें जन्म घेतला आणि योगेश्वर जो बौद्ध त्यारूपानें आपणच प्रकट झाला ॥ ५ ॥ आतां कल्की अवतार होणार आहे तोच वर देणार-असा नामयाचा केशिराज होय ॥ ६ ॥

मत्स्य कच्छ क्रोड मृग ते खुजट । जेथूनि प्रगट झालीं रूपें ॥१॥
तेंचि ब्रम्ह उभें भिवरेच्या तिरीं । हात कटावरी ठेवूनियां ॥२॥
मातृ घाती हिंडे वनीं जो रडत । चोर जार घात करी दुष्ट ॥३॥
दिगंबर अश्वारूढ खड्गधारी । पृथ्वीचा जो करी ग्रास एक ॥४॥
नामा म्हणे मुंगी आदि ब्रम्हवरी । नाना अवतारीं एकलाचि ॥६॥

(१५६) जेथून मत्स्य, कच्छ, वराह, नरसिंह खुजट, वामन अशीं रूपें उत्पन्न झालीं ॥ १ ॥ तेंच ब्रह्म भिवरेच्या किनारीं कटीवर हात ठेवून उभें आहे ॥ २ ॥ आईचा वध करणारा, अरण्यामध्यें रडत भटकणारा, चोरी व जार कर्म करणारा आणि दुष्टांचा घात करणारा ॥ ३ ॥ नग्न, अश्वारूढ होऊन तरवार धारण करणारा, पृथ्वीचा एकदम ग्रास करणारा ॥ ४ ॥ मुंगी पासून आदि ब्रह्मापर्यंत जो एकटाच अनेक अवताररूपानें नटला आहे, असें नामदेव म्हणतात ॥ ५ ॥

चिंतनिका:— मत्स्य, कच्छ, वराह, नरसिंह असा केवळ नामाचा निर्देष करून खुजट असणारा वामन, वनांत हिंडणारा राम, दुष्टांचा घात करणारा कृष्ण; नग्न असणारा बौद्ध आणि घोड्यावर बसून तरवार हातांत धारण करणारा कल्की असे रुपक केले आहे.

अंगाचिये सेजे फणि छाया धरी । सहस्र मुखीं करी स्तुति शेष ॥१॥
परि तयातें तुझें चरित्र अकल्पित । तेथें माझें गीत कोणीकडे ॥२॥

कैशापरी तुज आम्ही ध्यावे देवा । हें वर्म केशवा सांग मज ॥३॥
मार्कंडेयो भृशुंडी लोम हर्ष अगस्ति । करितां तुझी स्तुति कल्प गेले४
ध्यानीं पाहतां तुज न पवती योगी । तेथें मी तो रोगी कोणीकडे ।५।
ब्रम्हचर्य व्रत आचरती देव । ऋषी मुनी सर्व करिती सेवा ॥६॥
परि तुवां गर्व हरिला॰तयांचा । तेथें माझी वाचा कोणीकडे ॥७॥
इतुकें ऐकोनी बोले केशिराज खुणें । आरुता येई म्हणे नामयासी ।८
मुखीं माझें नाम हृदयीं धरूनि प्रेम । हेंचि तुज वर्म सांगितलें ॥९॥

(१५७) ज्याचा बिछाना शेष आहे व ज्याच्यावर शेषानें छाया केली आहे असा सहस्रमुखी शेष ज्याची स्तुती करितो ॥ १ ॥ हे देवराया, अशा त्या शेषालाहि तुमचें अपूर्व चरित्र अगम्य होय तेथें माझी बुद्धि कशी प्रवेश करणार ॥२॥ हे केशवराया, तुमचें ध्यान कोणत्या प्रकारें करावें हें वर्म मला सांग ॥ ३ ॥ मार्कंडेय, भृशुंडी, लोमहर्ष आणि अगस्ति यांनें तुमची स्तुती करण्यांत कल्पचे कल्प गेले ॥ ४ ॥ योगी लोकांच्या ध्यानालाहि तूं जेथें गम्य होत नाहींस तेथें माझ्या सारख्या रोगग्रस्ताला (पंगोस्थाला) कसा गम्य होणार ? ॥ ५ ॥ देव, ऋषि, मुनी इत्यादिक ब्रह्मचर्यव्रत धारण करून तुझी सेवा करितात ॥ ६ ॥ अशा श्रेष्ठ पुरुषांचाहि गर्व जेथें तुम्ही हरण केला तेथें माझ्या वाणीचा काय पाड ? ॥ ७ ॥ नामयांनीं केशवरायाची अशी स्तुती करितांच त्यांनी त्याला आपल्याजवळ खुणेनें बोलाविलें ॥८॥ हे नामया, तूं आपल्या मुखानें माझें नामोच्चार कर आणि हृदयांत प्रेम ठेव, हें मी तुला माझ्या प्राप्तीचें वर्म सुचवित आहे ॥९॥

चारी वेद तुझ्या नांदती नगरीं । तेथें मी भिकारी काय वानूं ॥१॥
वर्णितां पार नेणें चतुरानन । तेथें मी अज्ञान काय जाणें ॥२॥
अंगलगु सेवक शेषाच्या सारिखा । तेथें माझ्या लेखा कोणीकडे ॥३॥
कैलासीचा राणा करितसे ध्यान । तेथें भ्रांत मन कोठें रिघे ॥४॥
इंद्रासहित देव जेथें ओळंगणें । तेथें दास्य करणें घडे कांहीं ॥५॥
नामा म्हणे केशवा काय म्यां करावें । तुझे पायीं रहावें कैशापरी ॥६

(१५८) हे देवराया, तुमच्या नगरामध्यें चारी वेद हे वास्तव्य करीत आहेत. तेथें माझ्या सारख्या भिक्षुकानें तुमचें काय वर्णन करावें ? ॥ १ ॥ ब्रम्हदेवहि तुमचें वर्णन करीत असतां स्तब्ध झाला, तेथें माझ्या सारख्या अज्ञानी जीवाची काय कथा बरें ॥ २ ॥ ज्याचा बिछाना म्हणजे प्रत्यक्ष शेष तेथें माझी काय पात्रता असणार ? ॥ ३ ॥ शंकरहि ज्याचें ध्यान करीत आहे तेथें माझ्या भ्रांतिष्ट मनाचा कसा रिघ होईल बरें ? ॥ ४ ॥ इंद्रादिक देवहि जेथें दास्य करितात तेथें माझ्या सेवेचा कसा प्रवेश होणार ? ॥ ५ ॥ हे केशवराया, मी तुझ्या पायाजवळ नित्य असावें या करितां कोणतें साधन करावें, असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

वेदां न कळे पार श्रुती अगोचर । उपनिषदां सार न कळेचि ॥१॥
तो हरि गोकुळीं वसुदेवा कुळीं । यशोदेजवळीं बाळ कृष्ण ॥२॥
ब्रम्हादिक वंदिती शिवादिक ध्याती । शास्त्रांसी तों गति न कळेचि ३
योग्यांचें चिंतन मुनींचे अंजन । शेषादिकां ध्यान सदा ज्यांचें ॥४॥
पुराणें भागली आचारें श्रमली । बोलतां राहिली साधुवृंदें ॥५॥
नामा म्हणे तो हा विठ्ठल पंढरी । नाम मात्रें तारी सकळांसी ॥६॥

(१५९) जो वेदाला अगम्य, जो श्रुतीला अगोचर, उपनिषदेंहि जेथें मुग्ध होतात ॥ १ ॥ असा हा देवराय हरि गोकुळामध्यें वासुदेवाच्या कुळांत जन्मलेला, यशोदेजवळ असणारा बाळकृष्ण होय ॥ २ ॥ ब्रम्हदेवादिक ज्याचें वंदन करितात, शिवादिक ज्याचें ध्यान करितात, शास्त्रांनाहि जो अगम्य आहे ॥ ३ ॥ ज्याचें चिंतन योगी पुरुष करितात व मुनीचें हे तर दिव्यांजन होय, शेषादिकांना तर याचें वेडच लागले आहे ॥ ४ ॥ ज्याचें स्तवन करीत असतां पुराणेंहि थकली, आचार श्रांत झाले, साधुवृन्द हा तर त्याच्या विषयीं चर्चा करीत असतां स्तब्ध झाला ॥ ५ ॥ असा जो परमात्मा तोच पंढरी क्षेत्रांतील विठुलराय होय. त्याच्या नाम चिंतनानें सर्वांचा उद्धार होतो, असे नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

सहस्र तोंडक्ता तोहि भागियेला । अंत नाहीं ज्याला गुणा लागीं ॥१॥
तेथें मी पामर काय बोलूं वाणी । तुझी कीर्ति जनीं काय कैसी ॥२॥
यथामती कांहीं बोलियेलों बोल । तोचि हा विठ्ठल नामा म्हणे ॥३॥

(१६०) ज्याचा गुणांचा अंत नाहीं अशा देवरायाचें वर्णन करण्यास प्रवृत्त झालेला सहस्र मुखांचा शेषहि स्तब्ध झाला ॥ १ ॥ तेथें माझ्या सारख्या पामरानें जगात तुझी कीर्ति किती अपूर्व आहे या विषयींचें वर्णन कसें करावें ? ॥ २ ॥ जें मी यथाशक्ति ज्याचें वर्णन केलें तोच हा विठ्ठलराय होय, असें नामदेवराय म्हणतात ॥ ३ ॥

अगणित गुण वर्णिती पुराणें । पंढरीचे राणे ख्याती जगीं ॥१॥
अलक्ष भेटी लक्षिताचि नाहीं । पुंडलिके कांहीं तप केलें ॥२॥
युगें गेली अठ्ठावीस ते अझुनी । उभा चक्रपाणी राहिलासी ॥३॥
वेद म्हणति नेति पुराणें तें किती । भांबावल्या मती म्हणे नामा ।४।

(१६१) जगामध्यें ज्याची प्रसिद्धि आहे अशा पंढरीरायाच्या बहुविधी गुणांचें वर्णन पुराणें करितात ॥ १ ॥ जो अलक्ष होण्यानें लक्ष्य होत नाही, परंतु पुंडलीकरायानें असें कोणतें तप केले कीं ॥ २ ॥ तो चक्रपाणी अठ्ठावीस युगें झालीं असतांहि उभाच आहे ॥ ३ ॥ ज्याच्या संबंधीं वेद हे 'नेति' 'नेति' म्हणतात तेथें पुराणांचा काय पाड ? त्यांचीहि बुद्धि वेडसर झाली, असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

खोल बुद्धीचा तो देवकीनंदन । उभा तो गे बाई ॥१॥
नंद नंदन संतांचें जीवन । उभा तो गे बाई ॥२॥
कामिनी मनोहर नामया दातार। मोक्षदाता उदार तो गे बाई ॥३॥

(१६२) अहो बाईयांनों, हा देवकीचा पुत्र अति पाताळयंत्री आहे ॥ १ ॥ अहो बाईयांनों, हा नंदाचा मुलगा म्हणजे जणुं काय संतांचें जीवन असून तो उभाच आहे ॥ २ ॥ अहो बाईयांनों, हा नामयाचा दातार म्हणजे स्त्रियांच्या अंतःकरणाला हरण करणारा आणि मोक्षाला देणारा आहे ॥३॥

फेडोनि पीतांबर उभा दिगंबर । कटी ठेवूनि कर वाळवंटी ॥१॥
मोतियांचे हार सांडूनि रत्नकीळा । तुळशीच्या माळा गळां घाली ।२।
पर्यंक शयन शेषाचें आसन । सांडूनि निजभुवन उभा विटे ॥३॥
सांडुनियां भक्त सनकादिकीं प्रेमा। कलियुगी नामा आवडला ॥४॥

(१६३) ह्या देवरायानें आपल्या अंगावरील अमोलिक पीतांबर झुगारून दिला व दिगंबर झाला आणि वाळवंटामध्यें कटीवर हात ठेवून उभा राहिला ॥ १ ॥ रत्नासारखें तेज असलेले मोत्यांचे हार टाकून देऊन हा तुळशीच्या माळा गळयांत घालतो ॥ २ ॥ शेषाच्या आसनावर ज्याचें पहुडणें असतें असा जो तो स्वस्थानाचा त्याग करून विटेवर उभा राहिला ॥ ३ ॥ सनकादिक हे थोर प्रेमी भक्त खरे; परंतु त्यांच्याहि प्रेमाला पराङ्मुख होऊन या कलियुगामध्ये त्याचा केवळ एक नामाच प्रिय सखा झाला ॥ ४ ॥

पुंडलिकाचे भेटी आणि भीवरेचे तटी । परब्रह्म उभें वाळुवंटी माये ॥१॥ उभा विटेवरी कर ठेवूनी कटावरी । उभा भीमातीरी जग जेठी गे माय ॥२॥ विठ्ठल कान्हा चरणीं वांकी तोडर । कांसे पीतांबर पदक लीला मनोहर गे माय ॥३॥ कान्हा विठ्ठल कान्हा प्रसन्न वदन थोरा । जो आथी करुणा करा हरि नाम या दातारा ॥४॥

(१६४) पुंडलीकरायाच्या भेटींकरितां आलेलें जें परब्रह्म तें भिवरेच्या किनारी वाळवंटामध्यें उभें राहिलें आहे ॥ १ ॥ हे माय, हा जगजेठी भीमेच्या किनारीं कटावर हात ठेवून विटेवर उभा राहिला आहे ॥२॥ या विठ्ठल कान्हाच्या पायीं वाळे, तोडे असून कमरेला पीतांबर कसलेला आहे व छातीवर सुंदरसें पदक धारण केलें आहे ॥ ३ ॥ जो विठ्ठल कान्हा आहे त्या कान्हाचें मुखकमल अति प्रसन्न आहे. असा हा हरि अत्यंत कृपाळू असून नामयाचा दाता आहे ॥ ४ ॥

देहुडा चरणु वाहातुसे वेणु । गोपिका रमणु स्वामी माझा ॥१॥
देखिला गे माय यमुनेचे तीरीं । हात खांद्यावरी राधिकेच्या ॥२॥
गुंजावर्ण डोळे शिरीं बाबर झोटी । मयूर पुच्छ वेष्ठी शोभतसे ॥३॥
सगुण मेघश्याम लावण्य सुंदर । नामया दातार केशवराज ॥४॥

(१६५) गोपिकेला रमविणारा माझा हा स्वामी तो दिडक्या पायावर उभा राहून वेणू वाजवीत आहे ॥ १ ॥ अशा या देवरायाला राधिकेच्या

खांद्यावर हात ठेवलेला मीं पाहिला ॥ २ ॥ ज्याचे डोळे गुंजे सारखे लाल असून मस्तकावर असलेल्या केसांच्या गांठीवर मयूर पिसाऱ्याचें वेष्ठन शोभा देत आहे ॥ ३ ॥ हा मेघश्याम सगुण आणि लावण्यसुंदर आहे. असा हा केशवराज नामयाचा दाता आहे ॥ ४ ॥

हरिभोळा हरिभोळा । आम्हीं डोळां पाहिला ॥१॥
हरि श्रेष्ठ हरि श्रेष्ठ । आम्हां कष्ट नाहीं ते ॥२॥
हरि उदार हरि उदार । आम्हां धीर होईना ॥३॥
नामा म्हणे हरि दातां । आम्हां दासा रक्षितो ॥४॥

(१६६) हरि हा भोळा खरा; अशा भोळ्या हरीला आम्हीं डोळेभरून पाहिलें ॥१॥ हरि हा श्रेष्ठ आहे असें द्विरुक्तीने सांगतो असा हा हरि आमचा पाठीराखा होण्यानें आम्हाला कोणताच त्रास नाही ॥ २ ॥ हरि हा उदार; खरोखरच हा हरि उदार खरा असें असतांहि आमचें धैर्य गलित झालेंसें वाटतें. ॥ ३ ॥ आमचा दाता जो हरि तोच आमचें रक्षण करितो, असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

अधरीचें अमृत सेविसी एकला रे। काय पुण्य केले नेणों पावया ।१
तुळशीच्या माळा शोभति गोपाळीं। तयाहूनि आगळा पावया तूं ।२
सोळा सहस्र गोपी बोलतील प्रौढी। अधरींची गोडी नेली तुवां ।३
विष्णुदास नामा केशवी सौरस । उद्धरिला वंश पावया तुवां ।४

(१६७) हे पाव्या (वेणू), श्रीकृष्णाच्या ओष्टामृताचें सेवन करण्यांस तूं एकटाच अधिकारी झालास ना ? तूं असें कोणतें पुण्य केलें बरें ? ॥ १ ॥ या गोपाळाच्या गळ्याला तुळशीच्या माळा शोभा देत आहेत खरें; परंतु हे पाव्या (वेणू), त्यापेक्षां तूं अधिक पुण्यवान् आहेस ॥ २ ॥ श्रीहरीच्या ओष्ठामृताचें माधुर्य तूं हरण केलें आहेस, असें सोळा सहस्र गोपिका प्रौढीनें सांगतात ॥ ३ ॥ हे पाव्या, तूं आपल्या वंशाचा उद्धार केला खरा; परंतु हा विष्णुदास नामा केशवाच्या प्रेमगोडीमध्यें संलग्न झाला ॥ ४ ॥

वैकुंठ ते घर । सांडूनिया निरंतर ॥१॥ तो हा पुंडलिका द्वारी । उभा कर कटावरी ॥२॥ क्षीर सागरींची मूर्ति । तो हा रुक्मीणीचा पती ॥३॥ नये योगियांचे ध्यानी । छंदे नाचतो कीर्तनीं ॥४॥ नामा म्हणे आला । सवे परिवार आणिला ॥५॥

(१६८) ह्या देवरायानें निजस्थान जे वैकुंठ त्याचा सर्वस्वी त्याग केला ॥ १ ॥ आणि पुंडलीकरायाच्या द्वारासमोर कटीवर हात ठेवून उभा राहिला ॥ २ ॥ जो क्षीर सागरामध्यें शयन करणारा आणि ज्याचें, स्वरूप सर्वांग सुंदर आहे तोच हा रुक्मिणीचा पति होय ॥ ३ ॥ जो योगी पुरुषांच्या ध्यानांत येत नाहीं तो भक्तांच्या कीर्तनामध्यें आनंदानें नाचतो ॥४॥ हा विठ्ठल आला खरा; परंतु तो एकटा न येतां त्यांनीं आपल्या कुटुंब परिवारालाहि बरोबर आणलें, असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

अनंता श्रीधरा गोविंदा केशवा । मुकुंदा माधवा नारायणा ॥१॥
देवकीतनया गोपीका रमणा । भक्त उद्धरणा त्रिविक्रमा ॥२॥
मकर कुंडलें श्रवणीं शोभती । एकावळी दीप्ति तेजे भारी ॥३॥
नामा म्हणे तुझा न कळेचि पार । भजा निरंतर सर्वकाळ ॥४॥

(१६९) हे अनंता, श्रीधरा, गोविंदा, केशवा, मुकुंदा, माधवा, नारायणा ॥ १ ॥ देवकीच्या पुत्रा, गोपिका रमणा, भक्तोद्धार करणाऱ्या त्रिविक्रमा, ॥ २ ॥ तुझ्या कानांमध्यें मकर कुंडलें शोभायमान दिसत आहेत व तेजःपुंज असा हार तुझ्या गळ्याला शोभा देत आहे ॥ ३ ॥ हे देवराया, तुझी लीला अगम्य आहे. अशा देवरायाचें सतत भजन करा. असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

सत्यसंकल्पाचा कर्ता जो विश्वाचा । अनाथ जीवांचा मायबाप ॥१॥
पुंडलिकें त्या आणिले रंगणीं । कटावरी पाणी ठेवूनिया ॥२॥
अणुरेणुमाजी व्यापूनि राहिला । अनेकत्व झाला एकलाचि ॥३॥
नामा म्हणे वेद त्याळागी बोभाय । जोडोनियां पाय उभा ठाके ॥४॥

(१७०) जो सत्यसंकल्पी आणि विश्वाचा कर्ता आहे व जणूं काय अनाथांचा दुःखी जनांचा आईबापच होय ॥ १ ॥ त्या ह्या देवरायाला पुंडलीकरायानें कमरेवर हात ठेवलेला अशा रूपानें रंगणांत आणलें ॥ २ ॥ जो देवराय सूक्ष्मांत सूक्ष्म अशा वस्तूंत व्याप्त झाला आहे तोच हा एकटाच अनंत रूपानें विकसित झाला ॥ ३ ॥ ज्याच्याकरितां वेद कंठशोष करितो तोच हा विटेवर पाय ठेवून उभा आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

तुझिया सत्तेनें वेदासी बोलणें । सुर्यासीं चालणें तुझिया बळे ॥१॥
ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धणी । वर्म जाणूनि शरण आलों ॥२॥
मेघांनीं वर्षावें पर्वती बैसावे । वायुनें विचरावें सत्ते तुझे ॥३॥
नामा म्हणें कांहीं न हाले साचार । प्रभु तूं निर्धार पांडुरंग ॥४॥

(१७१) हे देवराया, तुझ्या सत्तेनें वेदाला[1] वाचा फुटली व सूर्य हा तुझ्याच प्रभावानें चलन पावतो ॥ १ ॥ असा तूं ब्रह्मांडाचा मालक आहेस हें तुझें वर्म मी जाणून तुझ्या शरणांकित झालों. ॥२॥ मेघानें वर्षाव करावा पर्वतानें स्थिर असावें, आणि वायूने संचार करावा, ह्या सर्व क्रिया तुझ्या, प्रभावानें होतात ॥ ३ ॥ अशा या प्रभूच्या महिमेमध्यें किंचितहि बदल होत नाही. असा हा पांडुरंग आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

अच्युता अनंता श्रीधरा माधवा । देवा आदिदेवा पांडुरंगा ॥१॥
कृष्णा विष्णु हरिगोविंदा वामना । तूंचि नारायणा नामधारी ॥२॥
मुकुंदा मुरारी प्रद्युम्ना केशवा । नाम सदाशिवा शांत रूपा ॥३॥
रूपातीत हरि दाखवी सगुण । निरंतर ध्यान करी नामा ॥४॥

(१७२) हे पांडुरंगा, तूं आदिदेवाचाहि देव आहेस. तुलाच अच्युत, अनंत, श्रीधर, माधव असें म्हणतात ॥ १ ॥ तूंच श्रीकृष्ण, विष्णु, हरि, गोविंद, वामन हीं नामें धारण करितोस ॥ २ ॥ हे केशवा, तूंच शांतरूप

[1] टीप:-ज्ञानेश्वरीच्या ओव्यांचें प्रमाण – म्यां बोलविल्या वेद बोले । म्यां चालविल्या सूर्य चाले ॥ २८३-९ ॥ ज्ञा.

असून तुलाच मुकुंद, मुरारी, प्रद्युम्ना, केशव असें नामाभिधान आहे ।। ३ ।। हे हरि, तूं रूपातीत खरा, परंतु सगुण रूपानें अभिव्यक्त होतोस. नामदेवराय हे अशा स्वरूपाचें ध्यान निरंतर करितात ।। ४ ।।

पंढरीचा देव तत्सच्चित अद्वय । तूंचि बापमाय पांडुरंगा ॥१॥
सगुण निर्गुण दाविसी प्रकार । दाही अवतार निमित्तासी ॥२॥
ऐसा माझा स्वामी समर्थ गोविंद । निरंतर छंद हरिनामीं ॥३॥
नामा म्हणे कांहीं न धरिसी लाज । भाविकांसी गुज कानीं सांगे ॥४॥

(१७३) पंढरीचा देवराय हा तत्, सद् व चित् स्वरूप होय आणि हे पांडुरंगराया तूंच आमची माता व पिता होय ।। १ ।। सगुण स्वरूप काय किंवा निर्गुण स्वरूप काय, ह्या दोन्ही रूपानें तूंच अभिव्यक्त होतोस. इतकेंच नव्हे तर कार्यपरत्वें तूंच दहाही अवतार घेतोस ।। २ ।। असा हा माझा स्वामी गोविंद सामर्थ्यरूप आहे माझा. त्या हरिनामाच्या ठायीं सतत छंद आहे ।। ३ ।। हा माझा देवराय भक्तकार्यार्थ कोणतीच लज्जा धरीत नाहीं. आणि भाविक जनाच्या हितार्थ तो त्यांच्या कानीं गुह्य मसलत सांगतो, असें नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

केशिराजा आदि सकळां अनादि । तूंचि कृपानिधी नारायणा ॥१॥
अव्यक्ता अक्षरा सर्व अविनाशा । अगा पंढरीशा पांडुरंगा ॥२॥
तूंचि ब्रम्हचारी गोपिकांचे घरीं । सर्वस्वें उद्धरी सर्व जीवां ॥३॥
लटिके दाविसी गोकुळा भीतरीं । नामा म्हणे शिरीं भार वाहे ॥४॥

(१७४) हे केशीराज, तूं सर्वांच्या प्रथम असून अनादि आहेस. हे नारायणा, तूंच कृपेचा ठेवा आहेस ।। १ ।। अगा हे पंढरी क्षेत्रांतील पांडुरंगा, तूंच अव्यक्त, अक्षर व अविनाश अशा सर्व रूपानें आहेस ।। २ ।। तूंच गोपिकेच्या घरी क्रीडा करणारा असा ब्रम्हचारी आहेस व सर्व जीवांचा सर्व प्रकारें उद्धार करणारा आहेस ।। ३ ।। हा देवराय आपल्या डोक्यावर भार वाहण्याची मिथ्या क्रिया गोकुळामध्यें दाखवित आहे असें नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

अनंत हे कळा अनंत हे लीला । अनंत जयाला वेदगांती ॥१॥
तोचि पांडुरंग पंढरीचा राणा । धणीं झाला वोजा[1] भावबळें ॥२॥
अनंत जयाच्या सेवा वोजोवणी । नामरूप गुणीं नामातीत ॥३॥
नामा म्हणे अंत असेना तो कांहीं । सांपडतो पाहीं पंढरीये ॥४॥

(१७५) ज्याच्या युक्त्या अनंत आहेत, ज्याच्या लीला अपरंपरा आहेत, आणि वेद ज्याला अनंत असें संबोधून त्याचें गुणगान करितात ॥१॥ असा हा देवराय तोच पंढरीचा राजा पांडुरंगराय होय तो प्रेमाच्या अविष्करणानें शुद्ध झाला ॥ २ ॥ हा देवराय नामातीत खरा, परंतु तो नामरूप गुणांनी आविष्कारला जातो. आणि म्हणून शुद्धपणें याची सेवा बहुविध मार्गानें करा ॥ ३ ॥ हा देवराय कसा आहे हें गम्य होत नाहीं खरें. मात्र तो पंढरपुरामध्यें हस्तगत होतो, असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

देव दाखवी असा नाही गुरु । जेथें जाय तेथें दगड शेंदुरु ॥१॥
देव[2] दगडाचा बोलेल कैंचा । कोणे काळीं त्यास फुटेल वाचा ॥२॥
देव देव करितां शिणलें माझे मन । जेथें जाय तेथें पूजा पाषाण ॥३॥
नामा तोचि देव हृदयी पाहे । नामा केशवाचे न सोडी पाय ॥४॥

(१७६) देवाला प्रत्यक्ष प्रतीतीस आणून देणारे गुरु कोठें आढळत नाहींत. कारण जेथें पहावें तेथें दगडाला शेंदूर लावलेले देवच आढळतात ॥ १ ॥ दगडाला देव केल्यानें तो कसा संवाद करील आणि कोणत्या काळीं त्याच्या ठिकाणी वाणीचा विकास होईल ॥ २ ॥ देव मिळावा, देवाची प्रतीति व्हावी म्हणून मी वणवण करीत फिरलों परंतु खरा देव प्रतीत न होतां माझें शरीर आणि मन थकींत झालें. कारण, जेथें पहावें तेथें दगडाच्या देवाचा पूजेचा संभार चाललेला आढळला ॥ ३ ॥ नामयानें मात्र खऱ्या देवरायांचा आपल्या हृदयांतच प्रत्यक्षानुभव घेतला. आतां या केशवरायाच्या पायाचा त्याग नामदेवराय केव्हांहि करणार नाहींत ॥ ४ ॥

टिप:—१ वोज–शुद्ध, योग्यता.

टीप:— २ नामदेव सार्थ गाथा भाग तिसरा १८२ अभंग पहा.

बाळवंटी उभा करें कुरवाळिलें । जीवींचें पुसेल जड भारी ॥१॥
हरुषें लोळणी घालूं महाद्वारीं । येईल सामोरी केशीराज ॥२॥
शोभतसे पायीं भक्त ब्रिदावळी । जीवासी सांभाळी दीनानाथ ॥३॥
माझा अभिमान धरून मानसी । नामा म्हणे होसी भक्तां साह्य ॥४॥

(१७७) बाळवंटामध्ये उभा असलेला पांडुरंग तो आपल्या हातांनीं मला आलिंगन देऊन कुरवाळील, आणि माझ्या अंतःकरणांतील होणाऱ्या वेदनांचें सांत्वन करील ॥ १ ॥ मी महाद्वारामध्यें उल्हासानें लोळण घालीत असतां हा केशिराज सन्मुख धांवत येईल ॥ २ ॥ हा दीनानाथ सर्व जीवांचा रक्षक होण्यानें याच्या पायी भक्त ब्रिदावळी या गुणाचा अविष्कार शोभा देत आहे ॥ ३ ॥ हा विठ्ठलराय भक्तांचा साहाय्यकारी होण्यानें तो आपल्या मनामध्यें माझा अभिमान धारण करील असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

करुणा बहुत तुझ्या चरणापाशीं । धांवोनि हृषिकेशी आलों सर्व ।१॥
बाळवंटी उभे पताकांचे भार । पोहोनि शंकर वेढावला ॥२॥
सूर्य चंद्रादिक घालिती लोटांगण । करी प्रदक्षणा स्वयें गंगा ॥३॥
नामा म्हणे ऐसें सांगतां बहुत । वेदशास्त्र ग्रंथ ठकावले ॥४॥

(१७८) हे देवराया हृषीकेशा, तू दयाळू आहेस आणि म्हणून मी तुझ्या पायांपाशी धांवून आलो ॥ १ ॥ जो बाळवंटामध्यें उभा आहे व जेथें पताकांचा संभार फडकत आहे, हा सोहळा पाहून शंकरहि वेडे झाले ॥ २ ॥ सूर्य चंद्रादिक देवताहि त्याला लोटांगण घालतात किंबहुना गंगा हीहि त्याला प्रदक्षिणा घालते ॥ ३ ॥ या देवरायाचे गुणगौरव करणें अगम्य होण्यानें तेथें वेदशास्त्र ग्रंथहि मौनावले, असें नामदेवराय म्हणतात ॥४

देव आपण नाटक । भक्ता दाखवीं वैकुंठ ॥ १ ॥
देव आपण संसारीं । होसी भक्तांचा साहकारी ॥ २ ॥
देव आपण निराळा । भक्ता दावितो सोहळा ॥ ३ ॥
नामा म्हणे भक्तांसाठीं । हात जोडी जगजेठी ॥ ४ ॥

(१७९) हे देवराया, तूं फार नाटकी आहेस. तूं कौतुकानें भक्तांना वैकुंठ दाखवितोस ॥ १ ॥ हे देवराया, भक्तांना साह्य करण्याकरितां तूं संसारी होतोस, तूं अजन्मा असतां जन्म घेतोस ॥ २ ॥ हे देवराया, तूं असंग, निराळा राहून भक्तांना असें हें कोड कौतुक सोहळा दाखवित आहेस ॥ ३ ॥ फार काय सांगावें, हा जगजेठी भक्तांसंमुख हात जोडून उभा राहतो असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

गोविंद गुणाचें निधीन । गोविंद नयनीचे अंजन । गोविंद बाळकाचे स्थान । गोविंद चिंतन योगियाचें ॥१॥ गोविंद पांघुरे कांबळा । गोविंद कृपेचा कोंवळा । गोविंद भावा लागीं भोळा । गोविंदें अजामेळा उद्धरिले ॥२॥ गोविंद बुद्धीची बुद्धी । गोविंद एकली मांदी । गोविंदे हरिली विघ्नव्याधी । गोविंद सिद्धी स्मरलिया ॥३॥ गोविंद गोकुळपाळक । गोविंद अंगवणें एक । गोविंदें दैत्या लावियला धाक । गोविंद शेषशयनी ॥४॥ गोविंद अडलिया काजा कैवारी । गोविंद बुडतीयातें तारी । गोविंदा सोळा सहस्र नारी । गोविंदबाळ ब्रम्हचारी ॥५॥ गोविंद दान दीक्षा गुरु । गोविंदे अढळ केला धुरु । गोविंद्र नामया दातारु । रुक्मिणीवरु गोविंदु ॥६॥

(१८०) गोविंद, हा गुणांचा ठेवा आहे. गोविंद हा डोळ्यानें अंजन, बाळकांचें विश्रांति स्थळ म्हणजे हा गोविंदच होय. किंबहुना योगी लोकांच्या चिंतनाचा विषय म्हणजे हा गोविंदच होय ॥ १ ॥ घोंगडी पांघरणारा असा हा गोविंद आहे. हा गोविंद कृपेचा मृदु आहे. गोविंद हा भाविकांचा प्रेमसखा असून या गोविंदानें अजामेळाचा उद्धार केला ॥ २ ॥ बुद्धीची बुद्धि जर कोणी असेल तर हा गोविंद होय. गोविंद हाच एकटा मंडळ होय. गोविंदाचें स्मरण केलें असतां विघ्न व्याधींचा नाश होतो. गोविंदाचें स्मरण केले असतां सिद्धी मिळते ॥ ३ ॥ गोविंद हाच गोकुळाचा रक्षक असून हाच गोविंद अंगवण (पराक्रम) आहे. हाच गोविंद शेषावर शयन करणारा असून याच गोविंदाचा दैत्यांना दरारा वाटतो ॥४॥ गोविंद हाच अडचणींत

सांपडलेल्याचा कैवार घेणारा, व बुडत असणाऱ्यांना तारणारा होय. हा गोविंद सोळा सहस्र स्त्रियांचा काम पूर्ण करणारा असा हा ब्रह्मचारी गोविंदच होय ॥५॥ गोविंद हाच दावदीक्षा देणारा गुरु होय. ध्रुवाला अढळपद देणारा हाच गोविंद होय. रुक्मिणीचा पति व नामयाला दान देणारा हा गोविंदच होय ॥ ६ ॥

विठ्ठल माउली कृपेची सावली । आठवितां घाली प्रेम पान्हा ॥१॥
न सांगता सर्व जाणें तान्ह भूक । जवळी व्यापक न विसंबे ॥२॥
माया मोह कैसा करावा सर्वथा । अंतरींची व्यथा तोचि जाणे ॥३॥
सुख शांति रूपें लेवविली अंगी । लागों नेदी धगी संसाराची ॥४॥
देऊनि अभय करें कुरवाळी । करित सावली पितांबरें ॥५॥
मुखीं नाम माळा कीर्तन श्रवणीं । लेववीलीं लेणीं नवविध ॥६॥
नयनीं अंजन सूदलें सांवळे । समाधान झालें सर्व अंग ॥७॥
अच्युत अनंत सुवर्णाची पेटी । घातलिसे कंठीं निर्विकार ॥८॥
चतुर्भुज शोभा रूपमध्यें मणि । प्रभा त्रिभुवनीं विराजित ॥९॥
मुक्तलग शुद्ध बिंदुली गोजिरीं । पद्महस्त शिरीं स्थापितसे ॥१०॥
संत पायरज कपाळीं टिळका । नाहीं भय शंका कळिकाळा ॥११॥
सगुण साजिरा कटीं कडदोरा । अवर्ण दुर्भरा दृढ बोधु ॥१२॥
काम क्रोधादिक करूनि पुतळे । पाय जे घातले पायवाट ॥१३॥
वासनेची दृष्टी लागेल त्या क्षणीं । उभा चक्रपाणी मागें पुढें ॥१४॥
संत पायीं नामा शृंगार मंडितु । अखंड क्रीडतु महाद्वारीं ॥१५॥

(१८१) ही विठ्ठल माऊली, जणूं काय दयेची छायाच होय. जिचें स्मरण करितांच ती मुखामध्यें प्रेमाच्या धारा घालते ॥ १ ॥ ती अंतर्यामी होण्यानें न बोलतांहि माझ्या तहान भुकेला जाणते. जवळ असो अथवा इतर ठिकाणीं (व्यापक) असो; ती मला विसरत नाहीं ॥ २ ॥ सर्वस्वी प्रेम, ममता कसें करावें यांत तज्ज्ञ होण्यानें तो माझी अंतस्थ दुःखें पूर्ण जाणतो ॥ ३ ॥ मला संसाराचें दुःख न व्हावें म्हणून माझ्या अंगावर त्यानें सुख

शांतीचे अलंकार घातले ॥ ४ ॥ तो अभय हस्तानें मला कुरवाळतो आणि आपल्या पीतांबरानें माझ्यावर छाया करितो ॥ ५ ॥ माझ्या मुखामध्यें त्याच्या नामाची माळ आणि कानामध्यें कीर्तनाचें श्रवण अशा नऊ प्रकारच्या अलंकारांनीं मला सुशोभित करितो ॥ ६ ॥ त्यानें माझ्या डोळ्यामध्यें सांवळ्या रूपाचें अंजन घातल्यानें माझें अंत:करण समाधानास प्राप्त झालें ॥ ७ ॥ अच्युत, अनंत, हीच कोणी सुवर्णाची पेटी, ती माझ्या कंठामध्यें निर्विकारपणें घातली ॥ ८ ॥ तो चारी हातांनी सुशोभित असून त्याच्या कंठांत मध्यभागी असलेल्या कौस्तुभ मण्याचा प्रकाश त्रिभुवनामध्यें फांकला गेला आहे ॥ ९ ॥ त्याच्या दंडामध्ये मोत्याचा अलंकार असून त्यानें माझ्या मस्तकावर पद्महस्त ठेवला आहे ॥ १० ॥ ज्याच्या मस्तकावर संताच्या पायाच्या धूळीचा टिळक लावलेला असून त्यायोगें कळीकाळाची भीती नष्ट झाली ॥ ११ ॥ त्याची सगुण मूर्ति शोभायमान असून त्याच्या कमरेला कटिदोर आहे त्याचा शुद्ध बोध हा अनिर्वचनीय आणि श्रेष्ठ आहे ॥१२॥ काम क्रोधादिक हेच कोणी पुतळे ते पायामध्यें घातले असून त्याची पायवाट केली ॥ १३ ॥ वासनेची दृष्ट लागूं नये म्हणून हा चक्रपाणी भक्तांच्या संरक्षणार्थ त्यांच्या मागेंपुढे उभा आहे ॥ १४ ॥ हा नामा संतांच्या चरणीं शोभायमान होऊन तो महाद्वारामधें सतत नाचतो ॥ १५ ॥

एक गोक्षीर धाम धवळा । एक तो सहज मेघ सांवळा । एक कंठीं रुंडमाळा । एक गळां वैजयंती ॥१॥ एक तो वृषभारूढ जाण । एका साजे गरुडवाहन । एक स्मशानीं भस्मोद्धुळण । एका शयन क्षीरसागरीं ॥२॥ एक तो भोळा कैलासीं चक्रवर्ती । एक तो वैकुंठाधिपती । एका सुरवर मुगुटीं वंदिती । एका अंगुष्ठीं गंगा वाहे ॥३॥ एकाचि चरणीं नेपुरें झणत्कारु । एका पायीं रुळे तोडरु । एका परिधान व्याघ्रांबरु । एका पीतांबरु कसियला ॥४॥ एका नरकपाल खट्वांग डमरु त्रिशूळ । एका शंख चक्र गदा कमळ । एका अर्धांगीं हैमवती बाळ । एका कमळा वामभागीं ॥५॥ एक त्रिपुर संधानीं लक्ष न चुके । एक बाणें वाळी वधिला कौतुकें ॥ विष्णुदास नामा एक रूप देखे । हरिहर कौतुकें वर्णितसे ॥६॥

(१८२) एकाचें घर शुभ्र (कैलास) अशा दुधासारखें आहे, तर एकाचें सौंदर्य शुद्ध मेघासारखें सांवळें आहे. एकाच्या कंठांत रुंडमाळा आहेत, तर एकाच्या गळ्यांत वैजयंतीच्या माळा आहेत ॥ १ ॥ एक तर बैलावर बसला आहे आणि दुसऱ्याचें वाहन गरुड आहे एकाचा वास स्मशानांत असून त्यानें अंगावर राख फांसली आहे, तर दुसऱ्याचा रहिवास क्षीरसागरामध्यें आहे ॥ २ ॥ एक तर भोळा असून कैलासाचा चक्रवर्ती राजा आहे, व दुसरा वैकुंठाधिपति आहे. एकाला इंद्रादिक देवता आपल्या मुकुटावर धारण करितात, तर दुसऱ्याच्या अंगुष्ठापासून गंगा वहात आहे ॥ ३ ॥ एकाच्या पायांत नेपुरें रुणझुण आवाज करितात, तर दुसऱ्याच्या पायांत तोडे शोभा देतात. एकानें व्याघ्रांबर धारण केलें आहे, तर दुसऱ्यानें आपल्या कंबरेला पीतांबर कसला आहे ॥ ४ ॥ एकाच्या हातांत मनुष्याच्या डोक्याच्या कवटी, खट्वांग, डमरु आणि त्रिशूळ आहे तर दुसऱ्याच्या हातांत शंख, चक्र, गदा आणि कमळ आहे एकाची अर्धांगी ही हिमालयाची कन्या जी पार्वती ती आहे, तर दुसऱ्याची अर्धांगी कमळा–लक्ष्मी आहे ॥ ५ ॥ त्रिपुराच्या वधकालीं एकाचा बाण अचूक ठरला, तर दुसऱ्यानें वाळीचा वध कौतुकानें सहज केला. अशा या दोन रूपांनी नटणाऱ्या हरिहरांला विष्णुदास नामा एक रूपानें पहातो आणि त्यांचें वर्णन कौतुकानें करितो ॥ ६ ॥

दुरोनि ओळंगिल्या अविनाश देताहे। तो जवळी जातां काय देईल नेणों ॥१॥ ऐसा तू कृपाळु लक्षुमीचा कांत। सांडूनि होतात कष्टीं झणीं ॥२॥ सेवा माझा स्वामि वैकुंठनायक। भुक्ति मुक्ति नायक पांडुरंग ॥३॥ साधिलें नगर देऊनियां शिर। कष्ट दश शिरें एवढें केले ॥४॥ तें दिले बिभिषणा एका नमस्कारा। त्या माझ्या उदारा कां न भजा ॥५॥ मांडीवरी बैसों नेदी सापत्न माता। ह्मणे राजसुता नव्हसी तू ॥६॥ हे ऐकोनी वना जाय तो तत्वता। सकळ माथां वरिष्ठ केला ॥७॥ दुर्योधनें भोजना बहु केले सायास। परि न घे ग्रास तया घरीं ॥८॥ विदुराचे घरीं न पुसतां जाय।

भक्ति प्रीय होय स्वामि माझा ॥९॥ आर्जुनाचे काजीं सांडी निज पैजा । सुदर्शन वोजा धरियेलें ॥१०॥ आपण लटिका झाला भीष्म साच केला । काळाचा अमुला स्वामि माझा ॥११॥ दीक्षित अवदान देती निज करीं । परि मुख न करी तयांकडे ॥१२॥ सुदाम्याचे पोहे देखे दृष्टिभरी । तयासी श्रीहरी पसरी हात ॥१३॥ ह्मणूनि हा गावा म्हणूनिया ध्यावा । तोचि आराधावा हृदय कमळीं ॥१४॥ हरि गुण नाम हेंचि प्रिय आम्हां । कीर्ति गाय नामा होऊनि भाट ॥१५॥

(१८३) ज्याच्या दुरूनच दर्शनानें अविनाश पद प्राप्त होतें, अशा देवरायाच्या जवळ गेलों असतां काय अपूर्व फळ देईल हें समजत नाही ॥१॥ हे लक्ष्मीपती, असा तूं कृपाळू आहेस. तुझ्या वियोगानेंच ही कष्ट परंपरा प्राप्त होते ॥ २ ॥ हा पांडुरंगराय भुक्ति मुक्ति नायक असून वैकुंठाचा स्वामी आहे. तुम्ही माझ्या सेवेचा स्वीकार करा ॥ ३ ॥ ज्या नगराच्या रक्षणार्थ रावणानें आपली मस्तकें अर्पण करण्याचें कष्ट सहन केलें ॥ ४ ॥ बिभीषणानें फक्त नमस्कार केला असतां त्याला यांनीं ही नगरी प्रेमानें बहाल केली, अशा माझ्या उदार देवरायांचें भजन तुम्हीं कां बरें करीत नाहीं ॥ ५ ॥ सापत्न पुत्र ध्रुव बाळक हा राजाच्या मांडीवर बसला असतां त्याला सापत्न आईनें, तूं राजपुत्र नव्हेस असें म्हणून मांडीवरून खालीं ओढलें ॥ ६ ॥ असा हा अपमान होतांच त्यानें वनामध्यें प्रवेश केला आणि तेथें तुझें भजन केल्यानें त्याला सर्व देवांच्या वरील वरिष्ठ स्थळ तूं दिलेंस ॥ ७ ॥ या देवरायांनी आपले येथें भोजन करावें म्हणून दुर्योधनानें अति आग्रह केला असतांहि त्याच्या येथें या देवरायानें एकहि घास घेतला नाहीं ॥ ८ ॥ मात्र विदुराचें घरीं अनिमंत्रित जाऊन त्याचे येथें कण्या भाकरी खाल्ल्या, असा हा माझा स्वामी भक्तप्रिय आहे ॥ ९ ॥ मी शस्त्र धारण करणार नाहीं अशी तुमची (कृष्णाची) प्रतिज्ञा असतांहि अर्जुनाच्या कार्यार्थ तुम्हीं सुदर्शन हातीं घेऊन स्वप्रतिज्ञेचा भंग केला ॥ १० ॥ भीष्माचार्याला,

खरा ठरवून आपलेकडे तुम्ही खोटेपणा घेतला, असा हा माझा स्वामी अनादि आहे ॥११॥ दीक्षित ब्राम्हण हे आपल्या हातांनीं यज्ञामध्यें आहुति देत असतां त्यांचेकडे जो मुखहि करीत नाहीं ॥ १२ ॥ असा हा हरि सुदाम्याचे पोहे डोळ्यांनीं पाहतांच ते मिळण्याकरितां त्याचेपुढें हात पसरतो ॥ १३ ॥ आणि म्हणूनच त्याचें गायन करावें, त्याचें ध्यान करावें, आणि त्याचीच आपल्या हृदय कमळामध्यें आराधना करावी ॥ १४ ॥ हरीचे गुण आणि नाम हेंच आम्हांला प्रिय आहे. नामदेवराय हे त्याचे भाट होऊन त्याची कीर्ति गातात ॥ १५ ॥

अज्ञान बाळकें तुझा हाकार केला । तेणें तये वेळां स्वर्ग भेदिला । ऐकूनि धाविलाला । अहो देवी खेचरे ॥१॥ स्तंभीं प्रगटलीसे हाक । कापिन्नले तिन्हि लोक । भेणें पळती शंखादिक । आणि कैलास आंदोळले ॥२॥ आली त्रिभुवन देवता । नाभी नाभीरे म्हणतां । माझा प्रल्हाद केउता । तो कवणें रे गांजिला ॥३॥ वदन पसरूनि विक्राळ । झरझरीत झरे लाळ । नेत्र जैसे वडवानळ । शोषूं पाहे जळनिधि ॥४॥ संहार झाला नागकुळ । भ्याले अष्टहि लोकपाळ । स्वर्गी सुटली खळबळ । अमरावतीं इंद्रासी ॥५॥ मग दैत्यातें पाचारित । लोह खणखणा वाजत । हाकी अंबर गर्जत । तेणें कांपे मेदिनी ॥६॥ कवटाळूनि चहूं हातीं । विदारिलें चपेट घाली । जैसा रुद्र प्रळयांतीं । तैसा हरी दिसतसे ॥ ७ ॥ दैत्य न मरे कवणें परी । मग तो धरिला जान्हूवरी । देखें उदर फोडूनि सत्वरीं । अस्थि चूर्ण केली या ॥ ८ ॥ मोदे नाचती देवता । मुक्ति दिल्ही दैत्यनाथा । नामया स्वामि वरदहस्ता । अभयदाता भक्तांसीं ॥ ९ ॥

(१८४) स्वर्गाला भेद करणारी अशी गर्जना बालक प्रल्हादानें केली असतां ती ऐकून अहो देवा तुम्ही धांवत आलां ॥ १ ॥ खांबामध्यें गर्जनेचा ध्वनि घुमूं लागला असता तिन्ही लोकांतील देवता कंपायमान झाल्या, त्या

भीतीनें शंखादिक पळत सुटले आणि कैलास पर्वत दोलायमान होऊं लागला ॥ २ ॥ अशा प्रसंगीं त्रिभुवनाची देवता जी नरसिंह मूर्ति ती तेथें अवतरित झाली. व तिनें भिऊं नको, भिऊं नको, असें आश्वासन दिलें. माझा प्रल्हाद कोठें आहे आणि त्याची छळणूक कोणाकडून होत आहे अशी पृच्छा केली ॥ ३ ॥ ज्यांनीं आपलें विक्राळ मुख पसरलें आहे व त्यांतून लाळ गळत आहे, ज्याचे नेत्र वडवानळ अग्नी सारखे जळीत होऊन जणुं काय सर्व महासागर शोषण होऊं पहात आहे ॥ ४ ॥ सर्पाचीं कुळें सर्व दग्ध होऊं पहात आहेत, अष्ट लोकपालहि भयग्रस्त झाले आहेत, स्वर्गामध्यें इंद्राच्या अमरावतीची खळबळ झाली आहे ॥ ५ ॥ नंतर या देवरायानीं हिरण्यकशिपूच्या नांवानें आरोळी ठोकली त्या योगें तें जणुं काय लोखंडच परस्परामध्यें घर्षण करीत आहे अशा ध्वनीनें सर्व आकाश दुमदुमून गेलें व पृथ्वी कंपायमान झाली ॥ ६ ॥ या देवरायांनीं आपल्या चारी हातांनीं हिरण्यकशिपूला कवटाळून त्याचें पोट फाडलें- मला तर असें वाटतें कीं हा हरी प्रलयकाळचा जणूं काय रुद्रावतारच होय ॥ ७ ॥ हा दैत्य कोणत्याहि प्रकारें मृत्यु पावत नाहीं. तेव्हां या देवरायानें त्याला आपल्या मांडीवर घेतलें व त्याचे पोट भेदुन त्याचीं हाडें चूर्ण केलीं ॥ ८ ॥ देवता आनंदानें नाचूं लागल्या आहेत व दैत्याला मुक्ति दिली. आपल्या अभय हातानें वर देणारा असा हा नामयाचा स्वामी होय ॥ ९ ॥

आणि सादिसिद्धि जयाचिया दासी । उणें तयापासीं काय आहे ॥१॥ आणिकाचे द्वारीं सांडोवा पै होसी । धिग् धिग् न लाजसी अरे जना ॥२॥ सुलभ सोपारा सेवा माझा स्वामी । म्हणतां जोडे नामी एक वाचे ॥३॥ अजामेळ वैकुंठा एक नेला नामें । गणिका विमानें स्वयें नेली ॥४॥ ऐसा हा कृपाळू आसनीं शयनीं । न विसंबावा मनीं भाग्यवंती ॥५॥ जटायु पक्षियाचें स्वयें झाला लेंकरू । त्याचा क्रिया पारु केला रामें ॥६॥ शबरीची फळें उच्छिष्टें ही खायवा ना विसरती पाय कैसे प्राणी ॥७॥ शाहाणिया द्वारपाळ ह्मणतां लाज थोरी । जरी झाला भिकारी न साहे ॥ ८ ॥ तो बळीचा द्वारपाळु

सारथी पार्थाचा । तो गोसावी आमुचा देवराणा ॥ ९ ॥ गर्भवास तया न होती रे जना । म्हणोनि लोक भजना प्रवर्तले ॥ १० ॥ अंबऋषिरायास पडले सायास । साहिले गर्भवास सकळ देवें ॥११॥ उच्छिष्ट हें खातां प्रायश्चित असे । तो गोपाळाचें कैसे खाय हरी ।१२ त्या सुखा लाभासी सुखर इच्छिती । ऐसा लक्ष्मीपति कां न भजवा ॥१३॥ म्हणोनि सोइरा आन दुजा नाहीं । गुरु पिता पाहीं हाचि बंधु ॥ १४॥ सज्जन सांगति अनेक नाहीं आम्हां । कीर्ति वर्णी नामा होऊनि भाट ॥ १५ ॥

(१८५) ज्याचे येथें अणिमादिक अष्ट सिद्धि दासी होऊन राहतात, तेथें हो काय कमी असणार ॥ १ ॥ अहो जनहो, असा हा माझा देवराय ऐश्वर्य संपन्न असतांहि त्याचा त्याग करून इतरांच्या दारीं पडून रहावें हें धि:कारास्पद होय. (अशा या निर्लज्ज स्थितीचा धिक्कार असो) ॥२॥ हा माझा स्वामी सहज सुलभ आहे. फक्त नामोच्चार केला असतां त्याची प्राप्ती होते ॥ ३ ॥ अजामिळासारख्या पाप्याला केवळ एका नामोच्चारानेंच वैकुंठास तुम्हीं नेलें ना ? तसेंच गणिकेला तर स्वतः होऊन वैकुंठास नेलें ॥ ४ ॥ म्हणून जे भाग्यवंत आहेत त्यांनीं माझ्या या कृपाळू देवरायाचे आसनीं व भोजन करीत असतां विसर पडूं देऊं नका ॥ ५ ॥ हा देवराय जटायु पक्ष्याचा तर स्वतः पुत्र झाला. त्याचें सव क्रिया-कर्म या श्रीराम प्रभूनें केलीं नाहीं काय ? ॥ ६ ॥ या रामरायानें शबरी भिल्लिणीचीं उष्टीं बोरें खाल्लीं नाहींत काय ? परंतु ह्या प्राण्यांना त्याच्या पायाचें का विस्मरण होतें ? ॥ ७ ॥ एकादा सुज्ञ मनुष्य भिकारी असतांहि त्याला जर कोणी द्वाररक्षक संबोधिले तर त्यास ते सहन होत नाहीं ॥ ८ ॥ परंतु हा आमचा स्वामी देवराणा यानें बळीचें द्वाररक्षण केलें आणि अर्जुनाचें सारथ्य तर केलें ॥ ९ ॥ आपणास पुनर्जन्म येऊं नये म्हणून लोक देवरायाच्या भजनाकडे प्रवृत्त होतात ॥ १० ॥ परंतु अंबऋषीला अति कष्ट झालेले पाहून त्याच्याकरितां देवरायानें प्रत्यक्ष दहा जन्म घेतले ॥ ११ ॥ कोणानें उच्छिष्ट खाणें हें सदोष आहे. त्याकरितां प्रायश्चित्त सांगितलें आहे हें खरें, परंतु, या

हरीनें गोपाळांचें उच्छिष्ट खाल्लें नाहीं काय ? ॥ १२ ॥ अशा शेष प्रसादाचे सेवनाकरितां इंद्रादिक देवांनाहि आनंद होतो. अशा या लक्ष्मीपति देवरायाची सेवा कां करूं नये ? ॥ १३ ॥ आणि म्हणून या देवराया सारखा दुसरा कोणी मला प्रियकर नाहीं. गुरु, वडील, बंधु या रूपानें माझा तोच आहे ॥ १४ ॥ आम्हांला दुसऱ्या कोणाचाहि आधार नाहीं असें सज्जन पुरुष सांगतात. नामदेवराय हे त्याचे भाट होऊन त्याची कीर्ति गातात ॥१५॥

देवा तूं होसी जया प्रसन्न । तया नलगे कर्म बंधन । निकें म्हणती सकळ जन । निचलोक वंदिती ॥१॥ तुझी दृष्टी कृपावंता । जया वरी पडे अनाथनाथा । तया न बाधी संसार व्यथा । सर्वस्व त्याचें हरीसी ॥२॥ माती धरिल्या होय कनक । भोग भोगिती परम मूर्ख । नाढळती महादोष । मुखी नाम गर्जतां ॥३॥ धन्य धन्य ते संसारी । पुरुष अथवा हो नारी । दरिद्र नाहीं त्यांचे घरीं । तूं श्रीहरी सानुकुळ झालिया ॥४॥ ऋद्धि सिद्धि द्वारीं ओळंगती । वैरी दास्यत्व करिती । विषें अमृतें होती । तूं श्रीपति सानुकुळ झालिया ॥ ५ ॥ तेथूनि नेसील परतें । नामा म्हणे वैकुंठातें । लक्षा नये चहूं वेदांतें । नाना मतें धुंडाळितां ॥६॥

(१८६) हे देवराया, ज्यांच्यावर तुमच्या कृपेची पाखर आहे तो कर्मकटकटींतून मुक्त होतो. सर्व जग त्याची स्तुति करतातच परंतु, खल पुरुषहीं त्यांचे वंदन करितात ॥ १ ॥ हे दयावंता, तुझी कृपा दृष्टि ज्या कोणावर पडते त्याला संसार दुःखाची बाधा न होतां त्याचे सर्व ताप तूं हरण करितोस ॥ २ ॥ अशा या भाग्यवानानें हातांत माती घेतली असतां तिचें सोनें होतें. असें असतांहि जे कोणी विषयभोग भोगतात ते मूर्ख होत. मात्र जे कोणी नामाची गर्जना करितात त्यांना महादोषांचा स्पर्श होत नाहीं ॥३॥ हे हरी, ज्यांना तूं अनुकूल झाला आहेस ते या संसारांत धन्य होत. मग ते पुरुष असोत कीं स्त्री असो. त्यांच्या घरीं दारिद्र्याचा प्रवेश होत नाहीं ॥४॥ हे श्रीपती, तूं ज्यांना अनुकूल होतोस त्यांच्या घरीं ऋद्धि सिद्धि प्रवेश करितात, शत्रु हे त्यांचे गुलाम होतात, विष हें त्यांस अमृत

होतें ॥५॥ जो चारी वेदांना (ज्ञान) गोचर होत नाहीं अथवा पुष्कळ मतांचा शोध केला असतां हि जो सांपडत नाहीं असा हा परमात्मा (मला) या संसारांतून मुक्त करून वैकुंठांत घेऊन जाईल, असें नामदेवराय म्हणतात ॥६॥

पांडव भाग्याची वर्णावया थोरी । शेषाची वैखरी न वर्णवे ॥१॥
पीतांबर कास घालूनि वनमाळी । काढी उष्टावळी आवडीनें ॥२॥
विधीचा जनक रमा जयाची दासी । ध्यान अहर्निशीं करी शिव ॥३॥
रोमीं जयाचे ब्रह्मांडें अनंत । चारी वेदां अंत न कळे ज्याचा ॥४॥
नामा म्हणे राबे भक्तांचिये घरीं । भाव देखोनि हरि भुलतसे ॥५॥

(१८७) पांडवांच्या भाग्याचें वर्णन करण्यास प्रवृत्त झालेल्या शेषाची वाणी कुंठित होते ॥१॥ हा वनमाळी कंबरेला पितांबर बांधून त्यांच्या (पांडवांच्या) घरच्या उष्टया पत्रावळी प्रेमानें काढीत असे ॥२॥ जो ब्रह्मदेवाचा बाप, लक्ष्मी ज्याची दासी व शिव ज्याचें अखंड ध्यान करितो ॥३॥ ज्याच्या प्रत्येक रोमरंध्रांत अनंतब्रह्मांडें सांठविली आहेत, व चारी वेदांना जो अगम्य आहे ॥४॥ असा हा हरि भक्तांच्या प्रेमाला भुलून त्यांच्या घरीं राबतो असें नामदेवराय म्हणतात ॥५॥

नेणे साही शास्त्रें तुज केशिराजा । स्वरूपे कुबजा काय होती ॥१॥
न मागें मी तैसा न मागें मी तैसा । न मागें मी तैसा कदा काळीं ।२
कौरवांचे काजी घेसी गाढेपण । धर्मा घरीं पूर्ण घोडे धूसी ।३
नामा म्हणे आम्ही कीर्ति वाखाणावी । भक्तांसीं गोसांवी होसी देवा ४

(१८८) हे केशीराजा साही शास्त्रांना तुझें माहात्म्य कळणें अगम्य आहे असा तूं कुब्जेसारख्या स्त्रीला भाळला नाहींस काय ? ॥१॥ मी केव्हांहि त्याप्रकारची मागणी करणार नाहीं असें मी तुला त्रिवार सांगतो ॥२॥ तूं कौरवांच्या कार्यांत मोठेपणा घेणारा खरा; परंतु धर्मराजाच्या घरीं तूं घोडे धूत होतास ॥३॥ हे देवराया, तूं भक्तांचा स्वामी होण्यानें आम्हीं फक्त तुझ्या कीर्तीचें वर्णन करावें, असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

पाला खाऊनियां धाला बहिणी घरीं । भक्ति लागीं हरि वेडा झाला ॥ १ ॥ सुदाम्याचे पोहे कोरडेचि खाय । टकमकां पाहे चहूंकडे ॥२॥ विदुराच्या कण्या खाय धणीवरी । झाला बळीचे द्वारीं द्वारपाळ ॥३॥ नामा म्हणे हरिचे न कळती पवाडे । नेणों भक्तां पुढें वेडा झाला ॥४॥

(१८९) बहीण-द्रौपदीच्या घरीं तिच्या भांड्यांत असलेलें भाजीचें पान खाऊन तृप्त होणारा असा हा हरि भक्तिकरितां वेडा झाला ॥१॥ सुदाम्याचें गांठोडें स्वतः सोडून त्यांतील मुठभर पोहे काय खातो व चहूंकडे काय पहातो ॥२॥ विदुराच्या घरीं ढेंकर येईपर्यंत कण्या खाणारा आणि बळीराजाचा हा तर द्वारपाळ झाला ॥३॥ असा हा हरि भक्तांकरितां वेडा होणारा आहे. त्याची कीर्ति अगम्य होय असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

काय वाणूं आतां पायाचा महिमा । जेथें झालीं सीमा बोलायाची ॥१
विठोबाचे पाय आठवितां मनीं । गेले हरपोनी भवभय ॥२॥
पाय नारदानें हृदयीं धरितां । ब्रह्मांडीं मान्यता झाली त्याची ॥३॥
सनकादिकांलागीं पाय वज्र कवच । ब्रम्हादि देवांस पद जेणें ॥४॥
लागतांचि पाय शिळा दिव्य झाली । पाषाण तारिले उदकावरी ।५
पाय ते रमेचे सौभाग्य साजिरें । योगि ऋषीश्वर थोर जेणें ॥६॥
नामा म्हणे मनीं पाय सर्वकाळ । म्हणोनि सुकाळ आनंदाचा ॥७॥

(१९०) या हरीच्या पायाचा महिमा किती म्हणून वर्णन करावा. तो वर्णन करीत असतां वाचा मुग्ध होते ॥१॥ या विठ्ठलरायाच्या पायांचें मनामध्यें स्मरण होतांच संसारभय नष्ट होतें ॥२॥ या हरीचे पाय नारदानें मनामध्यें धारण करतांच तो विश्ववंद्य झाला ॥३॥ हरीचे पाय हे सनकादिकांना जणुं काय वज्रकवच होत. ज्या योगें ब्रह्मादि देवांना पद मिळतें ॥४॥ ज्याच्या पादस्पर्शानें पाषाणमय झालेली अहिल्या दिव्यदेह झाली आणि पाषाणहि पाण्यावर तरंगूं लागले ॥५॥ याचे पाय म्हणजे लक्ष्मीचें गोंडस असें सौभाग्यच होय. ज्याच्या पायाच्या प्रसादानें योगी

आणि ऋषीश्वर हे मान्यतेला प्राप्त झाले ।।६।। हरीचे पाय हे माझ्या मनामध्यें नित्य होण्यानें आनंदाची लयलूट झाली असें नामदेवराय म्हणतात ।।७।।

उभा भीमातिरीं कर कटावरी । राहे निरंतरी भक्तांपुढें ।।१।।
भक्त भाग्य थोर नव्हे कधीं प्राप्ती । जाणोनि श्रीपती गुज बोले ।२
गणिका गजेंद्र उद्धव नारद । आपण गोविंद मिळोनियां ।।३।।
समुद्र मंथनीं उभा करोनियां । लागतसे पायां नामा म्हणे ।।४।।

(१९१) हा देवराय भीमानदीच्या कांठीं कटीवर हात ठेऊन उभा आहे आणि तो भक्तांची सतत वाट पहातो ।।१।। भक्तांची भेट ही भाग्यानें कधींकाळी होणारी असल्यानें हा श्रीपति त्यांच्याशी गुज गोष्ठी करीत असतो ।।२।। गणिका, गजेंद्र, उद्धव, नारद आणि स्वतः गोविंद ।।३।। यांना समुद्र मंथनी उभा करून (त्यांच्या) पायां पडतो असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

गगनीं ध्रुव तुवां अढ़ळ पै केला । तो बाळ धाकुला न म्हणसी ।१
अजामेळाचें तुवां चुकविलें संकट । ब्राम्हण तो नष्ट न म्हणसी ।२
प्रल्हादाचा तुवां केला कैवारु । वैऱ्याचा कुमरु न म्हणसीं ।३
गजेंद्रपशू सोडविला पानडियें । मूंगखोडो ऐसियें न म्हणसी ।४
रुक्मांगदाची तुवां उद्धरिली नगरी । विषयीं मुरारी न म्हणसी तया ।।५।। ऐसे अपराधी न म्हणसी देवा । नाम तो केशवा विनवीतसे ।। ६ ।।

(१९२) तूं ध्रुवाला आकाशांत अढळ पद दिलें त्यावेळीं ध्रुव हा लहान बाळ आहे (तेव्हां त्यास तें अढळ पद कसें द्यावें) असें म्हटलें नाहींत ।।१।। अजामिळाला संकटांतून मुक्त केलें त्यावेळीं हा ब्राम्हण नष्ट आहे अशा त्याच्या या दोषाकडे तुम्ही पाहिलें नाहीं ।।२।। प्रल्हाद हा शत्रूचा पुत्र आहे असें न म्हणतां तुम्ही त्याचा कैवार घेतला । ३।। गजेंद्राला अथांग अशा डोहांतून सोडविण्या करितां तुम्हीं प्रवृत्त झाला असतां तो पशु आहे हें तुम्हीं पाहिलें नाही ।।४।। रुक्मांगद हा विषयी होता खरा; परंतु

त्याच्या नगरीचा उद्धार केला तेव्हां त्याच्या या दोषाकडे तुम्ही पाहिलें नाहीं ।।५।। हे देवराया तुला शरणांकित होणाऱ्याच्या अनंत अपराधाकडे दुर्लक्ष करितोस असें केशवरायांना नामदेवराय बिनंति करितात ।।६।।

खगावरी स्वारी करूनियां देवा । धांवसी केशवा भक्तांसाठीं ।।१।।
रामा परशुरामा कृष्णा नारायणा । हरी संकर्षणा भक्तांसाठीं ।।२।।
विभीषण तारी रावणासी मारी । दावी भाव हरी भक्तांसाठीं ।।३।।
नामा म्हणे भक्तां कारणें गोविंदा । घेवोनियां गदा उभा ठासी ।।४।।

(१९३) हे देवराया, तूं भक्तकार्यार्थ गरुडावर बसून धांवून येतोस।।१।। हे देवराया, तूं भक्ताकरितां राम, परशुराम, कृष्ण, नारायण, हरि, संकर्षण ही नामें धारण करितोस ।।२।। रावणाला मारून बिभीषणाचें रक्षण करणारा तूं भक्तांकरितां असे प्रेम करितोस ।।३।। हा हरि, भक्तकार्यार्थ आपल्या हातांत गदाघेऊन सतत उभा असतो, असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

कौस्तुभ सोज्वळ कंठीं शोभताहे । भक्तांसाठीं बाहे उभारिली ।।१।।
आन हितासाठीं करिसी धांवण्या । विदुराच्या कण्या गोड करी ।।२।।
ब्रम्हचारी साक्ष सत्यत्वें करिसी । पुढें तूं धांवसी आवडीनें ।।३।।
वचना अंतर पडों नेदी सत्य । नामा म्हणे भृत्य होसी देवा ।।४।।

(१९४) ज्याच्या कंठामध्यें सोज्वळ असा कौस्तुभमणि शोभत आहे असा हा हरि, त्यानें भक्तांना भेटण्याकरितां आपले हात पुढें केले आहेत ।।१।। इतरांच्या हितासाठीं तर तूं धांवत जातोस, पण विदुराच्या घरच्या कण्याहि प्रेमानें खातोस ।।२।। सोळा सहस्त्र गोपिकांचा भोग घेऊनहि आपण प्रत्यक्ष ब्रम्हचारी आहोंत अशी प्रतिज्ञा स्पष्ट करितोस व ही लीला करण्याकरितां प्रेमानें पुढें धांवतोस ।।३।। आपल्या सत्यभाषणाला हा देवराय केव्हांहि अंतर न देतां भक्तांचा दास होतो असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

दर्दुराचें पिलूं म्हणे रामकृष्ण । नाहीं उदक उष्ण झालें तेथें ।।१।।
कढईमध्यें बाळ करी तळमळ । गोविंद गोपाळ पावे वेगीं ।।२।।

तये काळीं आज्ञा केली पावकासी । झणी तापविसी तया लागीं ३
ऐसा तो कृपाळु आपुलिया दासा । आमुचा कोंवसा नामा म्हणे ॥४॥

(१९५) बेडकानें रामकृष्ण या नांमाचा उच्चार केला असतां पाणी कांहीं गरम होत नाहीं ॥१॥ परंतु कढईंतील तेल तप्त झालें असतां त्यामध्यें बाळ पडलें व तें तळमळूं लागले. तेव्हां त्यानें गोविंदा, गोपाळा, अशा तुझ्या नामाचा धांवा केला असतां ॥२॥ तेल गरम होऊं देऊं नकोस, अशी आज्ञा अग्नींला तुम्हीं केली नाहीं काय? ॥३॥ असा हा देवराय भक्तांवर कृपा करणारा आहे आणि आमचा तर प्रिय सखा आहे असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

देवा पांडुरंगा वासुदेवा हरी । गोविंदा मुरारी नारायणा ॥१॥
नारायणा कृष्णा कमळ लोचना । माधवा प्रद्युम्ना रावणारी ॥२॥
रावणारि होसी जानकी टाकूनी । हिंडसी अंगणी अर्जुनाच्या ॥३॥
अर्जुनाच्या घरीं अंगे घोडे धुसी । लज्जा द्रौपदीची राखियेली ।४।
राखशील द्वार भक्ति बळिवंता । नामा म्हणे आतां काय सांगूं ।५।

(१९६) हे देवा, पांडुरंगा, वासुदेवा, हरि, गोविंदा, मुरारि, नारायणा ॥१॥ नारायणा, कृष्णा, कमललोचना, माधवा प्रद्युम्ना, रावणाचा शत्रू ॥२॥ तूं सीतेला टाकूण रावणाचा शत्रु होणारा आणि अर्जुनाच्या घरीं वारीं करणारा होतोस ॥३॥ अर्जुनाच्या येथील घोडे धुणारा असा असून द्रौपदीची लज्जा राखणारा आहेस ॥४॥ बळीच्या प्रेमाला भुलून त्याचा तूं द्वाररक्षक झालास आतां यापेक्षां मी जास्त काय सांगूं, असें नामदेवराय म्हणतात ॥५॥

भरतें त्यागिली जननी । ख्याती झाली त्रिभुवनीं ॥१॥
ऐसी भक्ति तुझी हरी । जगी करंटा न करी ॥२॥
बंधु अवज्ञी बिभिषणा । प्रगट झाला रामराणा ॥३॥
प्रल्हाद पिता आज्ञा मान्य न करी । स्तंभीं प्रगटला नरहरी ॥४॥
पति अवज्ञा ऋषि पत्न्यांसी । कृष्ण दर्शन पूर्ण त्यासी ॥५॥
नामा म्हणे भक्ता अवरोधी पाही । त्यासी त्यजिल्या दोष नाहीं ६

(१९७) भरतानें तुझ्या प्रेमाकरितां आपल्या आईचा त्याग केल्यानें त्याची त्रैलोक्यांत कीर्ति झाली ॥१॥ अमा तुझ्या भक्तीचा प्रभाव असल्यानें तूं मला जगतात दरिद्री (करंटा) करूं नकोस ॥२॥ बंधूची अवज्ञा करणाऱ्या बिभीषणाकरितां हा रामराणा तेथें प्रत्यक्ष उपस्थित झाला ॥३॥ पित्याच्या आज्ञेचा भंग करणारा जो प्रल्हाद त्याच्या करितां हा नरहरी खांबामध्यें प्रकट झाला ॥४॥ ऋषिपत्नींनीं आपल्या पतीच्या आज्ञेचा भंग केला खरा; परंतु, त्यांचें (ऋषिपत्नींचें) तुमच्यावर प्रेम असल्यानें त्यांना कृष्णदर्शन घडलें ॥५॥ भक्तांच्या भक्तीमध्यें अडथळा आणणारा कोणीहि असो, त्याची अवज्ञा करण्यांत कांहींच दोष घडत नाहीं, असें नामदेवराय म्हणतात ॥६॥

पंढरीचा देव बहुत कोंवळा । सगुण सांवळा सारथि हा ॥१॥
सारथि सर्वांचा साक्षीभूत असे । संकटीं सायासें गजेंद्रासी ॥२॥
गजेंद्रासीं रक्षी गणिका उद्धरी । भिल्लीणीचे करी फळें भक्षी ॥३॥
भक्षी सुदाम्याचे पोहे मुष्ठि भरी । नामा म्हणे हरि गोड मानी ॥४॥

(१९८) हा पंढरी क्षेत्रांतील देवराय अति कोवळा आणि सगुण सांवळा असून घोडे हांकलणारा आहे ॥१॥ सर्वांचें सारथ्य करणारा असून तो सर्वांचा साक्षीभूत आहे व गजेंद्राच्या संकट समयीं त्यांस साहाय्य करणारा आहे ॥२॥ तो गजेंद्राचें रक्षण करणारा आणि गणिकेचा उद्धारक असून भिल्लिणीच्या हातचीं उष्टीं बोरे खाणारा आहे ॥३॥ सुदाम्याचे मूठभर पोहे अमृततुल्य मानून अधाशीपणानें खाणारा हा देवराय आहे, असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

पंढरीचा देव पाहतां सगुण । प्रल्हादा कारणें सिद्ध झाला ॥१॥
पंढरीचा देव पतित पावन । उभा नारायण विटेवरी ॥२॥
पंढरीचा देव प्रत्यक्ष उदार । बाळचा भोळचा पार दावीतसे ॥३॥
नामा म्हणे देवा कीर्ति वानूं काय । आम्हांसाठीं सोय केली बापा ॥४॥

(१९९) ह्या पंढरीच्या देवाला पाहिलें असतां तो सगुण आहे आणि तो प्रल्हादाच्या रक्षणार्थ खांबामध्यें अवतीर्ण झाला ॥१॥ पंढरीक्षेत्रांतील

देव हे पतितांचा उद्धार करणारा असून तो विटेवर उभा आहे ॥२॥ बालक व भोळ्यांना पलीकडे नेणारा–संसारांतून मुक्त करणारा असा हा पंढरीक्षेत्रांतील देवराय उदार आहे ॥३॥ हे देवराया, तुझ्या कीर्तीचें किती म्हणून वर्णन करावें ? हे बापा, आमची व्यवस्था करा, असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

सगुण ते ब्रम्ह विटेवरी नीट । कोण्या प्राणी कष्ट होऊं नेदी ॥१॥
देऊनियां क्षेम देह पालटिसी । वृद्ध रूप होसी कर्णासाठीं ॥२॥
भजन भक्तांचें मानिसी वचन । नाम नारायण म्हणे कां रे ॥३॥
उफराटी वदवी वाल्मिका नामाच्या । शतकोटी संख्या प्रविस्तर ४
नामा म्हणे देवा भक्तिचें पै पिसें । त्या लागीं हव्यासें होसी जाण ॥५॥

(२००) कोणालाहि कष्ट न व्हावेत म्हणून हें सगुण ब्रह्म विटेवर उभें आहे ॥१॥ हे देवराया, तूं भक्तांना आलिंगन देऊन त्यांच्या देहाचें परिवर्तन करितोस आणि कर्णाकरितां तर तूं वृद्ध रूप धारण केलेंस ॥२॥ भक्ताच्या भजनाला व त्यांच्या वचनाला मान्यता देणारा अशा नारायणाचा नामोच्चार कां करीत नाहींस बरें ? ॥३॥ वाल्मीक ऋषीनें देवरायाच्या नामाचा उलटा उच्चार केला असतांना या नाम प्रभावें शत कोटी श्लोक रचले ॥४॥ या देवरायाला भक्तांचें जणु काय वेडच लागलें आहे आणि त्याला त्यांच्या भेटीचा हव्यास लागलेला आहे. असें नामदेवराय म्हणतात ॥५॥

शिशुपाळादिकां कोठे शुद्ध भाव । उद्धरी केशव उंच नीच ॥१॥
काय कामा पुत्रा कोण आले जाणा । सेखीं त्या रावणा कैवल्यदानीं २
महादुष्ट शंखासुरें नेले वेद । शेवटीं गोविंदे सोडविलें ॥३॥
पित्याचिये हातीं पुत्रवध करी । कृपाळु बा हरी नामा म्हणे ॥४॥

(२०१) शिशुपाळाचा कां शुद्ध भाव होता ? परंतु त्याचाहि उद्धार या देवरायानें केला. कारण, केशवरायाच्या ठिकाणीं ऊंचनीच भावाचा अत्यंताभाव आहे ॥१॥ संकट समयीं कोणाचे हो पुत्र साहाय्य करणारे

होतात ? परंतु ह्या देवरायांनी मात्र रावणाला संकटकाळी [illegible] दिले ॥२॥ महादुष्ट जो शंखासुर, त्यानें वेद चोरले असतां ह्या गोविंदानेंच ते परत आणून त्याचें रक्षण केले ॥३। बापाकडून मुलाचा वध करविणारा असा हा हरि कृपाळु आहे असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

पांडुरंगा नमूं परात्परा नमूं । सगुणासी नमूं साक्षिभूता ॥१॥
समस्त संबंध साधियेले हरी । रावणादि वैरी उद्धरिले ॥२॥
नामरूपातीता नाहीं भेटा भेट । म्हटले आहे नीट नामा म्हणे ॥३॥

(२०२) परात्पर अशा पांडुरंगरायाला नमन असो. साक्षिभूत अशा सगुण देवरायाला नमन असो ॥१॥ या हरीनें सर्वांचा संबंध राखून रावणादिक वैऱ्यांचाहि उद्धार केला ॥२॥ ज्याच्या ठिकाणीं संयोग वियोग नाहीं आणि जो नामरूपातीत आहे व जो नीट उभा आहे असें नामदेवराय म्हणतात ॥३॥

सगुण समान भजती अंतरीं । सर्व भूतांतरीं असे एक ॥१॥
पहा कोळीयाची काय सांगों कीर्ति । विद्या अभ्यासिती मूर्ति पुढें २
द्रौपदीचे घरी होते उपवासी । देंठहि लावीसी अकस्मात ॥३॥
नामा म्हणे जाण प्रारब्ध-कारण । पांडुरंगाविण गति नाहीं ॥४॥

(२०३) जो सर्व भूतमात्राच्या अंतरांत एकरूपानें-अद्वैत रूपानें आहे आणि साकार मूर्तस्वरूपाने आहे अशा देवरायाला तें साम्यरूपानें भजतात ॥१॥ गुरूच्या मूर्तीचे ठिकाणी एकविध निष्ठा ठेऊन ज्यांनीं धनुर्विद्या [illegible] केली अशा कोळयाच्या कीर्तीचें किती म्हणून वर्णन करावें ॥२॥ ऋषिगण हे द्रौपदीच्या घरी उपवासी आले असतां तू अकस्मात् भांड्याला भाजीचें पान चिकटविलेंस व त्याचें भक्षण करून ऋषिवर्गाला तृप्त केलेंस ॥३॥ येथें हा सर्व व्यवहार प्रारब्धाधीन आहे. खरें पाहतां पांडुरंगाशिवाय तरणोपाय नाहीं असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

सहस्र नामाची घालिता लाखोली । तरला हा कोळी वाल्मीक तो ॥१॥ पुराण प्रसिद्ध गोष्टी ह्या ऐकाव्या । प्रत्यक्ष देखाव्या

कोणें द्यावीं ॥२॥ अंगें अनुभवा आपण आणाव्या । तरीच वाणाव्या संतापुढें ॥३॥ नाही तरी मज वाटे कांनकोंडे । सुधा म्हणे तोंडें चवी नेणें ॥४॥ नामा म्हणे असे पोटामध्यें भूक । तृप्तीचें तें सुख बोलों कैसें ? ॥५॥

(२०४) वाल्हा कोळयानें सहस्त्रनामाच्या लक्षावधि आवर्तनें केलीं । त्यायोगें त्याचा उद्धार झाला नाहीं काय ? ॥१॥ हा सर्व पुराणांतील इतिहास होय–दंतकथा होत. त्याची प्रत्यक्ष प्रतीति कशी व कोठें व्हावी ॥२॥ अशा या नाममहात्म्याची प्रतीति स्वत: घ्यावी, नंतरच संतापुढें त्याचें वाक्पांडित्य करावें ॥३॥ अशी कृति न करितां केवळ वाक्पांडित्य करणें हें अश्लाघ्य असल्यानें तेदुर्लक्ष करण्यासारखें आहे. आणि ही कृति म्हणजे रुचीचा अनुभव न घेतां केवळ तोंडानें अमृत म्हणण्यासारखें होय ॥४॥ पोटीं खमंग भूक असतां तृप्ति झाल्याचा सुखानुभव प्रतिपादन करितां येईल काय ? असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

प्रल्हादा रक्षिलें पांडवां प्रति पाळिलें । तया उभें केलें पुंडलिकें ।१। बिभिषणा स्थापिलें ध्रुवासी अढळ केलें । तया उभे केलें पुंडलीकें ।२ चैद्यादि र्मदिले सुरवर तारीलें । तया उभें केलें पुंडलीकें ॥३॥ अहिल्या उद्धरिलें गजेंद्रा उद्धरिलें । तया उभें केलें पुंडलीके ॥४॥ गयासुरा वधिलें बळीस पाताळीं घातले । तया उभें केले पुंडलीके ५ नामा म्हणे केशवा भक्तांचें ठेवणें । घेऊनि केंवि जाणें घडे तुज ६

(२०५) ज्यानें प्रल्हादाचें संकटांत रक्षण केलें व पांडवांचें सर्व प्रकारें परिपालन केलें अशा या देवरायाला पुंडलीकरायांनीं उभें राहण्याची शिक्षा दिली ॥१॥ ज्यानें बिभीषणाला राज्यारूढ लंकाधिपति केलें व ध्रुवाला अढळ पद दिलें अशा देवरायाला पुंडलीकरायांनीं उभें केलें ॥२॥ ज्यानें चैद्यादि दैत्यांचा नाश केला आणि इंद्रादिक देवांचें रक्षण केलें अशा देवराला पुंडलीकरायांनीं खडा पहारा करण्यास लावलें ॥३॥ ज्यानें अहिल्येचा व गजेंद्राचा उद्धार केला, अशा देवरायाला पुंडलिकरायांनीं विटेवर उभें

केलें ॥४॥ ज्याने गयासुराचा नाश करून बळीराजाला पाताळामध्यें घातलें अशा देवरायाला पुंडलिकरायांनीं उभें केलें ॥५॥ हे केशवराया, ही भक्तांची ठेव तुला कोणत्या प्रकारें हरण करतां येईल, बरे ? असें नामदेवराय म्हणतात ॥६॥

एक अंजनी उत्पन्न । एका खांबीं अवतरण ॥१॥ ते पावले दोघे जण । नरसिंह हनुमंत आपण ॥२॥ एक सिंह नाद करी । एक भुभुःकार करी ॥३॥ एक सीता शुद्धी करी । एक प्रल्हादा कैवारी ॥४॥ एक बाळ ब्रम्हचारी । अर्धांगीं सुंदरी ॥५॥ एक रुद्राचा अवतारु । दुसरा नामया दातारु ॥६॥

(२०६) एकाचा जन्म अंजनीच्या पोटी, तर दुसऱ्याचा जन्म खांबांतून झाला ॥१॥ असे हे नरसिह व हनुमान दोघे होत ॥२॥ एक सिंहासारखा ध्वनि करणारा आणि दुसरा भुःभुःकार करणारा ॥३॥ एकानें सीताशुद्धि केली व दुसऱ्यानें प्रल्हादाचें रक्षण केलें ॥४॥ एक बाळब्रह्मचारी आणि दुसऱ्याला तर सर्वांगसुंदर अशा कांता ॥५॥ एक पहातां शंकराचा अवतार आणि नामदेवरायाचा दाता हा दुसरा ॥६॥

निरंतर नाम जपे । पिता प्रल्हादासी कोपे । उदरा आला वैरी म्हणवूनि धायीं त्रासिला ॥१॥ कोपें कोपला नरहरी । कवण तयातें सांवरी । खटखटा वाजती दांतोरी ॥ दैत्यावरी उठावला ।२ हांक देऊनि अवचिती । आंदोळली त्रिजगती । समुद्र पाणी उसळती । कुलथों पाहती गीरिवर ॥३॥ सिंहवदन प्रगटला । मगंज अवचित उतटला । भेणें वासुकी मोळला । गजबजिला पाताळीं ॥४॥ जैसा प्रळयींत काळिचा मेघु । तैसा गडबडिला वेगु । अरे मगंजाच्या खांबीं सवेगु । क्षणामाजी प्रगटला ॥५॥ केला भक्ताचा कुडावा । शिक्षा लाविली दानवा । नामया स्वामी वोळंगावा । नरहरी विसांवा भक्तांचा ॥ ६ ॥

(२०७) प्रल्हाद हा अखंड नामोच्चार करीत आहे हें पाहून त्याच्या बापाचा क्रोध अनिवार झाला. तूं माझा पुत्र नसून माझ्या पोटीं हाडवैरीच जन्मला कीं काय, असें म्हणून त्यानें हाय खाल्ली-त्रस्त झाला ॥१॥ प्रल्हादाचा असा छळ होत असलेला पाहून नरहरी हा क्रोधाविष्ट झाल्यानें त्याचें दांत खटखटा ध्वनी करूं लागले. अशा आवेशानें तो दैत्यावर तुटून पडला. त्याला आवरण्याची शक्ति कोणाची आहे बरें ? ॥२॥ नरसिंहानें अशा या आवेशानें गर्जना केली असतां त्रैलोक्य दोलायमान झाले, समुद्र उफळून आला आणि पर्वत उलथून पडूं लागले ॥३॥ तेव्हां हा नरहरी मर्गजाच्या (रत्नविशेषाच्या) खांबांतून सिंहमुखानें प्रकट झाला. त्यावेळीं पाताळांतील वासुकी-सर्प हा भयग्रस्त होऊन मुग्ध झाला ॥४॥ प्रलयकालचा मेघ वेगानें गडगडतो तद्वत हा नरसिंह रत्नविशेषाच्या (मर्गजाच्या) खांबांतून क्षणांत वेगानें प्रकट झाला ॥५॥ दैत्याला योग्य शिक्षा देऊन भक्ताचें रक्षण केलें. असा हा नामयाचा स्वामी नरसिंह भक्तांचें विश्रांति स्थान होण्यानें त्याच्या अंकीत व्हावें ॥६॥

वैकुंठाहूनि केलें पेणें । भक्त प्रल्हादा कारणें ॥१॥ नरहरी पावला पावला । महापापा पळ सुटला ॥२॥ शंख चक्र पद्म गदा । महापापा पळ सुटला ॥३॥ पावला गरुड ध्वज । नामया स्वामी केशवराज ॥४॥

(२०८) या नरहरीनें भक्त प्रल्हादाकरितां वैकुंठाहून प्रस्थान केलें ॥१॥ नरहरी प्रसन्न होण्यान महापापांनीं पलायन केलें ॥२॥ त्याच्या हातांतील शंख, चक्र, पद्म, व गदा, यांना पाहून महापापेंहि येथून निघून गेलीं ॥३॥ ज्याच्या ध्वजेवर गरुड आहे असा नामदेवरायाचा स्वामी जो केशीराज तो प्रसन्न झाला ॥४॥

कडक फुटला अंबरी । आला प्रल्हाद कैवारी ॥१॥ आला हाक देतु । सिंह नादें रे गर्जतु ॥२॥ दैत्या दचकु नरहरी । नामया स्वामी नरकेसरी ॥३॥

(२०९) प्रल्हादाचा रक्षणकर्ता हा देवराय आकाशाला भेदून प्रकट झाला ॥१॥ सिंहनादाची गर्जना करीत आणि प्रल्हादाला हांका मारीत धांवत आला ॥२॥ दैत्याला भयानक वाटणारा असा हा नरहरि नामयाचा स्वामी नरकेसरी होय ॥३॥

कायरे गडगडित दुमदुमीत । ब्रह्म कटाह उलथूं पहात ॥ १ ॥
तो देव आला रे नरहरी । आतां कवणा सांवरी ॥ २ ॥
प्रल्हादासी दिधले जैत्य । हर्षे नामा गुढी उभारीत ॥ ३ ॥

(२१०) ज्याच्या भयंकर आवाजानें ब्रह्मांड अणुंकाय दुभंग होऊं पहात आहे ॥१॥ असा हा हरि देवराय धांवतच आला. आतां त्याला कोण सावरणार बरे? ॥२॥ या देवरायांनीं प्रल्हादाला विजयी केलें हें पाहून आनंदोत्कर्षानें नामदेवरायांनीं ध्वज उभारला ॥३॥

पहा हो कडकडिलें गगनीं । भेणें कांपती मेदिनी ॥ १ ॥
तो देव दैत्यासी अंतुक । होय भक्तांसी पालकु ॥ २ ॥
भक्त संकटीं धांवत । क्षणां माजी केला मुक्त ॥ ३ ॥
भोंजें प्रल्हाद नाचतु । नामया स्वामी रे अनंतु ॥ ४ ॥

(२११) ज्याच्या सिंहगर्जनेनें आकाश दुभंग होऊं पहात आहे व त्या ध्वनीच्या भीतीनें पृथ्वी ही भयकंपित झाली आहे ॥१॥ असा हा देवराय, दैत्यांचा नाशक असून भक्तांचें पालन करणारा आहे. ॥२॥ हा भक्तांच्या संकटकाळीं धावत गेला व त्याला क्षणांत मुक्त केलें ॥३॥ नामदेवरायाचा स्वामी जो अनंत त्याला पाहून प्रल्हाद आनंदानें नाचूं लागला ॥४॥

वैकुंठिहूनि धांवत आला । खांबा आड उभा ठेला ॥१॥
खांब गडगडिला । वीर नरसिंह पावला ॥२॥
भक्त हृदयींचें प्रेम । एक जाणे घनःश्याम ॥३॥
पावला नामयाचा स्वामी । जग उद्धरिले याचे नामीं ॥४॥

(२१२) नरसिंह हा भक्त कार्यार्थ वैकुंठाहून धांवत येऊन खांबामागें उभा राहिला खरा ॥१॥ परंतु, त्यायोगें खांब दुभंगला आणि त्यांतून नरसिंह अवतीर्ण झाले ॥२॥ घनश्याम जो परमात्मा त्यालाच भक्ताच्या हृदयांतील प्रेमाची पारख असते ॥३॥ ज्याच्या नामोच्चारानें जगाचा उद्धार होतो असे नामदेवरायाचे स्वामी नरहरी प्रगट झाले ॥४॥

अंबऋषि रुक्मांगद । नारद महामुनी प्रल्हाद ॥१॥
मिळोनि सनकादिकां भारू । पांडुरंगीं हरि जागरू ॥२॥
शंख भेरी नादाकार । नांदे गर्जत अंबर ॥३॥
योग निद्रेसी पहुडला । आदिपुरुष उपवर झाला ॥४॥
देवी उतरोनी विमानीं । आदि क्षीर सागरीं भुवनीं ॥५॥
सुरवर वोळंगती जगन्निवास । गातो नामा विष्णुदास ॥६॥

(२१३) अंबऋषि, रुक्मांगद, महामुनि नारद, प्रल्हाद, ॥१॥ व सनकादिकादिक समूहानें पांडुरंगाचे ठिकाणीं हरिजागर केला ॥२॥ शंख व भेरी यांच्या आवाजानें आकाश दुमदुमून गेले ॥३॥ जो आदि पुरुष योग-निद्रिस्त होता तो उपवर–जागृत झाला ॥४॥ देवादिक हे विमानांतून उतरलेली आहेत आणि त्यांनी क्षीरसागरामध्यें प्रवेश केला ॥५॥ या जगन्निवासाला इंद्रादिक देवताहि शरण होतात आणि विष्णुदास नामा हे त्याचें गीत गातात ॥६॥

पैल गरुडाचे वारिकें । गगनीं कृष्ण येतां देखे ॥१॥
दुडवा दुडवीं हरि धांवत । नाभीं नाभीं नामया म्हणत ॥२॥
वैकुंठाहूनि आले वेगीं । नामयाच्या भेटी लागीं ॥३॥

(२१४) कृष्ण हा गरुडावर आरुढ होऊन पलीकडून येत असतांना मी पाहिला ॥१॥ हा देवराय दुडदुड-त्वरित धांवत येत आहे. व हे नामया, भिऊं नकोस असें द्विरुक्तीनें म्हणत आहे ॥२॥ नामदेव रायाच्या भेटींकरितां हा देवराय वैकुंठाहून धांवतच आले ॥३॥

दिसंदिस कैसा झालासी शहाणा । गोवळांसी खेळसी पंढरीच्या राणा ॥१॥ विश्वामाजी तुझे बोभाट मोठे । जन्म मरणाचें संकल्प तुटे ॥२॥ अकळ करणी न कळे लिहितां धरणी । सिंधुमणी करूनि नाम तुझें ॥३॥ नामा म्हणे कीर्ति काय वानूं देवा । भक्तांचा कुडावा ब्रीद तुझें ॥ ४ ॥

(२१५) हा पंढरीचा राजा दिवसेंदिवस पहा कसा शहाणा होत आहे व गोपाळांशीं खेळ खेळत आहे ॥१॥ ज्या योगें जन्म मरणाचीं बंधनें नष्ट होतात अशा तुझ्या कागाळ्या विश्वभर दुमदुमत आहेत ॥२॥ तुझी अलौकिक कृती इतकी अगम्य आहे की सागराची शाई व पृथ्वीचा कागद केला व त्यावर तुझें नाम लिहिलें तरी तो अपूर्ण होणार आहे ॥३॥ हे देवराया, तुझ्या किर्तीचें माहात्म्य कोणत्या वाणीनें करावें बरें ? भक्तांचें रक्षण करणें हेंच तुझें ब्रीद होय ॥४॥

वेदां जन्मस्थान शास्त्रां समाधान । काय बुझावण दाखविसी ॥१॥
जगादि अनंत अवतार घेसी । चरित्रें दाविसी भक्तांपुढें ॥२॥
पतीत पावन तूंचि नारायण । सत्वर धांवणें दामोदरा ॥३॥
नामा म्हणे भवबंध विमोचका । वैकुंठ नायका पांडुरंगा ॥४॥

(२१६) जो वेदाचें जन्मस्थान आहे आणि ज्याच्या योगें शास्त्रांचें समाधान होतें असा जो तू, काय आमची समजूत करूं पहात आहेस ॥१॥ हे देवराया, जगामध्ये अनंत अवतार घेऊन भक्तांना तूं अनेक अपूर्व कृती करून दाखवीत आहेस ॥२॥ हे नारायणा, तूं पापी पुरुषांचा उद्धारक आहेस ना ? हे दामोदरा, तू आमच्या करितां त्वरीत धांवत ये ॥३॥ हे पांडुरंगा, तूं वैकुंठाचा स्वामी आणि संसारबंधनांतून मुक्त करणारा आहेस, असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

चोरूनि खादलें दही दुध लोणी । तिहीं चक्रपाणि खेळविला ॥१॥
अखंड उन्मत्त मतिमंद पुढें । गौळणी पाशीं रडे रूपें दावी ॥२॥
शकुनीचा पुत्र शिव द्वेष करी । संकट मुरारी निवारिसी ॥३॥
उद्धरिल्या सर्व गोप गवळणी । लीला दाखवूनि नामा म्हणे ॥४॥

(२१७) हे चक्रपाणी, ज्यांच्या घरांतील दहि, दूध, लोणी तूं चोरून खात होतास त्यांनींच ना तुला खेळविलें-लहानाचें मोठें केलें ॥१॥ तूं अखंड उन्मत्त, मंदबुद्धि आणि मूर्ख अशीं रूपें दाखवून गोळयांपाशीं रहत असतोस ना ! ॥२॥ हे मुरारी, शकुनीच्या मुलानें शंकराचा द्वेश केला असतां जी संकट परंपरा कोसळली त्यातून तूंच ना रक्षण केलेंस ? ॥३॥ तूं गोप-गोपिकांना अनंत लीला दाखवून त्यांचा उद्धार केलास ना, असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

तुझे कीर्तना कोण जाये आतां । सख्या भगवंता कृपा करी ॥१॥
भीष्म पहुडला शरांचे पंजरी । तया प्रश्न करी युधिष्ठिर ॥२॥
महाभयेश्वरी विघ्नें निवारितां । सकळां देखतां दांत पाडी ॥३॥
नामा म्हणे तुझी भक्ति अघटित । पवाडे अनंत दाविना कां ॥४॥

(२१८) तुझ्या कीर्तनाकरितां आतां कसें जाणें घडेल हो म्हणून हे सख्या प्रिय भगवंता कृपा कर ॥१॥ भीष्माचार्य बाणांच्या शय्येवर झोंपले असतां राजा युधिष्ठिर त्यांना असा प्रश्न करीत आहेत ॥२॥ हे देवराया, तूं भयंकर अशा विघ्नांचा नाश करणारा आहेस सर्वांसमक्ष शत्रूचे दांत पाडणारा आहेस ॥३॥ हे अनंता तुझ्या भक्तीचें महत्व अपूर्व आहे आणि म्हणून तुझें ऐश्वर्य कां अभिव्यक्त करीत नाहींस, असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

अगम्य सामर्थ्य नयेचि गणना । तारूनि पाषाणा केलें सम ॥१॥
तारिसी वानर अवघेचि सेना । तोडिसी बंधना पांडुरंगा ॥२॥
काय वनचर जाणती प्रत्यक्ष । परिक्षिती साक्ष दिसे सातां ॥३॥
कृतत्रेत द्वापारांचे आदि अंती । नामाचि ते ख्याति म्हणे नामा ॥४

(२१९) हे देवराया, तुझी शक्ति मुग्ध करणारी अशी अनिर्वचनीय आहे, तूं पाण्यामध्यें दगडांना तारून त्यांचा पूल बांधलास ना ॥१॥ हे पांडुरंगा तूं सर्व वानरसेनेचें रक्षण केलेंस आणि तिला सर्व बंधनांतून मुक्त केलेंस ॥२॥ वृथा तुझ्या अद्‌भुत सामर्थ्याचें ज्ञान वानरांना होते काय ? राजा परीक्षितीला सात दिवसांत आत्मसाक्षात्कार करून दिलास, ही प्रत्यक्ष साक्ष नव्हे काय ? ॥३ कृत, त्रेता द्वापार या तिन्ही युगांमध्यें नामाचें महत्व प्रसिद्ध आहे, असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

सर्व देवांमाजी विठ्ठल वरिष्ठ । बोलतसे स्पष्ट वेद शास्त्रीं ॥१॥
अच्युता अनंता माधवा मुकुंदा । गोपाळा गोविंदा गोपवेषा ॥२॥
कृष्णा कमलाक्षा कस्तुरीचा टिळा । नेसला पाटोळा खोंचे शिरीं ।३
नामा ह्मणे रामकृष्ण नारायण । तारिसी पाषाणा सिंधूमाजी ॥४॥

(२२०) विठ्ठलराय हे सर्व देवांमध्यें थोर आहेत असें वेदशास्त्रांत स्पष्ट म्हटलें आहे ॥१॥ हे अच्युता अनंता, माधवा, मुकुंदा, गोपाळा, गोविंदा तूं गोळ्याचा वेश धारण करणारा ॥२॥ कस्तुरीचा टिळा लावलेला आणि नेसलेल्या वस्त्राचा पदर ज्यांनी मस्तकीं खोचलेला आहे अशा श्रीकृष्णा, कमलाक्षा ॥३॥ हा रामकृष्ण नारायण सागरामध्यें दगडहि तरंगवितो असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

षडगुण संपन्न पंढरीच्या राया । आमुच्या स्वामिया केशिराजा ।१
रामकृष्ण हरि श्रीधरा मुकुंदा । सज्जनी स्वानंदा सर्वातीता ॥२॥
गोविंदा गोपाळा गोपवेषधारी । गोवर्धन धरी नखावरीं ॥३॥
दुष्ट दुर्जनाच्या दुखवीना चित्ता । पावन पतिता नामा म्हणे ॥४॥

(२२१) हे केशीराज पंढरीच्या राजा, तूं षड्गुणसंपन्न असून आमचा स्वामी आहेस ॥१॥ हा देवराय रामकृष्ण हरि, श्रीधर, मुकुंद अशा नांमांचा असून तो सर्वातीत व सज्जनांचा स्वानंद आहे ॥२॥ ज्यानें आपल्या नखांवर गोवर्धन पर्वत धारण केला तोच हा गोविंद, गोपाळ, आणि गोळ्यांचा वेष धारण करणारा आहे ॥३॥ हे देवराया, तूं पतितपावन होण्यामें दुष्ट व खळांच्याहि अंतःकरणाला दुःख देत नाहींस असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

संतोषा कारणें सज्जन जीवासी । साहाकारी होसी नारायणा ।१।
समान करिसी सर्वांभूता जाण । पतीत पावन भाक तुझी ॥२॥
भक्ति भाव ज्यांचा भाग्यें आगळिया । होसी देवराया सर्व विघ्न ।३
समर्थपणासी कोणी विचारावें । नामा ह्मणे भावे कारण हा ॥४॥

(२२२) हे नारायणा, सज्जनांच्या चित्ताला समाधान व्हावें म्हणून, तूं त्यांना साहाय्यकारी होतोस ॥१॥ सर्वांनाहि साम्यावस्था प्राप्त करून

देतोस आणि पतितपावन ही तुझी प्रतिज्ञा सिद्ध करितोस ॥२॥ हे देवराया भक्तांच्या ठिकाणीं भक्तिभाव-प्रेम, अपूर्व भाग्य, इत्यादि गुणांच्या कृपानें तूंच आविष्कृत होतोस ॥३॥ तुझें असलेले समर्थपण कोणाला विचारावें ? हा सर्व विलास प्रेमाचा होय असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

अलक्ष्या अच्युता सख्या भक्त राया । तूंचि देवराया पांडुरंगा ॥१॥
परात्परतरा पार नेणे ब्रह्मा । तूंचि निजधामा स्वयें देसी ॥२॥
विश्वामित्रासाठीं विलंब न करी । बळिचिया द्वारीं भृत्य होसी ॥३॥
नामा ह्मणे तुझी माव नेणें कोणी । धांवे चक्रपाणि त्वरें नेटें ॥४॥

(२२३) हे देवराया पांडुरंगा, तूंच प्रिय भक्तांचा स्वामी अलक्ष्य व अच्युत कृपानें आहेस ॥१॥ तूं परात्पर-परेच्या पलीकडे होण्यानें व स्वत. निजधाम देणारा असल्यानें ब्रह्मदेवहि तुला जाणत नाहीं ॥२॥ विश्वामित्राच्या कार्यार्थे तूं यत्किंचितहि विलंब केला नाहींस व बळीराजाच्या द्वारामध्यें उभा पहारा करितोस-त्याचें दास्यत्व करितोस ॥३॥ हे चक्रपाणी, तुझ्या या अघटित कृती अगम्य होत. त्या कोणासहि आकलन होत नाहींत. असा तूं, आमच्या करितां त्वरित धांवत ये, असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

योगि मुनिजन तपस्वी याज्ञिक । ते तंव पादुका वंदिती शिरीं ॥१॥
हरिहर ब्रह्मा सूर्य चंद्रादिक । ओढवी मस्तक रजरेणु ॥२॥
गंगा भागीरथी होती सुचिमंत । आणिकांची मात काय सांगों ॥३॥
नामा म्हणे नेणो पार तुझा देवा । कृपाळू केशवा केशिराज ॥४॥

(२२४) हे नामदेवराया, योगी, मुनिजन, तपस्वी आणि याज्ञीक इत्यादिक थोर पुरुष तुझ्या पादुका आपल्या मस्तकीं धारण करितात ॥१॥ हरिहर, ब्रह्मा, सूर्य व चंद्रादिक हे तुझ्या चरणधुळीला मस्तकीं धारण करितात ॥२॥ गंगा, भागीरथी ही तीर्थें पवित्र खरें; परंतु तींहि तुझ्या चरणस्पर्शानें पवित्रांत पवित्र होतात पण इतरांची गोष्टच काय सांगावी ॥३॥ हे केशवा, केशिराजा, तूं कृपाळू आहेस, तुझा महिमा अगाध आहे असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

भक्त पुंडलिका देखोनि नयनीं । आलासी वैकुंठाहूनि आधीं देवा ॥१॥
नारद वचन ऐकोनियां मनीं । सुखें चक्रपाणी सुखावला ॥२॥
सुखरूप सदा देव दुरी ठेला । मुनीश्वरकाला स्वयें दावी ॥३॥
नामा म्हणे तुज भक्ति पीसे फार । साधिले नगर क्षणमात्रें ॥४॥

(२२५) हे देवराया, तूं आज पुंडलीकाला डोळयांनीं पहातांच वैकुंठाहून आगमन केलेंस ॥१॥ या चक्रपाणि देवानें नारदाचें भाषण ऐकतांच तो मनामध्यें अति आनंदित झाला ॥२॥ नित्य सुखरूप असा देवराय अतिदूर खरा (अगम्य खरा) परंतु तो मुनीश्वराच्या पुढें स्वतः संमुख होतो ॥३॥ या देवरायाला भक्तीचें-प्रेमाचें फारच वेड आहे. त्यानें क्षणांत सुवर्णाची नगरी केली असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

चारी वेद गात जयासी अखंड । नेणवे प्रचंड कीर्ति ज्याची ॥१॥
तोचि भीमातीरीं उभा दिगंबर । ठेवीं कटी कर भक्तांसाठीं ॥२॥
युद्धीं अर्जुनातें सांगितली गीता । सहस्रशा कांता केल्या ज्यानें ॥३॥
नामा म्हणे शिवा दिलें शिवपण । ब्रम्हया लागोन उपदेश ॥४॥

(२२६) ज्या देवरायाचें चारी वेद सतत गान करितात परंतु त्याच्या अगाध कीर्तीला ते जाणत नाहींत ॥१॥ असा हा देवराय, भक्तांकरितां म्हणून भीमेच्या कांठीं कंबरेवर हात ठेऊन दिगंबर असा उभा राहिला आहे ॥२॥ ज्यांनीं अर्जुनाला युद्धांत गीता सांगितली आणि ज्यांनीं सोळा सहस्र बायका केल्या ॥३॥ अशा या देवरायांनीं शिवाला शिवपण दिलें व ब्रम्हदेवाला उपदेश दिला असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

विश्वांच्या मोहूना कपट नाटका । पंढरी नायका पांडुरंगा ॥१॥
अवतार धरूनि होऊनि निमित्त । बुजविसी दैत्य सर्प खाणी ॥२॥
गोपिकांचे घरीं कामासी लंपट । करिसी धीट गवळीयांसी ॥३॥
भाव अभावाचा न करि कंटाळा । दावी बाळ लिला म्हणे नामा ॥४॥

(२२७) हे पंढरीक्षेत्राच्या स्वामी पांडुरंगा, तूं विश्वाला मोहित करणारा असा कपटी नाटकी आहेस ॥१॥ तूं अवतार धारण करून

सर्प रूपी दैत्यांचा (वंशाचा) उच्छेद करण्यास निर्मीत होतोस ॥२॥ हे गवळिया, गोपिकांशीं तूं स्वैरपणें कामचेष्टा करितोस ॥३॥ भाव असो अथवा अभाव असो याचा परिणाम तुझ्यावर होत नाहीं. असा धैर्याचा मेरुमणि तूं गोकुळामध्यें बाळलीला करितोस असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

गोकुळीं गोपिका गोपाळ सकळ । मध्यें घननीळ क्रीडा करी ॥१॥
करी खेळ मोठा स्थापिले निशाण । स्वयें नारीयण हाका मारी २
मारियेला कंस दुर्घट दुर्जन । पुरवी वासना पांडवांची ॥३॥
पांडवांचे ध्यान धरूनि अंतरी । नामा म्हणे हरि साह्य करीं ॥४॥

(२२८) हा घननीळ कृष्ण, गोकुळामध्यें स्थित असलेल्या गोप-गोपिकांमध्यें रममाण होतो ॥१॥ तेथें मोठा खेळ करीत असतां त्यानें निशाण उभारलें आणि नारायण स्वतःच हाका मारूं लागला ॥२॥ यानें कंसादिक दुष्ट दैत्यांचा नाश केला आणि पांडवांच्या सर्व इच्छा पूर्ण केल्या ॥ ३ ॥ हा हरि स्वतःच्या हृदयांत पांडवांचें ध्यान करितो व त्यांचा साहाय्यकारी होतो असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

सर्वांभूतीं नांदे सर्व नारायण । सर्व संस्थापन पांडुरंग ॥१॥
अगा देव वंद्या अगा गोपवेशा । पावन परेशा परमार्थी ॥२॥
मूर्त अमूर्ताचा मुक्त परांगता । सर्व मायातीता साक्षिरूपा ॥३॥
नामा म्हणे देवां दानवां जिंकिशी । ते भाके आम्हांसी सांभाळावें ॥४॥

(२२९) सर्वांभूतीं स्थित असणारा हा नारायण तोच पांडुरंग सर्वांचें रक्षण करितो ॥ १ ॥ तोच सर्व देवांना वंद्य असून गोपवेश धारण करितो. हाच देवराय परमार्थी लोकांना पावन करणारा आहे ॥ २ ॥ हे साक्षिरूपा तूं सर्वमायातीत असून मूर्त अमूर्त अशा सापेक्षित भावापासून मुक्त आहेस ॥ ३ ॥ तूं देवदानवांवर विजय मिळविणारा आहेस अशी तुझी प्रतिज्ञा आहे ना ? तेव्हां तूं आमचा सांभाळ करावा असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

प्रल्हादादिकांचें अंतरीचें ध्येय । तें पंढरीये ध्यान उभें असे ॥१॥
सर्वजन जया नेणते जाहले । सुख दाखविलें पुंडलिका ॥२॥

वेदांचें जें सार श्रुतीचे जिव्हार । तेचि कटीं कर उभे असे ॥३॥
ज्ञानाचें जीवन वैराग्या भूषण । तें सुख निधान विटेवरीं ॥४॥
शुद्ध बुद्ध मुक्त समाधींचें सुख । ते उभे प्रत्यक्ष वाळवंटी ॥५॥
हृदयीं धरूनि नामा निज बोधें निमाला । शीण हारपला संसाराचा ॥ ६ ॥

(२३०) प्रल्हादादिक भक्तांच्या प्रेमाचा विषय जें देवराय तेंच, स्वरूप पंढरीक्षेत्रामध्यें विटेवर उभें आहे ॥ १ ॥ ज्याला जाणण्याकरितां प्रवृत्त झालेलें ते सर्व जेथें स्तब्ध होतात असा सुखाचा ठेवा तो पुंडलीक रायांना प्रत्यक्ष दाखविला ॥२॥ वेदांचें जें सार आहे, श्रुतींचें जें गोप्य आहे तेंच कंबरेवर हात ठेवून उभें आहे ॥ ३ ॥ ज्ञानाचा विकास करणारा आणि वैराग्याचें भूषण असलेला असा सुखाचा ठेवा विटेवर उभा आहे ॥ ४ ॥ जें शुद्ध, बुद्ध, मुक्तरूप असून समाधींतल्या सुखाचें स्वरूप आहे तेंच वाळवंटामध्यें उभें आहे ॥ ५ ॥ अशा स्वरूपाला नामदेवरायांनीं हृदयीं धारण केल्यानें निजबोधानें शांत झाला आणि त्यायोगें त्याच्या संसाराचा सर्व ताप (शिणवटा) दूर झाला ॥ ६ ॥

एक वाहूं तुळशीपत्र । ते देवासी प्रिय होत ॥१॥ रखुमाईनें देव । सोडविला कृष्णराव ॥२॥ नामा म्हणे पूर्ण होती । प्राप्त राधिकेचा पती ॥३॥

(२३१) या देवरायांना आम्हीं प्रेमानें फक्त एक तुळशीपत्र अर्पण केलें असतां, तें त्यांना फार आवडतें ॥ १ ॥ अशा या तुळशीपत्रानेंच रुक्मिणीचा पति, जो कृष्ण परमात्मा त्याला रुक्मिणी मातेनें नारदापासून सोडविलें ॥ २ ॥ राधिकेचा पति जो कृष्ण त्याच्या प्राप्तीनें सर्व मनोरथ पूर्ण होतात असें नामदेवरायें म्हणतात ॥ ३ ॥

देऊनि भातुकें गळां घाली मिठी । सखा जगजेठी भक्तिभावा ॥१॥
आधार करोनि राहिले पंढरी । तेथें निरंतरी प्रेम दावी ॥२॥
नामा म्हणे सेवा करोनियां शुद्ध । संसार संबंध नाहीं तया ॥३॥

(२३२) हे सख्या जगजेठी–कृष्णा, तूं भक्त जनांना प्रेम भक्तीचे खाद्य–पदार्थ देऊन त्यांच्या गळयाला आलिंगन देतोस । १ ।। श्रीक्षेत्र पंढरीस रिवास करून तेथें सतत प्रेम-भक्तीचा सोहळा दाखवितोस ।। २ ।। जो या देवरायाची शुद्ध प्रेमानें सेवा करितो त्याला संसाराचा संबंध राहत नाहीं, असें नामदेवराय म्हणतात ।। ३ ।।

कोल्हीं काय कोल्हीं होती जड । तैसे तुझें मज मिळालें असे वाड ॥१॥ आंधळे मुकें कानीं नायके । त्यासी काय जननी पोसूं न शके ॥२॥ नामा म्हणे केशव कृपेचा सागरू । जयाचा जारू तयासिच भारू ।। ३ ।।

(२३३) कोल्हीला तिचें पिलूं जड होतें काय ? हे देवराया, तसाच तुझा माझा संबंध आहे ।। १ ।। एकाद्या आईला आंधळा, पांगळा, बहिरा आणि मुका असा मुलगा असला तर ती त्याचें पालन पोषण करीत नाहीं काय ? ।। २ ।। ज्याचा मुलगा त्याला काय जड असतो ? तसा हा माझा केशवराय उदार आहे असें नामदेवराय म्हणतात ।। ३ ।।

योगी हे शिणती तुझिये प्राप्ती लागीं। नातुडसी जगी कवणासी १
एक जटा नखें स्वयें वाढविती । दिगंबर होती एक देवा ।।२।।
त्यांसी तुझी भेटी नव्हेचि कल्पांति । अखंड सिणती साधनानें ॥३॥
आमचे सन्निध सर्वदा राहसी । आमच्या भाग्यासी पार नाहीं ॥४॥
धन्य झालो आम्ही तुझीया प्रसादें। नाचे तुझ्या छंदे नामदेव ।५।

(२३४) हे देवराया, तुझ्या प्राप्तीकरितां योगीजनंहि शीण पावतात असा तूं या जगांत कोणालाहि हस्तगत होत नाहींस ।। १ ।। या देवाच्या प्राप्तीकरितां कोणी नखें वाढवितात तर कोणी नग्नच फिरतात ।। २ ।। असे हे बहुत साधक तुझ्या प्राप्तीस्तव अनेक साधनें करीत असतांना थकतात, परंतु त्यांना तुझी प्राप्ती कल्पान्तीहो होत नाहीं ।। ३ ।। असा हा देवराय आमच्या प्रेमाला लुब्ध होऊन आमच्याजवळ सतत राहत

असल्यानें आमचे भाग्य अपूर्व होय ॥ ४ ॥ हे देवराया, तुझ्या प्रसादानें आम्हीं धन्य झालों आहोंत. हा नामदेव तुझ्या नामछंदानें नाचत आहे ॥ ५ ॥

मजसाठी काय लाजतोसि देवा । तृणा आणि जीवा साच होसी १
ते काय पवाडे गर्मविलीं ब्रीदें । ब्रम्हादिके वृंदे ध्याती कैसीं ॥२॥
जाणतां नेणतां सर्वांसी उद्धार । भवसिंधु पार पावविसी ॥३॥
नामा म्हणे तुझे उपकार ऐसे । दावीं जगदीशा हेळामात्रें ॥४॥

(२३५) तूं सचेतन व अचेतन या दोन्हीं वस्तूंच्या ठिकाणीं सारख्या रूपानें असतां माझ्या भेटीकरितां तुला कां लाज वाटते ? ॥ १ ॥ 'साम्यता, अशा तुझ्या ब्रिदाची कीर्ति तूं कां नष्ट करितोस ? अशा तुला ब्रम्हादिक हे कसें हो ध्यान करितात ? ॥ २ ॥ सुज्ञ असो कां अज्ञानी असो, यांचा तूं उद्धारक असून तूं या सर्वांना भवसिंधूतून मुक्त करणारा असा आहेस ॥ ३ ॥ हे जगदीशा, असा तूं अनंत उपकार करणारा आहेस ना ? मग त्याची प्रतीति मला त्वरित दे पाहूं, असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

उपमन्यु बाळा स्थापी क्षीर सिंधु । अनाथाचा बंधु नारायण ॥१॥
तुझें नाम मुखीं जपे सर्व काळ । दिधले अढळपद त्यासी ॥२॥
अनेक वृत्तांत सांगों देवा । अन्याय केशवा कोण मानी ॥३॥
नामा म्हणे तैसें मी नाहीं मागत। ऐकोनियां मात आलों जन्मा ४

(२३६). हा नारायण अनाथांचा सखा व माऊ होण्यानें उपमन्यु बाळकाला त्यानें क्षीरसागराचें आधिपत्य दिलें ॥ १ ॥ हे देवराया, ध्रुव बाळकाने सतत तुझा ध्यास घेतल्यानें त्यासहि तुम्हीं अढळपद दिलें ॥ २ ॥ हे केशवराया, अशीं अनेक उदाहरणें मीं तुझ्या दातृत्वबुद्धीला दिली असतां तीं अन्याय मूलक आहेत असें कोण समजेल ? ॥ ३ ॥ उपरिनिर्दिष्ट भक्तां-प्रमाणें मी तुझ्यावर कांहीं ओझे टाकीत नाहीं तुझ्या प्रेमाला लुब्ध होऊन तुझी किर्ती ऐकून मी जन्माला आलों असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

हरि गाता बरवा ऐकतां बरवा। हृदयीं ध्याता बरवा बाईयांनो १ केशव पैं देणे केशव पैं घेणें। केशव करणें धंदा आम्हीं ॥२॥ चंद्र बिबांची कुंरवंडी ओवाळूं श्रीमुखावरी। मदन हा जिव्हारीं लाजिन्नला ॥३॥ नामा म्हणे निववीलें सकळ इंद्रियांतें। म्हणोन त्या केशवातें शरण जारे ॥४॥

(२३७) अहो बाईयानों, ह्याच्या गुणांचें वर्णन करीत असतां, त्याचे गुणानुवाद श्रवण करितांना, आणि हृदयांत त्याचें ध्यान करितांना अति आनंद वाटतो ॥ १ ॥ या केशवरायाशींच आम्हीं देण्या घेण्याचा धंदा करूं ॥ २ ॥ याच्या सुंदर मुखावरून चंद्रबिंबाची ओवाळणी करूं. याचें सौंदर्य पाहून मदन हाहि आपल्या अंतःकरणांत लज्जित झाला ॥३॥ या केशवरायानें सर्व इंद्रियांचें समाधान केलें, म्हणूनच मी त्याच्या शरणांकीत झालों असें नामदेवराय म्हणतात.

आशा तृष्णा माया नाहीं लिथाडिल्या। म्हणावा तो भला कासयानें ॥१॥ अमृत सेवितां मृत्यू पळे दुरी। सुख होय तरी तेंचि नाम ॥२॥ तेव्हां कोणीतरी धरावा सत्संग। होय पांडुरंग प्राप्ती सर्वा ॥३॥ अविश्वास नर सर्वस्व पतीता। तारसी अनंता म्हणे नामा ॥ ४ ॥

(२३८) ज्याच्या अंतःकरणांतून आशा, तृष्णा, मायादिक वृत्ति नष्ट झालया नाहींत त्यास साधु कसें म्हणावें ? ॥ १ ॥ अमृताचे सेवन केलें असतां मृत्युला मरण येतें. तसेंच ज्याच्या योगानें सुखोपलब्धि होते तेच नाम होय ॥ २ ॥ ज्या कोणाला सत्संगतीचा लाभ घडला आहे त्या सर्वांना पांडुरंगाची प्राप्ति होते ॥ ३ ॥ जे अविश्वासी आणि पातकी पुरुष आहेत त्यांचाहि उद्धार हा पांडुरंग करितो असें नामदेवरायें म्हणतात ॥४॥

केशव पैं मुक्ति केशव पैं भक्ति। केशव विश्रांति पंढरीये ॥१॥ केशव लौकिकीं केशव व्यवहारी। केशव निर्धारीं नाम तुझे ॥२॥ नामा म्हणे अगा केशवा बोळला। भावासि भुलला वाळवंटी ॥३

(२३९) मुक्ति काय अथवा भक्ति काय, ती केशवरायाच्या कृपानेंच आविष्कृत आहे, पंढरीक्षेत्र हेच केशवरायाचे विश्रांतिचें स्थळ होय ॥ १ ॥

लौकिक असो अथवा व्यवहार असो, तो केशवरूपानेंच उपलब्ध आहे. केशवराय हेच त्याचें निश्चित नाम होय ॥ २ ॥ हा केशवराय वाळवंटामध्यें आमच्या प्रेमाला भुलून त्यानें आमच्याकडे कृपादृष्टि केली, असें नामदेवराय म्हणतात ॥ ३ ॥

वेदासी कानडा श्रुतीसी कानडा । विठ्ठल उघडा पंढरीये ॥१॥
नाम बरवें रूप बरवें । दर्शन बरवें कानडीयाचें ॥२॥
नामा म्हणे तुझे अवघेंचि बरवें । त्याहूनि बरवें प्रेम तुझें ॥३॥

(२४०) वेदाला व श्रुतीला अगम्य असा हा विठ्ठलराय पंढरीक्षेत्रीं सूर्यासारखा प्रकट आहे ॥१॥ या कानडीयाचें रूप काय अथवा नाम काय सुंदर आहेच; परंतु त्याचें दर्शनहि आनंद जनक आहे ॥२॥ हे देवराया, तुझे सर्वच सुंदर खरें, पण सर्वांहूनहि तुझें प्रेम अति मधुर आहे असें नामदेवराय म्हणतात ॥३॥

तुटोनि आकाश पडेलहि शिरीं । न सोडी मी हरी पाय तुझे ॥१॥
तुझे पाय गोड तुझे पाय गोड । तुझे पाय गोड सर्व काळ ॥२॥
डोंगरा सांगातें कोण करी वाद । वाउगी उपाद आहे आम्हां ॥३॥
नामा म्हणे तुझे थोरपण काय । कायसे उपाय सांग आम्हां ॥४॥

(२४१) हे हरि, माझ्यावर आकाश कोसळलें असतांहि मी तुझ्या पायाला केव्हांहि सोडणार नाहीं ॥१॥ हे देवराया, तुझे पाय अखंड अति मधुर आहेत असें मी त्रिवार सांगतों ॥२॥ पर्वताशीं हो कोणी वितंडवाद करावा ? तुझ्या पायाशिवाय हीं सर्वसाधनें उपाधिमूलक आहेत असें आम्हांला वाटतें ॥३॥ हे देवराया, तुझा श्रेष्ठपणा कशांत आहे आणि तो प्राप्त होण्याकरितां काय केलें पाहिजे त्याचा उपाय तूं आम्हांला सांग असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

निर्धन धनातें कीं आंधळें लोचनातें । मयूर घनातें जेंवि भावी ॥१॥
पारधियें पाडस धरियेलें वनीं । तें चिंती जननि रात्रंदिवस ॥२॥
तैसा तुझा छंद लागो कां गा देवा । माझिया बा जीवा केशिराजा ३
सर्पें डंखिलें तें स्मरतो गारोडी । पुरी जातां सांगडी मन चिंती ४
रोगी वैद्यातें बोलावूं धाडी । पडिले बांदवडी सुटका इच्छी ५
बोळविली बाला ते मनी वाहे कुवसा । कां रसज्ञ जैसा औषध

गिवसी ।।६।। धेनु कारणें व्याकुळ होय वत्स । तें दशदिशेस अवलोकितें ।।७।। निचेतन देह प्राण असे अलक । धायवट उदका स्मरें बनीं ।।८।। चकोरें मिळोनि चंद्रा जेंवि ध्याती । इंद्रिया निवृत्ति कें होईल ।।९।। पक्षिणीचें पिलू येऊनि द्वाराजवळें । मुख पसरी कोंवळें आलोहित ।।१०।। नामा म्हणे॰ म्यां आन नाहीं जाणितलें । मज पुरे इतुकलें केशिराजा ।।११।।

(२४२) हे देवराया, दरिद्री मनुष्य जसे धनाकरितां हपापलेला असतो अथवा आंधळया मनुष्याला जसे आपल्याला डोळे मिळावे अशी तळमळ असते किंवा जसा मयूराला मेघाचा वेध लागलेला असतो ।।१।। एकाद्या पारध्यानें पाडसाला धरलें असतां ते आपल्या आई करितां रात्रंदिवस चिंता करीत असते ।।२।। हे केशिराजा, तुझ्याविषयींचें तशाच प्रकारें वेड माझ्या मनाला लागो ।।३।। एकाद्याला सर्प चावला असतां त्या संकटांतून मुक्त होण्याकरितां जसा त्याला गारुड्याचा वेध लागतो अथवा पुरांत वाहात जाणारा मनुष्य नावेचा आश्रय मिळावा म्हणून तळमळ करितो ।।४।। रोगानें जर्जर झालेला माणूस जसा वैद्याची वाट पाहातो अथवा बंदीत झालेला मनुष्य आपली सुटका व्हावी म्हणून तळमळ करितो ।।५।। सासुरवाडीस जाण्याकरितां मुलीची बोळवण केली असतां ती जशी पाठोराख्याची आठवण करिते अथवा रसज्ञ वैद्य हा योग्य औषधाचा शोध करितो ।।६।। वत्स हा आपल्या आईकरितां हंबरडा फोडीत दाही दिशांकडे भटकत असतो ।।७।। जंगलामध्यें एकटा भटकणारा माणूस रडून रडून ज्याचा घसा कोरडा पडला आहे व देह निश्चेष्ट होऊन प्राणव्याकूळ झाला आहे तो जसा पाण्याकरिता तळमळतो ।।८।। आपल्या इंद्रियांचें समाधान होण्याकरितां जसे चकोर हे चंद्राचा ध्यास करितात ।।९।। एकादी पक्षीण बाहेर चरण्यास गेली असतां तिचें पिलूं घरट्यांतून बाहेर येऊन आपल्याला दाण्याचा कण मिळेल म्हणून आपलें म्लान मुख पसरतो. ।।१०।। हे केशीराजा त्याप्रमाणें मला तुझ्या पायाच्या दर्शनाशिवाय दुसऱ्या कोणत्याच वस्तूची गरज नाहीं असें नामदेवराय म्हणतात ।।११।।

नव जावें तेथें लागे जाणें । न करावें तेंचि लागे करणें । न बोलावे त्यासी लागे बोलणें । पडे मागणें नेदी तया ।।१।। कृष्णें

देवकीये उदरा येणें । कंसा त्यागोनि गोकुळासी जाणे । तेथें नंदाच्या गाई राखणें । संगति असणें गोवळ्यांच्या ॥२॥ राम वान्नरांची सेवा करी । पांडव कौरवांचे घरीं । हरिश्चंद्र डोंबा घरीं पायकी करी । हे अपूर्व परियेसा ॥३॥ रुद्रें अंजनी उदरां येणें । रामाची सेवा वान्नरपणें । प्रसंग पडे तैसे वर्तणें । रुसणें न लगें कवणासी ॥४॥ स्वामीनें सेवकाची सेवा करणें । नुपेक्षी कदान्न भक्षणें । म्हणवूनि अहंकार न धरणें । विषम संसार अरे जना ॥५॥ अवचट घडविती तुझिया भावा । घोर विस्मय होतो माझिया जीवा । विष्णुदास नामा विनवो केशवा । देवा तूं करिसी तें बरवें ॥६॥

(२४३) ज्या ठिकाणीं जाऊं नये अशा ठिकाणीं जाणें भाग पडतें. जीं कामें करूं नयेत तीं करावीं लागतात ज्याच्याशीं बोलण्याचें टाळावें त्याच्याशी बोलण्याचा प्रसंग येतो. ज्याच्याकडे याचना करूं नये असें वाटतें. त्याच्याकडें मागणें भाग पडतें ॥१॥ कृष्ण हा अजन्मा खरा; परंतु त्यालाहि देवकीच्या उदरी जन्म घ्यावा लागतो कंसाचा त्याग करून गोकुळामध्यें त्यास जावें लागतें आणि तेथें गोपाळांच्या संगतींत राहून नंदाच्या गाई राखाव्या लागतात ॥२॥ प्रत्यक्ष रामरायालाहि वानरांच्या सहवासांत रहावें लागलें. पांडवांना कौरवांच्या येथें रहाणें भाग पडलें. सत्यशील राजा हरिश्चद्र यांसहि डोंबाच्या घरीं पाणी भरावें लागलें अशा या अपूर्व-आश्चर्यजनक गोष्टींचें श्रवण करा ॥३॥ रुद्राचा अवतार जो हनुमान, त्यालाहि अंजनाच्या पोटीं वानराचा जन्म घेऊन रामाची सेवा करावी लागते. याकरितां अदृष्टानें प्रसंगोपात्त जी स्थिति प्राप्त होईल ती आनंदानें सहन करणें यांतच सुज्ञपणा आहे. येथें कोणावर दांत-ओठ खाऊन अथवा रुसून कांय होणार आहे ॥४॥ प्रत्यक्ष मालक खरा; परंतु प्रसंगानें त्यालाहि त्याच्या नोकराच्या येथें दास्य करावें लागतें. प्रसंगीं कदान्नहि सेवन करावें लागतें तेव्हां अहो जनहो, असा हा संसार[1] विचित्र स्थितीचा होण्यानें केव्हांहि अहंकार करूं नका ॥५॥ हे देवराया, अशी ही तुझी कृति अलौकीक होण्यानें याचा माझ्या मनाला अतिशय विस्मय वाटतो. हे देवराया, तूं जें कांहीं करित आहेस त्यांतच आमचे हीत आहे. असे विष्णुदास नामा विनंती करित आहे॥६

१ कबीरा गर्व न कीजिये रंचक न हासीये कोय । आब तो नाव समद्र में काय जाणे कांय होय ?

सर्व पापपुण्य हींचि दोन्ही भांडीं । विवेक न सांडीं येतां जातां ॥१॥
तुझें नाम तारूं तुझें नाम तारूं । तुझें नाम तारूं श्रीविठ्ठला ॥२॥
विष्णुदास नाम्यानें उभारिली शिडी । ठाकावया पेढी वैकुंठींची ३

(२४४) सर्व पाप व पुण्य हींच भांडीं–पात्रें होत आणि म्हणून विवेकाचा केव्हांहि विसर पडूं देऊं नका ॥ १ ॥ हें श्री विठ्ठलराया, तुझें नाम हेंच भवसागर तरण्यास समर्थ असें तारूं आहे असे मी त्रिवार सांगतों ॥ २ ॥ वैकुंठाचें साम्राज्य हस्तगत होण्याकरितां विष्णुदास नामयानें नामाची शिडी उभी केली आहे ॥ ३ ॥


नित्य आम्हा सुख तुझ्या पायांपासीं । शरण कोणासी जाऊं आम्हीं १
सकाळीं उठोनि ऐकतों कीर्तन । तेणें समाधान मज होय ॥२॥
उभा महाद्वारी वैष्णव भेंटती । सांखळचा तुटती चौऱ्यांशीच्या ।३
नामा म्हणे सदा पंढरी रहिवास । मागुता जन्मास येतो कोण ।४

(२४५) हे देवराया, तुझ्या पायाजवळ आम्हांला सर्व सुख प्राप्त प्राप्त होत असल्यानें दुसऱ्या कोणास शरण जाण्याचें आम्हांस कारण काय ? ॥ प्रातःकाळीं उठतांच आम्हाला कीर्तन श्रवणाचा लाभ होण्यानें आमच्या चित्ताला समाधान प्राप्त होते ॥ २ ॥ महाद्वारामध्यें उभा राहिलों असतां तेथें संतजनाच्या सहज भेटी होतात. आणि त्या योगे चौऱ्यांशी भव चक्राच्या शृंखळा निखळून पडतात ॥ ३ ॥ पंढरीक्षेत्रांत आमचा नित्य वास असल्यानें पुनश्च जन्माला कोण येणार ? असें नामदेव-राय म्हणतात ॥ ४ ॥

जय विठ्ठल श्रीविठ्ठल । जय जय विठ्ठल विठ्ठल ॥१॥
परब्रम्ह विठ्ठल मूर्ति विठ्ठल । निरंजन विठ्ठल विठ्ठल ॥२॥
तोचि नाम तोचि देवो । ऐसें म्हणों तरी नाहीं संदेहो ॥३॥
म्हणे विष्णुदास नामा । तो नेईल परत गामा ॥४॥

(२४६) जय विठ्ठल जयजय विठ्ठल विठ्ठल ॥ १ ॥ विठ्ठलराय हेच परब्रह्म मूर्ति होत. निरंजनरूपानें हाच विठ्ठल विठ्ठलराय होय ॥ २ ॥ हाच विठ्ठलराय नामरूपानें आणि देवरूपानें आहे असें मी निःसंदिग्धपणें प्रति-पादन करितों ॥ ३ ॥ हाच देवराय आम्हांला निजधामास घेऊन जाईल असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

पंढरी माहात्म्य



पाहातां देऊळाची पाठ। तीर्थें घडली तीनशें साठ ॥ १ ॥
स्नान करितां पऱ्हाळें। उद्धरतीं सर्व कुळें ॥ २ ॥
सन्मुख पाहतां विठाई। त्यासी उपमा द्यावया नाहीं ॥ ३ ॥
ऐसा पंढरीचा महिमा। काय वर्णूं ह्मणें नामा —

पंढरी माहात्म्य.

सहस्र अठ्यांशी ऋषि । स्कंद उपदेशी तयांसी । तिहीं एक पुसिली पुसी । ते तयासी अकळ ॥१॥ आतां जाऊं कैलासा । सकळ पुसूं त्या महेशा । मग निघाले आकाशा । पितृदेशा पातले ॥२॥ बरें होऊनिया सावध । ऐका भक्तीचा संवाद । विनवितां झाला स्कंद । तो अनुवाद शंभूचा ॥३॥ स्कंदे विनवीला त्रिपुरारी । सहित वामभागीं गौरी । स्तुति स्तवनें केलीं भारी । हृदासनीं नमियेला ॥४॥ मग निघाला लोटांगणीं । म्हणे त्राहि त्राहि शूळपाणि । करें उचलिला धांवोनि । मग आसनीं बैसविला ॥५॥ ऋषीसि आसनें देऊनि वेगा । जवळी बैसविलें पैंगा । ते म्हणति झडकरी सांगा । जें वेद शास्त्रांसी प्रिय ॥ ६ ॥ तंव स्कंद म्हणे ताता । ऋषिनीं पुसिली जे वार्ता । ते आकळ माझिया चित्ता । वेद शास्त्रार्थ विरहित ॥७॥ बरवीं तीर्थे पुण्यरासीं । महात्म्ये सांगत होता त्यांसी । परि तीर्थक्षेत्र देवांसी । नाहीं चहूंसी एकमेळा ॥८॥ जे जे क्षेत्री करितां विचार । ते ते ठायीं तेंचि थोर । परि तया माजीं असे सार । जे माहेर सकळिकां ॥९॥ पाप घडे जे जे मेदिनीं । तयासी तें तीर्थ करी धुणी । तीर्थां वर्णी शूळपाणि । सांगा हानि जें करी ॥१०॥ जळती पातकांचिया कोडी । ऐसी तीर्थे आहेत गाढी । तयां सकळिका तीर्थां आहे खोडी । ते मी उघडी सांगेन ॥११॥ हिम काळी कीजे स्नान । हेचि प्रयागासीं न्यून । काशी इच्छी जो मरण । थोर निर्वाण पाविजे ॥ १२ ॥ पितृस्मरण आचमन । करोनि देइजे पिंडदान । तेणें पूर्वज होती

पावन । हेंचि न्यून गयेसी ॥१३॥ गाढें कुरुक्षेत्र जाण । तेथें कीजे हिरण्यदान । केदारीचे उदक पान । करी पीडन देहासी ॥ १४ ॥ उपमा द्वारकेहुनी । अरुच गोमतीचें पाणी । सहा मास सेविल्या-वांचुनी । नव्हे दाटनी चक्राशी ॥१५॥ गंगा बारा वरुषे करी । सकळिकां मध्यें गोदावरी । सिंहस्थी महिमा थोरी । हें न्यून भारी तयासी ॥१६॥ अयोध्या माया मथुरा । कांची आवंतिका करवीरा । लोण्हार हाटकेश्वर तुंगभद्रा । आणि पुष्करा कावेरी ॥१७॥ कलीमाजी वैकुंठ साक्षात् गाढें क्षेत्र जगन्नाथ । त्या देवासी नाही पाय हात । उणीव बहुत तयासी ॥१८॥ गाढें श्रीशैल्य पर्वत। लक्षावया उदित । तेथें जीवासी करिजे घात। ही उणीव बहुत तयासी॥ १९ ॥ गाढें क्षेत्र परियेसा । गोकर्ण सेतु बंधु महेशा । तयासी उणीव ऐसा । जे यमदिशा म्हणताती ॥ २० ॥ ऐसीं तीर्थें कोटीरासी । परि लांछन आहे सर्वांसी । पहिले राहिजे उपवासी। मग डोईसी मुंडण ॥२१॥ सकळ तीर्थांचा पारू । जो गा देखिला सागरु । तयासी उणीव आहे थोरु । योग येतो अमावास्ये ॥२२॥ म्हणोनि पुसों आलों तुज । सकळ तीर्थांचें बीज । तें झडकरी सांग मज । देवा तुज जें प्रिय ॥ २३ ॥ ऐसी करोनी विनवणी । मग स्कंद लागला चरणीं । येरे उचलिला झडकरुनी । मग शुळपाणि हे बोलिले ॥२४॥ पुत्रा तुवां जे केली विनंती । हेंचि गिरिजा पुसत होती । तरी सांगेन तुजप्रती । चित्त देऊनि परियेसीं ॥२५॥ महिमा दरुशनाचा पूर्ण । एक लक्ष्मी जाणे खूण । शुक सनकादिक मुनि सज्जन । आणि वैष्णव जन प्रेमळ ॥ २६ ॥ जैसा कृपणाचा ठेवा । तैसे आर्त रे माझिया जीवा । पुत्रा पुसिलें तुवां । तरी वृत्तांत बरवा सांगेन ॥ २७ ॥ मी बैसोनीयां स्मशानीं जयाचे नाम जपे ध्यानीं । तें दैवत आहे जये स्थानीं । चित्त देऊनि

परियेसा ॥२८॥ युगा अठ्ठावीसांवरीं । आहे पुंडलिकाच्या द्वारीं । विठ्ठल उभा भीमातीरीं । विश्वतारी दरुशनें ॥२९॥ घेऊनि तरुवरांची बुंथि । देव सेवा जाणवीती । आदि करोनी पार्वती । आम्हां वस्ति तये ठायीं ॥३०॥ तेजे झळाले वैकुंठ । तयापरी चोखट । पहा पंढरपुर नीट । महिमा अदभूत तिहीं लोकीं ॥३१॥ जेणें पीडिले तिन्हीं लोकां । त्यासि वधावया पावलों देखा । ओढीं काढोनी त्र्यंबका । श्रीहरि सखा स्मरिला ॥ ३२ ॥ घात करोनी त्रिपुरा । वधियेले तिन्हीं असुरां । तेंचि तीर्थ भिवरा । सचराचरा तारक ॥ ३३ ॥ प्रतिदिनी माध्यान्हीं । सकळ तीर्थे तिये स्थानीं । भिवरे सुस्नात होऊनि । विठ्ठल चरणीं लागती ।३४। तये क्षेत्री पाप घडे । ऐसें बोलतां जिव्हा झडे । काय तुज सांगू पुढें । ब्रम्ह उघडें असे जेथे ॥३५॥ लोहो लागलिया परीसें । सोनें झालें एक सरिसें । आतां पालटेल कैसें । भलतें तैसें जरी झालें ॥३६॥ एक वेळ पंढरीये जाऊन । मग भलतिये ठायीं राहो कां जन । तो राहे वैकुंठींच जाण । कर्महीन जरी झाला ॥३७॥ ऐसें ऐकोनी उत्तर । स्कंद हरुषे निर्भर । आदि करोनि ऋषीश्वर । पंढरपूर ठाकिती ॥३८॥ विष्णुदास नामा म्हणे । एक वेळ पंढरीये जाणें । विठ्ठल धन्यावरी पाहाणें । नाहीं येणें संसारा ॥ ३९ ॥

(२४७) कार्तिक स्वामी हे अठ्यांयशी ऋषिवर्यांना उपदेश करीत असतां, त्यांस ऋषिवर्यांनी प्रश्न केला. परंतु त्यांच्या प्रश्नाचें उत्तर देण्यास कार्तिक स्वामी असमर्थ ठरले ॥१॥ तेव्हां आपण कैलासास जाऊन शंकराकडून या प्रश्नाचें समाधान करून घेऊं अशी कार्तिक स्वामींनीं सूचना केली. तेव्हां ते सर्वजण आकाश मार्गे कैलासास गेले ॥२॥ शंकरांशीं जो भक्तीचा संवाद झाला तो तुम्ही शांत मनानें ऐका अशी कार्तिक स्वामी विनंति करितात ॥३॥ ज्यांच्या अर्धांगीं पार्वती आहे अशा शंकराचें स्तुति-स्तवन कार्तिक स्वामींनीं मधुर कंठानें व मनोभावनेनें करून त्यांना नमस्कार केला

॥ ४ ॥ शंकराला त्यांनीं साष्टांग नमन केलें. हे शूळपाणे, आम्हें रक्षण करा हो, रक्षण करा अशी विनंति करितांच त्यांना शंकरानें आपल्या आसनावर बसविलें ॥ ५ ॥ ऋषिवर्यांनाहि आसनें देऊन शंकरानें त्यांना आपल्याजवळ बसविलें. अहो शंकरा, वेदशास्त्राला जें प्रिय आहे तें तुम्ही त्वरित सांगा अशी विनंती ऋषिवर्यांनी शंकरास केली ॥ ६ ॥ इतक्यांत कार्तिक स्वामी म्हणाले कीं, अहो पिताजी, ऋषिवर्यांनीं, मला एक वेदशास्त्राला अगम्य असा जो प्रश्न केला त्याचें समाधान माझ्याकडून करितां आलें नाहीं. कारण त्या प्रश्नाचें उत्तर मलाहि अगम्य आहे ॥ ७ ॥ या सृष्टीमध्यें पुण्यप्रद अशीं अनंत तीर्थें आहेत त्यांचें माहात्म्य या ऋषिवर्यांना सांगत असतां या तीर्थांच्या, क्षेत्रांच्या व देवतांच्या मध्यें एक मेळ कांहीं होत नाहीं। ८॥ ज्या ज्या तीर्थक्षेत्राचा विचार करावा तीं, तीं सर्व क्षेत्रें आपलेंच महत्व थोर आहे असें प्रतिपादन करीत असल्याचें आढळलें. तथापि त्यामध्यें सर्वश्रेष्ठ असें आणि सर्वांचे माहेरघर असें कोणतें तीर्थक्षेत्र आहे हो ? ॥९॥ या पृथ्वीवर जीं जीं पापें घडतात त्यांचा नाश जें करितें असें तीर्थ, हे शूळपाणी शंकरा, मला सांगा ॥१०॥ पर्वतप्राय अशा पापांचा नाश करणारीं तीर्थें आहेत खरीं; परंतु, त्यांच्यामध्ये कांहीं न्यून–कमीपणा आहे तो मी आतां तुम्हाला खुलासेवार सांगतों ॥ ११ ॥ प्रयागामध्यें स्नान करणें पुण्यप्रद आहे खरे; परंतु तें स्नान थंडीच्या दिवसांत करावें लागतें हा त्या तीर्थांचा कमीपणा आहे. काशीक्षेत्रीं मुक्ति होते खरी; परंतु तेथें मरावें लागतें ॥ १२ ॥ गया क्षेत्र पुण्यप्रद आहे खरें; परंतु, तेथें पितृस्मरण करून आचमन करावें लागतें आणि पिंडदान करावें लागते, तेव्हांच पूर्वजांचा उद्धार होतो, हा त्या क्षेत्राचा कमीपणा आहे ॥ १३ ॥ कुरुक्षेत्र हें फार पवित्र आहे परतु तेथें सुवर्ण दान करावें लागतें. केदारेश्वर पुण्यदायक आहे खरें; परंतु, तेथील जल प्राशन करावें लागतें व त्यामुळें देहाला पीडा होते ॥ १४॥ गोमतीचे जल हें द्वारका क्षेत्राहून श्रेष्ठ आहे; परंतु तें खारट आहे. व तें सहा महिने सेवन केल्याशिवाय चक्रभेद होत नाहीं ॥१५॥ गंगेपेक्षां गोदावरी श्रेष्ठ खरी. परंतु बारा वर्षांनी येणाऱ्या सिंहस्थामध्येंच गोदावरीच्या स्नानाला महत्व आहे, हें त्यामध्यें न्यून आहे ॥१६॥ अयोध्या मथुरा, माया, कांची, अवंतिका, करवीरा, लोणार, हाटकेश्वर, तुंगभद्रा,

पुष्करा व कावेरा, हीं हि क्षत्रें आहेत ।। १७ ।। या कलियुगामध्यें अतिश्रेष्ठ असें साक्षात् वैकुंठ स्वरूपानें असलेलें असें जगन्नाथ क्षेत्र आहे खरें; परंतु त्या देवाला ना हात, ना पाय, हाच त्यामध्यें कमीपणा आहे ।। १८ ।। श्री शैल्य पर्वतहि अतिश्रेष्ठ क्षेत्र आहे; परंतु तेथें आत्महत्या केल्यानें तें पुण्यप्रद होतें, हाच त्यामध्यें कमीपणा आहे ।। १९ ।। गोकर्ण, सेतुबंध, रामेश्वर आदिहि पुष्कळशी श्रेष्ठ तीर्थें आहेत. परंतु ती दक्षिण दिशेस आहेत हाच त्यांच्यामध्यें कमीपणा आहे ।। २० ।। अशीं हीं कोटयावधि तीर्थें आहेत; परंतु त्यांच्यामध्यें कालिमा लागलेली आहे. कांहीं क्षेत्रीं उपवास करावा लागतो तर कांहीं ठिकाणी मुंडण करावें लागतें ।। २१ ।। सागर हा सर्व तीर्थामध्यें श्रेष्ठ आहे खरा; परंतु, त्यामध्यें अमावास्येस स्नान केलें असता तें पुण्यप्रद होतें हा त्यामध्यें कमीपणा आहे ।। २२ ।। अशा प्रकारें प्रत्येक तीर्थामध्यें कांहींतरी न्यून आहेच असें दिसत असल्यानें त्यांतील मुख्य क्षेत्र कोणतें आहे व आपणास कोणतें क्षेत्र प्रिय आहे, याचें स्पष्टीकरण आपल्याकडून होईल म्हणून हे शंकरा, तुझ्या चरणाजवळ आलों ।। २३ ।। स्कंदानें अशा प्रकारची विनंति करून शंकराच्या चरणीं लोळण घेतली. तेव्हां शंकरानें त्यांना त्वरित प्रेमानें उचलून पुढील प्रमाणें सांगितलें ।। २४ ।। (शंकर म्हणाले) हे मुला, तूं जो प्रश्न केला आहेस असाच प्रश्न पार्वतीनेहि केला होता. त्याचीच पुनरुक्ति तुझ्याजवळ करीत आहें. तें तूं शांत चित्तानें श्रवण कर ।। २५ ।। ज्याच्या दर्शनाचें मर्म एक लक्ष्मी जाणते किंवा प्रेमळ वैष्णव जे शुकसनकादिक मुनि ते जाणतात ।। २६ ।। कृपणाचें चित्त ज्याप्रमाणें त्याच्या ठेव्याकडे असतें तद्वत् ज्या मुख्य क्षेत्रासंबंधीं माझ्या चित्तामध्यें अत्यंत आवड आहे व तो माझा जणुं काय ठेवाच आहे खरा; परंतु, तूं माझा प्रिय पुत्र असल्यानें तो तुझ्याजवळ उघड करितों ।। २७ ।। मी स्मशानांत बसतो खरा; परंतु माझें चित्त ज्याचें सतत अनुसंधान करीत आहे तें दैवत ज्या स्थळीं आहे तें स्थळ तुला सांगतो; चित्त देऊन ऐक ।। २८ ।। ज्याच्या दर्शनानें अखिल विश्वाचा उद्धार होतो तो विठ्ठल भीमेच्या कांठीं पुंडलिकापुढें अठ्ठावीस युगापासून उभा आहे ।। २९ ।। ज्यानें वृक्षाची खोळ घेतलेली आहे, पार्वती व इतर देवहि ज्याची सेवा करितात, आणि आम्ही ज्या ठिकाणीं वस्ती करून राहिलों

आहोंत ।। ३० ।। वैकुंठ हे तेजानें प्रकाशिलेले आहे खरें तथापि हे त्यापेक्षां शुद्ध आहे. ज्याचें माहात्म्य तिन्ही लोकांपेक्षां श्रेष्ट आहे, असें हें पंढरी क्षेत्र आहे ।। ३१ ।। ज्यानें तिन्ही लोकांना दु:ख दिले त्याचा नाश करण्याकरितां म्हणून शंकरानें नम्रतापूर्वक ज्या श्रीहरीचें स्मरण केलें ।। ३२ ।। व जेथें त्रिपुरादिक तिन्हि दैत्यांचा नाश केला असें जें चराचराला पावन करणारें तीर्थ तेंच भीवरा होय ।। ३३ ।। ज्या ठिकाणीं सर्व तीर्थे सकाळीं, दुपारीं व संध्याकाळीं स्नानाकरितां येतात अशी ही पवित्र नदी तीहि ज्या विठ्ठलाच्या चरणी शरणांकित झाली ।। ३४ ।। अशा क्षेत्रांमध्यें पाप घडतें असें कोणी म्हणत असल्यास त्याची जिव्हा नष्ट होईल, यापेक्षां अधिक काय सांगू बरें ? ज्या ठिकाणी प्रत्यक्ष ब्रम्ह हें प्रकट आहे ।। ३५ ।। लोखंडाला परिसाचा स्पर्श होताच तें सोनें होतें. आतां त्या झालेल्या सुवर्णाचा कोणत्या प्रकारें हो पालट होईल ? ।। ३६ ।। एकदां कां मनुष्य पंढरी क्षेत्रीं गेला म्हणजे मग तो कोठेंहि राहो; तो कर्महीन जरी असला तरी वैकुंठांतच आहे असें समजावें ।। ३७ ।। शंकराचें असें हें मार्मिक गोड भाषण स्कंदानें श्रवण करितांच स्कंदासहित इतर ऋषिगणादि अति हर्षानें उल्हसित झाले व पंढरीक्षेत्रीं आले ।। ३८ ।। आणि म्हणून एकदां तरी पंढरी क्षेत्रीं जाऊन विठ्ठलरायाचें दर्शन घ्या म्हणजे तुम्हाला पुनरावृत्ति होणार नाहीं असें विष्णुदास नामदेवराय म्हणतात ।। ३९ ।।

जगी पेठा जाण असती अनेका । अति सुरंगा वाखाणिती ।।१।।
जंव तूं नं देखसी पेठ द्वारकेची । श्रीरंगरायाची राजधानी ।।२।।
द्वारकेची पेठ तेथें स्वरूप चोखट । बरवी बरवंट शोभत असे ।।३।।
तैसेचि पंढरीचें सोपें बहु ठाणें । संत सुलक्षण जाणताती ।।४।।
तयाचें दर्शनलाभ कोटीं गुणें झाला । भवसिंधु आटला हेळामात्रें ।।५।।
ऐसी पेठ निर्मिली देवेंही पंढरी । पुंडलीक द्वारी उभा असे ।।६।।
या पेठेचा शेटचा पुंडलीक भक्त । नामा शरणांगत केशवासी ।।७।।

(२४८) या विश्वामध्यें अनेक पेठा-क्षेत्रें आहेंत व त्या अति नयन मनोहर असल्यानें लोक त्यांची वाखाणणी करितात खरें ।। १ ।।

परंतु श्रीरंगरायाची राजधानी जी द्वारका ती जोपर्यंत त्यांनीं पाहिली नाहीं तोंपर्यंतच ॥ २ ॥ जें शुद्ध स्वरूप द्वारका नगरीमध्यें स्थित आहे तेंच स्वरूप वाळवंटामध्यें शोभत आहे ॥ ३ ॥ त्याचप्रमाणें पंढरीक्षेत्रांतील स्थळ हेंहि अति सुलभ आहे. याचा अनुभव सुलक्षणी जे संत ते जाणतात ॥ ४ ॥ त्याच्या दर्शनानें अमाप लाभ होऊन भवसागर क्षणांत कोरडा होतो ॥ ५ ॥ देवरायानें अशी ही पुण्यप्रद नगरी निर्माण केली आहे कीं, जेथें देवराय प्रत्यक्ष पुंडलीकरायाच्या द्वारापुढें उभा आहे ॥ ६ ॥ भक्त पुंडलीकराय हे या पेठेचे मुख्य शेटचे आहेत, अशा केशवरायाला नामदेवराय शरणांकित आले आहेत ॥ ७ ॥

पंढरी हें क्षेत्र पावन पवित्र । महिमा विचित्र त्रिभुवनीं ॥१॥
पाहिली या क्षणीं नासतीं पातकें । ऐसियासी तुके दुजे कोण ॥२॥
तृण पक्षीं सर्व झाले ऋषि देव । पहाती वैभव पंढरीचे ॥३॥
भूमि ते राहिली विष्णुचक्रावरी । वैकुंठीची परी सर्व येथें ॥४॥
टाळ नृत्य घोष पताकांचे भार । गर्जे भीमातीर सर्वकाळ ॥५॥
पुंडलिकांसाठीं ठाके केशीराज । भेटीने सायुज्य त्यास देती ॥६॥
स्नाने उद्धरती दर्शनें प्रशस्ती । वाचे नाम कीर्ति विठोबाची ॥७॥
नामा म्हणे लाभ थोर हा जोडतो । पंढरिसी येतो प्राणी त्यासी ॥८॥

(२४९) हें पंढरीक्षेत्र अत्यंत पवित्र असून त्याचा महिमा या त्रिभुवनामध्यें अपूर्व आहे ॥ १ ॥ ज्याच्या दर्शनमात्रें करून सर्व पापें दग्ध होतात अशा पवित्र क्षेत्राची तुलना दुसऱ्या कोणाशीं होईल ? ॥ २ ॥ सर्व ऋषीश्वर हे तेथील तृण, पक्षी, या रूपानें होऊन पंढरीच्या ऐश्वर्याचें अवलोकन करितात ॥ ३ ॥ विष्णुचक्रावर हीं भूमी उभारलेली असून वैकुंठांतील सर्व ऐश्वर्य तेथें दिसून येतें ॥ ४ ॥ भीमातीर हें पताकांच्या भारानें-समूहानें शोभायमान होऊन टाळ व मृदंग यांच्या नादानें दुमदुमलें आहे ॥५॥ हा केशीराज पुंडलीकरायाकरितां येथें स्थान मांडून उभा राहिला आहे आणि त्याची भेट होतांच तो त्यांना सायुज्य पद देतो. ॥ ६ ॥ येथील चंद्रभागेचें स्नान केलें असता उद्धार होतो आणि या विठ्ठलरायाच्या दर्शनानें

प्रसन्नता वाटते आणि वाणीनें या विठ्ठलरायाच्या नामकीर्तीचा उच्चार घडतो ॥ ७ ॥ जो कोणी या पंढरीक्षेत्राची वारी करितो त्याचा मोठा फायदा होतो असें नामदेवराय म्हणतात ॥ ८ ॥

पंढरीचे सुख आनंदें गर्जती । ध्यातसे पार्वती अखंडित ॥१॥
भीमातीरीं उभा सखा पांडुरंग । देई अंगसंग अखंडित ॥२॥
उशीर झाला काय काम काजा । यावें अधोक्षजा अनिरुद्धा ॥३॥
नामा म्हणे पहा पंढरी माझारी । केशीराज तारी एकसरा ॥४॥

(२५०) ज्या पंढरी क्षेत्रांतील सुखाचा आनंदानें घोष करितात त्याचें चिंतन पार्वती सतत करीत असते ॥ १ ॥ हा सखा पांडुरंग भीमातीरीं उभा आहे आणि तो निरंतर सर्वांना आपला अंगसंग-सहवास देतो ।२। हे अधोक्षजा, अनिरुद्ध, तुम्ही कोणत्या कार्यांत रममाण झालां आहांत कीं ज्या योगें तुम्हाला येथें येण्यास विलंब होत आहे ॥ ३ ॥ हा केशीराज सर्वांचा सारख्यापणानें कसा उद्धार करितो याची प्रतीति तुम्ही पंढरपुरास पहा असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

निंबलोण करूं पंढरीच्या सुखा । आणिक पुंडलिका मायबापा ॥१॥
पाहतां भूमंडळीं नाही आणिक रे । पांडुरंग क्षेत्रावांचूनिया ॥२॥
आणिमादी सिद्धि भक्तांचिये द्वारी । होऊनि कामारि वोळंगती ।३।
परलोकी येती परतोनी मागुते । सर्व सुख तेथें भोगावया ॥४॥
मुक्तिपद कोणी न घे फुकासाठीं । हिंडे वाळवंटीं दीनरूप ॥५॥
भक्तांचिया पायां पडतों पुढतां पुढती । मज करा सांगाती मोक्ष म्हणे ॥६॥ सत्य लोकी जया सुखाची शिराणी । तें आम्हां अनुदिनीं प्रत्यक्ष दिसे ॥७॥ बंदीजन नामा उभा महाद्वारी । कीर्ति चराचरी वर्णितसे ॥८॥

(२५१) पंढरीच्या सुखाला आणि पुंडलीकरायाच्या मायबापांना निंबलोण करूं ॥ १ ॥ पांडुरंगाचें निवासस्थान जें पंढरीक्षेत्र त्याच्या सारखें पवित्र असें दुसरें स्थळ या भूमंडळामध्यें नाहीं ॥ २ ॥ या पांडुरंगरायाच्या

भक्तीच्या घरामध्यें अणिमादिक अष्टमहासिद्धि दासी होऊन राबतात ॥ ३ ॥ येथील सुखाचा भोग मिळावा म्हणून परलोकांतील देवताहि तेथून परत येतात ॥ ४ ॥ मुक्ति ही श्रेष्ठ खरी; परंतु येथील सुखापुढें ती निष्प्रभ होण्यानें ती फुकट पदरांत पडत असतां तिचा कोणी स्वीकार करीत नाहींत. आणि म्हणून ती मुक्ति येथील वाळवंटामध्यें दीन होऊन भटकत असते ॥ ५ ॥ मोक्ष हाहि दीन होऊन संतांच्या चरणीं लोटांगण घालतो व तुम्ही आपल्या सहवासाचा लाभ द्या अशी तो संतांना प्रार्थना करितो ॥ ६ ॥ ज्या सुखाला सत्य लोकामध्यें अग्रस्थान मिळालें आहे तें सुख आम्हाला येथें प्रत्यक्ष दर्शन देत आहे ॥ ७ ॥ ज्याची कीर्ति अखिल विश्वामध्यें गर्जत आहे. त्याला अंकित झालेला नामदेव हा त्याच्या महाद्वारामध्यें तिष्ठत उभा आहे ॥ ८ ॥

पंढरीचे सुख जिहीं अनुभविलें । भावे अनुसरले विठ्ठलपायी ॥१॥ काया वाचा मन रंगले चरणीं । धरियेला मनीं पांडुरंग ॥२॥ नामाचेनि बळे उडविली साधनें । तोडिली बंधनें संसाराची ॥३॥ मुक्तिपद कोणी ने घे फुकासाठी । हिंडे वाळवंटी दीनरूप ॥४॥ योगयांचे घरीं रिघे काकुलती । आव्हेरिले संतीं म्हणोनियां ॥५॥ दोन्ही कर जोडूनि मोक्ष पाहे वास । म्हणे होईन दास हरिदासाचा ॥६॥ तंव तुच्छ करोनी न पाहाती दृष्टी । आपंगिलें शेवटीं ब्रह्मज्ञानें ॥७॥ अष्टमहासिद्धी म्हणती कवणगति । यावें काकूलती कवणा आम्ही ॥८॥ मोक्ष भक्ति जिही हाणितल्या पायीं । आमुचीं ते सोयी काय धरिती ॥९॥ ऐसें भक्तराज देवा वंद्य झाले । ते एक राज्य केले पुंडलिकें ॥१०॥ हर्षे निर्भर नामा-नाचे महाद्वारी । कीर्ति चराचरी वर्णितसे ॥११॥

(२५२) ज्यांनीं पंढरी क्षेत्रांतील सुखाचा अनुभव घेतला आहे तेहि प्रेमानें या विठ्ठलाच्या पायीं अंकित झाले ॥ १ ॥ या पांडुरंगरायाला त्यांनीं आपल्या मनामध्यें धारण करून ते कायावाचा मनानें त्याच्या चरणीं

रंगले ।। २ ५।। त्याच्या नामोच्चाराच्या सामर्थ्यानें इतर साधनें हीं निष्प्रभ ठरलीं. संसार बंधनाच्या सर्व शृंखला तुटून गेल्या ।। ३ ।। मुक्तिपद श्रेष्ठ खरें; परंतु, त्याची कवडीमोल किंमत होण्यानें त्याचा फुकट कोणी स्वीकार करीत नाहीं. म्हणून मोक्ष हा दीनपणानें वाळवंटामध्यें भटकत राहतो ।। ४ ।। या मोक्षाचा संतांनीं धि:कार केल्यानें तो योगी लोकांच्या येथें दीन होऊन घरघुशा झाला ।। ५ ।। हरीच्या दासांचा दास व्हावें म्हणून मोक्ष हा हात जोडून त्यांची वाट पहातो ।। ६ ।। अशा या निर्लज्ज मोक्षाकडे संत हे ढुंकून पहात नाहींत हें पाहून शेवटीं ब्रम्हज्ञानानेंहि त्याचा इन्कार केला ।। ७ ।। आतां आमची कोणती गती होईल अशा चिंतेनें अष्टमहासिद्धि हताश झाल्या आणि आतां आपण कोणाला शरण जावें अशी त्यांची केविलवाणी स्थिति झाली ।। ८ ।। ज्या भक्ति प्रभावानें भक्तांनीं मोक्षाला हि तुच्छ लेखलें तेथें आमचा काय पाड लागणार ? ।। ९ ।। असे हे निरपेक्ष भक्त देवांनाहि पूज्य झाले. पुंडलीकरायानेंच असें हें साम्राज्य हस्तगत केलें ।। १० ।। ज्याची कीर्ति चराचरामध्यें विकसित झाली आहे अशा पांडुरंगरायाच्या महाद्वारामध्ये नामदेवराय हे आनंदोत्कर्षानें नाचतात ।। ११ ।।

पंढरीचे सुख पाहतां एक घडी । वास कल्प कोडी वैकुंठीचा ।।१।। आणितां अनुमाना न पवेसरी । महिमा न वर्णवे थोरीं सहस्र-मुखा ।।२।। हें सुख सुरवरां स्वप्नी नाहीं दृष्टीं । जैसें वाळवंटी तुम्हां आम्हां ।।३।। धन्य चंद्रभागा पुण्य सरोवर । धन्य भीमातीर पुण्य भूमी ।।४।। धन्य नरनारी गर्जती हरिनामें । ऐकोनि प्रेमे डोले शूलपाणी ।। ५ ।। धन्य वेणु नाद धन्य वृंदावन । धन्य तें महिमान क्षेत्रवासी ।। ६ ।। धन्य पंचक्रोशी धन्य आसपासी । दुम दुमी अहर्निशीं नामघोष ।।७।। धन्य पशु पक्षि कीटक आणि भृंग । जयां अंगसंग पांडुरंगीं ।।८।। धन्य ते तरुवर अवघे लहान थोर । अवतरले अमर गुप्तरूपे ।।९।। धन्य ते संसारी वर्तती जीवनमुक्त । जया आर्त असे पांडुरंगीं ।। १० ।। धन्य त्याचा वंश ज्या नामी विश्वास । धन्य विष्णुदास नामा तेथें ।।११।।

१ टीप- २५१ व २५२ या अभंगातील कांहीं चरणांची पुनरुक्ती आहे.

(२५३) पंढरीच्या सोहळ्याच्या सुखाचा अनुभव एक घडीभर घेतला असतां वैकुंठांतील एक कल्पपर्यंत निवासाचें पुण्य प्राप्त होतें ॥१॥ त्या सुखाला कोणतीच उपमा देता येत नाहीं. तेथील थोर महिमा वर्णन करण्यास शेषहि असमर्थ ठरतो ॥ २ ॥ तुम्हां आम्हांला वाळवंटामध्यें जें सुख प्राप्त होतें तें इंद्रादिक देवांनी स्वप्नांतहि प्रतीत होत नाहीं ॥ ३ ॥ चंद्रभागा ही खरोखर पुण्यप्रद असें सरोवर होय. भीमाकांठ ही पुण्य भूमि होय. ती धन्य होय ॥ ४ ॥ जे स्त्रीपुरुष हरिनामाची गर्जना करितात ते धन्य होत. शंकर हा त्यांच्या गाण्यावें प्रेमानें श्रवण करून डोलायमान होतो ॥ ५ ॥ तेथील वेणुनाद धन्य होय. तेथील वृन्दावन धन्य होय. तेथील क्षेत्र निवासी यांच्या महात्म्याचीं धन्यता होय ॥ ६ ॥ तेथील पंचक्रोशी व त्या सभोंवती असणाऱ्या प्रदेशामध्यें सतत नामघोष दुमदुमतो म्हणून ते धन्य होत ॥ ७ ॥ पांडुरंगाच्या सान्निध्यांत जे पशु, कीटक आणि मृग राहतात. त्यांना पांडुरंगाचा सहवास होत असल्यामुळें, ते धन्य होत ॥ ८ ॥ जे देव तेथें गुप्त रूपानें लहान अथवा मोठे वृक्ष होऊन राहिले आहेत ते धन्य होत ॥ ९ ॥ ज्यांचें प्रेम पांडुरंगरायावर आहे असे जे हे संसारांत असून जीवनमुक्त झालेले भक्त, ते धन्य होय ॥ १० ॥ ज्यांच्या नामाच्या ठिकाणीं विश्वास आहे अशा भक्तांचा वंश धन्य होय. तेथील भगवद्भक्त जो विष्णुदासनामा तो धन्य होय ॥ ११ ॥

ऐका पंढरीचे महिमान । राउळे तितुके प्रमाण । तेथील तृण आणि पाषाण । तेहि देव जाणावे ॥१॥ ऐसी पंढरी मनीं ध्याती । त्यासी तिहीं लोकीं गति । ते आणिका तीर्था जाती । ती वंदिती तयांसी ॥२॥ वाराणासीं चालिजे मासा । गोदावरी एक दिवसां । पंढरी पाऊल परियेसा । ऐसा ठसा नामाचा ॥ ३ ॥ ऐसे शंकर सांगे ऋषी जवळी । सकळ तीर्थें माध्यान काळीं । येती पुंडलिका जवळी । करिती अंघोळी वंदिती चरण ॥ ४ ॥ ऐसेनि तिर्थी पाप घडे । असत्य बोलतां जिव्हा झडे । नामा विनवी संतापुढे । पंढरी पेठ नोसंडावी ॥ ५ ॥

(२५४) पंढरीक्षेत्राचें माहात्म्य किती अवर्णनीय आहे तें श्रवण करा. या क्षेत्रांत जितकीं देवळें, गवत आणि दगड आहेत ते देवरूपच होत ॥ १ ॥ पंढरी क्षेत्राविषयीं अशी ज्याच्या मनामध्यें पूर्णश्रद्धा आहे त्यांना तिन्ही लोकामध्यें मुक्तद्वार आहे. इतर तीर्थांकडे तें गेले असतां तीं त्यांना वंदन करितात ॥ २ ॥ काशी क्षेत्राच्या एका महिन्याच्या सतत प्रदक्षणेचे श्रेय गोदावरीच्या एका दिवसाच्या प्रदक्षणेनें मिळते आणि पंढरपुरामध्यें तर एक पाऊल टाकले असतां या सर्व पुण्याचा लाभ होतो ॥ ३ ॥ पुंडलीक रायाकडे सर्व तीर्थें माध्यान्हकाळीं स्नानास येतात व त्यास वंदन करितात, असें हें माहात्म्य शंकर ऋषींना सांगतात ॥ ४ ॥ अशा पवित्र क्षेत्रीं पाप घडतें असें असत्य भाषण करणाराची जिव्हा नष्ट होते. म्हणून पंढरी क्षेत्र केव्हांहि सोडूं नये अशी विनंति नामदेवराय संतांना करितात ॥ ५ ॥

धन्य पंढरीचे सकळ ही जन । जिहीं सख्य केलें जाण विठ्ठल पायीं ॥१॥ विठ्ठल हा ध्यानीं विठ्ठल हा मनीं । विठ्ठल चिंतनीं रात्रं दिवस ॥२॥ विठ्ठलाविण जया न गमे एक घडी । सर्वस्वें आवडी विठ्ठलची ॥३॥ विठ्ठलची माता विठ्ठलची पीता । भगिनी आणि भ्राता विठ्ठल ज्यांचा ॥४॥ विठ्ठलचि मित्र विठ्ठलचि पुत्र । विठ्ठल कुळगोत्र केला जिहीं ॥५॥ विठ्ठलचि क्रिया विठ्ठलचि कर्म । विठ्ठल सकळ धर्म कुळ दैवत ॥६॥ गुज गौप्य जीवीचें विठ्ठला सांगावें । विठ्ठलें पुरवावें कोड त्यांचें ॥७॥ सर्व काळ करणे विठ्ठलाचि कथा । विठ्ठल जडला चित्ता जयाचिया ॥८॥ विठ्ठल जागृती स्वप्नीं हे सुषुप्तीं । अखंड ओसणती विठ्ठल विठ्ठल ॥९॥ ऐसा सर्वस्वेंसी विठ्ठल भजतां । सुख आलें हातां विठ्ठलाचें ॥१०॥ नामा म्हणे त्याचे चरण रेणु होऊन । झालोंसे पावन आम्ही आतां ॥११॥

(२५५) ज्यांनीं विठ्ठलरायाशीं अनन्य प्रेम केलें अशा सर्व पंढरी-निवासी जनाची धन्य होय ॥ १ ॥ ज्यांच्या ध्यानांत व मनांत रात्रंदिवस

विठ्ठलाच्या ध्यास लागला आहे ॥ २ ॥ विठ्ठलाशिवाय ज्यांना एक क्षणहि करमत नाहीं, ज्यांना विठ्ठलाचें अनन्य प्रेम आहे ॥ ३ ॥ ज्यांची माता व बाई आणि बहीण व भाऊ केवळ एक विठ्ठलच होय ॥ ४ ॥ ज्यांचा मित्र व मुलगा तसेच कुळगोत्र एक विठ्ठलच झाला आहे ॥ ५ ॥ ज्यांच्या क्रिया व कर्म तसेच धर्म आणि कुळदैवत एक विठ्ठलच आहे ॥ ६ ॥ आपलें सर्व गौप्य विठ्ठलाला सांगावें व त्यानीं आमच्या सर्व मनोकामना पूर्ण कराव्या अशी ज्यांची पूर्ण श्रद्धा असते ॥ ७ ॥ जे सतत विठ्ठलाची कथा करितात आणि ज्यांच्या चित्तामध्यें एक विठ्ठलरायच संलग्न झाला आहे ॥ ८ ॥ ज्यांना जागृति, स्वप्न व सुषुप्तीमध्यें विठ्ठलाचाच ध्यास असतो आणि विठ्ठल, विठ्ठल, म्हणून जे झोंपेंत नित्यश: बरळतात ॥ ९ ॥ अशा सर्व प्रकारें विठ्ठलाचें भजन केलें असतां जे विठ्ठलाच्या सर्व सुखाचे धनी होतात ॥ १० ॥ अशा अनन्य भक्तांचा मी चरणरज होऊन कृतकृत्य झालों असें नामदेवराय म्हणतात ॥ ११ ॥

पंढरीचे जन अवघे पावन । ज्या जवळी निधान पांडुरंग ॥१॥ विठ्ठल नामें घेणें विठ्ठल नामें देणें । विठ्ठल नामें करणें सकळ काम ॥२॥ विठ्ठल नामें क्रिया विठ्ठल नामे कर्म । हाचि प्रिय धर्म जया चित्ता ॥३॥ सभरा भरित विठ्ठल मागे पुढें । जिकडे जाती तिकडे विठ्ठलचि ॥४॥ निरंतर गर्जती विठ्ठल पवाडे । ऐत निवाडे विठ्ठल रूप ॥५॥ विठ्ठल नाम सरतें विठ्ठलनाम पुरतें । विठ्ठल नाम ज्यातें भांडवल ॥६॥ विठ्ठल नाम करिती अवधा योग क्षेम । नित्य ज्यांचें प्रेम विठ्ठल-नामीं ॥७॥ सदा हृदयीं भरित विठ्ठलाचे प्रेम । हर्षे विठ्ठलनामा गर्जताती ॥८॥ विठ्ठलनामीं गोडी धरोनी आवडी । विठ्ठल नामीं बुडी दिली जेणें ॥९॥ नामा म्हणे अवघें विठ्ठलचि झालें विठ्ठलें दिधलें प्रेमसुख ॥१०॥

(२५६) पांडुरंग हा ठेवा ज्यांच्या संग्रहीं आहे असे पंढरीचें सर्व जन कृतकृत्य होत ॥ १ ॥ विठ्ठल नाम हेंच ज्याचें घेणें असून देणें हेंहि

विठ्ठल नामच आहे आणि विठ्ठल नामोच्चार करणें हेंच ज्यांचें सर्व काम आहे ।। २ ।। विठ्ठल नाम हीच ज्यांची क्रिया असून कर्म हेंहि विठ्ठल-नामच आहे आणि विठ्ठल नाम हाच धर्म ज्यांच्या चित्ताला प्रिय वाटतो ।। ३ ।। विठ्ठलराय हाच मार्गे पुढें असा पूर्ण झाला असून जिकडे जातात तिकडे विठ्ठल हाच ज्यांचा विषय झाला आहे ।। ४ ।। जो विठ्ठलरायाच्या कीर्तिचा घोष करितात व त्या योगें ज्यांना सहजच विठ्ठलरूप प्राप्त होतें ।। ५ ।। ज्यांचें भांडवल विठ्ठल नाम हेंच असून पूर्ण व अपूर्ण रूपानें विठ्ठलरायच ज्यांचा झाला आहे ।। ६ ।। ज्यांचे प्रेम विठ्ठल नामाच्या ठिकाणीं आहे आणि तेंच विठ्ठलरायाचें नाम ज्यांचा योगक्षेम करितो ।।७।। ज्यांच्या हृदयामध्यें विठ्ठलरायाच्या प्रेमाचें आविष्करण झालें असून ते विठ्ठल नामाचा आनंदानें घोष करितात ।। ८ ।। विठ्ठल नामाची गोडी प्रेमानें धरून ज्यांनीं विठ्ठल नामाच्या ठिकाणीं बुडी दिली आहे ।। ९ ।। ज्यांना विठ्ठल रायाचें प्रेम सुख प्राप्त झालें ते सर्वजण विठ्ठलरूप झाले असें नामदेवराय म्हणतात ।। १० ।।

नित्य हे दिवाळी असे पंढरपुरीं । ओंवाळिती नारी विठ्ठलासी ।।१।। पावां वाजे वेणु बरविया नादें । नाम घोष आनंदे नाचतसे ।।२।। नामा म्हणे आम्ही पंढरीये जावें । कवतुकें पहावे विठ्ठलासी ।।३।।

(२५७) पंढरी क्षेत्रीं नित्य दिवाळी असून तेथील सर्व स्त्रिया विठ्ठलास ओंवाळणी करितात ।। १ ।। तेथें पांवा व वेणु मधुर ध्वनी करीत आहे आणि भक्तजन आनंदानें नामघोष करीत नाचताहेत ।। २ ।। आम्ही पंढरीला जावें व कौतुकानें विठ्ठलास पहावें असें नामदेवराय म्हणतात ।। ३ ।।

अवघी हे पंढरी सुखाची मांदुस । माझा स्वप्रकाश रत्नहरी ।।१।। धन्य संतजन तेथिचे पारखी । ज्या झाली ओळखी विठ्ठल नामीं ।२। अनुभवुनीं चित्तीं पाहिलें विवेकें । धरिलें पुंडलीकें हृदयकमळीं ।३।

त्रिभुवन खेळण प्रेमाचें कोंदण । करोनि भूषण भोगितसें ॥४॥
युगें गेलीं परी पालटचि नाहीं । नित्य शुद्ध पाही तेज:पुंज ॥५॥
पाहतां नित्य नवें ध्यातां चित्त निवे । म्हणोनि नामा जिवे विसंबेना॥६॥

(२५८) ही सर्व पंढरी म्हणजे सुखाची पेटी आहे व त्या पेटींतील रत्न म्हणजे माझा स्वयं प्रकाश हरी हा होय ॥ १ ॥ ज्यांना विठ्ठल नामाची ओळख झाली असे तेथील पारखी जे संतजन ते धन्य होत ॥ २ ॥ या पुंडलीकरायानें विवेकानें आपले चित्तांत या सुखाचा अनुभव घेऊन प्रतीति घेतली आणि तें आपल्या हृदयकमळामध्यें सांठवून ठेविलें ॥ ३ ॥ प्रेमाच्या कोंदणांत 'त्रिभुवनाचें खळणें' स्थित करून त्याचा अलंकार जे आपल्या अंगावर धारण करितात ॥ ४ ॥ अठ्ठावीस युगें लोटलीं असतांहि ज्याच्या शुद्ध अशा तेज:पुंज कांतीमध्यें पालट झाला नाहीं ॥ ५ ॥ ज्याला पहाण्यांत नित्य नावीन्यता असून ज्याचें ध्यान केलें असतां चित्तांत समाधान होतें आणि म्हणून नामदेवरायाच्या अंतःकरणास त्याचें केव्हांच विस्मरण होत नाहीं ॥ ६ ॥

अनंत तीर्थांचें माहेर अनंत रूपांचें सार । अनंता अनंत अपार । तो हा कटीं कर ठेवूनि उभा ॥१॥ धन्य धन्य पांडुरंग । सकळ दोषां होय भंग । पूर्वज उद्धरती सांग । पंढरपूर देखिलिया ।२। निरा भिवरा पडतां दृष्टी । स्नान करितां शुद्ध सृष्टि । अंती तों वैकुंठप्रति । ऐसें परमेष्टि बोलिला ॥३॥ तेथें एक शीत दिधल्या अन्न । कोटी कुळांचे होय उद्धरण । कोटि याग केले पूर्ण । ऐसे महिमान ये तीर्थीचे ॥४॥ नामा म्हणे धन्य जन्म । जे धरिती पंढरीचा नेम । तयां अंतीं पुरुषोत्तम । जीवें भावें न विसंबे ॥५॥

(२५९) जो विठ्ठलराय कटीवर हात ठेवून उभा आहे तो अनेक तीर्थांचें माहेरघर व अनंतरूपांचें सार असून अत्यंत असा अनंत अपार आहे—अमर्यादित आहे ॥ १ ॥ धन्य धन्य तो पांडुरंग, ज्याच्या दर्शनानें सव पापें दग्ध होतात आणि पंढरी क्षेत्राला पहातांच पूर्वजांचा उद्धार होतो

॥ २ ॥ निरा भिवरा दृष्टी पडल्यास व तिचें स्नान घडल्यास सर्व सृष्टी शुद्ध होते आणि शेवटीं वैकुंठ लोक प्राप्त होतो असें ब्रम्हदेवानें सांगितलें आहे ॥ ३ ॥ या क्षेत्रामध्यें अन्नाचें एक शीत दान दिलें असतां कोटयावधि कुळें पावन होतात आणि कोटयावधि यागाची पूर्तता केल्याचें श्रेय मिळतें असें हें या तीर्थाचें माहात्म्य आहे ॥ ४ ॥ जे कोणी पंढरीच्या वारीचा नियम करितात त्यांचा जन्म धन्य होय. अशा एकविध भक्तांना हा पुरुषोत्तम त्यांच्या अंतसमयीं केव्हांच विसरत नाहीं, असें नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुलभ । जेथें समारंभ हरि कथेचा ॥१॥
तें एक पंढरी विख्यात त्रिभुवनीं । सकळां शिरोमणीं चंद्रभागा ॥२॥
ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुखरूप । जेथें त्रिविध ताप हारपती ॥३॥
ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुंदर । गरुड टक्केभार विराजतीं ॥४॥
ऐसें तीर्थ कोणीं दाखवा निर्मळ । जेथें नासे मळ दुष्ट बुद्धि ॥५॥
नामा म्हणे संत जनांचें माहेर । गातां मनोहर गोड वाटे ॥६॥

(२६०) ज्या ठिकाणीं प्रत्यक्ष परब्रह्माची भेट होतें असें कोणतें तीर्थ आहे तें मला दाखवा पाहूं हो ? ॥१॥ या त्रिभुवनामध्यें असें कोठें व कोणतें क्षेत्र आहे कीं ज्या ठिकाणीं सर्वमान्य अशी चंद्रभागा आहे ॥ २ ॥ ज्याला पहाण्यांत मन शांत होतें असें तीर्थ मला कोणीहि दाखवावें ॥ ३ ॥ ज्या ठिकाणीं प्रेमाचा पूर वाहात आहे असें सुन्दर तीर्थ मला कोणीतरी दाखवा ? ॥ ४ ॥ ज्या ठिकाणीं कीर्तनाचा समारंभ होत आहे असें सुलभ तीर्थ मला कोणीतरी दाखवा ? ॥ ५ ॥ सर्व जीवांना जेथें प्रत्यक्ष परब्रह्मरूपता प्राप्त होते असें निर्मळ तीर्थ कोठें आहे तें मला कोणीतरी दाखवा ? ॥ ६ ॥ धन्य तें पंढरपूर क्षेत्र कीं जें आम्हां दीनांचें गीत गाण्याचें माहेरघरच आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

टिप:—ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुलभ । जेथें प्रत्यक्ष भेटे परब्रम्ह ॥१॥ कोठे ऐसे क्षेत्र आहे त्रिभुवनीं । सकळां शिरोमणी चंद्रभागा ॥२॥ ऐसे तीर्थ कोणी दाखवावें एक । देखतांचि सुख पावें मन ॥३॥ ऐसे तीर्थ कोणी दाखवा साजिरें । सदा प्रेमपुरें वोसंडत ॥ ४ ॥ ऐसें तीर्थ कोणी दाखवा निर्मळ । परब्रम्ह केवळ सकळां जीवा ॥ ६ ॥ नामा म्हणे आम्हां दीनांचें माहेर । धन्य पंढरपूर गीतीं गातां ॥ ७ ॥

काय सांगू तुझी करणी नारायणा। वेदपारायणा केशिराजा ॥१॥
पृथ्वीवरीं तीर्थें आहेत अपार। परी पंढरीची सर एका नाहीं ॥२॥
जन्मोजन्मींचियां पातकां दरारा। चुके येरझारा एके खेपे ॥३॥
ब्रम्हज्ञानेंविण मोक्ष आहे भूतीं। वाचेसी ते घेती विठ्ठल नाम ॥४॥
बेचाळीसां सहित जातील वैकुंठा। नामा म्हणे भेटा विठ्ठल देवीं ॥५॥

(२६१) हे केशीराजा, तूं वेदपारायण आहेस. हे नारायणा, तुझ्या अपूर्व कृतीचा महिमा कसा सांगतां येईल बरें? ॥ १ ॥ या पृथ्वीवर पुष्कळशीं तीर्थें आहेत खरीं; परंतु तीं पंढरी क्षेत्राच्या पासंगासहि उतरणार नाहींत ॥ २ ॥ या पंढरी क्षेत्राची एकादी जरी वारी घडली तरी त्यामुळें जन्मोजन्मी घडलेल्या पातकांना धाक वाटतो व त्यायोगें प्राण्यांच्या जन्ममृत्यूच्या येरझारा नष्ट होतात ॥ ३ ॥ ब्रम्हज्ञानाशिवाय मोक्ष होत नाही हें खरें; परंतु विठ्ठल नामोच्चार केला असतां ब्रम्हज्ञानाशिवाय हि त्यास मोक्ष होतो ॥ ४ ॥ विठ्ठल नामोच्चार करणारांचीं बेचाळीस कुळें वैकुंठास प्राप्त होत असल्यानें या विठ्ठलरायाची त्वरित भेट घ्या असे नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

सांडूनि पंढरी जासी आणिका तीर्था। लाज तुझ्या चित्ता कैसी नये ॥१॥ त्रिभुवनिचीं तीर्थें झालीं तीं मळीन। न्हावया पावन आली येथें ॥२॥ एवढा ब्रम्हानंद कैचा आणिका ठायीं। जो या आहे पायीं विठोबाच्या ॥३॥ काळ मृत्यु दोन्हीं घालोनि पायांतळीं। वाजलिया टाळी कीर्तन संगें ॥ ४ ॥ नित्य नवी दिवाळी सुखाचा सोहळा। भोगिजे अवलीला संतसंगें ॥५॥ धर्म अर्थ काम मोक्ष मुक्ति चारी। देतो हा मुरारी नामें एका ॥६॥ नामा म्हणे चला जाऊं पंढरीये। पाहूं बापमाये पांडुरंग ॥ ७ ॥

(२६२) तूं पंढरी सारख्या सर्व श्रेष्ठ क्षेत्राचा त्याग करून इतर तीर्थाला जाण्याकडे प्रवृत्त कसा होत आहेत? याची तुला लाज कां वाटत

नाहीं ? ।। १ ।। त्रिभुवनांतील तीर्थें हीं इतरांच्या पापांचें क्षालन केल्यानें जीं अशुद्ध झालीं आहेत त्या अशुद्धतेचें क्षालन करण्याकरितां ती सर्व तीर्थें लपून या पंढरीक्षेत्रीं आलीं आहेत ।। २ ।। या विठ्ठलरायाच्या पायाजवळ जो अपूर्व ब्रम्हानंद भोगावयास मिळतो तो इतर ठिकाणीं कसा प्राप्त होणार ? ।। ३ ।। कीर्तनामध्यें जो कोणी टाळघा वाजवितो तो काळाच्या व मृत्यूच्या डोक्यावर पाय ठेवून नाचतो ।। ४ ।। येथील संतांच्या संगती-मध्यें नित्य नूतन अशा दिवाळीच्या सोहळ्याचे सुखाचा सहज लाभ घडतो ।। ५ ।। हा मुरारी फक्त एका नामोच्चरणानें धर्म, अर्थ, काम व मोक्ष देणगी देतो ।। ६ ।। अहो जनहो, पंढरपुरास जाऊं या आणि मायबाप जो पांडुरंगराय त्यास पाहूं या असें नामदेवराय म्हणतात ।। ७ ।।

काशी हे पंढरी । प्रयाग नीरा नृसिंहपुरी । पिंड ठेवा पुष्पवती संगम पदावरी । पूर्वज होती चतुर्भुज ॥ १ ॥ सकळ तीर्थें वाराणसी । मध्यानकाळीं वेगीं पंढरीसी । ओंवाळीती वीठोबासी । विश्वनाथ म्हणोनियां ॥२॥ म्हणऊनि वेगीं चला पंढरपुरा । विठोबारायाच्या नगरा । चंद्रभागा सरोवरा । देव कौतुक पाहती ॥३॥ वाराणसी मणीकर्णिका । चंद्रभागा पुंडलिका । वाराणसी भागीरथी देखा । पांडूरंगीं भीमरथी ॥४॥ वाराणसी पंचगंगा । पुष्पावती पांडूरंगा । महापातकें जाती भंगा । तीर्थें मस्तकीं वंदिल्या ॥ ५ ॥ वाराणसी दंडपाणि । क्षेत्रपाळ हे हनुमंत दोन्हीं । सकळ तीर्थें विठोबाचे चरणीं । काशी होय पंढरी ॥ ६ ॥ वाराणसी माधव बिंदू । पांडुरंगीं वेणु नादू । पंचक्रोशी तीर्थें उदंडू । पांडुरंगीं पद्मतीर्थ ॥ ७ ॥ वाराणसी मोक्ष पंथा । विठ्ठलाचेनि सायुज्जता । एवढें तीर्थ त्रिभुवनीं पाहतां । तीर्थ नाहीं यापरतें ॥८॥ वाराणसी चंद्रमौळी । पांडुरंगीं वनमाळी । विश्वनाथ नंदी जवळी । विठोबा जवळीं गरुड असे ॥ ९ ॥

वाराणसी गौरी म्हणा। पांडुरंगी रुक्मिणी जाणा। वाराणसी अन्नपूर्णा। पांडुरंगीं जाणा सत्यभामा ॥ १० ॥ वाराणसी त्रिशुळावरी। सुदर्शनावरी पंढरी। कांही संदेह मनी न धरी। काशी होय पंढरी ॥ ११ ॥ ऐसें सकळ तीर्थांचें माहेर। तीर्थ नाही या परते थोर। विष्णुदास नामयाचा दातार। पुंडलिका सहित असे ॥ १२ ॥

(२६३) पवित्र क्षेत्र जें पंढरपूर हीच काशी होय. नीरा नृसिंहपुर म्हणजेच प्रयाग, पुष्पवती संगम पदावर पिंड ठेवणाऱ्याचे पूर्वज चतुर्भुज होतात ॥ १ ॥ वाराणसी तीर्थासहित सर्व तीर्थे हीं पंढरी क्षेत्रीं माध्यान्ह काळीं येतात आणि विठोबा हाच विश्वनाथ आहे असा निश्चय करून त्याची ओवाळणी करितात ॥ २ ॥' चंद्रभागेच्या सरोवराकांठीं वसलेलें असें विठ्ठलरायाची नगरी जें पंढरपुर तिकडे त्वरेनें चला. कारण, देवही तेथील अपूर्वता अवलोकन करितात ॥ ३ ॥ जशी काशी क्षेत्रीं मनकर्णिका तद्वत् चंद्रभागा ही पुंडलिका करितां आहे. काशी क्षेत्रीं भागीरथी तद्वत् पांडुरंगाची भीमरथी ॥ ४ ॥ काशींक्षेत्रीं पंचगंगा तर पांडुरंगाची पुष्पवती अशा पवित्र तीर्थांचें मस्तकीं वंदन केलें असतां महापातकें नष्ट होतात ॥५॥ काशीक्षेत्रीं दंडपाणि-शंकर व हनुमान हे दोघे क्षेत्रपाळ होत. सर्व तीर्थे हीं विठ्ठलरायाच्या चरणीं लोळण घेत असल्यानें श्री क्षेत्र पंढरपुर हें जणु काय काशी क्षेत्रच होय ॥ ६ ॥ माधवबिंदु हा वाराणसीस तर 'वेणुनाद हा पांडुरंगाचे समीप होय. काशींच्या पंचक्रोशींमध्ये अनेक तीर्थें आहेत. तसें पांडुरंगाचें जवळ पद्मतीर्थ होय ॥ ७ ॥ काशी क्षेत्र हें मोक्षस्थळ तर विठ्ठलराय हे सायुज्यता मुक्ति देणारे होत, आणि या विश्वामध्यें अनेक तीर्थें आहेत खरीं, परंतु पंढरी तीर्थाची बरोबरी करणारें एकहि क्षेत्र नाहीं ॥८॥ वाराणसी हें शंकराचें स्थळ होय. पंढरी क्षेत्रीं पांडुरंग हा वनमाळी रूपानें आविष्कृत झालेला आहे. नंदी हा विश्वनाथाजवळ तर विठ्ठलराया समीप गरुड होय ॥ ९ ॥ काशीक्षेत्रीं पार्वती तर पांडुरंगाजवळ रुक्मिणी; वाराणसीस अन्नपूर्णा तर पंढरीक्षेत्रीं पांडुरंगाजवळ सत्यभामा होय ॥१०॥

काशी हीं त्रिशूळावर उभारली गेली तर पंढरी क्षेत्र हें सुदर्शनावर उभारलें गेलें आणि म्हणून काशी हा पंढरी क्षेत्र होय हें निःसंशय समजावें ।।११।। आणि म्हणून सर्व तीर्थांचें माहेर घर म्हणजें पंढरीक्षेत्र होय. त्या ठिकाणीं विष्णुदास नामयाचा दातार जो पांडुरंगराय तो पुंडलीकरायासहित वास्तव्य करितो. म्हणून या पवित्र क्षेत्राशिवाय दुसरें थोर तीर्थ नाहीं ।।१२।।

पाहतां देऊळाची पाठ । तीर्थे घडली तीनशें साठ ।। १ ।।
स्नान करितां पन्हाळें । उद्धरतीं सर्वकुळे ।। २ ।।
सन्मुख पाहतां विठाई । त्यासी उपमा द्यावया नाहीं ।। ३ ।।
ऐसा पंढरीचा महिमा । काय वर्णू म्हणे नामा ।। ४ ।।

(२६४) विठ्ठलरायाच्या देवळाची पाठ पहातांच मनुष्याला तीनशें साठ तीर्थांचें श्रेय मिळतें ।। १ ।। येथील पन्हाळें तीर्थाचें स्नान केलें असतां प्राण्याच्या सर्व कुळांचा उद्धार होतो ।। २ ।। या विठाईला सन्मुख पाहिलें असतां जें फळ मिळतें तें अनुपमेय होय ।। ३ ।। अशा प्रकारे या पंढरीचें माहात्म्य अपूर्व असल्यानें त्याचें मी कोणत्या प्रकारें वर्णन करावें, असें नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

पंढरीची युगसंख्या

कृत त्रेता द्वापार कली । ऐसा चौयुगांचा मेळीं । ते महा युग शद्व आढळी । वेदांत शास्त्री ।। १ ।। ऐसा ब्रह्मयाचा दिनांतर । तैसीच रात्र एक सहस्र । तिसा दिवसांचा प्रखर । एक मास ।। २ । ऐसे बारामास । त्याचें एक वरुष । शत भरी आयुष्य । ब्रम्हयाचें ।। ३ ।। ऐशा ब्रम्हीयाच्या दिनांत । सहस्त्रयुगें गणीत । ज्या प्रळयीं पोहत । मार्कंडेय उदकी ।। ४ ।। ऐसी अठ्ठावीस युगें जाण । पंढरपुरासीं झाली पूर्ण । जो कीं ब्रम्हयाचा दिन । प्रयळ केला ।।५।। नामा म्हणे पंढरीची संख्या । सांगितली संत महंत लोकां । लक्षुनि पादुका । श्री विठोबाच्या ।। ६ ।।

(२६५) कृत, त्रेता, द्वापार व कलि अशीं हीं चार युगें होत. यालाच वेदांत शास्त्रामध्यें महायुग अशी संज्ञा आहे ।। १ ।। ब्रह्मदेवाचा दिवस म्हणजे ही सहस्र महायुगें व तितकीच रात्र होय. अशा तीस दिवसांचा एक महिना होय ।। २ ।। असे बारा महिने म्हणजे त्याचें एक वर्ष; अशीं शंभर वर्षें हें ब्रम्हदेवाचें आयुष्य होय ।। ३ ।। अशा या ब्रम्हदेवाच्या दिवसाचें सहस्र युगांचें गणित केलें असतां त्याचा प्रलयकाल होतो. अशा या प्रलयकालाच्या जळामध्यें मार्कंडेय ऋषि पोहतात ।। ४ ।। ब्रम्हदेवाच्या दिवसापासून तो प्रलयापर्यंत समाप्त होणारीं अठ्ठावीस युगें या पंढरीक्षेत्राच्या उभारणीला झालीं ।। ५ ।। पांडुरंगाच्या पादुकेला साक्ष ठेवून पंढरीची युगसंख्या मी संत महंतांना सांगितली, असें नामदेवराय म्हणतात ।। ६ ।।

श्रोते म्हणती विष्णुदासा । या ब्रम्हांडीचा प्रळय कैसा । पंढरीच्या भासा । नांश कीं नाही ।। १ ।। तंव नामा म्हणे सुदर्शनावरी । देवे रचिली पंढरी । भक्ता सहित राज्य करी । रुक्मिणीवर ।। २ ।। तो परमात्मा गुणातीत । अपरोक्ष भक्ता सहित । तेथें प्रळय हात जोडित । जया लागीं ।। ३ ।। जें ब्रम्हयाचें आयुष्य सरें । लया जाय चरा चरें । तें मिळे पंढरपूर । वस्तु माझी ।। ४ ।। नामा म्हणे या खुणा । एक जाणें पंढरी राणा । कळती संतजना । इतर मायिक जना नेणवती ।। ५ ।।

---

१ टीप:- वस्तु ही कारण व कार्यरुपाने असते कारण हे स्थाईक एक रुपानें असते व कार्य हे परिवर्तनीय असते. कार्य दृष्टी ही चकवणारी आहे तर कारण दृष्टी समाधानाला पोषक असते. सुज्ञाची कारण दृष्टी विषयीं आग्रह आहे कारण त्याच्या ठिकाणीं सत्य वस्तुचा अनुभव असतो. श्री क्षेत्र पंढरी ही अनादि, सत्य, सुदर्शनावर आदि जी विशेषणें दिलीं आहेत तें कारण दृष्टीनें होय तथापि बुद्धी वादी यांच्या तर्क पटूच्या लटपटी रूपी-वाहुटळीनें त्यांची मेधा लुप्त होण्यानें संतवाङ्मयाला विटंबन स्वरूप आणण्याचा प्रमाद त्यांच्या कडून घडतो. सांप्रदायीक अशा वैष्णव जनांनी अशा वंचक लेखकाच्या बुद्धी भेद लिखाणाने आपल्या सात्विक श्रद्धेहून विचलीत होऊ नये

(९६६) हे विष्णुदासा [1] या ब्रम्हांडाचा प्रलय कोणत्या प्रकारचा आहे, आणि या पंढरीचा जो नयनमनोहर देखावा प्रतीत होतो त्याचा नाश होतो किंवा नाहीं, असा श्रोतेजन (नामदेवांना) प्रश्न करितात ।। १ ।। देवरायांनीं आपल्या सुदर्शनावर पंढरीक्षेत्राची उभारणी केली आणि रुक्मिणी पति देवराय हे तेथें भक्तांसहित साम्राज्य करितात, असें नामदेव-रायांनीं प्रश्नाचें उत्तर दिलें ।। २ ।। प्रलय हा ज्याच्यापुढें हात जोडून उभा आहे असा हा परमात्मा गुणातीत असून भक्तांसहित तेथें प्रत्यक्ष आहे ।। ३ ।। ब्रम्हदेवाचें आयुष्य संपलें असतां चराचरादिकांचा नाश होतो. परंतु अशाही काळीं पंढरी क्षेत्र ही वस्तु स्थित असते ।। ४ ।। हें मर्म पंढरीचा राजा विठ्ठलराय आणि संतजन जाणतात. मायेनें ग्रस्त झालेल्या इतर जनांना हा बोध नसतो, असें नामदेवराय म्हणतात ।। ५ ।।

आधीं रचिली पंढरी । मग वैकुंठ नगरी ।। १ ।।
जेव्हां नव्हते चराचर । तेव्हां होते पंढरपूर ।। २ ।।
जेव्हां नव्हती गोदा गंगा । तेंव्हा होती चंद्रभागा ।। ३ ।।
चंद्रभागेचे तटी । धन्य पंढरी गोमटी ।। ४ ।।
नासिलीया भूमंडळ । उरे पंढरी मंडळ ।। ५ ।।
असे सुदर्शनावरी । म्हणूनि अविनाश पंढरी ।। ६ ।।
नामा म्हणे बा श्रीहरी । ते म्यां देखिली पंढरी ।। ७ ।।

---

[1] टिप:—विष्णुदास नामा व नामा ह्या स्वतंत्र दोन व्यक्ति असल्याचा कांहीं लेखकांचा दावा आहे खरा. परन्तु या अभंगामध्यें श्रोत्यांनीं ज्यांना प्रश्न केला असा जो विष्णुदास तोच उत्तर देतांना स्वतःला नामा म्हणवीत आहे. विष्णुदास व नामा ह्या एकच व्यक्तिला बोधन केल्याची स्थळें अन्यत्र आढळतात. तेव्हां केवळ शब्दच्छलाला महत्व न देता संतांची क्रिया व शिकवणूक ही आत्मसात करण्याचा प्रयत्न करणें हें वैष्णव जनाचें कर्तव्य नव्हें काय ?

(२६७) प्रथम पंढरीक्षेत्राची उभारणी केली, पश्चात् वैकुंठ निर्माण केलें ॥ १ ॥ ज्याकाळीं चराचरांचा अभाव होता अशाहि काळीं पंढरी क्षेत्र होतें ॥ २ ॥ गोदा व गंगा हीं तीर्थें जेव्हां नव्हतीं त्याहिकाळीं चंद्रभागेचें अस्तित्व होतें ॥ ३ ॥ धन्य हें गोमटें पंढरी क्षेत्र जें चंद्रभागेच्या कांठीं वसलेलें आहे ॥ ४ ॥ अखिल विश्वाचा प्रलय झाला असताहि फक्त पंढरीक्षेत्र अवशिष्ट रहातें ॥ ५ ॥ पंढरीक्षेत्र हें सुदर्शनावर स्थित झालेलें असल्यामुळें तें अविनाशी आहे ॥ ६ ॥ अशी ही अपूर्व पंढरी मीं डोळयांनी पाहिली असें नामदेवराय म्हणतात ॥ ७ ॥

अवघी हे पंढरी सुखाची वोवरी । अवघ्या घरोघरीं ब्रम्हानंद ॥ १॥ अवघा हा विठ्ठल सुखाचाचि आहे । अनुसरे तो लाहे सर्व सुख ॥ २ ॥ पहावा नयनीं ऐकावा श्रवणी । अवघा ध्यावा ध्यानी अवघ्या मनें ॥ ३ ॥ अवघिये आवडी अवघा गावा गीतीं । अवघा सर्वांभूती तोचि आहे ॥ ४ ॥ अवघा हा जाणावा अवघा हा मानावा । अवघा वाखाणावा अवघी वाचा ॥ ५ ॥ अवघा ओळखोनि अवघा गिळिजे मनें । अवघा हाचि होणें म्हणे नामा. ॥६॥

(२६८) अखिल पंढरपुर हें जणुं काय सुखाची वोवरी खोली होय. जेथें घरोघर ब्रह्मानंद उफळतो ॥ १ ॥ विठ्ठलराय हा स्वरूपानेंच आनंदमय आहे. जो याच्या अंकित होतो तो सर्व सुखाचा स्वामी होतो ॥ २ ॥ अशा या सुखरूप विठ्ठलरायाला नित्यशः डोळयांनीं पहावें, त्याचे गुणानुवाद कानांनीं ऐकावे आणि मनानें सतत त्याचें ध्यान करावे ॥ ३ ॥ पूर्ण प्रेमानें सतत त्याचें गान करावें. कारण भूतमात्रा मध्यें त्याचेच वास्तव्य आहे॥४॥ याच्या व्यापकपणाची प्रतीति घ्यावी व तशी भावना करावी आणि सर्व वाणीनें या व्यापक स्वरुपाचें गुणानुवाद गावे ॥ ५ ॥ हा पांडुरंगराय सर्वत्र आहे अशी प्रतीती घेऊन व त्यामध्यें समरस होऊन सर्व रूपानें आपणच व्हावें असे नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

अवघें हे पवित्र पांडुरंग क्षेत्र । सुखचि सर्वत्र भरलें असे ॥ १ ॥ अवघा हा विठ्ठल गीती गातां गोड । अवघे पुरवी कोड नामें एके ॥ २ ॥ अवघें जे सांडोनि अनुसरले यातें । अवघे देतो त्यांतें आपले प्रेम ॥ ३ ॥ अवघी चित्तवृत्ति ठेविली याच्या पायीं । त्यातें अवघ्या बाही आलिंगीती ॥ ४ ॥ अवघे आपलें मन दिल्हे जिहीं यातें । असे त्या सांगातें मागें पुढें ॥ ५ ॥ अवघ्यासी अनुसरला अवघेंचि विसरला । अवघा नामा झाला सुखरूप ॥ ६ ॥

(२६९) पांडुरंग रायाची राजधानी जें पंढरी क्षेत्र तें सर्वस्वीं पवित्र असून त्याठिकाणीं पूर्णपणें सुख दुमदुमलें आहे ॥ १ ॥ या विठ्ठलरायाचे गुणानुवाद गाणें सर्वस्वी गोड–मधुर होय. त्याच्या एक नाममात्रें करून सर्व कामना पूर्ण होतात ॥ २ ॥ जे सर्वस्वाचा त्याग करून या विठ्ठलरायाला शरण गेलें आहेत त्यांना तो आपल्या पूर्ण प्रेमाचा सर्वाधिकारी करितो ॥ ३ ॥ यांच्या पायावर जो आपल्या सर्व मनोवृत्तींची स्थापना करितो त्याला हा देवराय आपल्या चतुर्भुजांनीं आलिंगन देतो ॥ ४ ॥ ज्यांनीं आपलें सर्व मन याला अर्पण केलें आहे त्यांच्या मागेंपुढें हा विठ्ठलराय नित्य असतो ॥ ५ ॥ हा नामदेव पूर्णपणें त्याच्या अंकित झाला आहे आणि त्यायोगें त्याला सर्व जगाचें विस्मरण झालें आहे आणि म्हणून तो पूर्णपणें आनंद रूप झाला आहे ॥ ६ ॥

तूं जाऊं नको जेथें तेथें । जरी तुज मुक्तिचे आर्त । तुज मी सांगेन हित । देऊनि चित्त परियेसें ॥ १ ॥ शंभु अडसष्टी तीर्थांचें माहेर । सकळ सिद्धी ऋषीश्वर । मध्यान काळी सुरवर पंढरपूर ठाकती ॥ २ जाई जाई आली यारे । पांडुरंगी राहे स्थिर रे । न लगती आणिक दैवतें रे । एक पुरे विठ्ठलची ॥ ३ ॥ तीर्थ क्षेत्र दैवतें । ऐसे नाहीं जेथें तेथें । तिन्ही सर्वोत्तम जेथें । तें पै क्षेत्र सांगेन ॥ ४ ॥ श्रीहरीच्या चोविस मूर्ति । विठ्ठल प्रेम दृष्टीं प्रीति । सहस्रनामांवरती कीर्ति । विठ्ठल दैवत जाणावें ॥ ५ ॥ रुद्रार्धांगी गौरी । जान्हवी

असे शिरीं । सर्वांगव्यापिनीं भीमा सुंदरी । आले त्रिपुरारी ठाकोनी ॥ ६ ॥ कोटि जन्माचें पातक । नासे स्नान केलिया देख । एवढें क्षेत्र अलौकिक । पांडुरंग भीवरा ॥ ७ ॥ काशी त्यागिजे शरीर । हिंवें शिणले केदार । पाणी गोमतीचे क्षार । म्हणवोनि महिमा सम नाहीं ॥ ८ ॥ जन्म मरणा वेगळें । वैकुंठ तुकिले सगळें । परि त्याहुनि आगळें । एक अक्षर जाणावें ॥ ९ ॥ गया भोंवुनि चौदापदी । तीं अनंतें वेणुनादी । काला केला गोविंदीं । हा दृष्टांत पहा पां ॥ १० ॥ ज्याचेनि नांवें पिंडदान । त्यासी गयेसी गति जाण । येथें करितां नामस्मरण । सर्व पूर्वजां मुक्ति ॥ ११ ॥ कार्तिकीये आदित्यावारीं । जो पद्माला स्नानकरी । त्यासी नाहीं येरझारी नये पुढ़ती संसारा ॥ १२ ॥ इंद्र येवढे परमेष्टी । तेथें मनुष्याच्यां काय गोष्टी । धन्यधन्य तो एक सृष्टी । पंढरी दृष्टी जो देखे ॥ १३ ॥ बरवे पुंडलीकें केलें । हें परब्रम्ह रे अर्चिलें । जगांत शांतवन केले । परि नेटकें सर्वथा ॥ १४ ॥ तीर्थ सोपारें सधर । कष्ट न लगती अपार । उपवासी निराहार कीं क्षौर । करणेंची नलगे ॥ १५ ॥ येथें सुखें येणें जाणें । घेणें न लगे धरणें । मनीचे मनोरथ पुरवणें । एके भेटी साठी ॥ १६ ॥ पूर्व जन्मीचा तापसी । तीर्थे केली पुण्यराशी । सहस्रशतें भोजनासी । देवांद्विजां भजिन्नला ॥ १७ ॥ शाळिग्रामाची पूजा करी । त्यासी प्रसन्न झाले हरी । त्यासी दावितो पंढरी । पूर्व संस्कारी म्हणोनिया ॥ १८ ॥ जयासीं नावडे पंढरी । तो पापिया दुराचारी । उपजोनिया संसारी । येरझारी शिणतो ॥ १९ ॥ त्यासी श्वान सुकुर हांसती । म्हणती यासी कैसी पडली भ्रांती ॥ उपजोनियां मनुष्य यातीं । पंढरपूरपती नोळखे ॥ २० ॥ जो विन्मुख पंढरपुरा । त्याचा संग क्षणीं न धरा । मोडोनि सुकृताचा थारा । पाप शरीरासी तो गेला ॥ २१ ॥

जो पंढरीसी आतुं । त्याची करा बरवी मातु । अंतःकाळीं पंढरीनाथु । यम पंथु चुकविल ॥ २२ ॥ बरवें समतुल्य वाळुवंट । वरी वैष्णव मिळाले घनदाट । करिती हरी नामाचें बोभाट । वीर उद्‌भट विठ्ठलांचे ॥ २३ ॥ जें जेथें प्रेमासी आतुर । ते चतुर्भुज होती नर । येवढे क्षेत्र पंढरपूर । महिमा थोर तिहीं लोकीं ॥२४॥ अन्य क्षेत्री पाप किजे । ते पुण्य क्षेत्रीं विनशिजे । तें पुण्य क्षेत्रीं पाप किजे । तें त्यागिजे पंढरीसी ॥ २५ ॥ पंढरीचे पातक । पंढरी नासे देख । एवढें क्षेत्र अलौकीक । त्रिभुवना माझारीं ॥२६॥ पैल विटेवरी सांवळा । विठोबा पहा पहारे डोळा । विघ्न घालोनि पायातळा । आणिक कळिकाळा दमेना ॥ २७ ॥ जप तप अनुष्ठान । नलगे जीवासी रे बंधन । आणिक न करावें साधन । पहावें चरण विठोबाचे ॥ २८ ॥ देवा सांगे वसुंधरा । मी न भीये सप्तसागरा । स्थावर जंगमादिसारा । नाहीं भार तयाचा ॥ २९ ॥ ज्यासी नावडे विठ्ठल वीरू । त्याचा मज भार थोरू । त्यासी नरकी होय थारू । तो असूर प्राणिया ॥ ३० ॥ ऐसा हा पंढरपूरपती । जीवंतु असतां देतो मुक्ति । मेलिया देतो ब्रम्हप्राप्ति । दोहींकडे सौरस ॥३१॥ येरां प्राणि कष्ट थोर । परी ते न भरे उदर । मेलिया यम किंकर । अष्टौ प्रहर जाचिती ॥ ३२ ॥ ऐसा कैलासीचा राणा । गिरीजे स्कंदा सांगे खुणा । तुम्ही आणिक मंत्र नेणा । या पांडूरंगावांचुनी ॥ ३३ ॥ विठ्ठल विठ्ठल म्हणतां । तुटती महा पातका चळथा । विष्णुदास नामा विनवी संता । सावधान व्हा जी म्हणतसे ॥ ३४ ॥

(२७०) तुला जर मुक्तीची इच्छा असेल तर तूं इतर कोठेंहि भटकूं नकोस. मुक्ति प्राप्त होण्याचा सुलभ मार्ग मी तुला सांगतों; त्याचें तूं लक्षपूर्वक श्रवण कर ॥ १ ॥ अडुसष्ट तीर्थांचें माहेरघर

असा शंकर व सर्व सिद्धि ज्यांना प्राप्त झाल्या आहेत असे ऋषीश्वर आणि इंद्रादिक देव हे पंढरपुरास माध्यान्हकाळीं येतात ॥ २ ॥ हे जिवा, तूं संसारांत आला आहेस ना? तर पंढरीं क्षेत्रीं जाऊन तेथें शांत रहा. तेथील फक्त विठ्ठल देवता ही सर्व कामना पूर्ण करणारी आहे. दुसऱ्या देवतांची कांहींच आवश्यकता नाहीं ॥ ३ ॥ या विश्वामध्यें जिकडे पाहावें तिकडे तीर्थें, क्षेत्रें व दैवतें आहेत. परंतु या पंढरी क्षेत्रांतील सोहळ्यासारखीं ती नव्हत. तिन्हीं लोकांमध्यें जें क्षेत्र श्रेष्ठ आहे तें मी सांगतों. श्रवण कर ॥ ४ ॥ श्रीहरीच्या चोवीस मूर्ति आहेत खरें परंतु विठुलराय हा सर्वांना प्रेमदृष्टीनें पहाणारा आहे. विठ्ठल दैवत हें हजारों नामांपेक्षांहि श्रेष्ठ आहे ॥ ५ ॥ ज्यांच्या वामांगीं पार्वती असून मस्तकीं गंगा आहे, ज्यांच्या सर्वांगानें सुंदर असलेली भीमा व्यापलेली आहे असे त्रिपुरारि हे पांडुरंगाकडे आले ॥ ६ ॥ कोटयवधि जन्मांत केलेलीं पातकें ही जिच्या स्नानानें दग्ध होतात असा हा अलौकिक थोरपणा या पांडुरंगाच्या भीवरेचा आहे ॥ ७ ॥ काशीमध्यें मुक्ति मिळते हें खरें परंतु तेथें देह त्यागावा लागतो. केदारेश्वरांतहि मुक्ति मिळते परंतु तेथें हिवानें गारठावें लागतें. गोमती पवित्र खरी परंतु तिचें पाणी खारट आहे. आणि म्हणून पंढरी क्षेत्राची बरोबरी त्यांना करतां येत नाही ॥ ८ ॥ वैकुंठ हे जन्ममृत्युच्या अतित खरे परंतु त्यांची संपूर्ण पणें तुळा केली असतांहि ज्याच्या पासंगाला ते उतरत नाहींत अशा अपूर्व एका अक्षराला ओळखावें ॥ ९ ॥ वेणुनादाची अपूर्वता इतकी आहे कीं ती गंगेच्या चौदा वेळां केलेल्या पदयात्रेपेक्षां श्रेष्ठ आहे. ज्या ठिकाणीं कृष्णानें काला केला ही प्रत्यक्ष प्रतीति पहा ॥ १० ॥ गयेला ज्याचे नांवानें पिंडदान करावें त्यास गति मिळते, परंतु येथें फक्त नामस्मरण करण्यानें सर्व पूर्वजांना मुक्ति मिळते ॥ ११ ॥ कार्तिक महिन्यांतील रविवारीं जो कोणी पद्मालीं स्नान करितो तो जन्ममरणांतून मुक्त होऊन त्यास संसाराचें पुनश्च दर्शन घडणार नाहीं ॥ १२ ॥ इंद्र हा सर्व श्रेष्ठ असतांहि तो पंढरीक्षेत्रीं आगमन करितो. तेथें इतर मानवांची काय कथा? आणि म्हणून जो कोणी पंढरीक्षेत्राचें दर्शन घेईल तो धन्य होय. ॥ १३ ॥ पुंडलीक रायानें हें चांगलें केलें कीं त्यांनीं यी

परब्रह्माची पूजा केली व अगांत सर्वांग सुंदर असें शांतवन केलें ।। १४ ।। हें पंढरीक्षेत्र सुलभ असून येथें उपवास किंवा क्षौर कर्म अशी कोणतीच कष्टदायक क्रिया करावी लागत नाहीं ।। १५ ।। येथें सुखानें यावें जावें. येथें धरणें धरण्याचें कांहींच कर्तव्य नाहीं. ज्याच्या एका भेटीमध्यें सर्व कामना पूर्ण होतात ।। १६ ।। ज्यानें पूर्व जन्मांमध्यें थोर तपश्चर्या केली आहे व ज्यानें अनेक तीर्थांच्या स्नानानें व दर्शनानें पुण्य संपादन केलें आहे, हजारो ब्राम्हणांस भोजन दिलें असून देव, ब्राम्हणांचें पूजन केलें आहे ।। १७ ।। ज्यानें शाळिग्रामाची पूजा केली, त्यावर हरि प्रसन्न होतो. व तो त्याच्या पूर्व संस्कारानें त्याला पंढरीक्षेत्राचें दर्शन घडवितो ।। १८ ।। ज्याला पंढरीक्षेत्राविषयीं अनादर आहे तो पुरुष पापी व दुराचारी म्हणून समजावा. व तो या संसारामध्यें जन्ममृत्यूच्या चक्रामध्यें फिरतो व कष्ट भोगतो ।। १९ ।। मनुष्य जन्मांत येऊन जो पंढरपुर पहात नाहीं अशा पुरुषाला पाहून कुत्रीं व डुकरें हांसतात. आणि काय हो, या मनुष्याला भ्रम झाला आहे असें तीं म्हणतात ।। २० ।। पंढरपुर क्षेत्राबद्दल जो विमुख आहे अशा पुरुषाची संगत क्षणभरहि धरूं नका. अशा पुरुषांनीं सन्मार्ग टाकून अधोगतीचा मार्ग स्वीकारला आहे असें निश्चित समजावें ।। २१ ।। पंढरपुराविषयींचें प्रेम ज्यांच्या ठिकाणीं आहे त्यांच्याशीं प्रेमानें वर्तन करा. ज्यायोगें पंढरीनाथ प्रसन्न होऊन ते तुम्हांला अंतकाळीं साहृयकारी होतील आणि तुम्हांला यमयातनेपासून सोडवितील ।। २२ ।। प्रभावशाली विठ्ठलरायाचे शूर योद्धे जे हे संतजन ते सुंदर अशा वाळवंटामध्यें जमलेले आहेत आणि हरिनामाचा गजर प्रेमानें करीत आहेत ।। २३ ।। या पंढरपुर क्षेत्रासंबंधी ज्यांना प्रेमादर आहे ते पुरुष विठ्ठलरायासारखे चतुर्भुज होतात असा या क्षेत्राचा तिन्ही लोकांमध्यें थोर महिमा आहे ।। २४ ।। इतर क्षेत्रामध्यें केलेलीं पापें, पुण्यक्षेत्रांत गेल्यानें नाहींशीं होतात आणि पुण्यक्षेत्रांत घडलेलीं पातकें पंढरीक्षेत्राच्या दर्शनानें नाहींशीं होतात ।। २५ ।। पंढरी क्षेत्रांत घडलेली पातकें पंढरीक्षेत्राच्या दर्शनानेंच नाहींशीं होतात असें अलौकिक माहात्म्य या पंढरी क्षेत्राचें आहे ।। २६ ।। असा हा सांवळा विठ्ठलराय विटेवर उभा आहे. त्यास डोळे भरून पहा. तो

तुमचीं सर्व विघ्नें पायदळी घालून कळिकाळालाहि नष्ट करील ॥ २७ ॥ येथें फक्त विठ्ठल रायाच्या चरणाचें दर्शन घ्या. तुम्हांला जपतपादिक साधनांच्या बंधनांची काहींच जरूरी नाहीं ॥ २८ ॥ मला सप्त सागरांची भीति नाहीं. किंबहुना स्थावर जंगमांचाहि भार मला जड वाटत नाहीं, असें देवरायांना पृथ्वी सांगत आहे ॥ २९ ॥ मात्र ज्यांना पंढरपुराचें प्रेम नाहीं अशांचा भार मला असह्य आहे. असे असुर प्राणी नरकाचे धनी होत ॥ ३० ॥ पंढरपुराचा राजा हा प्राण्यास जिवंत असतां मुक्ति देतो आणि मरणोत्तर ब्रह्मप्राप्ति देतो. दोन्हीं काळीं आनंद आहे ॥ ३१ ॥ इतरांना कष्ट करून पोट भरत नाहीं आणि मेल्यावर यमकिंकर त्यांना त्रास देतात ॥ ३२ ॥ असें वर्म कैलासपति शंकर हे पार्वती व स्कंद यांना सांगतात. आणि म्हणून तुम्हीं पंढरीनाथाशिवाय दुसऱ्या नामाच्या मंत्राचा उच्चार करूं नका. ॥ ३३ ॥ विठ्ठल विठ्ठल असा नामोच्चार केला असतां महापातकांचे डोंगर भस्म होतात. म्हणून सावध व्हा अशी विनंति विष्णुदास नामा हे संतांना करितात ॥ ३४ ॥

सुखालागीं जरी करिसी तळमळ । तरी तूं पंढरीसी जाय एक वेळ ॥ १ ॥ तेणें अवघाची सुखरूप होसी । जन्मोजन्मीचें दुःख विसरसी ॥ २ ॥ चंद्रभागे करितां एक स्नान । तुझे दोष पळती रानों रान ॥ ३ ॥ लोटांगण घालोनि महाद्वारीं । कान धरोनि नाचावें गरूड पारीं ॥ ४ ॥ नामा म्हणे उपमा काय द्यावी । माझ्या विठोबाची आलाबला घ्यावी ॥ ५ ॥

(२७१) तुम्हांला सुखप्राप्तीची उत्कंठा असल्यास पंढरीक्षेत्राची एक वेळेसच वारी करा ॥ १ ॥ त्यायोगें तुम्ही सर्व सुखाचे धनी व्हाल आणि अखिल दुःखांचें विस्मरण होईल. ॥ २ ॥ चंद्रभागेचें एक वेळ स्नान झालें असतां सर्व पापें रानोमाळ पळून जातील ॥ ३ ॥ महाद्वारामध्यें लोटांगण घालावें आणि गरुड पारावर कान धरून नाचावें ॥ ४ ॥ अशा या पुण्य क्षेत्रास कोणती उपमा द्यावी बरें ? माझ्या या सर्वांगसुंदर विठ्ठल रायाची दृष्ट काढावी असें नामदेवराय म्हणतात ॥५॥

यारे नाचों प्रेमानंदें । विठ्ठल नामाचिया छंदें ॥ १ ॥
जाऊं म्हणतां पंढरीवाटे । कळिकाळा भयँवाटे ॥ २ ॥
चंद्रभागे घडले स्नान । यम लोकीं पडली हान ॥ ३ ॥
झाली पुंडलिका भेटी । पूर्वज आनंदले वैकुंठीं ॥ ४ ॥
आंत राउळासी जातां । झाली जीवाचि मुक्तता ॥ ५ ॥
विष्णुदास नामा म्हणे । आतां नाही येणें जाणें ॥ ६ ॥

(२७२) या हो, या. आपण विठ्ठलरायाच्या नामछंदानें प्रेमानंदानें नाचूं या ॥ १ ॥ पंढरीच्या मार्गाकडे जाण्याची तयारी करितांच कळिकाळाला भयकंप सुटतो ॥ २ ॥ चंद्रभागेचें स्नान होतांच यम लोक उजाड होतो । ३ ॥ पुंडलीक रायाचे दर्शन घडतांच पूर्वजांना—वाड-वडिलांना वैकुंठामध्यें आनंद होतो ॥ ४ ॥ देवळामध्यें प्रवेश केला असतां जीवांना मुक्ति मिळते ॥ ५ ॥ आतां आम्हास पुनरावृत्ति नाही असें विष्णुदास नामा म्हणतात । ६ ॥

पैल ते पंढरी पैल ते पंढरी । पांढरीवरी काळी वसविली ॥ १ ॥
सोंवळें हें ब्रम्ह सुनिळ हें ब्रम्ह । विद्युलता ब्रम्ह पाहूं चला ॥ २ ॥
नामा म्हणे माझा विठ्ठल हा डोळा । अर्धमात्रें जवळां पाहूं चला ॥ ३ ॥

(२७३) ज्या पवित्र क्षेत्रांत–गांव ठाण्यामध्यें सावळी मूर्ति स्थापन झालेली आहे असे हे पंढरीक्षेत्र तुझ्या सन्मुख आहे असे द्विरुक्तीनें सांगतात ॥ १ ॥ जे ब्रम्ह विद्युलते सारखें प्रकाश देत आहे ते सांवळे असून सुनिळ होय ते आपण पाहूं चला ॥ २ ॥ अशा माझ्या विठ्ठलरायाला

---

१ टीपः— जाईन म्हणतां पंढरी । यम थोर चिंता करी ॥ १ ॥
धरितां पंढरीची वाट । पापें पळालीं सपाट ॥ २ ॥
कळस देखतां नयनीं । होय पातकाची धुनी ॥ ३ ॥
घेता विठोबाची भेटी । दोष जाती उठा उठी ॥ ४ ॥
करितां चंद्रभागें स्नान । सर्व पापा घडे हान ॥ ५ ॥
नामा म्हणे रे केशवा । आम्ही करूं तुझी सेवा ॥ ६ ॥

अर्धक्षणांत पाहूं या, असे नामदेवराय म्हणतात. चिंतनीका :-कोणत्याहि वाक्याचा भावार्थ व्यक्त करितांना वाच्य, लक्ष्य, अलंकारिक, यौगिक अशा कक्षा शास्त्रामध्यें वर्णन केल्या आहेत. 'पांढरीवरी-शुद्ध स्वरुपी, अर्ध मात्रा = ॐ काराची अर्ध मात्रा असाहि भाव निष्पन्न होतो. परिशिष्ट पहा.

झळकती पताका । कळस दिसतो नेटका ॥ १ ॥
बरवें बरवें पंढरपुर । विठोबा रायाचें नगर ॥ २ ॥
अरे हे माहेर संतांचे । नामया स्वामी केशवाचें ॥ ३ ॥

(२७४) पताका झळकत फडफडत आहेत. सुंदरसा कळस दिसतो आहे ॥ १ ॥ हे विठ्ठलरायाचें नगर पंढरपूर अतिरमणीय आहे असें द्विरुक्तानें (नामदेवराय) सांगतात ॥ २ ॥ नामदेव रायाच्या स्वामीचें हें पंढरपुर क्षेत्र म्हणजे संतांचें माहेरघर होय ॥ ३ ॥

काय पुण्य केलें इहीं जीवा जनीं । पंढरी नयनीं देखियेली ॥ १ ॥
अनंतां जन्माचें हेचि प्रायश्चित । वाचे जपे नित्य रामनाम ॥ २ ॥
कोटी कुळें केली क्षणेंचि पावन । केल्या एक स्नान चंद्रभागे ॥ ३ ॥
शोक मोह ताप विध्वंसिला हेळा । अवलोकिता डोळा पांडुरंग ॥४॥
महापाप राशी तीहीं केल्या होळी । वाजविल्या टाळी विठ्ठल नाम॥५॥
नामा म्हणे धन्य धन्य ते संसारी । चालविती वारी पंढरीची ॥ ६ ॥

(२७५) या जगामध्यें जीवानें असें कोणतें पुण्य केलें कीं त्यानें आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पंढरी पाहिली ॥ १ ॥ वाणीनें नित्यशः रामनामाचा जप करणें हेंच अनंत जन्मांमध्यें केलेल्या पातकाचें प्रायश्चित होय ॥ २ ॥ चंद्रभागेच्या एका स्नानानें कोटयवधि कुळाचा क्षणांत उद्धार होतो ॥ ३ ॥ पांडुरंगाला डोळे भरून पाहिलें असतां क्षणांत शोक, मोह व ताप यांचा ध्वंस होतो ॥४॥ ज्यांनीं विठ्ठलनाम घेऊन टाळी वाजविली त्यांच्या महापापाची होळी होते ॥५॥ जे नित्यशः पंढरीची वारी करितात ते संसारांत धन्य, धन्य होत असें नामदेवराय म्हणतात ॥६॥

कार्तिकी एकादशी । पोहा मिळाला पंढरीसी । तेथील महिमा वर्णूं कैसी । ब्रम्हादिकां न वर्णवे ॥ १ ॥ दिंड्या गरुड टक्याचे भार । मृदंग वाजती अपार । वैष्णव नाचती जयजयकार । नादें. अंबर गर्जतसे ॥ २ ॥ उपजोनियां संसारीं । वेळो वेळां पाहारे पंढरी । विठ्ठल राज भीमातीरी । वाट पाहे भक्तांची ॥ ३ ॥ कल्पतरू चिंतामणी । घरीं कामधेनूचीं दुभणीं । मोतियांचे चौक राजांगणीं । वृंदावनें शोभती ॥ ४ ॥ संत बैसले पद्मासनीं । राया विठ्ठला तुझें चरण ध्यानी । हरि किर्तन ऐकोनि कानीं । अंतःकरणी निवाले ॥ ५ ॥ जें जें चिंतन मानसीं । ते फळ पावले अर्हानिशीं । मुक्ति देऊनि तयासि । अढळ पदीं बैसविलें ॥ ६ ॥ सकळ तीर्थें मध्यान्हकाळीं । येती चंद्रभागेजवळी । विमानें येती अंतराळीं । देवस्नानें करिताती ॥ ७ ॥ धन्यधन्य ऐसे चंद्रभागा तीर्थ । तेथें चतुर्भूज होती प्राणिमात्र । ऐसें आणिक नाहीं क्षेत्र । भूवैकुंठ पंढरी ॥ ८ ॥ मणीकर्णी वैतरणी । स्नान करिजेती अंतःकरणीं । लीन होईल विठ्ठल चरणीं । पायाधुणी होईल ॥ ९ ॥ अंनत जन्माचा उपाव । नामया स्वामी पंढरीराव । देईल वैकुंठी ठाव । पुनर्जन्म चुकविल ॥ १० ॥

(२७६) कार्तिक शुद्ध एकादशीस पंढरीस जाण्याकरितां यात्रेकरू निघाले. ज्या पंढरीचा अपूर्व महिमा वर्णन करण्यास ब्रम्हादिकही असमर्थ आहेत ॥ १ ॥ दिंड्या व गरुडटक्यांचा समूह आहे, पुष्कळसे मृदंग वाजत आहेत. वैष्णव जन जयजयकार असा ध्वनि करीत नाचत आहेत. त्या नादानें आकाश दुमदुमलें आहे ॥ २ ॥ विठ्ठलराज हा भीमातीरीं विटेवर भक्त केव्हां येतील म्हणून वाट पहात उभा आहे. अशा पवित्र स्थळाचें जन्माला येऊन वारंवार दर्शन घ्यावें. ॥ ३ ॥ ज्या ठिकाणीं कल्पतरूंचे वृक्ष आहेत, चिंतामणीच्या सडका आहेत, प्रत्येकाच्या येथें दुभत्या अशा कामधेनु आहेत, मोत्यांनी बांधलेले चौक आहेत आणि वृंदावनें शोभा देत

आहेत ॥ ४ ॥ हे विठ्ठलराया, संत हे पद्मासन घालून तुझ्या चरणांचें ध्यान करीत आहेत आणि हरिकीर्तनाच्या श्रवणानें त्यांचें अंतःकरण उल्हासीत होत आहे ॥५॥ जे ज्या वस्तूची मनांत कामना करितात ती त्यांचा हा देवराय सतत पूर्ण करितो आणि त्याना मुक्ती देऊन अढळ पदावर नेऊन बसवितो ॥६॥ चंद्रभागेला सर्व तीर्थे माध्यान्हकाळीं येऊन मिळतात आणि इंद्रादिदेव हे स्वर्गाहून विमानांत बसून तेथें स्नानाला येतात ॥ ७ ॥ धन्य धन्य या चंद्रभागातीर्थाचा, येथें स्नान घडलें असतां प्राणिमात्र चतुर्भुजरूप होतात आणि म्हणून पंढरी क्षेत्रा सारखें श्रेष्ठ असें दुसरे क्षेत्र या त्रिभुवनामध्यें नाही ॥ ८ ॥ विठ्ठल चरणीं समरस झाले असतां आणि मणिकर्णिका व वैतरणी नदीचें स्नान केलें असतां मनुष्याच्या सर्व पापांची होळी होते ॥ ९ ॥ नामदेव रायाचा स्वामी पंढरीराय, याची सेवा अनंत जन्मामध्यें केली असतां तो जीवांना पुनर्जन्मातून मुक्त करून वैकुंठपदही देतो ॥ १० ॥

एक एकादसी होय पंढरीसीं । सुकृताच्या रासी ब्रम्हा नेणे ॥ १ ॥
चंद्रभागेतीरी चतुर्भुज नरनारी । विठ्ठल कैवारी उभा असे ॥ २ ॥
परतून येथें न येसी मागुता । आणिकां सर्वथा ऐसें नाहीं ॥ ३ ॥
क्षीर सागरीचें जिव्हार वैकुंठीचें सार । पुंडलिकें उपकार केला लोकां ॥ ४ ॥ नामा म्हणे आम्हां थोर लाभ झाला । तापत्रय गेला पांडूरंगा ॥ ५ ॥

(२७७) पंढरक्षेत्री एक एकादशी केल्यानें जो पुण्य संग्रह होतो त्याची ब्रम्हदेवाहि गणना करू शकत नाहीं ॥ १ ॥ चंद्रभागेच्या कांठीं जे स्त्री पुरुष राहतात ते म्हणु काय चतुर्भुज विष्णुरूप होत. विठ्ठल हा त्यांच्या रक्षणार्थ उभा आहे ॥ २ ॥ या क्षेत्राला जाण्यानें त्यांस पुनरावृत्ति होत नाही. असे सामर्थ्य दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रामध्यें नाही ॥ ३ ॥ क्षीरसागराचा जिव्हाळा आणि वैकुंठाचे सार असें हें क्षेत्र आहे. पुंडलीकरायानें असा हा देवराय येथें उभा ठेवून जनतेवर उपकार केला ॥ ४ ॥ पांडुरंगाच्या दर्शनानें आमचें तापत्रय नष्ट झालें. असा हा आम्हाला फार लाभ झाला असें नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

पांडुरंगाचे नाम बरवें । आवडी घेतली माझ्या जीवें ॥ १ ॥ कैसा देहुडा पाउलीं उभा । वेणुनादीं गोपाळ वेणू बाहे ॥ २ ॥ आंगीं चंदन चर्चित माळा गळां । भाळीं शोभताहे कस्तुरीचा टिळा ॥ ३ ॥ नामा म्हणे धन्य धन्य जिणें । एक वेळां पंढरी पाहाणें ॥ ४ ॥

(२७८) माझ्या जिवाला सुंदर अशा पांडुरंग नामाची आवड जडली ॥ १ ॥ गोपाळ हा आपल्या दिडक्या पायावर उभा राहून कमा मधुर वेणु वाजवीत आहे ॥ २ ॥ ज्यानें आपल्या अंगाला चंदन लाविलें आहे, ज्याच्या गळ्यामध्यें माळा आहे आणि कपाळाला कस्तुरीचा टिळा शोभा देत आहे ॥ ३ ॥ ज्यांनी एक वेळ पंढरी पाहिली त्याचें जीवन धन्य-धन्य होय असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

उठा उठी जावों पंढरीस राहों । आनंदें क्षेत्र पाहों विठ्ठलाचें ॥१॥ नाम वदनीं ध्यावो । चरण हृदयी ध्यावो । रूप डोळां पाहों विठ्ठलाचें ॥ २ ॥ जीवें भेटी घेवों आनंद भावें गावों । प्रेमसुख घेवों म्हणे नामा ॥ ३ ॥

(२७९) त्वरित जाऊन पंढरीक्षेत्र गांठू आणि आनंदानें विठ्ठलरायाचें निवासस्थान पाहूं ॥ १ ॥ विठ्ठलरायाचें नाम वाणीनें उच्चारूं आणि त्याचे चरणांचें हृदयामध्यें चिंतन करूं आणि या विठ्ठलरायाचें रूप डोळे भरून पाहूं ॥ २ ॥ अंतःकरण पूर्वक त्याची भेट घेऊ आणि त्याचें गान आनंदानें करूं, आणि तेथील प्रेमसुख आनंदानें लुटू असे नामदेवराय म्हणतात ॥ ३ ॥

विठोबाच्या गांवा जाईन धांवोनी । घालीन लोळणी चरणावरी॥१॥
शिणभाग दवडिला म्हणेल । जीविचें पुसेल जडभारी ॥ २ ॥
हरुषें लोळत जाईन महाद्वारां । भेटाया सामोरा येईल मज ॥ ३ ॥
उचलोनी सीस पुसील आदरें । मुख पीतांबरें पुसिल माझें ॥ ४ ॥
धरोनि हनुवटी उठवील हस्तकीं । ठेवील मस्तकीं अभयकर ॥ ५ ॥
राही रखुमाई माता सत्यभामा । कडे घेऊनि नामा स्तनीं लावी ॥६॥

(२८०) विठ्ठलरायाच्या गांवीं धांवत जाईन आणि त्यांच्या पायांवर लोळण घालीन ॥ १ ॥ तुझा शीण भाग दूर झाला असे तो मला म्हणेल आणि माझ्या अंतःकरणांतील दुःख विचारील ॥ २ ॥ त्याच्या महाद्वाराकडे आनंदानें लोळण घातली असतां तो मला भेटण्याकरितां सामोरा येईल ॥३॥ तो माझें मस्तक प्रेमानें उचलून आपल्या पीतांबरानें माझें मुख पुसील ॥४॥ तो आपल्या हातानें माझी हनुवटी धरील व मला उचलून आपला अभय हस्त माझ्या मस्तकावर ठेवील ॥५॥ राही रखुमाई माता आणि सत्यभामा यांनी नामयाला कडेवर घेतलें आणि त्याला त्यांनी आपलें स्तनपान करविलें ॥६॥

सर्व सुख आहे भिवरेचे तीरीं। आमुची पंढरी कामधेनु ॥ १ ॥
प्रेमामृतें दुभे सदा संत जनां। वोसंड तो पान्हा नित्य नवा ॥ २ ॥
धर्म अर्थ काम मोक्ष चारीं थाने। दोहोणार धन्य पुंडलीक ॥ ३ ॥
जीयेचें दुभतें नित्य नवें वाढें। पंढरीसी ओढे पूर्वपुण्य ॥ ४ ॥
भक्तिचेनि बळे भावाचेनि मेळें। देखोनियां बोले बहु फार ॥ ५ ॥
भाग्यवंत नामा तें क्षीर लाधला। प्रेमें वोसंडला गर्जेनाम ॥ ६ ॥

(२८१) पंढरी क्षेत्र हे आमची कामधेनू होय आणि म्हणून ह्या भिवरेच्या किनारी सर्व सुखें उपलब्ध आहेत ॥ १ ॥ संतजना करितां ही कामधेनु सदा दुभते आणि नित्य नवा असा पान्हा स्रवते ॥ २ ॥ धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे ह्या धेनुचे चार स्तन असून पुंडलिकराय हा तिचें दोहन करणारा आहे ॥ ३ ॥ जिचे दुभतें शुक्लेंदूवत नित्य नूतन असे वाढत्या प्रमाणानें असून ते पंढरी क्षेत्री पूर्वपुण्याईनें हस्तगत होतें ॥ ४ ॥ भाव संयुक्त अशा भक्तीच्या उत्कर्षणानें पुष्कळ भाषण करावेसें वाटतें ॥ ५ ॥ नामा हा भाग्यवंत होण्यानें त्याला हे दुध प्राप्त झाले आणि त्या योगें प्रेमाचा अविष्कार होऊन तो नामोच्चाराचा गजर करित आहे ॥ ६ ॥

पंढरीच्या सुखा अंतपार नाही लेखा। शेषा सहस्र मुखा न वर्णवेचि ॥ १ ॥ पंढरीच्या सुखा तोचि अधिकारी। जन्मोजन्मीं वारी घडली तया ॥ २ ॥ पंढरीस जातां प्रेम-उचंबळत। आनंदें गाईत

नामघोष ॥ ३ ॥ विश्वमूर्ति विठो विश्वंभर देखें । विसरला दुःखें देहभाव ॥ ४ ॥ नामा म्हणे त्याचा होईन चरण रज । नुपेक्षील मज पांडुरंग ॥ ५ ॥

(२८२) पंढरीक्षेत्रांतील सुखाची तर मोजदाद होत नाहीच परंतु शेषालाही त्यांचें वर्णन करिता येत नाही ॥ १ ॥ ज्यांची जन्माजन्मीं पंढरीची वारी आहे तोच येथील सुखाचा अधिकारी आहे. ॥ २ ॥ पंढरीस गेले असतां सहज प्रेमाचा अविष्कार होतो आणि आनंदानें नामघोषाची गर्जना होते ॥ ३ ॥ हा विठ्ठलराय विश्वरूपानें अविष्कृत असून विश्वंभर आहे. त्याला पहातांच देहभान आणि सर्व दुःखाचें विस्मरण होतें ॥ ४ ॥ पांडुरंगराय माझी केंव्हांही उपेक्षा करणार नाहीं आणि म्हणून मी त्याच्या चरणाची धूळ होईन असे नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

पंढरीची वारी जयाचिये कुळीं । त्यांचीं पायधुळी लागोमज ॥ १ ॥
तेणें त्रिभुवनीं होईन सरता । नलगे पुरुषार्था मुक्तिचारी ॥ २ ॥
नामाची आवडी प्रेमाचा जिव्हाळा । क्षण जिवा वेगळा न करीं त्यासी ॥ ३ ॥
नामा म्हणे माझा सोयरा जिवलग । सदा पांडुरंग तया जवळीं ॥ ४ ॥

(२८३) ज्यांच्या कुलामध्यें पंढरीची वारी आहे त्यांची पायधुळ मला स्पर्श करो ॥ १ ॥ त्या योगे मी ह्या त्रिभुवना मध्यें धन्य होईन मला चारी मुक्ती आणि पुरूषार्थाची जरूरी नाही ॥ २ ॥ ज्यांना नामाची आवड व प्रेमाचा जिव्हाळा आहे अशा भक्तांना मी क्षणभरहि विसरणार नाहीं ॥ ३ ॥ त्यांच्या जवळ माझा सखा जिवलग पांडुरंग नित्यशा असतो असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

अभिमानें लोक जाती वाराणसी । आमुची मिरासी पंढरीये ॥ १ ॥
तीर्थ व्रतनेम मज केशिराजा । पंढरीचा राजा बोळवया ॥ २ ॥
पाउला पाउलीं चालती मारग । उभा पांडुरंग मागें पुढें ॥ ३ ॥
नामा म्हणे मज पंढरी विसांवा । दर्शन केशवा पुरे मज ॥ ४ ॥

(२८४) देव बुद्धीचें मानसें काशी क्षेत्रीं गमन करोत. मात्र पंढरी क्षेत्र ही आमची मिरासी होय पंढरीचा राजा जो केशीराज ह्याची वोळखण करणें हेच माझे तीर्थ, व्रत, तप, होय ॥ २ ॥ पंढरी क्षेत्राच्या वाटेला चालत असतां पाऊला गणिक पांडुरंगराय हा माझ्या पुढें मागें उभा असतो ॥ ३ ॥ केशव राजच्या दर्शनानें, मला समाधान होत असल्यानें पंढरी क्षेत्र हेच माझें विश्रांती स्थळ होय असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

पंढरीचें प्रेम आहे ज्याचे जीवीं । त्याची नित्य नवी करीन आशा ॥१॥ तें माझें सोइरे सुखाचे सद्गुरु । भवसिंधूचा पारु उतरतो ॥२॥ माझ्या विठोबाच्या नामी ज्यांचा विश्वास । होईन त्यांचा दास आवडीचा ॥३॥ माझ्या विठोबाच्या चरणीं ज्यांचा भाव । दाखंटा पाय धरीन त्याचे ॥ ४ ॥ माझ्या विठोबाचे ध्यान ज्यांचे मनीं । सांडोवा अंगणीं होईन त्याचे ॥५॥ ऐसे सर्व भावे विठोबा शरण । वंदीन त्याचे चरण नामा म्हणे ॥६॥

(२८५) ज्यांच्या अंतःकरणांत पंढरी विषयीं अनन्य प्रेम आहे त्यांच्या सहवासा विषयी नित्यनूतन अशी इच्छा करीन ॥ १ ॥ तें माझें प्रिय सर्व असून सुखोद्भवक सद्गुरू होत. त्यांच्या योगें मी हा भवसागर सहज उतरून जातो ॥ २ ॥ माझ्या विठ्ठलाच्या नामाचें ठिकाणीं ज्यांचा पूर्ण विश्वास आहे त्यांचा मी प्रेमानें दास होईन ॥ ३ ॥ माझ्या विठोबाच्या ठिकाणीं ज्यांचा पूर्ण भाव आहे त्यांच्या उमऱ्यावर बैठा सत्याग्रह करीन ॥४॥ ज्यांच्या मनामध्यें माझ्या विठ्ठलरायाचें ध्यान आहे त्यांच्या अंगणाचा मी पाट होईन ॥ ५ ॥ अशा सर्व भावानें जें कोणी माझ्या विठोबाला शरण गेले आहेत त्यांच्या पायाचें मी वंदन करीन असे नामदेवराय म्हणतात ॥ ६॥

वांकडें पाहाणें जया लौकिकांसी । मज पंढरीसी वास पुरे ॥१॥
उदंड उपाय कासया करावे । पुरे एका भावे भाविकांसी ॥२॥
तीर्थ क्षेत्र मूळ जाणा वाळुवंट । कटीं कर नीट भक्तांसाठीं ॥३॥
नामा म्हणे माझी वैकुंठ पंढरी । तेथें निरंतरीं जन्म देई ॥४॥

(२८६) त्यानां लौकिका बद्दल विट आला आहे खरा परंतु मला फक्त पंढरीचें वास्तव्य समाधान करणारे आहें ।। १ ।। पांडुरंगाचें ठिकाणीं एकविध भाव हेच एकमेव साधन आहे त्यांस दुसरें अनेक उपाय करण्याची आवश्यकता नाहीं ।। २ ।। भक्ताकरितां कटीवर हात ठेऊन जो विटेवर निट उभा आहे असे वाळवंट हेच तीर्थक्षेत्राचें मूळ आहे ।। ३ ।। पंढरीक्षेत्र हेच माझे वैकुंठभुवन होय. त्याच ठिकाणीं वारंवार मला जन्म दे असे नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

आम्हीं स्वर्गसुख मानूं जैसा ओक । देखोनियां सुख पंढरीचें ॥१॥
नलगे वैकुंठ न वांछूं कैलास । सर्वस्वाची आस देवा पायीं ॥२॥
नलगे संतति आणि धन मान । एक असें ध्यान विठोबाचें ॥३॥
सत्य कीं मायिक आमुचें बोलणें । तुझी तुज आण सांग हरी ॥४॥
जीवभाव आम्हीं सांडूं ओंवाळुनी । नामा लोटांगणीं महाद्वारीं ॥५॥

(२८७) पंढरीच्या सुखा पुढे स्वर्गलोक हा ओका सारखा तुच्छ समजूं ।। १ ।। तेथील देवाच्या चरणाची आम्हीं अपेक्षा करूं त्याहून भिन्न असलेले वैकुंठ लोक आणि कैलास तुच्छ समजूं । २ ।। आम्हाला फक्त एका विठोबाचाच ध्यास आहे, त्याहून भिन्न पुत्र धन मानाची किंचीत अपेक्षा नाहीं ।। ३ ।। हे विठ्ठलराया मी हा जों निर्वाळा दिला आहे ते सत्य किंवा मिथ्या आहे हें तूं तुझी शपथ घेऊन सांग ।। ४ ।। हे देवराया आम्ही तुझ्या वरून आमचा जीवभाव ओवाळून टाकूं असे बोलून महाद्वारामध्ये नामदेवराय लोटांगण घालीत आहेत ।। ५ ।।

वैकुंठासी आम्हां नको धाडूं हरी । वास दे पंढरी सर्वकाळ ॥१॥
वैकुंठ कोपट जुनाट झोंपडी। नको अडाअड़ीं घालूं आम्हां ॥२॥
वैकुंठी जाऊनि काय बा करावें । उगेंचि बैसावें मौनरूप ॥३॥
नामा म्हणे मज येथेंच हो ठेवीं । सदा वास देईं चरणांजवळीं ॥४॥

(२८८) हे पांडुरंगा आम्हाला वैकुंठास पाठवूं नकोस. नित्यशा आम्हाला पंढरीचा रहिवासी कर ।। १ ।। वैकुंठ हे श्रेष्ठ खर परंतु तें

मकुरपुराच्या ऐश्वर्याच्या मानानें जीर्ण झोंपडी होण्यानें दिसली, अवगळ आम्हां पुढें आणूं नकोस ।। २ ।। अहो देवराया काय आहे हो त्या वैकुंठामध्यें ते केवळ सुख रहाण्याचें स्थळ ना, तेथें किर्तन ना भजन ।। ३ ।। हे देवराया तुम्ही मला येथेंच तुमच्या चरणा जवळ ठेवा असे नामदेवराव म्हणतात ।। ४ ।।

नित्य प्रेमाचें पेटें बांधीं माझे पोटीं । उतरी जगजेठी पैलपार ॥१॥
निरे भिवरे ऐक्य तीरीं । कां पद्माळा पंढरपुरीं ॥२॥
केलिया रविवारीं आंघोळी । महा दोषां होय होळी ॥३॥
पाप जायाचें । पद पावाल अच्युताचें ॥४॥
म्हणाल बोलणें कोणाचें । नामया स्वामी केशवाचें ॥५॥

(२८९) हा जगजेठी माझ्या अंत करणांत प्रेमाची पेटी बांधून तो मला या भवसागरांतून पार करील ।। १ ।। निरे भिवरेच्या संगमीं किंवा पंढरपुरांतील पद्माळा तिर्थावर ।। २ ।। रविवारीस्नान केले असतां सर्व पापें दग्ध होतात । ३ ।। सर्व पाप नष्ट होऊन अच्युताचें पद प्राप्त होईल ।।४।। ही भाषा कोणाची आहे ? असा प्रश्न केल्यास ही नामयाच्या स्वामीची भाषा आहे असा मी निर्वाळा देईन. ।। ५ ।।

[1]देव गुज सांगे पंढरीसी यारे । प्रेमें चित्तीं घ्यारे नाम माझें ॥१॥
काया वाचा मन दृढ धरा जीवीं । सर्व मी चालवी भार त्यांचा ॥२॥
भवसिंधु तारीन घ्यारे माझी भाक । साक्ष पुंडलीक करूनि बोले ॥३॥
लटकें जरी असे नामयासी पुसा । आहे त्या भरंवसा नामीं माझ्या ॥४॥

१ टीप:– भवसागर तोडातां का रे करितसीं चिंता । पैल उभा दाता पांडुरंग ।। १ ।। निजाचे जं पंठ सोडुन वैकुंठ । येथें वाळवंट आवडले ।।२।। देवगुज सांग पंढरीसी यारे । प्रेम सुख घ्यारे नाम माझे ।। ३ ।। तारिन भवसिंधु घ्यारे माझी भाक । साक्ष पुंडलिक करूनि सांगे ।। ४ ।। काया वाचा मने दृढ धरा जीवी । मी त्याचा चालवी भार सर्व ।। ५ ।। हे जरी लटके नामया पुसा । आहे त्या भरंवसा नामीं माझे ।। ६ ।।

(२९०) पंढरीस या आणि प्रेमळ चित्तानें माझें नाम घ्या असे हे गोप्य देवराय सांगतात ।। १ ।। माझ्या ठिकाणी काया, वाचा, मनाने भाव ठेवला असतां त्याचा सर्व योगक्षेम मी चालवीन ।। २ ।। तुम्हाला मी संसारातून मुक्त करिन असे मी पुंडलिकरायांना साक्ष ठेऊन अभिवचन देत आहे ।। ३ ।। यांत कांही अन्यथा असल्यास माझा प्रेम भक्त जो नामदेवराय त्याला विचारा कारण त्याचा माझ्या नामावर पूर्ण विश्वास आहे ।। ४ ।।

बहवें बहवें वाळवंट । काय इच्छितो वैकूंठ ।। १ ।।
ऐसे सुख कोठें आहे । मुक्ति मागुनि करशील काय ।। २ ।।
दिंड्या पताकाचें थाट । टाळ घोषांचा गजर ।। ३ ।।
संत महंताची दाटणी । अगाध महिमा किर्तनी ।। ४ ।।
महाद्वाराच्या रंगणीं । नामा ज्ञातो लोटांगणीं ।। ५ ।।

(२९१) वाळवंट हे अति रमणीय होण्यानें वैकूंठाची काय अपेक्षा करित आहेस ॥१॥ अरे ह्या पंढरी क्षेत्री होणारा आनंद कोठें आहे बरें? आणि म्हणून मुक्तीची मागणी करण्यांत काय असे स्वारस्य आहे ॥२॥ या पवित्र क्षेत्रीं पताका फडकत आहेत. टाळघोषांचा गजर होत आहे ॥३॥संत महंताची गर्दी उसळलेली आहे आणि किर्तनाला बहारीचा रंग आला आहे, कारण किर्तनाचा महिमा अपूर्व आहे ।। ४ ।। नामदेवराय हे महाद्वाराच्या रंगणामध्ये लोटांगण घालात आहेत ।। ५ ।।

अरूप रूपासी आलें । परब्रम्ह ठसावलें । भक्त पुंडलिका फावले । गोप्य झाले[१] प्रगट ।। १ ।। धन्यधन्य भीवरा तट । चंद्रभागा हे निकट । धन्यधन्य वाळुवंट । मुक्ति पेठ पंढरी ।। २ ।। धन्यधन्य प्रेमळ । मबरा भरित स्वानंदजळ । स्नान केलिया निर्मळ । कोटिकुळें उद्धरती ।।३।। धन्य गा हा देशु । जेथें विठ्ठले केला रहिवासु । नामा विनवी विष्णुदासु । देई समरसु भक्तीचा ।। ४ ।।

---

१ टिप:– निर्गुण गुणासी आले ।। ।। भाग तिसरा (सार्थ गाथा) या सदृश हा अभंग आहे, पहा–

॥ समाप्त ॥

नाम महिमा

नामाचा महिमा नेणेची पै ब्रम्हा । म्हणोनिया कर्मा अनुसरला ॥१॥
नाम हेंचि कर्म नाम हेंचि ब्रम्ह । केशव हेंचि वर्म सांगितले ॥२॥
नाम शुद्ध स्नान नाम शुध्द संध्या । नामाविणें वेद आणिक नाहीं।३
करितां आचमन केशव नारायण । करिती उच्चारण आधीं हेंची।४।
लग्नाचिये काळी म्हणती सावधान । लक्ष्मीनारायण चिंतन करा॥५॥
देहाचिये अंतीं प्रायश्चित देती । शेवटीं वदविती रामनाम ॥६॥
ऐसिया नामा परतें नाहीं सार । गिरिजेसी शंकर उपदेशी ॥ ७ ॥
करिती पितृश्राध्द कर्म आचरती । शेवटी म्हणती एको विष्णु॥८॥
नामें होय गति नामें होय मुक्ति । नामयाचे चित्तीं रामनाम॥९॥

(१) ब्रह्मदेव सृष्टीकर्ता खरा परंतु नामाचे माहात्म न उमगल्यानें त्यास कर्माचे किंकर व्हावे लागले ॥ १ ॥ कर्म काय अथवा ब्रह्म काय हे नामच होय असें हे वर्म आम्हाला केशवरायानें सांगितले ॥ २ ॥ पवित्र स्नान काय अथवा पवित्र संध्या काय ते हे नामच होय नामाशिवाय आम्ही दुसरा कोणता वेद जाणत नाहीं ॥ ३ ॥ केशव नारायण या नामाचें प्रथम उच्चारण करून आचमन करितात ॥ ४ ॥ लग्न सोहळ्याच्या प्रसंगी लक्ष्मीनारायणाचे चिंतन करा अशी सावधानता-जाग्रती देतात ॥ ५ ॥ देहावसानकाळीं प्रायश्चित्त देतात आणि अंतिम रामनामाचे उच्चारण करतात ॥ ६ ॥ अशा या श्रेष्ठ नामापेक्षां दुसरें साधन नाहीं असा गिरजेस-पार्वतीस शंकराने उपदेश केला ॥ ७ ॥ पितृश्राद्ध काळीं जो क्रिया करावी लागतें त्याच्या अंतिमहि एको विष्णु असाच उच्चार करितात ॥ ८ ॥ गती पुनरावर्ति काय अथवा मुक्ति काय ती एक नामानेंच होणारी आहे आणि म्हणून नामदेवरायांच्या चित्तामध्यें केवळ एक रामनामच आहे ॥ ९ ॥

* म्हणता वाचे नाम वंदीतया यम ।। काळादिकासम तुज एका ।।१।।
ऋध्दि सिध्दि दासी अंगण झाडिती ।। उच्छिष्टे काढिती मुक्तिचारी ।।२।।
चारी वेद भाट होऊनि गर्जती ।। सनकादिक गाती कीर्ति तुझी।।३।।
सुरवरांचे भार अंगणी लोळती ।। चरण रजक्षिति शीववंदी ।।४।।
नामा म्हणे देव ऐसा हो कृपाळु ।। करि तो सांभाळू अनाथाचा ।।५।।

(२) तुला जो काळादिका सारखा वाटणारा यम तो हि वाणीनें नामनिष्टाच्या चरणाचे वंदन करितो ।। १ ।। त्यांच्या अंगणामध्यें रिद्धी सिध्यादिक अष्ट महा सिध्या झाडलोट करितात इतकेच नव्हे तर सलोकतादि चारी मुक्त्या ह्या त्यांच्या येथील उष्टावळी काढतात ।।२।। चार वेद हे श्रेष्ठ खरे परंतु तेहि त्यांचे भाट होऊन त्यांची स्तुति करितात किंबहुना सनकादिकहि त्याची कीर्ती गातात ।। ३ ।। त्याच्या अंगणामध्यें इंद्रादिक देवता लोळण घेतात शिव हा हि त्यांच्या चरण धुळीचे वंदन करितो ।। ४ ।। देवराय हा अत्यंत दयाळू होण्यानें तो अनाथ जिवांचे संरक्षण करितो असे नामदेवराय म्हणतात ।। ५ ।।

नामें सदा शुद्धि प्राणिया होतसे । नामापाशीं असे भुक्ति मुक्ति।।१।।
नामा ऐसे सोपें नाहीं त्रिभुवनीं । नाम संजिवनी साधकांसी ।।२।।
नामें भक्ति जोडें नामें कीर्ति वाढे । नामें सदा चढे मोक्ष हातां।।३।।
यज्ञ दान तप नामें आली हातां । नामें सर्व सत्ता प्राप्त होय ।।४।।
नामा म्हणे सदा नाम ज्याचे मुखीं । नाहीं याच्या तुकीं दुजा कोणी ।।५।।

---

* टीपः–म्हणतां वाचेनाम वंदी तया यम । काळादिकासम वदी तया ।।१।।
ऐसे नाम श्रेष्ठ सकळांसि वरिष्ठ । उच्चारितां नीट वैकुंठ गाजे ।। २ ।।
तो हा नाम महिमा वाखाणीत ब्रम्हा । न कळे तया उपमा आदि अंतो ।। ३।।
नामा म्हणे प्राणें नामाचेनि वाटें । तया [illegible] प्रगटे विठ्ठल हरि ।।४।।

(३) नामोच्चार केला असतां अत्यंत खळ नष्ट जीवहि पवित्र होतात कारण नामाजवळ भुक्ती मुक्ति ह्या तिष्टत राहतात ।। १ ।। नामासारखें सोपें साधन या त्रिभुवनांत नाही. नाम हे साधकांना संजिवनीच होय ।। २ ।। नामोच्चरणाने भक्तिचा अविष्कार होतो किंबहुना किर्तीचा विकास होतो. मोक्ष हा तर नामोच्चरणाने सहज हस्तगत होतो ।। ३ ।। नामानें यज्ञ, दान, तपादिक सात्विक साधनें ही हस्तगत होतात. फार काय सांगावे नामोच्चरणानें अखिल सत्ता प्राप्त होते ।।४।। ज्याच्या मुखांमध्यें नित्यशा नामाचे वास्तव्य आहे त्यांची दुसरी कोणी बरोबरी करूं शकत नाही असें नामदेवराय म्हणतात ।।५।।

नामें तो सरता नामें तो परता । नामें पंढरिनाथा भेटविलें ।।१।।
नाम हेंचि तारी नाम भवसागरी । उतरी पैलतिरीं नाम तुझें ।।२।।
नाम तें अंजन नामें बोधे मन । नामेंचि निधान चांगया झाला।।३।।
मार्गी जातां तुम्ही उगेंचि नसावें । वाचेसी म्हणावे रामकृष्ण।।४।।
रामकृष्ण हरि मुकुंदमुरारि । केशव नरहरि नारायण ।।५।।
ऐसा हा सतत आठव नामाचा । नामा म्हणे कैचा दोष तया।।६।।

(४) या नामानेच तो सरता होतो व या नामानेंच तो परता होतो या नामाच्या योगेच श्री पांडुरंग रायाची भेट होते ।। १ ।। या भव सागरांतून तरण्या करितां नामच समर्थ आहे तुला हे नामचे पैलतीर करील ।। २ ।। विठ्ठल निधान दिसण्या करितां नामच अंजन-काजळ होय. या नामानेंच मन हे बोध संपन्न होते या चांगदेवाला नाम हेच निधान प्राप्त झालें ।। ३ ।। रस्त्यानी चालत असतांना मौन धारण न करितां वाचेनें रामकृष्णाचा जप करावा ।। ४ ।। रामकृष्ण हरि मुकुंद मुरारी, केशव नरहरी, नारायण ।। ५ ।। अशा या नामाचे नित्यशा स्मरण केलें असतां त्यास कोणताहि दोष स्पर्श करणार नाहीं अर्थात तो सर्व दोषांतून मुक्त होईल असे नामदेवराय म्हणतात ।। ६ ।।

चिंतातुर देहीं न साहें काजळीं । नामाची पाजळी उभव दिवी॥१॥
प्रकाश पडेल ब्रम्ह हें दिसेल । वैकुंठ जोडेल भंजन भक्तीं ॥२॥
नाहीं याती वर्ण नाहीं या वेदोक्ति । नामेंचि संतृप्ति होवी जीवा ॥३॥
नामा म्हणे नाम हेंचि बीजसार । तुटेल येरझार भवबंधाची ॥४॥

(५) पा० भेद चिकित्सा–नाम संकिर्तनाचा महिमा वर्णन करणारा हा अभंग आहे हे ध्यानीं घेतले असतां नामाची आणि उभव हेंच नामदेवरायाचे मुळचे शब्द असले पाहिजे असे दिसून येते न आणि ब. याची अदला बदल होऊन मनाची हा आपपाठ पडलेला आहे.

उभव–उभीकर, उंचकर दीवी– मशाल, काजळी–अज्ञानरूप अंधकार, भजनभक्ती–भजन भक्तीनें, नाम संकीर्तन रूप भक्तीनें,

अर्थ– हे चिंतातूर नरा, तूं असा अज्ञान अंधकारांत ठेचाळत राहू नकोस यांतून सुटण्या साठीं तूं नामाची मशाल पाजळ व उंच कर ॥ १ ॥ म्हणजे ज्ञानरूप प्रकाश पडेल व त्यायोगें तुला ब्रम्ह सहज प्रतीत होईल भजन भक्तीच्या योगें वैकूंठ प्राप्त होईल ॥२॥ नाम संकिर्तन कोणास करता येते त्यासाठी अमुकच जात किंवा वर्ण असला पाहीजे असे बंधन नाहीं व त्यास वेदाध्ययनाचीहि आवश्यकता नाही, केवळ नाम संकिर्तनानें खरे समाधान लाभते ॥ ३ ॥ नाम हे अति स्वल्प खरे परंतु ते अत्यंत प्रभावी आणि मूळ बीज होय, त्याच्या योगें जन्म मृत्युचा फेरा चुकेल असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

गोक्षीर लाविलें अंधळिया मुखीं । तेथील पारखी जिव्हा जाणे॥१॥
तैसें देवा तुझें नाम निरंतर । जिव्हेसी पाझर अमृताचे ॥२॥
सोलूनियां केळें साखरें घोळिलें । अंधारी खादले तरी गोड ॥३॥
द्राक्षफळां घड सेवितां चोखड । तयाहूनि गोड नाम तुझें ॥४॥
आळूनियां क्षीर तुपाचिये आळें । कालविलें गुळें गोड जैसें ॥५॥
जाणोनिया नामा करी विनवणी । अमृताचि खाणी नाम तुझें ॥६॥

(६) आंधळयाच्या हाताला दूध लावले असतां त्या हाताला जरी दुधाची गोडी समजली नाही तरी त्याच्या जिव्हेला त्याचे ज्ञान होतें ॥ १ ॥ हे देवा त्याप्रमाणें तुझ्या नामाचे नित्यश: उच्चार केले असतां जिव्हेला अणूं काय अमृताचा स्त्राव होतो ॥ २ ॥ केळी सोलून त्यामध्यें साखरेचे मिश्रण केले व ते अंधारांत जरी खाल्ले तरी मधुरच लागते ॥ ३ ॥ द्राक्षाचे पक्व झालेले घंड हे मधुर खरे परंतु तुझे नाम त्यापेक्षां मधुर होय ॥ ४ ॥ दुध आटवूनं आणि ते तुपाच्या आळयांत ओतून कालविले असतां ते गुळापेक्षांहि गोड लागते ॥ ५ ॥ नाम हे अमृताची अणू काय खाणच आहे हे जाणून नामदेवराय देवरायाची विनवणी करितात ॥ ६ ॥

नामचि हें आहे पंचतत्त्वां ठाव । नाहीं दुजा भाव देखावया ॥१॥
देखणारा जाहाली कर्पुराची वाती । नामाग्नि विश्रांती ठाईं
जाहाली ॥२॥
द्वैताद्वैत तेथें नेणें जाणपण । गेलें हरपोन नामें सर्व ॥३॥
नामदेव म्हणे अनाम तें नाम । नाना नामभ्रम तेथें दुजा ॥४॥

(७) या पंचभूतांना आश्रय स्थान म्हणजे एक नामच होय त्यांना दुसरे स्थळ नाहीं ॥ १ ॥ कापुराची वात ही पहाणाराला दिसते खरी परंतु त्याला अग्निचा कां संपर्क झाला कीं तेथेच त्या कर्पुरवातीची समाप्ती होते ॥२॥ द्वैत अद्वैत काय अथवा जाणीव नेणीव काय नामाच्या ठिकाणीं या सर्वांची निवृती होते ॥ ३ ॥ आमचे हे नाम अणूं काय अनामच होय आणि अशा.या अनाम नामामध्यें अन्य जी भिन्न भिन्न नामें हीं केवळ भ्रम-होत असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

हडबडलीं पातकें । घेतां रामनाम एके ॥१॥
नाम घेतां तत्क्षणीं । चित्रगुप्तें सांडिली लेखणी ॥२॥
घेऊनि पूजेचा संभार । ब्रह्मा येतसे समोर ॥३॥
नामा म्हणे जरी हें लटकें । तरी माझें छेदावें मस्तक ॥४॥

(८) दुःखमय जन्ममृत्युला कारण पाप खरे परंतु एका राम नामोच्चरणानें ती भयकंपीत होतात ॥ १ ॥ चित्रगुप्त हा जिवांच्या आयुष्यांतील क्रियेचें हिशोब लिहीण्यांत तज्ञ खरा परंतु नामोच्चार करणाऱ्या पुढें त्याच्या हातांतील असलेली लेखणी तत्क्षणी गळून पडते ॥२॥ इतकेच नव्हे तर ब्रम्हदेव हा सृष्टी कर्ता खरा परंतु तोही हातामध्यें पुजेचे साहित्य घेऊन राम नामोच्चार करणारा पुढें सामोरा येतो ॥ ३ ॥ हे जें मी नाम महात्म वर्णन केले आहे ते असत्य ठरल्यास माझ्या मस्तकाचा छेद करा असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

असत्याचे मळ बैसले ये वाचे । ते न फिटती साचे तीर्थोदकें ॥१॥
हरी नामामृत प्रक्षाळी जिव्हेतें । पाणीयें बहुतें काय करिती ॥२॥
गंगासागरादी तीर्थें कोडीवरी । हरिनामाची सरी न पावती ॥३॥
हरीनाम गंगे सुस्नात पैं झाला । नाम्याजवळी आला केशिराज ॥४॥

(९) वाचेच्या ठिकाणी जी असत्य भाषणाची काजळी आलेली आहे ती तिर्थयात्रा करून स्वच्छ होणारी नाही. ॥ १ ॥ अरें बाबा हरि या नामामृताच्या योगानें जिव्हा प्राक्षाळण कर हेच तेथें समर्थ साधन आहे. तेथें अन्य बहुविध तीर्थजळाचा काय उपयोग होणार आहे ? ॥ २ ॥ पवित्र असें गंगा महासागरादि कोठयावधी तीर्थस्थळें आहेतर खरी, परंतु ती रामनामाच्या महात्म्याची बरोबरी करूं शकत नाहीन ॥ ३ ॥ हरिनाम गंगेच्या स्नानानेंच पावित्रता होण्यानें नामदेवाच्या जवळ केशवराय आले ॥ ४ ॥

वैष्णव तो बळी । सदाशिव चंद्रमौळी ॥१॥
त्याचा भक्त तो रावण । मारूनि छेदिला अभिमान ॥२॥
आणिक तो बाणासुर । छेदिला शिवा समोर ॥३॥
अनिरुद्धा समर्थी ख्याती । केली तयाची फजिती ॥४॥
भस्मासुर भस्म झाला । जाळूनियां भस्म केला ॥५॥
मारूनियां मुक्त केले । परि ते भक्त नाहीं झाले ॥६॥
नामा म्हणे ऐसेयादि देव । भजा पंढरीराव ॥७॥

(१०) ज्यांच्या मस्तकावर चंद्र आहे असा जो शिव हो वैष्णवाग्रणी होय ।। १ ।। त्याचा भक्त असलेला जो रावण त्याचा अभिमान ज्याने नष्ट केला ।। २ ।। दुसरा जो बाणासूर त्याला शिवासमोर छेदले ।।३।। अनिरुद्धाच्या काळामध्यें त्याची फजिती करून किर्ती मिळविली ।। ४ ।। भस्मासुराला जाळून, त्याला भस्म केले ।। ५ ।। उपनिर्दिष्ट व्यक्तींना मुक्त केले खरे परंतु ते भक्त या सदरांत आलें नाहींत ।। ६ ।। आणि म्हणून देवादि देव असलेला पंढरीराय यांचे भजन करा असें नामदेवराय म्हणतात.

भक्ति करूनियां कोण वांयां गेला । सांगा हो विठ्ठला निवडूनी ॥१॥
द्वापाराचे अंतीं नामाची सुकृत । अद्यापि निश्चित चालतसे ॥२॥
नाम ऐकतां तरती निर्धारी । व्याख्यान श्रीधरी टीकाकार ॥३॥
नामा म्हणे राम व्यापी त्रिभुवन । नाम तें निधान कलियुगीं ॥४॥

(११) हे विठ्ठलराया तुमची भक्ती करणारा असा कोण हो त्याज्य ठरला हे तुम्ही मला निर्णय करून सांगा ।।१ ।। नाम हेच परम पावन आहे असा जो द्वापारयुगांच्या शेवटीं निर्णय झाला तीच परंपरा अद्याप चालू आहे ।। २ ।। नामाच्या योगेंच प्राणिमात्रांचा उद्धार होतो असे श्रीधर टीकाकारानें आपल्या भाष्यांत-व्याख्यानांत निर्णय दिला ।। ३ ।। या त्रिभुवनांमध्यें माझा हा राम व्यापून राहिला आहे आणि या कलियुगांमध्यें मुख्य साधन जर कांही असेल तर तें नाम होय असें नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

देवाचें हें गुज सकळ मंत्रमय । जें कां नित्य ध्येय शंकराचें ॥१॥
तें हें रामनाम सेवितां सर्वभावें । रामरूप व्हावें निश्चियेंसी ॥२॥
नष्ट आजामेळाचे पतित्व गेलें । दिव्यरूप झालें वाल्मिकाचे ॥३॥
शरीर संपत्ति बळीनें अर्पूनी सकळ । केला द्वारपाळ नारायण ॥४॥
कृष्णाविण दुजे नेणती काया वाचा । झाला पांडवांचा साहाकारी ॥५॥
नामा म्हणे केशव भावाचा लंपट । भक्तांसी निकुट रतलासे ॥६॥

(१२) देवाचे गुह्य हें सर्व मंत्रमय असून शंकराचेहि ते नित्य ध्येय होय ॥१॥ सर्व भावानें रामनामाचे चिंतन केले असतां निश्चये करून राम जपतां प्राप्त होणें ॥२॥ . अजामीळ नष्ट खरा परंतु तोहि नाम पाठानें पवित्र झाला । तसेच वाल्मीकाचा देह हा या नामपाठाने दिव्य झाला ॥३॥ बळीने आपले देहादिक सर्व संपत्ति या नारायणास अर्पण करून त्यास द्वारपाळ केले ॥४॥ कायावाचा मनादिकानें पांडव हे कृष्णाशिवाय अन्य कोणाला जाणत नव्हते म्हणून कृष्ण हा पांडवाचा सखा झाला ॥५॥ देवराय ते केवळ भावनेने आकर्षित होणारे असल्याने तो भक्तावत्सळ नित्यशः रममाण असतो असे नामदेवराव म्हणतात ॥६॥

नामाचें सामर्थ्य नेणें वेदशास्त्र । शेषाची वक्त्रें मौनावली ॥१॥
गंगा गणपति चंद्र सूर्य श्रेष्ठ । शंकर वरिष्ठ मौनावले ॥२॥
भीष्म पाराशर उद्धव अंगद । ब्रम्हा मुचकुंद मौनावले ॥३॥
नामा म्हणे येरे काय जाणे स्तुति । दाटोनि श्रीपति उभा केला ॥४॥

(१३) वेदशास्त्र परमपुज्य व सर्वज्ञ खरे परंतु नामाचे सामर्थ्य जाणण्यास तो हि असमर्थ ठरतो शेषाला हजारो मुखें आहेत हे खरे परंतु तो हि नामाचे महात्म्य वर्णनाकरिता मौनावला जातो ॥१॥ गंगा, गणपति, चंद्र आणि सूर्य शिवहुना शंकर हे सर्वश्रेष्ठ खरे परतु ते हि या नाम महात्म्याचें वर्णन करित असतां मुग्ध होतात ॥२॥ भीष्म, पराशर, उद्धव, अंगद, ब्रम्हा, मुचकंद हे थोर भक्त व सामर्थ्यवान खरे परंतु तेहि मुग्धता धारण करितात ॥३॥ तेथें इतरांचा कांय पाड आहे परनु या नाम प्रभावानें श्रीपतीला हक्काने उभा केला असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

करीं घेऊनि ब्रम्हवीणा । नारद बोळगे नारायणा ॥ १ ॥
हेंचि हेंचि तत्वसार । नाम म्हणे निरंतर ॥ २ ॥
नारायण शिव आणि शक्ति । रामनाम ते जपती ॥३॥
गाऊं नाचत प्रल्हाद वीर । खांबीं केलासे अवतार ॥४॥
कुंटणी पक्षियां म्हणे रामा । तिसी नेलें निजधामा ॥५॥

अहिल्येसी लागता चरण । तिसी आलें मनुष्यपण ॥ ६ ॥
अजामेळ पातकी अपार । नामें पावला पैलपार ॥७॥
गजेंद्रे केलें नामस्मरण । त्याचें तोडिलें बंधन ॥८॥
द्रौपदी स्मरे हृषिकेशी । वस्त्रें पुरविलीं तियेसी ॥९॥
परिक्षितीसी घडलें स्मरण । त्यासी झालें सुलभ चरण ॥१०॥
नामा म्हणे निरंतरू । गगनीं अढळ केला धुरू ॥११॥

(१४)नारद हे महामूनी खरें परंतु तेहि हालामध्यें विणा घेऊन नारायणाला शरण येतात ॥ १ ॥ नाम तत्व हेंच प्रमुख आहे अशा निश्चयानें ते सतत त्याचा उच्चार करितात ॥२॥ शिव हा स्वतः शक्तिसहित श्री रामनामाचा जप करितात ॥ ३ ॥ या वीर प्रल्हादानें प्रेमानें नाचत गात या देवरायाला खांबातून अवतीर्ण केले ॥ ४ ॥ कुंटिणी खरी परंतु पोपटाला शिकविताना रामनामाचा उच्चार केला असतां तिला या देवराय वैकूंठांत घेऊन गेले ॥ ५ ॥ जी अहिल्या पतिच्या श्रापानें पाषाण झालेली होती तिला या देवरायाच्या चरण स्पर्शाने पुनश्च मनुष्यत्व प्राप्त झाले ॥ ६ ॥ अजामेळ हा अत्यंतपापी असल्याचा दाखला पुराणान्तरी प्रसिद्ध आहे, परंतु तोहि नामो-च्चारणानें संसारांतून मुक्त झाला ॥ ७ ॥ नक्राने पाण्यांत गजेंद्राला हतबल केल्याने शेवटचा उपाय म्हणून त्यानें नामस्मरण करितांच त्याला नक्राच्या तावडींतून सोडविले ॥८॥ भर सभेंत सती द्रौपदीला विवस्त्र होण्याकरितां दुष्ट दुर्योधनानें तिचे वस्त्र काढण्याचा प्रयत्न केला असतां तीच्या निहृय स्मरणानें हा देवराय तिच्या अंकीत होऊन तिला वस्त्रें की हो पुर-विली ॥ ९ ॥ राजा परिक्षीतीला या देवरायाच्या सहज नामस्मरणानें त्यास या देवरायाचे चरण प्राप्त झाले ॥ १० ॥ ध्रुव बालक होता खरा परंतु त्यानें सतत नामाचे स्मरण केल्यानें त्यास आकाशामध्यें अढळ-पद मिळाले असें नामदेवराय म्हणतात ॥ ११ ॥

अग्नी जाळीं तरी न जळती पांडव । हृदयीं माधव म्हणोनिया ॥१॥
अग्नी जाळी तरी न जळती गोपाळ। हृदयीं देव की बाळ धरियेला ॥२॥
अग्नि जाळी तरी न जळे हनुमंत । हृदयीं सीताकांत म्हणोनिया ॥३॥

अग्नी जाळी तरी न जळे प्रल्हाद। हृदयीं गोविंद म्हणोनियां ॥४॥
अग्नी जाळी तरी न जळे पैं सीता।हृदयीं रघुनाथ धरिले म्हणोनीया॥५॥
लंकेसी उरलें बिभिषणाचें घर। हृदयीं सीतावर म्हणोनीया ॥६॥
नामा म्हणे स्वामी स्मरावें गोविंदा। चुके भवबाधा संसाराची ॥७॥

(१५) पांडवांच्या हृदयामध्यें सतत माधवाचे चिंतन होण्यानें त्यांना लाक्षा गृहामध्यें जाळण्याचा दुर्योधनानें प्रयत्न केला खरा परंतु ते अग्निनें जळाले नाहींत ॥ १ ॥ कंसानी गोपाळांना अग्नीत जाळण्याचा प्रयत्न केला असतां त्यांनीं हृदयामध्यें देवकी बाळाला धारण केल्यानें ते जळाले नाहींत ॥ २ ॥ हनुमंताला जाळण्याकरितां त्याच्या शेवटास भडक अग्नी दिला असतां त्याच्या हृदयांत सीतापती होण्यानें तो जाळला गेला नाहीं ॥ ३ ॥ प्रल्हादाला जाळण्याकरितां त्यास ज्वलंत अग्नित घातला असतां त्याच्या हृदयांत गोविंदाचे वास्तव्य होण्यानें तो जळाला नाही ॥ ४ ॥ पतिव्रतेची कसोटी सिद्ध होण्याकरितां सीतेनें ज्वलंत अग्नींत उडी घातली खरी परंतु तिच्या हृदयांत रघुनाथाच्या मूर्तिचे वास्तव्य होण्यानें ती जळाली नाही ॥५॥ हनुमंताच्या शेपटीला लावलेल्या अग्निनें सर्व लंका जळाली परंतु बिभीषणाच्या हृदयांमध्यें सीतापती होण्यानें त्याचे घर जळाले नाहीं ॥६॥ आणि म्हणून प्राणीमात्रानें स्वामी गोविंदाचे चिंतन केले असतां त्याला या दुःखमय संसाराची बाधा होणार नाहीं असे नामदेवराय म्हणतात ॥ ७ ॥

नामाचा प्रताप जाणवेना कोणा। समुद्रीं पाषाण तारीयेले ॥१॥
आवडीनें कोणी चिंतितां उल्हास। काय तो तयास उपेक्षील ॥२॥
कुंटिणी ते नीच राव्यासाठीं नेली। वैकुंठीं ठेविली सन्निधचि ॥३॥
अजामिळ खळ पुत्राचिया मिषें। उद्धारिलें त्यास दिनानाथें ॥४॥
नामा म्हणे ऐसें सांगों आतां किती। नामापाशीं मुक्ति उभी असे॥५॥

(१६) ज्या नामाच्या प्रभावानें समुद्रामध्यें दगड तरले त्याचे सामर्थ्य कोण वर्णन करील बरें ? ॥ १ ॥ जो कोणी अत्यंत प्रसन्न अंतःकरणानें नामाचे चिंतन करीतो त्याचा तो त्याग ~~करील काय~~ ? कुंटीणी ही अार

कर्मामध्यें निपुण होती खरी परंतु पोपटाला पढविण्याकरितां तिनें नामोच्चार केल्यानें या देवरायानें तिला वैकुंठांत आपले सान्निध्य दिले ॥ ३ ॥ अजामेळ हा महा दुष्ट खरा परंतु पुत्राच्या नामोच्चरणांत नारायणाचा उच्चार होण्यानें या दिनानाथानें त्याचा उद्धार केला ॥ ४ ॥ या नामाचा प्रताप कितीं म्हणून वर्णन करावा बरें? मुक्त्या ह्या दुर्मीळ खऱ्या परंतु त्या नामाच्या द्वारामध्यें उभ्या राहून खडा पहारा देतात असें नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

आणीक ही मंत्र मोक्षदानी खरे । अशौचाचा थार असूं नये ॥१॥
नाममंत्र कांहीं बाधीना कोणासी । जपा अहर्निशीं रामकृष्ण ॥२॥
तपाची मांडणी आकाशाचे खेंव । इंद्रियांची हांव राहे तरी ॥३॥
यज्ञ तो आचार धनाचें सांकडें । तरी जाण द्वाड स्वर्गसुख ॥४॥
नामा म्हणे नाम साधकाची मातां । जैसें तैसें घेतां भक्ति जोडे ॥५॥

(१७) या विश्वामध्यें अनेक प्रकारचे मंत्र आहेत ते आपापल्या प्रभावानें मोक्ष देण्याला समर्थ आहेत हे खरे परंतु त्यांना मंत्रविधी नियमाच्या अडगळीची बंधनें आहेत, अशुद्धकाळीं त्यांचा जप करतां येत नाहीं ॥ १ ॥ नाम मंत्र हे कोणाला बाधा करित नाहीं म्हणून त्याचा नित्यशा जप करा ॥ २ ॥ तप सामर्थ्य हेहि अचाट खरें परंतु त्याचे अनुष्ठान करणें म्हणजे आकाशाची भेट घेण्यासारखी अवघड कृती आहे, कारण तप हे अनावर जी इंद्रिये ती शांत होण्यानें होणार आहे ॥ ३ ॥ यज्ञ हेहि पवित्र साधन आहे परंतु ते करित असतां धनाचा खर्च होतो आणि त्याचे फळ म्हणजे पुनरावृत्ती देणारें स्वर्ग सुख होय ॥ ४ ॥ आपले पवित्र नाम मंत्र साधकांची जणू काय माऊलीच होय, कोणत्याहि व कशाहि प्रकारें नाम घेतले असता ती भक्तींत जमा होते असें नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

नामाचि जो जाणे आन कांही नेणे । संसार नामाविणें जाईजण ॥१॥
नाम स्मरे त्यासी संसारचि नाहीं । खुंटली ते पाहीं येरझार ॥२॥
नाम न होय त्याचें जळों जालेपण । आळसी वायांविण संसारासी ॥३॥
नामा म्हणे मज नामींच सौरस । नामीं स्मरे हृषिकेशु त्यासी मार्गे ॥४॥

(१८) नामाशिवाय संसार बंधनें ही नष्ट होणार नाहींत असे जाणून तो या नामाच्या ठिकाणी अनन्य होतो त्याशिवाय तो दुसरें कांहीं साधन जाणत नाहीं ॥ १ ॥ प्रेमानें नामाचे स्मरण केले असतां संसाराचा त्याला स्पर्श होत नाहीं. तो जन्म मृत्युच्या चक्रांतून मुक्त होतो ॥ २ ॥ नामावर ज्याचे प्रेम नाहीं त्याचा जन्म व्यर्थ होय नाम घेण्यासंबंधी आळस करणारा प्राणी हा संसारांत भारवाही होय ॥ ३ ॥ नाम स्मरण करणाराला हरीची सहज प्राप्ती होते आणि ह्मणून मला नामाच्या ठिकाणीं गोडी वाटतें असें नामदेवराय ह्मणतात ॥ ४ ॥

साधनें ही सार भक्तीचें भांडार । नाम निरंतर गातां वाचें ॥१॥
कासया करावें आणिक साधन । नामाविण क्षण जाऊं नेदी ॥२॥
दयाशांति क्षमा हेंचि पैं भूषण । नामसंकीर्तन अहर्निशीं ॥३॥
नामा म्हणे जप अखंड नामाचा । काळ हा सुखाचा सदोदित ॥४॥

(१९) नाम हेंच सर्व साधनांचा अर्क असून भक्तीचे तर भांडारच होय आणि ह्मणून नामाचे सतत गाण करित प्रेमानें त्याचा वाचेनें उच्चार करावा ॥ १ ॥ व इतर कष्टतर आणि निष्फळ साधनाच्या मार्गाकडे चुकूनहि जाऊं नये किंबहुना या पवित्र नामाशिवाय एक क्षणहि व्यर्थ जाऊं नये ॥ २ ॥ खरा अलंकार म्हणजे दया व शांती होय ती धारण करून सतत नामसंकीर्तन करावें ॥ ३ ॥ जो कोणी सतत नामाचा जप करितो त्याचे कालक्रमण आनंदानें होते असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

दग्धही होतसे आलें जें आकारा । असोनी निर्धारा नाम नाहीं ॥१॥
नाम अनुभवें प्रपंचचि ब्रह्म । जाहला सर्वोत्तम संत कृपें ॥ २ ॥
म्हणोनियां संतां जाऊनि शरण । साधावें निधान नामब्रह्म ॥३॥
नामदेव म्हणे संताचिया कृपे । माजी नाम सोपें नांदतसे ॥४॥

(२०) जो पदार्थ अकाराला आलेला आहे त्याचा नाश होणार हे निश्चित आहे परंतु नाम मात्र तसे नव्हे, ते अविनाशी आहे ॥ १ ॥ ज्याला नामाची स्वप्रतिष्ठा झालेली असते त्यास हा अखिल संसार ब्रह्मरूप प्रतित

होतो व तो संत कृपेकरून सर्वोत्तम होतो ।। २ ।। आणि म्हणून संताला अनन्य भावानें शरण जाऊन परब्रम्हरूप जो नाम ठेवा तो हस्तगत करावा ।। ३ ।। संत कृपा प्रसादामध्यें सहज सुलभत्वानें नाम स्थित आहे असे नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

नांदतसे नाम आकांश पाताळीं । सर्व भूमंडळीं घनदाट ॥१॥
पाताळ फोडोनि किती आहे पुड । नाहीं अंत वाड नभावरी ॥२॥
चौऱ्यांसीं भोगिती दुर्मति पामर । नाहीं सारासार जाणत तें ॥३॥
नामदेव म्हणे नाम अविनाश । तेथें नाना वेष नाम सर्व ॥४॥

(२१) हे पवित्र नाम इतके व्यापक आहे कीं तें आकाश पाताळामध्यें व्याप्त झालेच आहे परंतु या भूमंडळांमध्येंहि ठासून भरले आहे याला पाताळ भेदून पहावे तो त्याचा अंत लागत तर नाहीं परन्तु त्याची व्याप्ती आकाशापेक्षां ज्यास्त प्रतीत होते ॥२॥ असे हे परमनाम असतांहि त्याचा सारासार विचार न होण्यानें दुष्ट बुद्धिचे पामर वर्ग हे चौऱ्यांशीच्या चक्रामध्ये फेरें करतात ॥३॥ पवित्र नाम हें अविनाशी असून तेथें होणारे नाना वेश हे सर्व नामच होय असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

तरले तरती हा भरंवसा । पुढती न येती गर्भवासा ॥१॥
वाट सांपडली निकी । विठ्ठल नाम ज्याचे मुखी ॥२॥
तीर्थें इच्छिती चरणींचे । रज नामधारकांचे ॥३॥
प्रायश्चित्त सांडोनी प्रौढी । झाली दीन रूपें बापुडी ॥४॥
रिद्धी सिद्धी महाद्वारीं । मोक्ष वोळंगण करी ॥५॥
नामा म्हणे सुख निधान । नाम पतीत पावन ॥६॥

(२२) नामपाठक ते निश्चयानें तरले व तरतील असा पूर्ण विश्वास आहे इतकेच नव्हें तर त्यांना पुनरपि जन्ममृत्यु प्राप्त होणार नाही ॥१॥

ज्यांच्या मुखा मध्ये नामोच्चार आहे त्यांना असा हा चोपट मार्ग सांपडला ॥२॥ जे नाम धारक आहेत त्यांच्या पायाच्या धुळीची सर्व तिर्थें अपेक्षा करितात ॥३॥ प्रायश्चित्त म्हणून जी कर्मं सांगितली आहेत त्यांनीं

आपल्या मोठेपणाचा त्याग करून दीन झाली ।।४।। कष्टतर अशा योग साधनानें प्राप्त होणाऱ्या अष्ट महा सिद्धी काय अथवा ज्ञानानें प्राप्त होणारा मोक्ष काय तो देवरायाच्या महाद्वारामध्यें ओळंगण करितो ।।५।। नाम हे सुख निधान असून पतीतांना पावन करणारे आहे असें नामदेवराय म्हणतात. ।।६।।

तीर्थ तपरासी जप हृषिकेशी । नाम अहर्नीशीं रामराम ॥१॥
तीर्थाचें पैं तीर्थ नाम हें समर्थ । होईल कृतार्थ रामनामें ॥२॥
साधेल साधन तुटेल बंधन । वाचे जनार्दन सुफळ सदा ॥३॥
नामा म्हणे हरी उच्चार तूं करीं । उद्धरसी निर्धारी इह लोकी ॥४॥

(२३) हृषीकेशाचा जप केला असतां तुझ्या पुढे तिर्थाच्या व तपाच्या पुण्याच्या राशीचा डोंगरच ओळंगेल आणि म्हणून नित्यशः राम नामाचे नाम घे ।।१।। नामाचे सामर्थ्य इतके आहे की ते तिर्थाचे तिर्थ होय या रामनामाच्या योगें निश्चयानें कृतार्थता प्राप्त होईल ।।२।। जनार्धनाचा वाचेनें उच्चार केला असतां सर्व साधनेंही हस्तगत होईल इतकेंच नव्हें तर सर्व बंधनें नष्ट होऊन नित्यकल्याण होईल ।।३।। मुखानें हरिचा उच्चार केला असतां या लोकांमध्ये निःसंशय तुझा उद्धार होईल असें नामदेवराय म्हणतात. ।।४।।

तपें दानें व्रतें यज्ञाचिया कोडी । तुकितां झाली थोकडी हरिनामें ॥१॥
न पुरे त्यांसी घातली त्रिभुवनींचीं तीर्थे । नयेची पुरतें रामनामेंसी॥२॥
नाहीं या जिवाचें बोलणें शिवाचें । उपदेशिलें वाचे शक्तीप्रती ॥३॥
नाम नाहीं वाचे हाचि पैं निषेधु । विधी हा गोविंदु स्मरलिया ॥४
श्रेष्ठ सर्व नाम शिवाचें बोलणें । युक्ति अनुमानें न बोलें कांहीं ॥५॥
नामेंचि भक्त पावलें अपार । नामें पतित नर उद्धरले ॥६॥
नामें पशु गजेंद्राचा तो उद्धार । वाल्मिकें विचार हाचि केला ॥७॥
गगनीं धुरु केला अढळ नामें देखा । नामेंचि गणिका उद्धरली ॥८॥
नामें तें आपदा न बाधी प्रल्हादा । मुखीं नाम सदा उच्चारिता ॥९॥

कृपाळू नाम पैं मेघ हाचि सार। भीष्में युद्धिष्ठिरा उपदेशिलें ॥१०॥
हरिनामा परतें नाहीं विचारितां। नवमाध्यायी गीता कृष्ण सांगे ॥११॥
सकल अमृत श्रीहरिनें नाम। त्यामाजि उत्तम रामनाम ॥१२॥
म्हणोनि सदाशिवें धरिलें मानसीं। हेचि गिरजेसी उपदेशिलें ॥१३॥
तारक ब्रह्ममंत्र रामनाम जाण। विश्वनाथ श्रवण करीतसे ॥१४॥
कीर्तन श्रवण हेंचि पैं हो काशी। म्हणोनि मानसीं राम जपा ॥१५॥
विरंची सकळ शास्त्र विचारितां। हरिनामा परतां मंत्र नाही॥ १६॥
कळिकाळा त्रास हरिनाम कीर्तनें। पतित पावन प्राणी होय॥१७॥
कलियुगी धर्म हरीचें हें नाम। म्हणोन शुकदेवें वाखाणिलें ॥१८॥
नामायाचा स्वामी पंढरीचा रावो। रुक्माईचा नाहो गाऊं गीतीं ॥१९॥

(२४) हरीनामाच्या सामार्थ्याच्या तुलनेनें पहातां तप, दान, व्रत, व कोठयावधी यज्ञाचो फळें ही तुच्छ होत ॥१॥ या त्रिभुवनांचो तिर्थे एकत्र करून त्यांचें होणारे पुण्य नामापुढें फिक्का होत ॥२॥ माझे हे प्रतिपादन म्हणजे क्षुद्र जोवाचे नसून ते शंकरानें प्रत्यक्ष आपल्या अर्धांगी जी पार्वती तिला सांगितले ॥३॥ ज्याच्या वाचेला रामनाम नाहीं त्याची सर्व कर्में निषेधात्मक होय आणि गोविंदाचे स्मरण करणें हाच विधी होय॥४॥ नाम हे श्रेष्ठ होय.ही प्रतिज्ञा प्रत्यक्ष शंकराची होय ती केवळ युक्ती आणि तर्कानें लढविलेलें बोल नव्हेत ॥५॥ या नामाच्या योगेच पुष्कळ भक्तांचा आणि पापी जीवांचा उद्धार झाला ॥६॥ पशु जो हात्ती त्याचाहि उद्धार या नामानेंच झाला आणि वाल्मीक ऋषीनेंहि या नामाकडे आपले विचार केंद्रित केले ॥७॥ ध्रुव बालक खरा परंतु या नाम प्रभावानें त्यास आकाशामध्यें अढळपद दिले या नामस्मरणानें गणिकेचाहि उद्धार झाला ॥८॥ प्रल्हादाला त्याच्या वडिलांनीं पुष्कळशी छळणूक केली खरी परंतु या नामस्मरणानें त्यांचा उपसर्ग त्यास किंचितहि झाला नाहीं ॥९॥ नाम हे जणू काय

मेघासारखे कृपाळू होय तो जसा सर्वांना सारखा वर्षाव करतो तद्वत नाम हे सर्वांना पावन करणारे आहे असे युधीष्ठीराला भिष्माने उपदेश केला ॥१०॥ हरिनामाशिवाय अन्य कोणतेहि साधन श्रेष्ठ नाहीं असे भगवंतानें अर्जुनाला गीतेच्या नवव्या अध्यायांत सांगितले ॥११॥ स्वर्गादिकांतील अनेक अमृते अमर करणारी आहेत खरीं परंतु त्या पेक्षांहि हरिनाम हे श्रेष्ठ अमृत होय त्यामध्येंहि रामनाम हे श्रेष्ठतर अमृत होय ॥१२॥ आणि म्हणूनच शंकरानें अशा या अमृतरूप नामाला स्वकंठी धारण केले आणि पार्वतीलाहि हेच सांगितले ॥१३॥ तारक असा ब्रम्हमंत्र असेल तर रामनाम हेच होय विश्वनाथ हेही याचेच श्रवण करितात ॥१४॥ पवित्र काशी म्हणजे किर्तन श्रवण होय आणि म्हणून मनामध्यें रामनामाचा जप करा ॥१५॥ हरिनामाशिवाय दुसरा कोणताच मंत्र श्रेष्ठ नाहीं हे ब्रम्हदेवानी अनेक शास्त्राचा विचार करून निश्चित ठरविले ॥१६॥ या हरिनामाच्या किर्तनाच्या योगे कळीकाळाचा त्रास दूर होऊन पापी जीवाचा उद्धार होतो ॥१७॥ हरिचे नाम हाच कलीयुगांतील मुख्य धर्म होय आणि म्हणूनच शुकदेवासारखे ऋषी हे त्याचा गौरव करितात ॥१८॥ पंढरपुरचा राणा आणि रुक्मीणीचा पती जो पांडुरंगराय तोच नामदेव रायाचा स्वामी असून त्याचेच आनंदाने गान करूं ॥१९॥

चंद्र तारांगण नैऋति भास्कर । तटस्थ निर्धार ब्रम्हादिक ॥१॥
ब्रम्हादि सकळ भजनी तत्पर । तेव्हां हरिहर नाचतसे ॥२॥
कृष्ण विष्णु नाम अच्युत अनंत । सगुण निश्चित स्मरा वेगीं ॥३॥
नामा म्हणे नको उदंड सायास । तोडी भवपाश रामनामें ॥४॥

(२५) या नामाचा निर्धार करीत असता चंद्र, चांदण्या, नैऋत्यादिक दिशा, व सुर्य इतकेच नव्हे तर ब्रह्मादिकहि तटस्थ झाले ॥१॥ जेव्हा ब्रह्मादीक हे भजनामध्ये मग्न असतात तेव्हा शंकर व विष्णु हे आनंदानें नाचतात ॥२॥ कृष्ण, विष्णु, अच्युत, अनंत ही जी सगुण परमात्म्याला नामे आहेत त्याचे तत्परतेनें त्वरीत स्मरण करा ॥३॥ एका राम नामाच्या योगें संसार बंधनें नष्ट होणारी असल्यानें अनेक साधनाच्या खटपटीत पडूं नका असें नामदेवराय म्हणतात. ॥४॥

सुखाचा सोहोळा वाटतसे जीवा । भेटणें केशवालागीं आजी ॥१॥
पाऊलां पाऊली वाचिया वाटे । पताकांचे थाट दिसताती ॥२॥
पैल तो कळस पाहें पां साजणी । नाम घोष कानी पडतसे ॥३॥
नामा म्हणे नामीं पारणें जो करी । तयासि श्रीहरी उपेक्षीना ॥४॥

(२६) आज केशव रायाची भेट होणार असल्यानें माझ्या जिवाला सुख सोहळयाच्या उर्मी उमटत आहेत ॥१॥ त्याच्या भेटीस्तव जात असतां प्रत्येक पाऊलागणीक पताकाची शोभा प्रतित होत आहे ॥२॥ अहो मैत्रीणींनो पहा तो कळस कसा पलीकडे शोभत आहे आणि कर्ण पटलावर नाम घोष ऐकू येत आहे ॥३॥ जो कोणी नामाचे पारणें करतो त्याचा त्याग श्रीहरि केव्हांहि करित नाही असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

नामा परता मंत्र नाहीं त्रिभुवनीं । ऐसी बोले वाणी वेदशास्त्रीं ॥१॥
पहा विचारोनी अनुभव मनीं । नका आडरानीं क्षणीं भरों ॥२॥
नामा वांचोनी तरले जे म्हणती । ते आधी बुडती भवसागरीं ॥३॥
नामा म्हणे नाम ॐकाराचें मूळ । ब्रम्ह ते केवळ विटेवरी ॥४॥

(२७) ह्या त्रिभुवनांत नामापेक्षां दुसरा कोणताहीं मंत्र श्रेष्ठ नाहीं अशी घोषणा प्रत्यक्ष चारी वेद करितात ॥ १ ॥ याचा तुम्ही आपल्या-मध्यें प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहा, व्यर्थ अन्य खटपटोंच्या आडरानांमध्यें भटकू नका ॥ २ ॥ पवित्र अशा नाम साधनाशिवाय इतर साधनाचे अव-लंबन करून आम्ही तरलो असे जे कोणी ह्मणत असतील त्यांचीच या भव-सागरांमध्यें प्रथम जल समाधी होणार ॥ ३ ॥ पवित्र नाम हें जणूं काय ॐकाराचें मूळच होय आणि जे कटीवर हात ठेवून विटेवर उभे आहेत ते खरोखरच परब्रह्म होय असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

कां करिसी सोस मायेचा असोस । नव्हे तुज सोरस नामेंविण ॥१॥
नामचि हा मंत्र नामचि हो तंत्र । नामेंविण पवित्र न होसी देखा ॥२॥
तिहीं लोकीं पाहतां नामेंविण सर्वथा । अच्युत म्हणतां पुण्य कोटी ॥३॥
नामा म्हणे ब्रम्ह आदि अंतीं नेम । तें विटेवरी सम उभें असे ॥४॥

(२८) पवित्र नामाशिवाय दुसरें कोणीहि सुखाला हेतु नाहीं तेव्हां त्यासी पाठमोरे होऊन दुःख जनक अशा मायावी पदार्थांच्या चिंतनामध्यें व्यर्थ अयुष्य कां खर्च करितोस ? ॥१॥ मंत्रामध्यें मंत्र जर कोणता असेल तर ते नाम होय असे द्विरूक्तीनें सांगत आहे नामाशिवाय तुला केव्हांही पवित्रता प्राप्त होणारी नाहीं ॥ २ ॥ या तिन्ही लोकांमध्यें पहातां नामाशिवाय कोणतेच साधन श्रेष्ठ नाहीं. अच्युताचे नाम घेतले असतां तुला कोटयावधी पुण्याची प्राप्ती होणारी आहे ॥ ३ ॥ जे ब्रह्म आदि अंति व्यापून आहे तेच हे विटेवर समचरण ठेवून उभे आहे असे नामदेवराय ह्मणतात ॥ ४ ॥

सार पैं सांगत उपनिषद तुम्हां । वाचे रामनामा जप करा ॥१॥
हेंचि पैं मथित सांगोनिया गेले । उच्चारितां ठेलें ब्रम्हरूप ॥२॥
ज्योतीसी ते ज्योति भजन करील । आपणचि होईल हरी स्वयें ॥३॥
नामा म्हणे कैसें विपरीत करणें । भूतदया धरणें सर्वांभूतीं ॥४॥

(२९) तुम्ही वाणीनें रामनामाचा जप करा हेच सर्व उपनिषदें सांगत आहेत ॥ १ ॥ नामोच्चार केला असतां तो ब्रह्मरूप होतो हेंच सार त्यांनीं निश्चयानें सांगितलें ॥ २ ॥ जो कोणी हरिभजन करील तो ज्योतीशी ज्योतवत समरस होऊन अंगानें हरिरूप होईल ॥ ३ ॥ तेव्हां अन्य साधन करण्यांत काय स्वारस्य आहे. प्राणीमात्रा संबंधी भूतदया करा असें नामदेवराय ह्मणतात ॥ ४ ॥

अखंड मुखीं राम नाम । धन्य तयाचाचि जन्म । स्नान संध्येसी नेम । तो पुरुष महापवित्र ॥१॥ धन्य धन्य तयाचा जन्म । रामार्पण अवघे कर्म । तोचि तरला हाचि नेम । रामकृष्ण । उच्चारणीं ॥२॥ अनंत जन्मांचें सांकडें । तेणेंचि उगविलें कोडें । जप तप येणें नाडे । रामकृष्ण उच्चरणीं ॥३॥ नामा म्हणे नाममात्रें । अवघीं निवारलीं शस्त्रें । रामकृष्ण नाम वक्त्रें । उच्चारी तो धन्य ॥४॥

(३०) ज्याच्या मुखामध्यें नित्य रामनाम आहे त्याचा जन्म धन्य होय. ज्याचा संध्या स्नान करण्याचा नित्य नियम आहे तो पुरुष महापवित्र होय ॥ १ ॥ जो आपली सर्व कर्मे रामार्पण करितो त्याचा जन्म धन्य धन्य होय. जो रामकृष्णाचा उच्चार करितो तो निश्चयानें मुक्त झाला ह्मणून समजावे ॥ २ ॥ रामकृष्ण नामामध्ये जो रंगून जातो त्यास जप तपादिक साधनें ही अप्रिय वाटतात इतकेच नव्हे तर त्यांच्या अनेक जन्माची ज्या कोंडी आहेत तो तो सहज उकलूं शकतो ॥ ३ ॥ एका नाम मात्रे करून अखिल शस्त्राचे आघातापासून निवारण होते आणि ह्मणून जो आपल्या मुखाने नामोच्चार करितो तो धन्य होय असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

सहस्रदळांमधून अनुहात ध्वनि उठी ! नामाचेनि गजरें पातकें
रिघाली कपाटी ॥१॥
जागारे गोपाळांनों रामनामीं जागा ! कळिकाळ एका नामें महादोष
जाती भंगा ॥२॥
दशमीं एकव्रत दिंडीचें करा दर्शन ! एकादशी उपवास तुम्ही
करा जागरण ॥३॥
द्वादशी साधनें जळती पातकांच्या कोटी ! नामा म्हणे केशव ठाव
देईल वैकुंठी ॥४॥

(३१) अनुहात ध्वनी हा सहस्र दलांतून उमटतो खरा परंतु नामाच्या योगें अखिल पातकें ही गुहेंत दडा मारून बसतात ॥ १ ॥ आणि म्हणून हे गोपाळानों तुम्ही जागे व्हा. आणि रामनामाच्या ठिकाणीं जागृत रहा कारण एका रामनामाच्या जपानें सर्व दोष नष्ट होतात ॥ २ ॥ दशमीला एकवृतस्थ राहून दिंडीचे दर्शन घ्या आणि एकादशीस उपवास करून हरिजागर करा ॥ ३ ॥ द्वादशीचे साधन केलें असतां कोट्यावधी पातकें दग्ध होतात किंबहुना हा केशवराय त्यास वैकुंठ पद देतो असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

मायेचें भूचर रज तम सात्विक ! रामनाम एक सोडवणें ॥१॥
राम हेंचि स्नान राम हेंचि ध्यान ! नामें घडे यज्ञ कोटी देखा ॥२॥
न लगती साधन नाना मंत्र विवेक ! राम नामी मुखरंगी कां रे ॥३॥
नाम म्हणे श्रीराम हेंचि वचन आम्हां ! नित्य ते पौर्णिमा सोळा कळी।४

(३२) मायाकृत जे भूचरादिक, आणि रज, तम, सत्वादिक गुण यापासून मुक्त करण्याकरितां एक रामनाम समर्थ आहे ॥ १ ॥ राम हेच ध्यान होय या नामोच्चरणानें कोठ्यावधी यज्ञ केल्याचे श्रेय प्राप्त होते ॥ २ ॥ मुखानें रामोच्चारण्याच्या रंगामध्यें रंगून गेले असतां मंत्र विवेकादिक इतर साधनाची कांहीं आवश्यकता नाहीं ॥ ३ ॥ जसा काय चंद्रमा पौर्णिमेस पूर्ण कलेनें पूर्ण असतो तद्वत आमच्या वाणीमध्ये रामोच्चार आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

माझें मी करितां गेले हे दिवस ! न धरीच विश्वास रामनामीं ॥१॥
अंतीं तुज उद्धरती रामनाम हरी ! राम पंचाक्षरी मंत्रसार ॥२॥
कां करशील सांठा प्रपंच विस्तार ! न तुटे येरझार नामेंविण ॥३॥
नामा म्हणे कैसें रामनामीं पिसें ! तो उद्धरेल अपैसे इहलोंकी ॥४॥

(३३) अरे वेड्या जीवा, मी आणि माझे अशा या भ्रमामध्यें आयुष्य संपत आले तरी अद्याप कां रामनामाच्या ठिकाणीं विश्वास ठेवित नाहीस ॥ १ ॥ तुझ्या अंतकाळामध्यें तुझा उद्धार करणारा असा राम नाम हरि होय " राम " असा हा पंचाक्षरी मंत्र हाच सार होय ॥ २ ॥ या अवाढव्य अशा मिथ्या प्रपंचाचा संग्रह कां करित आहेस या पवित्र नामाशिवाय तुझे जन्म मृत्यु केव्हांही दूर होणार नाहींत ॥३॥ ज्यांना रामनामाचा छंद-वेड आहे तोच या भवसागरांतून मुक्त होईल असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

* कृष्णकथा सांग जेणे तुटे पांग । न लगे तुज उद्वेग करणें कांही ॥१॥
समर्थ सोइरा राम हा निधान ! जनीं जनार्दन एक ध्याई ॥२॥
नामा म्हणे उच्चार रामकृष्णसार ! तुटेल येरझार भवाब्धींची ॥३॥

(३४) ज्याच्या योगें हें जन्ममृत्युचे दारिद्रय नष्ट होईल अशी कृष्ण कथा निवेदन कर या शिवाय दुसरी खटपट करणें नलगे ॥१॥ रामराय हाच योग्य असा समर्थ जोवलग ठेवा आहे जगामध्यें केवळ जनार्दनाचेच ध्यान धर ॥२॥ श्री रामकृष्ण हे नामच श्रेष्ट आहे त्याचाच उच्चार कर त्या योगेच या भव सागरांतील अवागमन नाहीसे होईल असें नामदेवराय म्हणतात. ॥३॥

स्मरण करितां रामनाम ध्वनी । ऐकतांची कर्णी पळती यम ॥१॥
ऐसे पाठ करी रामनाम हरी । होतील कामारी रिद्धीसिद्धी ॥२॥
साध्य तेंचि साधीं न करीं उपाधि । जन्मांतरींच्या व्याधि हरती नामें।३
नामा म्हणे सर्व राम हाचि भाव । नाहीं आणिक देव रामेविण॥४॥

(३५) रामनामाच्या ध्वनीचे स्मरण केले असतां अथवा ते शब्द कानानें ऐकले असतां दुष्ट असा अकाल यम पळून जाईल ॥१॥ रामकृष्ण हरि अशा नामाचे पठण केले असतां महा ऋद्धी सिद्धयादिक तुझे दास होतील ॥२॥ जे साध्य तुला सुलभपणे हस्तगत होईल त्याचेच अनुष्ठान कर अन्य दुसरी कोणती उपाधीं करूं नकोस अरे या राम नामाच्या योगें जन्म जन्मांतरीची दु:खे नाहीसी होतात ॥३॥ श्री रामराय हाचपूर्ण भाव असून या श्री रामाशिवाय दुसरा कोणी देव नाहीं असें नामदेवराय म्हणतात. ॥४॥

---

* टिप–नाम हे चि सार नाम हे चि सार । तराल निर्धार श्रुति सांगे कांही प्रतीत हे चरण अधिक आहे.

सर्वाभूतीं हरी आहे आहे साचे । माया जाळ कैंचें भाविकांसी ॥१॥
सर्व ब्रम्ह ऐसें वेद बोले गाढा । ब्रम्हींचा पवाडा अगम्य तो ॥२॥
जाणतां नेणतां हरिनाम उच्चार । मार्ग तो साचार सुफळ सदा॥३॥
नामा म्हणे कारण जिव्हा होय स्मरण । सर्व नारायण हरी दिसे ।४॥

(३६) अखिल प्राणी मात्रामध्यें हरि हाच खरा अविष्कारलेला आहे ज्याचा भाव या श्रीरामनामाच्या ठिकाणी आहे त्याला हो हे मायाजाळ काय स्पर्श करणार आहे ? ॥१॥ सर्व ब्रम्ह आहे असे वेद प्रतिपादन करतो खरा परंतु ब्रह्म वस्तुचे महात्म अगम्य असे आहे ॥२॥ ज्ञानी असो की अज्ञानी असो नामाचा उच्चार करणें हा सर्वांना सारखा व नित्यफल प्रद देणारा खरा मार्ग आहे ॥३॥ जिव्हाला हरिचे स्मरण झाले असतां त्यास सर्वत्र नारायणाची प्रतिती होते असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

जप तप अनुष्ठान हरी । एकचि तो नमस्कारी । भूतद्वेष कदा न करीं । तप सामग्री हेचि तुझी ॥१॥ हरी माधव यादवा । कृष्णा गोविंदा केशवा । येणे करोनिया जीवा । सर्व काळ रंजवी ॥२॥ स्मरतां हरीचें नाम । पळोनि जाती काळयम । तुटती नाना योनि जन्म । गर्भवासा मग नये ॥३॥ नामा जपे नामावळी । अखंड तप हेंचि सदाकाळीं। हरिनामे पिटोनि टाळी। हाचि तरणोपाय सकळांचा॥४॥

(३७) हे नरा हरि हाच तुझें जप, तप, आणि अनुष्ठान होय कोणाहि भूतमात्रा संबंधानें राग द्वेष न करितां सर्वामध्ये एक हरि आहे असे समजून त्यांना नमस्कार कर हीच तुझ्या खऱ्या परमार्थाला योग्य सामुग्री होय ॥१॥ हरी, माधव, यादव, श्रीकृष्ण, गोविंद, आणि केशव, अशा या पवित्र नामाचा वाणीने उच्चार करून सतत आपल्या अंतःकरणाला उल्हासीत कर ॥२॥ हरिचे स्मरण केल्याने कळी काळादिक दूर पळून जातील व अनेक जन्म योनीचा भंग होऊन पुनश्च गर्भवास प्राप्त होणार नाही ॥३॥ नामदेवराय हे अशा या पवित्र नामावळीचा जप करितात आणि हेच चिरकाल तप होय. हातानीं टाळी आणि मुखानें नाम घेणें हाच सकळांना तरण्याकरितां सुलभ उपाय होय ॥४॥

सर्वकाळ हरी जप । हेंचि तपामाजी तप । न लगती घालावे संकल्प । नाना मंत्राचे परीयेसी ॥१॥ मंत्रामाजी मंत्रसार । राम-कृष्ण हा उच्चार । नित्यानित्य निर्विकार । हरी जोडेल साचारें ॥ २ ॥ मागे कृतायुगीं सांगों । त्रेतायुगीं काय ओळगों । द्वापारीं कृष्ण रंगें रंगो । परी कलीमाजी नाम तारक ॥ ३ ॥ नामा म्हणे ग्रंथीं । पाहे पां यथा निगुती । नाम जपतांचि तरती । हें व्यासाचें वचन असें ॥ ४ ॥

(३८) सतत हरिजप करणें हेच तपामध्यें तप होय आणि म्हणून इतर बहुविध मंत्राचे ठायी मनाला वेध लावूं नकोस ॥१॥ राम कृष्ण हरि हा पवित्र नामोच्चार मंत्र सर्व मंत्रामध्यें सार होय अशा या मंत्राचा नित्यानित्य आणि निर्वीकार अंतःकरणानें उच्चार केला असतां निसंग्धपणें हरिची प्राप्ती होईल । २॥ पूर्वीच्या कृतायुगामध्यें कोणती साधनें होती अथवा त्रेतायुगी काय करणें इष्ट होते तसेच द्वापारामध्यें कृष्णाच्या ठायीं प्रेमानें रंगून जात होते हे खरें परंतु या कलीयुगांमध्ये मात्र नाम हेच उद्धारक होय ॥३॥ अनेक ग्रंथाचा शोध केला असतां त्यामध्यें हाच निवाडा मिळेल कीं नामोच्चार केला असतां जीवांना उद्धार होतो व व्यासांनी यालाच पुष्टी दिली आहे असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

नाम वाचे उच्चारितां । हरे संसाराची व्यथा । जाती क्लेषाचिया चळथा । रामकृष्ण उच्चारणीं ॥ १ ॥ हरी माधवे गोविंद । याची नामाचा जया छंद । तोचि पावेल परमानंद । निज भुवन वैकुंठी ॥ २ ॥ जन्म जन्माची तपरासी । तेणें नाम आले मुखासीं । स्मरतां हरी हृषिकेशी । सकळ पूर्वजां उद्धार ॥ ३ ॥ नामा जपे ध्यानीं मनीं । अखंड विठ्ठल हरी कीर्तनीं । तेणें जपें ये मेदिनी कोटी यज्ञ घडेल ॥ ४ ॥

(३९) नामोच्चार केला असतां संसाराच्या दुःखाची निवृत्ती होईल रामकृष्णांचा उच्चार केला असतां दोषांच्या राशी नष्ट होतील ॥१॥ हरि माधव गोविंद या नामाचा ज्यांना छंद लागला आहे त्यास माझे जे श्रेष्ठ पद वैकुंठ भुवन ते प्राप्त होईल ॥२॥ ज्यांचा पूर्वजन्मार्जीत पुण्याचा संग्रह आहे त्यांच्याच मूखांतून नामोच्चार होतो. हृषीकेष हरिचे स्मरण केलें असतां त्याच्या सर्व पुर्वजांचा उद्धार होतो. ॥३॥ नामदेवराय हे आपल्या ध्यानी व मनांमध्यें जप करितात आणि किर्तनामध्यें तर नित्य विठ्ठल नामोच्चार करितात त्या योगें या भूतलावर कोठ्यावधी यज्ञ घडतात ॥४॥

रूपांसीं रूपस नाम हृषिकेश । पंढरी निवास जप करी ॥ १ ॥
विठ्ठल श्रीहरी मुकंद श्रीहरी । नामेंचि बोहरी प्रपंचाची ॥ २ ॥
विठ्ठल नामामृत हेंचि जीवन होत । नाम हें मुखांत केशवाचें ॥३॥
नामा म्हणे देव अमृताचा लाटा । मुखामाजीं पैठा होत नामें ॥ ४ ॥

(४०) सर्व सौंदर्यामध्यें सुंदर असे हृषीकेश नाम आहे अशा पंढरी निवासाचा जप कर ॥ १ ॥ विठ्ठल श्रीहरि मुकुंद मुरारी या नामोच्चारणानें प्रपंच्याच्या दुःखाचा नाश होतो ॥ २ ॥ ज्याच्या मुखामध्यें केशवाचे नाम वसलेले आहे त्याचे जीवन विठ्ठल नामामृत झाले ॥ ३ ॥ देव हा जणूं काय अमृताच्या लाटा असून त्यांनीं नामाच्या रूपाने त्याच्या मुखांमध्यें वास्तव्य केले आहे असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

सर्वांग साजिरीं आहेत इंद्रियें । तंव सावध होय हरी कथे ॥ १ ॥
कीर्तन नर्तन वाचे जनार्दन । न पवसी पतन येरझारीं ॥ २ ॥
पूर्ण मनोरथ घडती एका नामें । दाटेल सप्रेमें जीवन हेतु ॥ ३ ॥
नामा म्हणे विलास न करीं तूं आणिक । सर्वीं सर्वां येक नाम असे ॥४॥

(४१) जोपर्यंत इंद्रियाच्या ठिकाणी पूर्ण शक्ति आहे त्या अवधीतच हरिकिर्तनाचा रंग आत्मसात करा ॥ १ ॥ किर्तनामध्यें प्रेमानें नृत्य करणें आणि वाचेनें नामोच्चार केले असतां तो जन्ममृत्यूच्या चक्रामध्यें केव्हांच

गुंतणार नाहीं ।। २ ।। एका नामोच्चरणानेंच सर्व मनोकामना पूर्ण होतील आणि जिवनाला सुख देणारे प्रेमाचा अविष्कार होईल ।। ३ ।। सर्वांमध्यें श्रेष्ट एक नाम आहे तेव्हां दुसऱ्या कोणत्याहि इतर विलासामध्यें-छंदामध्यें असक्त होऊं नकोस असे नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

ऐकतां कीर्तन होती जीवन्मुक्त । दाविसी अनंत नाममात्रें ।।१।।
मृत्युलोकीं जो जन्म इच्छी नर । त्याच्या पुण्यापार कोणवाणी ।।२।।
भक्तिसारामृत श्रेष्ठ कलियुगीं । उद्धरिले योगी ब्रम्हादिक ।।३।।
नामा म्हणे मज नाहीं चिंता भय । हृदयी तुमचे पाय पुरे आतां ।।४।।

(४२) किर्तन ऐकणाऱ्या जीवांना जिवन्मुक्तता प्राप्त होते किंबहुना नामोच्चार करितांच प्रत्यक्ष देवराय दर्शन देतात ।। १ ।। मृत्युलोकीं आपणांस जन्म व्हावा अशी इच्छा करणाऱ्या पुरुषाच्या पुण्याईस गणती करतां येणार नाहीं ते अमाप होय ।। २ ।। या कलियुगांमध्यें भक्ती सारामृत हेंच श्रेष्ट होय त्यायोगेच महान योगी पुरुषांचा आणि ब्रम्हादिक देवतांचा उद्धार झाला ।। ३ ।। आतां मला कोणाची भीती अथवा कसलीहि चिंता नाहीं केवळ तुमचे पाय माझ्या हृदयीं असावे असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

कीर्तनाच्या सुखें सुखी होतो देव । कोणतें वैभव वाणूं आतां ।।१।।
अंत्यज आणि जातिवंता । मुखीं नाम घेतां उडी घाली ।।२।।
बैसोनी आसनीं आळवितां नाम । उभा सर्वोत्तम तयापुढें ।।३।।
प्रेमाचिया भरें उभ्यानें गर्जतां । नाचे हा अनंत तयासवें ।।४।।
नामा म्हणे तया कीर्तनाची गोडी । घालीतसे उडी नेटेंपाटें ।।५।।

(४३) देवराय हेहि किर्तनाच्या योगें आनंदित होतात तेथें आतां अन्य वैभवाचे काय गौरत्व आहे ? ।।१।। अंत्यज असो कां वर्ण श्रेष्ठ असो त्यांच्या मुखांतून नामोच्चार होतांच देवराय धांवत येतात ।।२।। शांत आसनावर बसून देवरायाची प्रार्थना केली असतां ते त्याच्या सन्मुख उभे रहातात ।। ३ ।। प्रेमोल्हासित अंत:करणानें उभे उभेच देवरायाच्या नामाची गर्जना केली असतां देवराय हे त्याच्या पुढें आनंदानें नाचतात ।। ४ ।। या देवरायाच्या ठायीं किर्तनाविषयीं अलोट प्रेम होण्यानें तो त्वरीत धांवत येतो असें नामदेवराय म्हणतात ।।५।।

काळ वेळ नसे नामसंकीर्तनीं । उंचनीच योनी हें हि नसे ॥१॥
धरा नाम कंठीं सदा सर्वकाळ । मग तो गोपाळ सांभाळील ॥२॥
कृपाळू कोंवसा सुखाचा सागर । करील उद्धार भाविकांसी ॥३॥
नामा म्हणे फार सोपें हें साधन। वाचे नाम घेणें इतुकेची ॥४॥

(४४) नामस्मरण करण्याकरितां काळवेळेचे बंधन नाहींच नाहीं परंतु श्रेष्ठ कनिष्ठ अशा योनीच्या जन्माची आडकाठीं नाहीं ॥१॥ मात्र तुम्ही आपल्या कंठामध्यें नित्यशा नामस्मरण ठेंवा म्हणजे तो गोपाळ तुमचे सर्व प्रकारे संरक्षण करील ॥ २ ॥ हा आमचा देवराय कृपेनें मृदू आणि जणूं काय सुखाचा सागरच होय असा होण्यानें तो भाविकांचा उद्धार निसंशय करिल ॥ ३ ॥ वाणीनें फक्त नाम घेणें असें हें सुलभ साधन आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

गीता हेंचि गंगा गुह्यभाव पै गा। नाम हेंचि जगा सोडवण ॥१॥
सर्व ब्रह्म हरी सांगतसे मुरारी। विश्वरूप श्रीहरी आपण झाला ॥२॥
उपदेश अर्जुना जनीं जनार्दना । अखंड भावना भूतदया ॥३॥
नामा म्हणे सर्व आहे हाचि देव । उदार माधव सर्वाभूतीं ॥४॥

(४५) गीता ही पवित्र गंगा स्वरुप आणि गुह्य भाव व्यक्त करणारी खरी परंतु जनतेला दुःखातून मुक्त होण्याकरितां नाम हे सुगम साधन होय ॥ १ ॥ ह्या अखिल विश्वरूपानें एक हरिब्रम्ह अविष्कारलेले आहे असें श्रीकृष्ण सांगतात. श्री हरिनेच हे विश्वरुप धारण केले आहे ॥२॥ जनामध्यें एक जनार्धनच नटला आहे अशी भावना करा आणि भूत मात्रा संबंधी दया ठेवा असा अर्जुनास श्रीकृष्णानें उपदेश केला आहे ॥३॥ हे जे दृश्य प्रचित होते तद्रुपानें एक हरिच अविष्करलेला आहे. माधव हाच सर्व भूतमात्रासंबंधी उदार आहे असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

नामाचें चरित्र सदा अतिगोड । तीर्थें काय चाड नाम मात्रें ॥१॥
ऐसा दृढमनीं करावा विचार । नाम परिकर कलियुगीं ॥२॥
नामा म्हणे नाम अनादि अक्षर । उभा कटीं कर भक्तांसाठीं ॥३॥

(४६) नामाचे चरित्र पहातां नित्यशः रसमय आहे या नामाच्या माहात्म्या पुढें तिर्थांची काय किंमत आहे ? ॥१॥ या कालियुगामध्यें नाम हेंच परिकर (सिद्ध) आहे असा मनांमध्यें दृढ निश्चय करावा ॥२॥ नाम हेंच अनादि आणि अविनाशी असें असून तेच भक्ताकरितां कटीवर हात ठेऊन विटेवर उभे आहे असें नामदेवराय म्हणतात ॥३॥

अनंत जन्में मेळ मेळवितां दुर्लभ । तो प्राणवल्लभ शंकराचा ॥१॥
वेदशास्त्र मंथुनी काढियेलें पैं सार । ब्रह्मादिका पार रामनामें ॥२॥
स्वर्गीचे ते देव चिंतिताती मनीं । एकवेळां क्षणीं भेटी देईं ॥३॥
नामा म्हणे केशव नाम उच्चारितां । विघ्नासी भंगिता नवल काय ॥४

(४७) अनेक जन्म घेतलें असतांहि ज्याची प्राप्ती होत नाहीं असा जो तो शंकराचा प्रिय सखा होय ॥१॥ रामनामाच्या योगें ब्रम्हादिक देवतांहि तरल्या गेल्या असें वेदशास्त्राचे मंथन करून सार निष्पन्न केलें ॥२॥ हे देवराया तुम्ही आम्हाला एक वेळ तरि भेट द्यावी असें स्वर्गादिक देवता ह्या रात्रंदिवस मनांमध्यें चिंतन करितात ॥३॥ केशवरायाचे नामोच्चार केल्यानें अनेक विघ्नांचा नाश होतो यांत काय आश्चर्य आहे ? असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

विठ्ठलाचें नाम जे माउलीचे ओंठीं । विठो तिचे पोटीं गर्भवासी ॥१
जयाचिये कुळीं पंढरीची वारी । विठो त्याचे घरीं बाळलीला ॥२॥
नामा म्हणे जिव्हे काढीन मी रवा । असत्य केशवा वचन होता ॥३॥

(४८) ज्या माऊलीच्या मुखानें विठ्ठल नाम प्रेमानें उच्चारण होत आहे तिच्या उदरी विठ्ठलराय जन्म घेतात ॥ १ ॥ ज्यांच्या कुळामध्यें

विठ्ठलाची वारी आहे विठ्ठलराय हे त्यांच्या घरीं बाळ क्रिडा करितात ।।२।। जर माझ्या ह्या भाषणांमध्यें असत्यता असेल तर मी माझी जिव्हा दुःखंड करील असें नामदेवराय ह्मणतात ।।३।।

अनंत ब्रम्हांडें व्यापक तें नाम । अनादि निष्काम विश्वंभर ।।१।।
तोचि कृष्ण परब्रम्ह द्वारकेसी । पांडवा मानसीं ठसावला ।।२।।
ठसावला तोचि पाहावा अनुभव । पांचालागीं ठाव मग कैचा।।३।।
नामदेव म्हणे संपूर्ण आघवा । नामाचिया गांवा सींव नाहीं ।।४।।

(४९) नाम हे अनंत ब्रह्मांडापेक्षांहि श्रेष्ठ आहे आणि ते अनादि असे निष्कामरूपानें विश्वंभर आहे ।।१।। तेंच द्वारकेचे कृष्ण परब्रम्ह असून पांडवाच्या मनामध्यें स्थित झालें आहे ।।२।। प्रतितीनें पाहिले असतां तेंच पूर्णपणें स्थित होण्यानें तेथें पांचाचें अस्तित्व कसें राहणार ? ।।३।। तोच सर्वत्र व्यापक होण्यानें या नामाच्या गांवामध्यें द्वैताचा संपर्क नाहीं असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

ज्ञान व्हावें आधीं ओळखावें नांवा । मग जावें गांवा तयाचिया।।१।।
या नामीचें मूळ त्या माजी जो धाला । प्रपंचाचा घाला मग नाही।२
नाम गावें सर्व प्रपंच हे नाम । ब्रम्हानंदें प्रेम घनदाट ।।३।।
नामदेव म्हणे नंदचिया घरीं । होता एक हरि दुजें नाम ।।४।।

(५०) ज्या वस्तुचा आपणांस बोध व्हावा अशी अपेक्षा आहे प्रथमतां त्याच्या नामाची ओळख व्हावीं लागते नंतर त्याच्या गांवीं जाणें सुफळ होय ।। १ ।। जो नामाच्या मूळ स्वरूपानें पूर्ण तृप्त झाला आहे त्याच्यावर प्रपंचाचा आघात केव्हांही होत नाहीं ।। २ ।। सर्व प्रपंच रूपानें नामच अविस्करलेले आहे आणि म्हणून नामाचे गान करावे त्या योगें ब्रह्मानंद हा पूर्ण प्रेमानें अविष्कारला जातो ।।३ ।। या नंदाच्या घरांमध्यें एक हरि होता व दुसरे हें नाम होय असें नामदेवराय म्हणतात. ।। ४ ।।

साधनांत सोपें नाम हें केवळ । यावीण सकळ शीण वाम्यां ॥१॥
धरारे धरा नाम विठोबाचें । तेणें अज्ञानाचें मूळ नासे ॥२॥
नाम तारी फार पुराणीं वर्णिलें । नामचि केवळ आत्मसत्ता ॥३॥
नामा म्हणे नामीं रंगला सुरंग । अंगें स्वयमेव पांडुरंग ॥४॥

(५१) सर्व साधनांमध्यें नाम हेच सुलभ असें साधन होय याहून इतर साधनेंहीं केवळ भारवाही होत ॥ १ ॥ आणि म्हणून विठ्ठल नामाचा आश्रय करा ज्याच्या योगें अज्ञानाचे मूळच नाहीसे होईल ॥ २ ॥ नाम हेंच भवपार उतरविणारे साधन होय असें सर्व पुराणांमध्यें वर्णन केलें आहे इतकेच नव्हें तर नाम हेंच आत्मसत्ता होय ॥ ३ ॥ जो कोणी नामरंगामध्यें तल्लीन होतो तो अंगानेच स्वतः पांडुरंग स्वरुपानें उपलब्द होतो असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

एकट येकला सर्व हें सकळां । आपणची झाला विश्व हरी ॥१॥
न कळे याची माव कैसा आहे भाव । सर्वभूतीं देव गीता सांगे।२
भूतदया धरा भजावें श्रीधरा । नाम एक स्मरा विठ्ठल ऐसें ॥३॥
नामा म्हणे देव पंढरीं पाटणीं । पावेल निर्वाणी नाम घेतां ॥४॥

(५२) हरि हा एकला एकटा आहे खरा परंतु तो स्वयंम् या विश्वरूपानें उपलब्ध झाला आहे ॥१॥ त्याची लीला अगाध असून त्याचा प्रेम भाव अलोलीक होण्यानें तो अगम्य आहे. देव हा सर्व भूत मात्रामध्यें स्थित आहे असें गीता शास्त्र प्रतिपादन करिते ॥ २ ॥ भूतमात्रा संबंधी दया धारण करा आणि श्री हरीचे भजन करा व एका विठ्ठलरायाच्या नामाचे स्मरण करा ॥३॥ हा आमचा देव पंढरी निवासी असून त्याचे नाम घेतांच तो सर्व संकटांतून मुक्त करितो असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

जीव शिव ग्रामीं मी तूं पण पाही । हा गौरव कांहीं नाहीं नामीं ।१
नाहीं चतुर देह तुर्या हे उन्मनीं । स्वयंभु ते खाणी निजनामाची॥२॥
नामीं जडे चित्त तेथें काय उणें । लज्जित साधनें नानाजाहाली ।३
नामा म्हणे नामीं नाहीं मी तूं पण । कांहीं नाहीं आन सर्व तेंची ॥४॥

(५३) जिवाच्या व शिवाच्या स्वरूपी मी व तूं पणाची प्रतीती होते खरी परंतु नामाच्या ठिकाणी हा भेद भाव नसतो ॥१॥ या स्वयं नामाच्या ठिकाणीं ते चार देह तसेंच तूर्या व उन्मनी ह्याही अवस्था नाहींत ॥२॥ ज्याचे चित्त नामाच्या ठायी सलंग्न झाले आहे त्याला कोणत्याहि प्रकारची न्यूनता नसते इतकेच नव्हें तर या ऐश्वर्यापुढें इतरें साधनें ही लज्जायमान होतात ॥३॥ या नामाच्या ठायीं मी तूं पणाचा संसर्ग नसतो. आणि तो सर्वत्र होण्यानें त्याच्या शिवाय दुसरें कांहींच नाहीं असें नामदेवराय म्हणतात॥४॥

पवित्र परिकर नाम हा उच्चार । उद्धरण साचार जगा यया ॥१॥
गोविंद केशव उच्चारी श्रीराम । न लगती नेम अमूप जप ॥२॥
तें हें विठ्ठल रूप पिकलें पंढरीं । नाम चराचरीं विठ्ठल ऐसें ॥३॥
नामा म्हणे विठ्ठल सर्वात सखोल । उच्चारितां मोल न लगे तुज ॥४॥

(५४) या जगांमध्यें तरून जाण्याकरितां पवित्रांत पवित्र असें नामाचे उच्चारण करणें हे मुख्य साधन होय ॥१॥ गोविंद केशव श्रीरामाचा उच्चार करणें हेंच कर्तव्य होय. इतर जी साधनें नियम किंवा पुष्कळ प्रकारच्या जपाची अवश्यकता नाही ॥२॥ ते सुंदर रूप पंढरीमध्यें उपलब्ध झाले आहे आणि विठ्ठल नाम हे चराचरामध्यें दरवळलेलें आहे ॥३॥ नाम हे अति सखोल खरे परंतु त्याचा उच्चार करण्या करितां कांहींच मोल द्यावे लागत नाहीं असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

आकारिक नाम जीवानें ठेवलें । शिवानें तें केलें निर्विकल्प ॥१॥
जीव शिव दोन्हीं विराले ज्यामाजी । तें नाम सहजी आद्य आहे॥२
तया नामाविण जावयासी ठाव । नाहीं दुजा भाव तिळभरी ॥३॥
नामा म्हणे जंव नाम घनदाट । प्रपंचाचा घोट नाम करी ॥४॥

(५५) या जीवानें आपल्या कल्पनेनें या देवरायास अनेक प्रकार अथवा नामें दिलीत हें खरें परंतु या शीवाने त्यास निर्विकल्प स्थित केलें ॥१॥ ज्या नामामध्यें जीव-शिव हे समरस होतात असें हें 'नाम सहज' च सर्वांच्या आदि आहे ॥२॥ अशा या नामा शिवाय इतरत्र जाण्याकरिता जागा नाहीं कारण त्याच्यामध्यें किंचित हि द्वैत नाहीं ॥३॥ तुम्ही या नामाचे पूर्णपणानें जप करा म्हणजे ते ब्रम्हांडाचें प्राशन करिल असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

कृष्ण नाम श्रेष्ठ गाती देवऋषी । नाम अर्हनिशीं गोपाळाचे ॥१॥
हरी हरी हरी तूंचि बा श्रीहरी । वसे चराचरीं जनार्दन ॥२॥
आदि ब्रम्हा हरि आळवी त्रिपुरारीं । उमे प्रति करी उपदेश ॥३॥
नामा म्हणे राम हा जप उत्तम । शंकरासी नेम दिननिशीं ॥४॥

(५६) देवऋषी इत्यादि या श्रेष्ठकृष्ण नामाचे गान करितात गोपालाचे तर हे नाम सतत ध्यान आहे ॥१॥ बा श्री हरि तूंच श्री आहेस असे त्रिवार सांगतो आणि तूंच जनार्धन रुपानें या चराचरामध्यें व्याप्त आहेस ॥२॥ आदि जो ब्रह्म हरि याचा उच्चार कर असा उपदेश शंकर हे पार्वतीला करितात ॥३॥

भजन करारे हरि हरा । नारायण शिवशंकरा । माझें बोलणें अवधारा । भेद न करा दोघांचा ॥१॥ तुम्हांसी सांगेन ' सत्य वृत्तांत । पाहे पां तेथींचा दृष्टांत । नारायणें सेविलें अमृत । झाला श्वेत महादेव ॥२॥ शंभूनें गिळिलें हलहला । म्हणोनि विष्णु झाला निळा । देखत देखत आंधळा । झणीं होसी गव्हारा ॥३॥ लक्ष्मीरूपें आपण हरू । देवें वरिला शारंगधरू । गरूडरूपे महेश्वरू । वाहन झाला विष्णूचें ॥४॥ शक्तिरूपें शारंगपाणी । नारायण झाला भवानी । शारंगधर नंदी होऊनि । सन्मुखासनीं बैसला ॥५॥ एक तो एका वेगळा नाहीं । दृष्टांत तूं आगमीं पाहीं । नामा म्हणे एक केशव ध्यायीं । हरिहर पाहीं ज्याचे अवतार ॥६॥

(५७) अहो जीवांनो तुम्ही हरिहराचे व तसेच नारायण शिवशंकराचे भजन करा तुम्ही यांच्यामध्ये फुटीवृत्ती करूं नका हे माझे अत्याग्रहाचे सांगणें आहे तें तुम्हीं ऐका ॥१॥ तुम्हाला आतां मी घडलेला सत्यप्रकार सांगत आहे. नारायणानें अमृत सेवन केलें खरें परंतु तो शुभ्र न होतां त्याचे ध्यान शंकरानें केलें ह्मणून तो शुभ्र झाला ॥२॥ शंकराने विषाचे प्राशन केले खरे परंतु त्याचे ध्यान विष्णुनें केल्याने तो नीलवर्णाचा झाला ही प्रत्यक्ष गोष्ट घडली असतां मूर्खा कां अंधळा झाला आहेस ॥३॥ हर हाच होऊन त्यांनी शारंगधर जो देव त्यालां वरले शंकरानें गरुडरुप धारण केले आणि तो विष्णुचे वाहन झाला ॥४॥ हा सारंगपाणी नारायण शक्तिचया रूपाने भवानी झाला व शारंगधर हा नंदी होऊन शंकराच्या सन्मुख बसला ॥५॥ आणि म्हणून शंकर आणि विष्णु हे परस्परांमध्यें भिन्न नाहींत आणि ही सत्यकथा पुराणामध्यें ग्रंथीत केलेली आहे तेव्हां हरिहराचा असलेला अवतार जो केशवराय त्याचे ध्यान करा असें नामदेवराय म्हणतात

म्हणतां नाम वाचे वैकुंठ जवळी । नित्य वनमाळी भक्तांसंगें ॥१॥
होईल साधन विठ्ठलीं परिपूर्ण । निवती नयन मूर्ति पाहतां ॥२॥
शंख चक्रांकित आयुधें शोभती । भाग्योदयीं दिसती भावशीळा ॥३॥
नामा म्हणे ते रूप पंढरीस आहे । न सांडी ते सोय केशवाची ॥४॥

(५८) वाणीनें नामोच्चार केला असतां वैकुंठ हे तर त्यांच्या जवळ होय हा वनमाळी भक्ता करितां सतत तिष्टत असतो ॥१॥ विठ्ठलरायाच्या योगे सर्व साधनाची पूर्तता होते आणि त्याची मूर्ती पहातांच नेत्र तृप्त होतात ॥२॥ जो शंख चक्रादिक आयुधांच्या योंगे शोभायमान आहे. असा तो भाव शिळांना पूर्व भाग्याच्या योगे प्राप्त होतो ॥३॥. अशा प्रकारचें गोजीरे स्वरूप पंढरीस तिष्टत आहे म्हणून 'तुम्ही केशवाचा आश्रय सोडूं नका असें नामदेवराय म्हणतात. ॥४॥

आपुली पदवी सेवकासी द्यावी । तो एक गोसावी पांडुरंग ॥१॥
भावाचा आळुका भुलला भक्तिसुखा । सांपडला फुका नामासाठीं ॥२॥
प्रेमाचा जिव्हाळा नामाची आवडी । क्षण एक न सोडी संग त्याचा ॥३॥
नामा म्हणे आम्हां दीनाचें माहेर । तो एक उदार पांडुरंग ॥४॥

(५९) आपल्या दासानां स्वपद देण्याचें मर्म हा पांडुरंग स्वामीच जाणत आहे ॥१॥ हा भावाच्या योगे भक्ति सुखाला लुब्ध होण्यानें तो केवळ नामाच्या योगे मोफत प्राप्त झाला ॥२॥ प्रेमाच्या जिव्हाळ्यानें आणि नामाच्या आवडीनें त्याचा एक क्षणहि वियोग होऊं देऊं नका ॥३॥ हा उदार पांडुरंगराय आम्हां सारख्या दीनांचे माहेरघर होय असें नामदेवराय ह्मणतात ॥४॥

सोयरा सुखाचा विसांवा भक्तांचा। विठोबा निजाचा मायबाप ॥१॥
कृपाळु दीनाचा बडिवार नामाचा। तोडर ब्रीदाचा शोभे तया ॥२॥
काया वाचा मनें संग धरा त्याचा। अनंत जन्मींचा हरेल शीण ॥३॥
नामा म्हणे विठो अनाथां कोवसा। तारिल भरवंसा आहे मज ॥४॥

(६०) सुखाचा सन्मित्र आणि भक्तांचे विश्रांती स्थळ असा हा आमचा मायबाप विठ्ठलराय होय ॥१॥ दिनावर कृपा करणारा आणि नामाच्या पराक्रमाची बढाई करणारा अशा ब्रीदाची तोडे याला शोभा देत आहे ॥२॥ काया वाणी आणि मनानें या विठ्ठलरायाची संगत करा ज्याच्या योगें अनंत जन्माच्या दुःखाचा परिहार होईल ॥३॥ हा विठ्ठलराय अनाधार असलेल्या जीवांचे संरक्षण करील असा माझा पूर्ण विश्वास आहे असें नामदेवराय ह्मणतात ॥४॥

देव दयानिधि भक्तांचा कैवारी। नाममात्रें तारी सर्वांलागीं ॥१॥
तया देवराया गावें हों आवडी। लागे मनीं गोडी सर्वकाळ ॥२॥
नाही यातिकूळ उंचनीच भेद। भाव एक शुद्ध पाहतसे ॥३॥
नामा म्हणे काय सांगावें नवल। अखंड दंडलें व्योमाकार ॥४॥

(६१) हा देवराय दयेचा खजिना असून भक्तांचा तर पाठीराखा आहे तो केवळ नामाच्या उच्चारणानें सर्वांना तारतो ॥१॥ अशा या देवरायाचे गुणगान प्रेमानें करा ज्याच्या योगें नित्यशा त्याची चटक मनाला लागेल ॥२॥ जाती कुळ आणि उंचनिचपणा इत्यादिक बाह्यांगाकडे तो दुर्लक्ष करितो. तो फक्त जीवाच्या अंतःकरणांतील शुद्धभावाकडे पहातो ॥ ३ ॥ काय हो या देवरायाचा नवलाव सांगावा तो खरोखर आकाशाप्रमाणें सर्वत्र व्याप्त झाला आहे असें नामदेवराय ह्मणतात ॥ ४ ।

नाम फुकाचें चोखट । नाम घेतां नलगे कष्ट ॥ १ ॥
पडशील ज्या सागरी । रामनामें आत्मा तारी ॥ २ ॥
पुत्रभावें स्मरण केलें ॥ तया वैकुंठासी नेले ॥ ३ ॥
नामा हें महिमान जाणे । घेतो विठ्ठलाची आण ॥ ४ ॥

(६२) शुद्ध असे नाम हें मोफत असून तें नाम घेतानां कोणत्याहि प्रकारचे कष्ट लागत नाहीं ॥ १ ॥ तूं या भवसागरांत गटांगळया खात आहेस खरा परंतु या रामनामाच्या योगेंच तुझ्या आत्म्याचा उद्धार होईल ॥ २ ॥ अजामिळानें केवळ पुत्र प्रेमानें नामोच्चार केले परंतु त्यांनीं त्यास वैकुंठांत नेलें ॥ ३ ॥ विठ्ठलाचे महात्म नामदेवच जाणत आहेत असें विठ्ठल रायाची शपथ घेऊन सांगतो ॥ ४ ॥

साधावया स्वरूप सिद्धी । सिद्ध साधका समाधीं । बैसोनीयां ध्यान सिद्धीं । परी तो हरी न सांपडे ॥१॥ धन्य धन्य वैष्णव संग । अखंड तेथें पांडुरंग । कीर्तनीं नाचतसे अभंग । अखंड काळ सर्वदा ॥२॥ नाम घेतां धांवे विठ्ठल । नलगे तप नलगे मोल । कष्ट न लगती बहुसाल । हा कृपाळु दीनाचा ॥३॥ नामा म्हणे भक्ती कारण । भक्तीनें तुष्टे नारायण । याचें करितां कीर्तन । आपेंआप तुष्टेल ॥४॥

(६३) स्वरूप सिद्धी साध्य होण्याकरितां सिद्ध व साधक हे ध्यानावस्थेनें समाधींत बसतात खरें तथापि त्यांना हा हरि हस्तगत होत नाहीं ॥१॥ तथापि वैष्णवाचा सहवास हा धन्य धन्य होय कारण त्यांच्या किर्तना मध्यें पांडुरंगराय हे नित्यशः राहून सर्वकाळ प्रेमानें नाचत असतात ॥ २ ॥ हा विठ्ठलराय दीनाचा कृपाळू होण्याने तो नामोच्चार करितांच धांवत येतो. त्याकरिता तप करण्याची किंवा कांही किंमत देण्याची आवश्यकता नाहीं. तसेंच पुष्कळ कष्ट करण्याची जरुरी नाहीं ॥ ३ ॥ येथें भक्तो हीच समर्थ आहे. नारायण हा भक्तीच्या योगे तृप्त होणारा आहे. याचे किर्तन केले असतां तो सहज संतुष्टीत होतो. असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

दया हेचि दाता मन करी उदार । सर्व हा श्रीधर ऐसें भावी ॥१॥
तुटेल यातना होईल वैकुंठ । पंढरी मूळपीठ सेवी कां रे ॥२॥
इच्छिती अमर नित्य काळ नेमें । दाटतिस प्रेम सनकादिक ॥३॥
तें हें विठ्ठलनाम पवित्र चोखडे । अंतरामाजी चढे नित्य करी ॥४॥
होतील कामारि ऋद्धिसिद्धि अपार । आपण श्रीधर कुरवाळील ॥५॥
नामा म्हणे येथें नलगेची मोल । विठ्ठल निमोल सर्वांभूतीं ॥६॥

(६४) मनाला उदार कर, दातृत्व दयेनें कर, हे सर्व दृश्य हरीरूप आहे अशी भावना ठेव ॥ १ ॥ त्या योगें सर्व दुःखें नष्ट होतील. तेव्हां मूळपीठ जी भू वैकुंठ पंढरी तिची सेवा कर ॥ २ ॥ स्वर्गांतील देवता ह्या तर नित्य नियमानें हीच इच्छा करितात आणि सनकादिक हे तर प्रेमानें उल्हासीत होतात ॥३॥ असें या शुद्ध विठ्ठलनामाचा अंतःकरणांत सतत अविष्कार होईल असें कर ॥ ४ ॥ त्यायोगें अष्ट महा सिद्धी ह्या तुझे दास्यत्व करतील किंबहुना श्रीहरि हा आपण होऊन प्रेमाने तुला आलिंगन देईल ॥ ५ ॥ अशा या साधनाला कांही खर्च करावा लागत नाही कारण सर्वांतरी विठ्ठलराय हा वास्तव्य करित आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

पोसीशी शरीर इंद्रियांचा बांधा । सेवी ते आपदा करील तुज ॥ १ ॥
नव्हे तुझें हित विषय पोषितां । हरी हरी म्हणतां उद्धरसी ॥ २ ॥
वायांचि पाल्हाळ चरित्र सांगसी । परी राम हें न म्हणसी अरे मूढा ॥३॥
नामा म्हणे हेंचि पंढरीये निधान । उच्चारितां जाण तरले ऐसे ॥४॥

(६५) अरे मूर्खा शरीर व इंद्रियाचे चोंचले पूर्ण करण्यांत तूं जो आपले अमोलीक आयुष्य खर्च करित आहेस ती तुला शेवटी दगा देतील ॥ १ ॥ विषय सेवन करण्यांत तुझा कोणतांच फायदा होणार नाहीं फक्त हरि हरि या नामोच्चारणानेच तुझें कल्याण होणार आहे ॥ २ ॥ व्यर्थ तूं कां आपल्या चरित्राचें गुणानुवादांत आयुष्य खर्च करित आहेस आणि तारक जो श्रीराम त्याचे नाम घेण्याकडे दुर्लक्ष करतोस ॥ ३ ॥ हाच पंढरीचा ठेवा होय याचा उच्चार करण्यानें अनेक जीवाचा उद्धार झाला आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

कां करीसी हव्यास इंद्रियांचा सोस । वांयां कासावीस कोण्या काजें ।१
सर्व हे ल्टिके माया मोहबंधन । सत्य हें निधान विठ्ठल एक ॥ २ ॥
उगवेल प्रपंच सर्व हें आहाचें । रामकृष्ण वाचे बांध जिव्हे ॥ ३ ॥
नामा म्हणे करणी करावी पैं ऐसी । जेणें त्या विठ्ठलासी पाविजेती ।४

(६६) तूं इंद्रीय तंत्र होऊन कां हव्यास करित आहेस आणि काय कारणास्तव व्यर्थ कासावीस होत आहेस ॥१॥ अरे ही माया व मोह बंधनादिक सर्व मिथ्या आहेत. विठ्ठलाचे नाम मात्र खरा ठेवा आहे ॥२॥ जिव्हेनें रामकृष्ण नामाचा सतत उच्चार केला कीं हा सर्व सामान्य प्रपंच नष्ट होईल ॥३॥ अशा प्रकारची कृति करावीं कीं ज्या योगे विठ्ठलरायाची प्राप्ति होईल असें नामदेवराय ह्मणतात ॥४॥

नामाचा महिमा कोण करी सीमा । जपा श्रीरामा एक्याभावें ॥१॥
न लगती स्तोत्रें नाना मंत्र तंत्रें । वर्णिजे तें वक्त्रें श्रीराम नाम ॥२॥
अनंत पुण्य घडे ज्या प्राणीयासी । तरीच मुखासी नाम येत ॥३॥
नामा म्हणे राम हा जप परम । तो देह उत्तम मृत्युलोकीं ॥४॥

(६७) नामाच्या महात्म्याचे कोण हो सिमा करिल ? आणि ह्मणून एक निष्टेनें श्रीरामाचे भजन करा ॥१॥ श्रीराम नामाचा उच्चार मुखानें केला असतां अन्य असलेली साधनें जी स्तोत्र मंत्रादिक त्याची कांहीच आवश्यकता नाहीं ॥२॥ ज्याच्या ठिकाणीं अनंत पुण्याचा सांठा संग्रह आहे त्याच्याच मुखातून नामोच्चार होतो ॥३॥ रामाचा जप हाच श्रेष्ठ आहे व त्याचा जो जप करितो त्याचा देह या मृत्युलोकी पवित्र ठरतो असे नामदेवराय ह्मणतात ॥४॥

कांसवीचे दृष्टीं जैं होईजे भेटी । तें अमृताची सृष्टी घडे त्यासी ॥१
तैसें हें भजन श्रीरामाचें ध्यान । वाचे नारायण अमृतमय ॥२॥
धन्य त्याचें कुळ सदा पैं सकळ । दिननिशीं पळ राम नाम ॥३॥
नामा म्हणे धोंखडा भक्त तो उत्तम । वाचेसी सुगम रामनाम ॥४॥

(६८) कांसवीच्या दृष्टिचा योग कां झाला त्याला सर्व सृष्टि अमृतरूप होते ॥१॥ अमृतरूप असलेले नारायणाचे नाम ज्याच्या वाचेने होते त्याचे भजन व श्रीरामाचें ध्यान हें अमृतरूप होते ॥२॥ नित्यशः ज्याच्या मुखांतून राम नामोच्चार होतो त्याचे कुळ अखंड पवित्र होय ॥३॥ ज्याच्या मुखानें सुलभ जे श्रीराम नाम उचार होतो तो शुद्ध असा उत्तम भक्त होय असे नामदेवराय ह्मणतात ॥४॥

मी माझे भावितां न फिटे हे ओझे । कर्मकांड तुझे आड येत ॥१॥
न तुटे हें कर्म न चले हा धर्म । सर्वत्र हें ब्रह्म न कळे तया ॥२॥
मी माझें हें ओझें अहंताची वाहे । परतोनि न पाहें मी कवण ॥३

(६९) मी माझें अशा या चक्रांत गुंतले असतां हा संसाराचा भार केव्हांहि दूर होणार नाहीं, मात्र त्या योगें दुसरेच कर्मकांडाची अडगळ पुढें उभी राहते ॥१॥ त्यांचो कर्मबंधनें ही नष्ट होत नाहींत व धर्माचें अस्तीत्व हि रहात नाहीं आणि सर्वत्र ब्रम्ह वस्तुचे वास्तव्य आहे हे हि त्यास उमगत नाहीं ॥२॥ केवळ अहंकाराला बळी पडल्यानेच मी माझें याचे ओझें वाहत आहे परंतु ते अंतर्मुख होऊन मी कोण आहे याची जाणीव करून घेत नाहींत असे नामदेवराय म्हणतात.

उपदेश विठ्ठळ न कळे याचा अर्थ । वायांची हा स्वार्थ प्रपंचाचा ॥१
सांडी हा प्रपंच मिथ्या लावला हो । विठ्ठल हा टाहो नित्यकरी ॥२
हरी हरी भजन भज दयासीळ । होसींल निखीळ ब्रम्हरूप ॥३॥
सर्व हा आकार हरीचें शरीर । मायेचा विकार भुलों नका ॥४॥
आप तेजीं ब्रम्ह हरीं माझा सम । आदि अंतीं नेम विठ्ठल हरी ॥५
नामा म्हणे उपमा काय द्यावो यासी । नाम तारी सर्वांसी कलिमाजीं ॥६॥

(७०) प्रापंचिक स्वार्थ हा व्यर्थ होय असा उपदेश केला जातो खरा, परंतु त्याचा अर्थ मात्र जाणत नाहींत. ॥१॥ तूं या मिथ्या प्रपंचाचा त्याग कर आणि विठ्ठल नामाचा सतत घोष कर ॥२॥ पवित्र प्रेमळ अंतःकरणानें हरि, हरि असे भजन कर त्या योगें तूं शुद्ध ब्रम्ह स्वरूप होशील ॥३॥

हे दृश्याकार पदार्थ केवळ हरीचे शरिर होय तेव्हां या मायेच्या विकृत स्वरुपाला पाहून लुब्ध होऊं नकोस ॥४॥ जल व अग्नि यामध्यें ब्रम्हरूप हरि समरूप आहे आणि म्हणून हरिचाच नियम आदिं अंति कर ॥५॥ नाम. हेच या कलियुगामध्यें सर्वांना तारक आहे तेव्हां त्यास दुसरी कोणती उपमा द्यावी ? असे नामदेवराय म्हणतात ॥६॥

धिग् धिग् तो ग्राम धिग् धिग् तो आश्रम । संत समागम जेथे नाहीं ।१
धिग् धिग् ते संपत्ति धिग् धिग् ते संतति । भजन सर्वांभूतीं नाहीं जेथें ॥२॥
धिग् तो आचार धिग् तो विचार । वाचे सर्वेश्वर नाहीं जेथें ॥३
धिग् तो वक्ता धिग् तो श्रोता । पाडुरंग कथा नाहीं जेथें ॥४॥
धिग् तें गाणें धिग् तें पढणें । विठ्ठल नाम * बोलणे नाहीं जेथें ॥५॥
नामा म्हणे धिग् धिग् त्यांचें जिणें । एका नारायणें वाचूनिया ॥६

(७१) ज्या ठिकाणीं संतसमागम नाहीं अशा गांवाचा व आश्रमाचा धिःकार असो असे द्विरुक्तीनें सांगतो ॥१॥ ज्या ठिकाणीं सर्वभूतमात्रामध्यें भजन प्रेम नाही अशाच्या संपत्तीचा आणि संगतीचा धिक्कार असो असे द्विरुक्तीनें सांगतो ॥२॥ जेथें वाणीनें सर्वेश्वराचा उच्चार होत नाहीं तेथील आचार विचाराचा धिक्कार असो असे द्विरुक्तीनें सांगतो ॥३॥ ज्या ठिकाणीं पांडुरंगरायाची कथा किर्तन होत नाहीं तेथील असलेल्या श्रोत्या वक्त्यांचा धिक्कार असो असे द्विरुक्तीनें सांगतो ॥४॥ जेथें रामनामाचा उच्चार नाहीं तेथील गाणें आणि पठणाचा धिक्कार असो असे द्विरुक्तीनें सांगतो ॥५॥ एका नारायणाच्या नामाशिवाय त्यांचें जीवन व्यर्थ होय असे नामदेवराय म्हणतात ॥६॥

सुख तें आपुलें चोरांसी वांटिलें । पालटें घेतलें दुःख त्याचें ॥१॥
नित्य नवी त्याची सोसितां सोसणी । नयेचि अझोनि वीट मना ॥२
ऐसा तूं निर्लज्य पाहे आत्मघातीं । कैसी तुझी खंती न वाटे तुज ॥३

* टीप- नाणें, बाणें, असाहि पाठ आहे.

लक्ष या चौऱ्यांशीं सोसितां यातना । भोगिसी पतना ज्यांच्या संगें ॥४॥
त्यातें भजसी सांग पुढती कोण्या मोहें । विचारूनि पाहें तुझा तूंचि ॥५
सदा चिंतातूर होऊन दीन रूप । संकल्प विकल्प करिसी किती ॥६
नाथिलाची छंदु नाहीं त्या दुराशा । भोंवती दाही दिशा तळमळीत ॥७
इंद्रियें बापुडीं दिसतीं केविलवाणीं । विषया लागोनी लोलिंगत ॥८
त्यांची आशा थोर करिसी निरंतरी । झालासी भिकारी कृपणाचा ।९
आलें काळभय हाकीत टाकीत । मूढा तुझें हीत कोण करी ॥१०
त्रिभुवनी समर्थ बळीं जगजेठी । रिघें त्याचे पाठी म्हणे नामा ।११

(७२) तुं आपले स्वसुख चोरांना अर्पण करून त्यांची दुःखमयता घेतलीस ॥१॥ अनेक प्रकारच्या होणाऱ्या हाल अपेष्टानें अद्याप पर्यंत तुझ्या मनाला कां वीट येत नाहीं ॥२॥ असा तूं कां निर्लज्ज आणि आत्मघातकी झाला आहेस. तुझी तुला या संबंधीची खंती कां वाटत नाहीं ॥३॥ अरे ज्यांचा सहवासानें लक्ष चौऱ्यांशी योनीच्या अपदा भोगीत आहेस आणि पतन पावत आहेस ॥४॥ तूं कोणत्या लोभानें वारंवार त्यांच्याकडे नित्यशः आकर्शित होतोस याचा तुझा तूंच विचार करून पहा ॥५॥ नित्य चिंतातुर होऊन दीनपणें किती बरें संकल्प विकल्प करित राहशील ॥६॥ खोटया अशा छंदाच्या व असत्या दुराशेच्या नादानें कां असा दाही दिशा वणवण करित फिरत आहेस ॥७॥ तुझी ही गरीब इंद्रिये केविलवाणी दिसत असून ती विषय सुखाकरितां दीन झाली आहेत ।८॥ अशा मिथ्यां सुखाची नित्यशा मोठी आशा करून कृपणाचा दास बनलास ॥९॥ अरे मुर्खा काळाचा फेरा तुझ्याकडे चालत आला आहे अशा प्रसंगी तुझे कल्याण कोण करील बरे ? ॥१०॥ हा जगजेठी त्रिभुवनामध्यें समर्थ होण्यानें त्याचा तूं आश्रय कर असे नामदेवराय म्हणतात ॥११॥

अभ्यासिले वेद झाला शास्त्र बोध । साधिल्या विविध नाना कळा ॥१
प्रेमाचा जिव्हाळा जंव नाहीं अंतरीं । तंव कैसा श्रीहरी करील कृपा २।
हित तें आचारा हित तें विचारा । नामीं भाव धरा जाणतेनों ॥३॥

प्रसंगीं पुराणें ऐकिलीं श्रवणीं । त्यांतील कोण मनीं धरील अर्थ ।४
काय तें सांडिलें काय तें मांडिलें । काय तें दंढिलें प्रवृत्तीसी ।।५।।
अनंत ह्या मूर्ति पाहिल्या लोचनीं । त्यांतील कोण ध्यानीं प्रतिबिंबली ।।६।।
स्वप्नींचिया परी देखसीं अभ्यास। न धरीच विश्वास चित्त तुझें ।७
वांझेचिये स्तनीं अमृताची धनी । मृगजळ पाणी तान्हावोलें ।।८।।
तरी प्रेमेविण कळती क्रियाकर्मे । हातीं येती वर्मे विठोबाची ।।९।।
दृष्टीचे देखणे श्रवणीचे ऐकणें । मनाचें बैसणें एकं होय ।। १० ।।
नामा म्हणे तरी विठो येऊनि भेटे । भेटल्या पालटे कैवल्यहोय ।११

(७३) वेदाचे पुष्कळसे परीशीलन करून शास्त्रपारंगत झालांत, आणि बहुविध अशा कला विद्या हस्तगत केल्या खरे ।।१।। परंतु जो पर्यंत पवित्र प्रेमाचे अविष्करण झालें नाही तोपर्यंत हरि कृपा कशी करील बरे ? ।।२।। आणि म्हणून ज्यामध्यें हित आहे अशा आचार व विचाराची कास धरा आहे, जाणत्यानों या नामाच्या ठिकाणीं निष्ठा ठेवा ।।३।। फावल्या वेळांत केलेल्या पुराण श्रवणानें त्यांतील हृदगंत कसे मनांत ठसेल ।।४।। कोणत्या वस्तुचा त्याग केला व कोणाचा संग्रह केला आणि प्रवृत्तीचें कोणतें निरोधन केले ? ।।५।। डोळयांनीं पुष्कळशा मूर्ती पाहिल्या खऱ्या परंतु त्यांतील कोणती मूर्ती तुझ्या ध्यानांमध्यें ठसली आहे बरे ? ।।६।। अभ्यास हा स्वप्नवत आहे असी प्रतिती असतांहि अद्याप पर्यंत तुझें चित्त विश्वास कां धरित नाहीं ।।७।। जर वांझेच्या स्तनांतुन अमृताच्या धारा निघतील किंवा मृगजलापासून तृषेची निवृत्ती होईल ।।८।। तरच प्रेमाशिवाय क्रिया कर्म हीं फलद्रूप होतील आणि हरि प्राप्तिचे वर्म हस्तगत होईल ।।९।। दृष्टीचे पाहाणें वा कानाचें ऐकणें किंवा मनाचे स्थित होणें असो ती जेव्हां एका स्थळी स्थित होतील ।।१०।। तेव्हां विठ्ठलराय हे येऊन भेट देतील व त्यायोगे मोक्ष प्राप्त होईल असे नामदेवराय म्हणतात ।।११।।

नामामृत गोडी आहे वैष्णवासी । येरा प्राकृतांसी कळेनाची ॥१॥
प्राकृत हे जन भुलले विषयीं । नामाचिया गांवीं कैसे जाती ॥२॥
नामीं चित्त व्हावें जावें तेव्हां गांवा । मग नाम गोवा तेथें कैचा ॥३॥
नाम तेंचि जाहालें वर्ण रूपातीत । अनाम स्वतंत्र स्वयंभू तो ॥४॥
नामदेव म्हणे नाम हे सुलभ । अभक्तां दुर्लभ नाना परी ॥ ५ ॥

(७४) वैष्णव जनांनाच नामामृताच्या माधुरीचा स्वाद प्राप्त होतो, इतर बहिर्मुखांना तो अप्राप्त असतो ॥१॥ देह निष्ट जीव हे तर विषय सुखामध्यें लुब्ध होण्यानें त्यांचा नामाचा ठायीं कसा प्रवेश होणार ? ॥२॥ नामीच्या ठायीं प्रथम चित्ताची अनुरक्तता करा नंतर त्याच्या गावी प्रवेश करा म्हणजें त्या गावीं प्रवेश होण्यास कोणतीच अडचण भासणार नाहीं ॥३॥ नाम हे वर्ण रूपातीत होण्यानें त्याचाच अनाम, स्वतंत्र व स्वयंमत्वाने अविष्कार होतो ॥४॥ नाम हे सहज सुलभ खरे परंतु तें अभक्तांना नाना प्रकारे दुर्लभ होते असे नामदेवराय म्हणतात ॥५॥

अवघिया आचार निष्ठा । चित्त जरी जाय वैकुंठा ।
तरीच निस्तारिलें कष्टा । भवपाशा पासोनि ॥ १ ॥
धन्य धन्य चित्तवृत्ती । विठ्ठल भक्तीसी पुढत पुढती ।
त्यांचे पूर्वज उद्धरती । गीत गाती रामकृष्ण ॥ २ ॥
हेंचि जपतप ध्यान । हरी चरणीं ठेवूनि मन ।
साधलें कार्याचें कारण । रामकृष्ण उच्चारणीं ॥ ३ ॥
नामा जपे ठेऊनि चित्त । अखंड चरणीं झाला रत ।
पुरले आमचे मनोरथ । सर्व कृतार्थ पैं झालो ॥ ४ ॥

(७५) चित्त हे जर अखिल अचार निष्टेनें वैकुंठस्थ होईल तेव्हांच भवबंधनादि कष्टांतून मुक्तता होणारी आहे ॥१॥ जी चित्तवृत्ति विठ्ठल रायाच्या प्रेमासी तन्मय झाली आहे तीचि धन्य धन्य होय. जे रामकृष्णाचे गुणानुवाद गातात त्यांच्या पितरांचा उद्धार होतो ॥२॥ हरिच्या चरणीं मन ठेवणे हेंच जप तप ध्यान होय. रामकृष्णाचा उच्चार केल्यानें सर्व कार्या-

ची साफल्यता होते ॥३॥ नामदेवरायांनीं म्हणोनि एकाग्र चित्तानें नामाचा जप केला म्हणोनि तो श्रीहरिचरणीं अखंड तल्लीन झाला. आतां आमुचें सर्व मनोरथ पूर्ण होऊन कृतकृत्य झालो ॥४॥

सर्वांमाजीं सार नाम हे देवाचे । सर्व साधनाचे सार जे कां ॥१॥
चार सहा अठरा वर्णिताती । नामे निज प्राप्तीं अर्ध क्षणी ॥ २ ॥
व्यासादिक नाम साधियेले दृढ । प्रपंच काबाड निरसले ॥३॥
नामदेव म्हणे जनी ब्रम्ह तेचि नाम । घेतां नेम धर्म सर्व साधे ॥४॥

(७६) इतर जी कांहीं साधनें सारभूत ठरली आहेत त्यामध्यें देवरायाचे नाम हेच श्रेष्ठ तर साधन होय ॥१॥ चार वेद, सहा शास्त्रे आणि अठरा पुराणें ही ज्याचे गुणानुवाद गातात अशा श्रीहरीची प्राप्ती नामाच्या योगें अर्ध क्षणांत होते ॥२॥ व्यासादिकांनीं हे नाम निश्चयानें साध्य केल्यानें त्यांच्या प्रपंचाची काबाड कष्टें निवृत्त झालीत ॥३॥ जगामध्यें जे ब्रम्ह अविष्कारलेले आहे ते नाम होय त्याचा उच्चार केला असतां नियम, धर्मादिक या सर्व साधनाचे श्रेय प्राप्त होते असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

मन करी आपुलें वाचना ते निवारी । सर्व हेंचि हरी भजत जाय ॥ १
ब्रम्हनामी गोविंद नाहीं भेदाभेद । तुटे भवबंध हरिनामें ॥ २ ॥
सांडी तूं लगबग न करी आळस । विठ्ठलीं विश्वास असों देणें ॥३।
नामा म्हणें ब्रम्ह हेंचि निरूपण । पूर्ण सर्व काम याच्या नामें ॥ ४ ॥

(७७) मन आपलेसे करा आणि वासनेचि निवृत्ती करा व हे सर्व हरीरुप आहे अशा साम्य भावनेनें भजन करा ॥१॥ ब्रम्ह नाम आणि गोविंद यांच्यामध्यें किंचितहि भेदाभेद नाहीं हरिच्या नामोच्चरणानें सर्व भवबंधनें नष्ट होतील ॥२॥ सर्व खटपटीचा त्याग करण्यास तूं आळस करूं नकोस आणि विठ्ठलरायाच्या ठिकाणीं दृढ विश्वास ठेव ॥३॥ याच्या नामोच्चरणानें सर्व कामना पूर्ण होतील. ब्रम्ह हेच निरुपण होय असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

व्रत तप दान हवन पूजन । न लगे साधन नाम म्हणतां ॥ १ ॥
रामकृष्ण हरी मुकुंदा मुरारी । जिव्हे क्षणभरी न विसंबे ॥ २ ॥
कळिकाळ दारुण करीतसे विघ्न । परजी नारायण नाम जिव्हे ॥३॥
शरण आलों जिव्हे तुवां नुपेक्षावें । नामा म्हणे गावें हरीनाम ॥४॥

(७८) नामोच्चार करणाराला वृत, तप, हवन आणि पुजनादिक इतर साधने करण्याची आवश्यकता नाहीं ॥१॥ रामकृष्ण हरि मुकुंद मुरारी या नामाचा क्षणभरही विसर पडूं देऊं नकोस ॥२॥ ज्या प्रमाणें मुठीमध्यें तलवार असल्यानें व ती फिरवीत असतां कोण-ताही शत्रु सन्मुख होत नाहीं तद्वत जिव्हेवर नामोच्चारण होण्यानें काळानें उपस्थित केलेले अनेक प्रकारची विघ्नें नष्ट होतात ॥३॥ हे जिव्हे तुला मी शरण आलों आहे. तूं माझा त्याग करू नकोस, तूं सतत हरिचे गुणानुवाद गा असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

नित्य सर्वगत अखंड सगुण । केशवाचें ध्यान करी ब्रह्मा ॥ १ ॥
ब्रह्मा सर्वकाळ सांगें साधूपासीं । आणिक हे शेषी तेंचि मानी ॥ २ ॥
मनीं जो मानसीं नामामृत सार । सेविती सादर नामा म्हणे ॥ ३ ॥

(७९) नित्य, सर्वगत व अखंड अशा सगुण केशवाचे ध्यान ब्रम्ह-देव सतत करितो ॥१॥ ब्रम्हदेव हा साधु जवळ याचेच गुणानुवाद गात आहे तसेच शेषालाहि हे मान्य आहे ॥२॥ ते आपल्या मनीं मानसीं या सार नामामृताचेच सेवन करितात असे नामदेवराय म्हणतात ॥३॥

नामाचा धारक विष्णूरूप देखा । वैकुंठीचें सुख रुळे पायीं ॥ १ ॥
निराकार देव आकारासी आला । भक्ती पैं स्थापिला नामरूपा ॥२
नाममंत्र बीज जोंवरी नाहीं जया । तोंवरी केशव दया नाहीं प्राप्त ॥३
नामा म्हणे नाम केशव केवळ । जागती प्रेमळ हरीभक्त ॥ ४ ॥

(८०) नाम निष्ट हा प्रत्यक्ष विष्णु स्वरुप होय, त्यांच्या चरणीं वैकुंठ सुख लोळण घेते ॥१॥ देवराय निराकार खरे, परंतु ते प्रेमानें

आकारांला येऊन नामरूपानें अविष्कृत झाले ॥२॥ बिजभूत नाम मंत्र हस्तगत झाल्याशिवाय केशवरायाची दया प्राप्त होणार नाहीं ॥३॥ नाम हे केशव स्वरूप होय, जे नैष्ठीक हरिभक्त आहेत त्यांना याचा अनुभव असतो असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

सदा पैं परिपूर्ण जयाचें रूपडें । तेथेंचि माजीवडे मन करी ॥ १ ॥
होईल उद्धारु तुटेल संसार । सर्व मायापूर दूर होय ॥ २ ॥
कंटाळा कायेचा दुरावा मायेचा । हेंचि जप वाचा स्मरे नाम ॥ ३ ॥
नामा म्हणे करी सर्व हरी हरी । राम हें उत्तरीं वाखाणीं पां ॥४॥

(८१) व्यापक हेंच ज्याचे स्वरुप आहे अशा ठिकाणीं मनाची स्थापना करा ॥१॥ अशा साधनानें तो संसार बंधनांतून मुक्त होऊन त्याचा मायापूर दूर होईल ॥२॥ श्रीराम याचाच जप करण्यानें शरीर व मायेचे कष्ट दूर होतील ॥३॥ सर्वदा हरि हरि याचेच अनुसंधान करावें व श्रीरामाचें चरित्र वर्णन करावें असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

रकार मकार बांधी कारे तुळी । तापत्रय होळी होऊनि जाय ॥१॥
गोविंद मुकुंद हरि परमानंद । कृष्ण केशव छंद नित्यवाचे ॥ २ ॥
जपे जगद्बंधु हरिकथा छंदु । विघडे भवबंधु येणें नामें ॥ ३ ॥
नामा म्हणे केशव न करी निर्वाण । माझा अभिमान आहे त्यासी ॥४

(८२) रकार व मकार यांना ताजव्याला बांधल्याप्रमाणें [समरेषेंत] तुलना केली असतां त्रिविध तापाची होळी होते ॥१॥ गोविंद, मुकुंद, हरि, परमानंद, कृष्ण, केशव या नामाचा सतत वाचेनें उच्चार करा ॥२॥ जगाचा जो बंधु विठ्ठलराय त्याचा जप कर आणि हरि कथेचा छंद असो दे अशा या नामानेंच भवबंधाचा ध्वंस होईल ॥३॥ या केशवरायाला माझा पूर्ण अभिमान असल्याने तो केव्हांहि माझा अंत पहाणार नाहीं असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

जन्माचे कारण राम नाम पाठे । जाईजे वैकुंठें एकवेळा ।। १ ।।
रामनाम ऐसा जिव्हे उमटे ठसा । तो उद्धरेल अपैसा इहलोकीं ।।२
दो अक्षरी राम हा जप परम । नलगे तुज नेम नानापंथ ।। ३ ।।
नामा म्हणे पवित्र श्रीरामाचें चरित्र । उद्धरिसी गोत्र पूर्वजेसी ।।४

(८३) रामनामाचा पाठ करण्याकरितां जन्म धारण केला आहे आणि तो केल्यानें त्वरीत वैकुंठाची प्राप्ती होईल ।।१।। रामनामाचा शिक्का ज्याच्या जिव्हेवर उमटलेला आहे त्याचा या मृत्युलोकीं उद्धार होईल ।।२।। श्रेष्ठ अशा रामनाम या दोन अक्षरीं मंत्राचा जप करा, तुम्हाला इतर नियमाची व पंथाची आवश्यकता नाहीं ।।३।। श्रीरामाचे चरित्र हेंच परम पवित्र होय त्यायोगें तुमच्या सर्व गोत्रांचा उद्धार होईल असे नामदेवराय म्हणतात ।।४।।

गोविंद गोपाळ वाचेसी निखळ । तो उद्धरे तात्काळ कलीमाजी ।।१
नारायण नारायण करितां हे पारायण । उद्धरले जन इहलोकीं ।।२।।
तुटती यातना कर्माच्या भावना । जडजीव उद्धरणा नाम स्मरा ।।३।।
नामा म्हणे राम हा जप परम । न लगती नेम नाना कोटी ।।४।।

(८४) ज्याच्या वाणींला गोविंद गोपाळ अशा पवित्र नामाचा सतत छंद लागला आहे त्यांचा या कलीयुगामध्यें त्वरित उद्धार होतो ।।१।। नारायण नारायण अशा नामाचे ज्यांनीं पारायण केले त्यांचा या लोकामध्ये उद्धार झाला ।।२।। व त्यांचीं अनेक दुःखे व कर्मबंधनें नष्ट झालींत, नामस्मरण हेच जड जिवांना उद्धारण्यास समर्थ आहे ।।३।। रामनामाचा जप हाच श्रेष्ठ होय यापेक्षां इतर कोटयावधी नियमाची आवश्यकता नाहीं असे नामदेवराय म्हणतात ।।४।।

शंभु उपदेशी भवानिसी । राम नाम जपे मानसीं ।। १ ।।
दोन्हीं अक्षरें रसाळें । महा पातकां करी निराळें ।। २ ।।
बीजमंत्र राम राणा । फळ शतकोटी रामायणा ।। ३ ।।
नामा विनवितो रघुनंदना । विनंती परिसा जगजिवना ।। ४ ।।

(८५) तूं आपल्या अंतःकरणामध्यें श्रीरामनामाचा जप कर असें शंकरराय हे पार्वतीस उपदेश करितात ॥१॥ ही दोन अक्षरें म्हणजे अमृता-सारखी मधूर असून ती महापातकांपासून मुक्त करणारी आहेत ॥२॥ रामनाम हा बीज मंत्र असून शंभर कोटी रामायण हे त्याचें फळ होय ॥३॥ हे जगजिवना माझी विनंती ऐका असे रघूनंदनाला नामदेवराय विनंती करितात ॥४॥

संसार पाल्हाळ सांगसी परिकर । नाम तें श्रीधर न म्हणसी ॥ १
कैसें तुज उद्धरण होईल गव्हारा । भजन त्या हरिहरा करीं वेगीं ॥२
योनी नानाविधा पावसीं आपदा । हाचि खेळ सदा स्मरतोसी ॥३
नामा म्हणे लटिकें प्रपंचासी मुके । राम हेचि मुखें जप करी ॥४

(८६) तूं संसारांतील वायफळ कथेची उल्हासानें बडबड करितोस मात्र श्रीधर नामाचा उच्चार करण्यास तूं मुखस्तंभ होतोस ॥१॥ हे मूर्खा तूं जर या हरिहराचें भजन न केलें तर तुझा उद्धार कसा होईल बरें ? आणि म्हणून त्याचे त्वरीत भजन कर ॥२॥ अनेक जन्मांमध्यें बहुविध दुःखे भोगीत असतां पुन्हां त्याच कृतीचें अवलंबन करित आहेस ॥३॥ मुखानें रामाचा जप कर म्हणजे या मिथ्या संसारांतून मुक्त होशील असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

नामा वांचूनि कांहीं दुजें येथें नाहीं । वेगीं लवलाहीं राम जपा ॥१
गोविंद गोपाळ वाचेसी रसाळ । पावसी केवळ निजपद ॥ २ ॥
ध्रुव प्रल्हादं बळी अंबऋषि प्रबुध । नामें परमानंद पावले देखा ॥३
नामा म्हणे राम वाचे जया नाम । संसाराचें श्रम हरे नामें ॥४॥

(८७) या संसारामध्यें रामनामाशिवाय इतर कांहीं श्रेष्ठ नाहीं आणि म्हणून त्वरित रामरायाचा जप कर ॥१॥ गोविंद गोपाळ या मधूर नामाचा उच्चार जिव्हेनें केला असतां तुला परम निज पदाची प्राप्ती होईल ॥२॥ ध्रुव प्रल्हाद, बळीराजा, अंगद अंबरुषी आदि परम भक्त हे याच नामानें परमानंदाला प्राप्त झाले ॥३॥ ज्याच्या वाणीला सतत नामोच्चाराचा छंद लागलेला आहे त्यांचे सर्व संसारीक श्रम नष्ट झाले असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

गाणें गातीरे सुगड । तया हांसति दुघड ॥ १ ॥
नाम गोड नाम गोड । होय जन्माचा निवाड ॥ २ ॥
हांसे त्यासी हांसू द्यावें । गात आपण असावें ॥ ३ ॥
नामा म्हणे जे हांसती । त्यांची कुळें नरका जाति ॥ ४ ॥

(८८) शहाणे जे पुरुष आहेत ते श्रीहरिचें गाणें प्रेमानें गातात मात्र मुर्खांना ते सहन न झाल्यानें हांसतात ॥१॥ नाम हेंच अति मधुरांत मधुर आहे ज्याच्या उच्चारणानें जन्माचा निवाडा होतो ॥२॥ ज्या मुर्खांना अशा या कार्या संबंधी हसू येत असेल त्यांना हंसण्याकरितां मोकळें सोडावें. आपण मात्र प्रेमानें श्रीरामाचे गुणानुवाद गावें ॥३॥ रामाचे गीत गाणाराला पाहून जे कोणी हंसत असतील त्यांची सर्व कुळे ही रौरव नरकांत पडतील असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

नाम एकचि तारक । रामनामें शुद्ध मुख । येणें उद्धरती तिन्ही लोक । कुळांसहित वैकुंठ ॥ १ ॥ धन्य धन्य तें कुळ । रामनामें नित्य निर्मळ । जो उच्चारी सर्वकाळ । धन्य जन्म तयाचा ॥ २ ॥ एक हरी एक तत्त्व । तेथें धरोनिया शुद्ध सत्व । नाना काय करिसी कवित्व । राम नाम उच्चारी ॥ ३ ॥ नामा जपे नाम मंत्र । हातीं न घे आणिक शस्त्र । रामकृष्ण हें वक्त्रें उच्चार । इतुकेंचि पुरे आम्हां ॥ ४ ॥

(८९) नाम हेच जगामध्यें तारक होय, मुखाची पवित्रता या रामनामानेच होते इतकेच नव्हे तर याच्या योगे तीन्ही लोकांचा उद्धार होतो व कुळासहित त्यांना वैकुंठाची प्राप्ती होते ॥ १ ॥ जे कोणी या पवित्र नामाचा सतत उच्चार करतात, त्यांच्या कुळाची धन्य धन्यता होय व त्यांचा जन्म धन्य होय ॥२॥ एक तत्त्वात्मक असलेला जो एक हरि त्याचें शुद्ध सत्वात्मक भावनेनें अवलंबन कर. इतर कवित्वाचो उठाठेव कां करितोस, तूं फक्त रामनामाचा उच्चार कर ॥३॥ नाम मंत्राचाच जप नामदेवराय करित आहेत. ते आपल्या हातामध्ये इतर शस्त्र धारण करित नाहींत. केवळ रामकृष्णाचा उच्चार आमच्या मुखातून व्हावा यांतच आमचे पूर्ण समाधान आहे ॥४॥

तूं तंव नेणता परी हरि जाणता । आहे तो समता सर्वांभूतीं ॥ १
सर्व ब्रम्ह हरी येकचि निर्धारी । होसील झडकरी ब्रम्ह तूंचि ॥ २
अच्युत माधव अमृताच्या पाठें । लागतांची वाटे वंदी यम ॥ ३ ॥
नामा म्हणे होसील जिवलग विष्णूचा । दास त्या हरीचा आवडता ।४

(९०) अज्ञपणा हे तुझें लक्षण आहे परंतु हरि हा सर्वभूत मात्राच्या ठिकाणीं सारखा असून ज्ञाता आहे ॥१॥ ब्रम्ह व हरि हे ऐक्य स्वरुपानें आहेत असा निश्चय झाला असतां तूं स्वत: ब्रम्हरुप होशील ॥२॥ अच्युत माधव या नामामृताचे पठण केले असतां यम तुझें वंदन करील ॥३॥ अशा या क्रियेनें तूं विष्णूचा प्रेमळ सखा होऊन हरिचा आवडता सेवक होशील असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

न लगती कथा व्युत्पत्ति उलथा । वाऊग्या चळथा ग्रंथांचिया ॥ १
हरि हरि भजन जनीं जनार्दन । सर्वत्रीं समान भूतदया ॥ २ ॥
भावेंचि भजावें हरीतें पुजावें । नित्य हें सेवावें रामनाम ॥ ३ ॥
नामा म्हणे गोड नको तें हे वाड । विठ्ठलाचें वेड इतकें पुरे ॥ ४ ॥

(९१) तुला उलट सुलट अशा व्युत्पत्ति व इतर कथा आणि अनेक ग्रंथाचा भार याच्या उठाठेवी करण्याची आवश्यकता राहणार नाहीं ॥१॥ विश्वामध्यें जनार्धन स्थित आहे असा निश्चय आणि हरि हरि असे भजन तसेच सर्वत्र समान भूतदया करावी ॥२॥ भाव धरून भजन करावें आणि हरिची प्रेमानें पुजा करावी तसेच रामनामाचें आवर्तन करावे ॥३॥ इतर कांहीं मधूर साधनें असतील त्याची जरूरी नाही कारण ती दु:खकारक होत. फक्त विठ्ठलाचा छंद होणें यांतच साफल्य आहे असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

मंत्रांचा पै मंत्र हरी हरी उच्चार । न लगे तो विचार करणें कांहीं ।१
सुफळ नाम गाढें वाचेसी उच्चारूं । केशव हाचि करूं सर्वांभूतीं ॥२॥
नाहीं यासी पतन न होईल बंधन । नित्य हेंचि स्नान रामनामें ।३।
नामा म्हणे भाव सर्वभूती करा । आणिक पसारा घालूं नको ।४।

(९२) हरि असा उच्चार करणें हा सर्व मंत्रामध्यें मंत्रराज होय या पेक्षां इतर साधनाच्या विचाराची आवश्यकता नाहीं ॥१॥ फलद्रुप असे श्रेष्ठ नाम स्थाचाच वाचेनें उच्चार करूं आणि केशवराय हाच सर्व-भूती आहे असा निश्चय करूं ॥२॥ रामनाम हेच नित्य स्नान होय अशा या साधनानें पुनरावृत्ती अथवा बंधन प्राप्त होणार नाहीं ॥३॥ सर्वत्र परमात्मा आहे असी शुद्ध भावना करा या पेक्षां दुसऱ्या उठाठेवी करूं नका असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

नाचतां उडतां रडतां पडतां । 'नामीं अवचितां हातां आला ॥ १ ॥
येतां जातां हरि हरि हरि वाटे । नाम ते चोखटें स्मरा मुखीं ॥२॥
हांसतां खेळतां घरीं दारीं पारीं । मुखी हरि हरि म्हणे कां रे ॥ ३
खातां जेवितां अन्नतृप्ति सारी । सांडी मांडी हरि सर्वकाळ ॥ ४
नामा म्हणे नामीं आस्ति नास्ति ठसा । केशव हरि सन्मुख तुम्हां दिसे ॥ ५ ॥

(९३) नृत्य करित असतां, बागडत असतां, रडत असतां आणि लोळण घेत असतांना हरि हा नामाचे योगें सहज प्राप्त झाला ॥१॥ मार्गानें जातांना, येतांना हरि हरि हरि अशा पवित्र नामाचे स्मरण करा ॥२॥ घरांमध्यें व दारामध्यें अथवा पारावर हांसत खेळत असतांना मुखानें हरि हरि म्हणत जा ॥३॥ खातांना, पोट भरून अन्न भोजन करित असतांना नित्यशा हरि चिंतन करा ॥४॥ आहे नाहीं चा ठसा केशव हरी होण्यानें.तो तुम्हाला सन्मुख प्रतित होईल असे नामदेवराय म्हणतात ॥५॥

करितां हरिकथा नाम सुखरासी । उद्धार जीवाशीं एका नामें ॥१॥
तें हें रामनाम जपे तूं सप्रेम । जप हा सुगम सुफळ सदा ॥ २ ॥
नामेंचि तरले नामेंचि पावले । नाम म्हणता गेले वैकुंठासीं ॥३॥
नामा म्हणे एका नामेंसी विनट । ते वैकुंठीचे पेठ पावले देखा ॥४

* टिप:- १ नाम्या

(९४) हरि कथा करणें व नाम ह्या जणूं सुखांच्या राशीच होत, जिवांचे कल्याण एका नामानेच होणारे आहे ।।१।। अशा या रामनामाचा प्रेमानें जप कर, कारण हा जप सुलभ व सदा फलप्रद असा आहे ।।२।। नामाच्या योगें ते तरले गेले व त्या योगेच पूर्णत्वाला प्राप्त झाले, इतकेंच नव्हे तर नामोच्चारणानेंच ते वैकुंठास गेले ।।३।। किंबहुना एका नामीसी समरस होण्यानें त्यांनी वैकुंठ पेठ ही हस्तगत केली असे नामदेवराय म्हणतात ।।४।।

हरिविण देह मळीण सर्वथा । मंगळाची कथा रामकृष्ण ।। १ ।।
कथा करी कोणी ऐकती जे जन । वैकुंठ भुवन हातां आलें ।। २ ।।
वेदशास्त्रां सार नामाचा उच्चार । अंतीं पैलपार दाखवितों ।।३।।
जन्मोनियां जगीं अलिप्त असावें । नाम तें स्मरावें म्हणे नामा ।।४

(९५) ज्या शरीरामध्ये हरि भजन होत नाहीं तो देह अमंगल होय. रामकृष्ण कथा ही मंगल आनंदरूप होय ।।१।। कोणी कथा करित असतां त्याचे जो श्रवण करितो त्याला वैकुंठ भुवन हस्तगत झालें असें समजावें ।।२।। नामाचा उच्चार करणें हेंच वेदांचे सार होय व तेच शेवटीं पैलपार करणारे आहे ।।३।। जन्मास येऊन संसाराच्या अलिप्त रहावे व नामस्मरण करावें असे नामदेवराय म्हणतात ।।४।।

विष्णु नाम श्रेष्ठ गाताती देवऋषि । नाम अहर्निशीं गोपाळाचें ।।१
हरि हरि हरि तूंचि बा श्रीहरी । वसे चराचरीं जनार्दन ।। २ ।।
आदि ब्रम्ह हरी आळवी त्रिपुरारी । उमेप्रती करी उपदेश ।। ३ ।।
नामा म्हणे पूर्ण ब्रम्ह जप उत्तमोत्तम । शंकरासी नेम दिननिशीं ।।४

(९६) श्रेष्ठ जे विष्णुनाम त्याचेच गायन देवऋषी आदिक हरि करितात आणि ते या गोपाळाचे नित्यशः नामोच्चार करितात ।।१।। हे जनार्दन रूपानें या विश्वांत तुझीच व्याप्ती आहे. बा हरि असे हे मी त्रिवार निवेदन करितो ।।२।। अद्य ब्रम्हरुप असलेल्या हरिस आळव असा उपदेश शंकर पार्वतीला करितात ।।३।। शंकराला अशा या पूर्ण उत्तमोत्तम ब्रम्ह जपाचा नित्य नियम आहे असे नामदेवराय म्हणतात ।।४।।

सर्वकाळ पुण्याच्या राशी । हरि नाम आलिया जिव्हेसी । नित्य तप अनुष्ठानाच्या राशी । कोटी यज्ञासी लाभ झाला ॥१॥ धन्य धन्य त्यांचा वंश । जे जे रतले नामास । रामनामीं नित्य सौरस । ते विष्णुदास पवित्र ॥ २ ॥ पवित्र ते स्वधर्मी । ज्यासी सर्वकाळ नामी । तयाचें नाम पूर्ण कामीं । मनोरथ पुरतील ॥ ३ ॥ नामा जपे नाम हरीचे । सार्थक केलें संसाराचें । आझें फेडिलें पूर्व जन्माचें । हरी स्मरण केलिया ॥ ४ ॥

(९७) सर्वकाळ पुण्याच्या राशी देणारें असे हरिनाम जिव्हेला आले असतां त्याला नित्य अशा तप अनुष्ठानाच्या राशीचे पुण्य किंबहुना कोटी यज्ञाचें फल प्राप्त होते ॥१॥ जें कोणी नामाच्या ठायीं संलग्न झाले आहेत त्यांचा वंश धन्य धन्य होय. ज्यांना रामनामाच्या ठायीं प्रेम आहे ते शुद्ध वैष्णव होत ॥२॥ ज्याचा सर्वकाळ रामनामामध्यें खर्च होत आहे तें खरें पवित्र व स्वधर्मी होत. नामानें त्यांच्या सर्व कामना पूर्ण होतील ॥३॥ नामयानें हरिचे नाम घेतल्यानें त्यांनी आपल्या संसाराचे सार्थक केले व हरिच्या स्मरणानें पूर्व जन्मीचे ओझें दूर केले ॥४॥

नामीं नारायण । होय भक्तांचे आधीन ॥ १ ॥ न मागतां भक्ती । नामा पासीं चारी मुक्ती ॥ २ ॥ भुलों नये जाण । नाम वैकुंठीं निशाण ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसे प्राणी । सम होती नारायणीं ॥ ४ ॥

(९८) नारायण हा नामाच्या योगें भक्ताधीन होतो ॥१॥ नामा जवळ चारी मुक्ती होण्यानें भक्त हे कोणतीच मागणी करित नाहींत ॥२॥ नाम हें वैकुंठाचे निशाण आहे म्हणून याची विस्मृति होऊं देऊं नका ॥३॥ जे कोणी नाम स्मरण करितात ते प्राणी नारायणरूप होतात असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

सदा फळ, सुफळ वाचेसी गोपाळ । वंदि कळि काळ शास्त्र सांगे ॥१
ब्रम्हांड नायक ऐसें जें कवतुक । तेंचि नाम एक श्रीकृष्ण ऐसें ॥२
आदि अंत पाहतां नाहीं पै सर्वथा । परिपूर्ण सरीता अमृताची ॥३
नामा म्हणे अनंत कां करीसी संकेत । उद्धरिले पतीत युगायुगीं ॥४॥

(९९) ज्याच्या वाणीला गोपाळ नामाचा छंद आहे त्याचे कार्य सदा फलद्रुप होते व कलिकाळ हि त्यांचे वंदन करितो असे शास्त्र सांगते ॥१॥ श्रीकृष्ण नाम हेच कौतुकास्पद असा ब्रम्हांडनायक होय ॥२॥ आदि अंति पाहिले असता याचे सारखे दुसरें कांहीं नाहीं खरोखर पाहतां जणूं काय तो अमृताचा सागर होय ॥३॥ युगायुगामध्यें या नामोच्चरणानें अनेक पतितांचा उद्धार झाला असतां तूं त्याविषयीं अनंत संकेत कां करित आहेस असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

आतां आहे नाहीं पाहतां लक्ष एक । संपत्तीचें सुख विषय हा ॥१॥
हित तें आचरा हित तें विचारा । नामी भाव धरा जाणतेनो ॥२॥
संपत्तीच्या बळें एक झाले आंधळे । वेढिले कळिकाळे स्मरण नाहीं ३।
एक विद्यावंत जातीच्या अभिमानें । नेलें तमोगुणें रसातळा ॥४॥
मिथ्या माया मोह करोनी हव्यास । वेंचलें आयुष्य वायांविण ।५
नामा म्हणे कृपा करूनि ऐशा जीवा । सोडवी केशवा मायबापा ६।

(१००) संपत्ती आदि विषयसुख जे आतां दिसत आहे तें क्षणमात्र टिकणारे आहे त्यांच्या मध्यें स्थिरभाव किंचितही नाहीं ॥१॥ आणी म्हणून ज्यामध्यें कल्याण आहे अशाच गोष्टीचा विचार करा व कृति करा. अहो शहाण्यानों तुम्ही नामाचा ठायीं दृढ निश्चय ठेवा ॥२॥ कांहीं जण या मृग जळवत असलेल्या संपत्तीच्या मदानें अंध झाले आहेत त्यायोगे काळीकाळानें आपणांस गुरफडलेले आहे याचे त्यांना स्मरणही नाही ॥३॥ कांहींजण विद्या व जाती असा तम गुणाच्या अभिमानानें रसातळाला गेले ॥४॥ तुच्छ अशा

माया मोहादिकांची हांव धरून आपल्या अमोलिक आयुष्याचा नाश केला ॥५॥ हें माय बाप केशवा अशा या जिवावर कृपा करून त्यांना सोडील असें नामदेवराय म्हणतात ॥६॥

आम्ही विठोबाचे दूत । यमा आणूं शरणांगत ॥ १ ॥
मुखी नाम हाती टाळी । महापापा करूं होळी ॥ २ ॥
करूं हरिनामाचा घोष । कुंभपाक पाडूं वोस ॥ ३ ॥
करूं हरिकथा कीर्तन । तोडूं यमाचे बंधन ॥ ४ ॥
एवढा प्रताप नामाचा । रीघ नव्हे कळीकाळाचा ॥ ५ ॥
ऐसा नामा यशवंत । विठोबाचा शरणांगत ॥ ६ ॥

(१०१) आम्ही विठ्ठलरायाचे दास खरें परंतु यमराजालाही शरणांकित करूं ॥१॥ मुखानें नाम घेऊं व हातानें टाळी वाजवूं आणि त्यायोगे महापापाचा ध्वंस करूं ॥२॥ हरिनामाच्या ध्वनीनें कुंभपाक—नरक रिकामा करूं ॥३॥ हरिकथा किर्तन करून यमाची शृंखला तोडूं ॥४॥ असा हा नामाचा प्रभाव होण्यानें त्या मध्यें कळीकाळाचा प्रवेश होऊं शकत नाही ॥५॥ हा नामा विठ्ठलरायाला शरणांगत होण्यानें तो जयश्री युक्त होय ॥६॥

ज्यासी विन्मुख संसार । तो करी मोक्षाचा विचार ॥ १ ॥
आम्ही पंढरीचे लाठे । न वजो वैकुंठीचें वाटे ॥ २ ॥
सांडोनि पंढरीची वारी । मोक्ष मागे तो भिकारी ॥ ३ ॥
जन्मों जन्मींचा आळसी । तो मुक्तीतें अभिलाषी ॥ ४ ॥
ताट ओगरिलें निकें । सांडोनि कोण जाय भीके ॥ ५ ॥
जो कां नेणे नाम गोडी । तो मुक्तीतें चरफडी ॥ ६ ॥
नामा म्हणे विष्णुदास । झणीं भ्याला गर्भवास ॥ ७ ॥

(१०२) संसार ज्याला पाठमोरा झाला आहे तोच मोक्षाचा विचार करील ॥१॥ आम्ही पाहतां पंढरीचे लाटे—शूर आहोंत आणि

म्हणून वैकुंठाच्या मार्गाला चुकूनहि जाणार नाही ॥२॥ पंढरीच्या वारीचा त्याग करून मोक्ष मागणारे भिक्षुक होत ॥३॥ जन्मोजन्मी आळशी झालेला आहे तोच मोक्षाची इच्छा धरील ॥४॥ अमृततुल्य अशा पक्वान्नाचें ताट सन्मुख असतां कोण असा मूर्ख भीक मागण्याकडे प्रवृत्त होईल ॥५॥ ज्याला नामाविषयीं प्रेम नाहीं तोच मोक्षाकरितां तळमळत रहाणार ॥६॥ अहो विष्णुदासांनो तुम्ही गर्भवासास भिऊं नका असे नामदेवराय म्हणतात ॥७॥

हरिकथा श्रवण श्रवणाचेनि द्वारें । माझिया दातारें केशवें दिलें ।१
रुपाचें सुख नयनाचे द्वारे । माझीया दातारें केशवे दिले ॥२॥
तीर्थाचें सुख चरणाचेनि द्वारें । माझिया दातारें केशवें दिलें ।३
पूजनाचें सुख कराचेनि द्वारें । माझिया दातारें केशवें दिलें ॥४॥
नामा म्हणे ऐसे जयाचे उपकार । तो विठ्ठल दातार विसरले ।५

(१०३) हरिकथेचें श्रवण व्हावे म्हणून माझ्या केशवरायानें कान दिले ॥१॥ माझ्या केशवरायाचें रूप सौंदर्य सुख मिळावे म्हणून त्यांनीं नेत्र दिले ॥२॥ तीर्थयात्रेचे सुख मिळावे म्हणून माझ्या केशवरायानें मला पाय दिले ॥३॥ केशवरायाच्या पुजेचे सुख मिळावे म्हणून त्यांनी मला हात दिले ॥४॥ असे ज्याचे उपकार आहेत अशा विठ्ठल दात्याला लोक विसरले असे नामदेवराय म्हणतात ॥५॥

ब्राह्मण हो तुम्ही सर्व नारीनर । सर्वांसी आधार नाम सत्य ॥१॥
नामाविण गति नसे रे आणिक । वैकुंठ नायक बोले मुखें ॥२॥
परि तेंचि नाम पहावें शोधूनी । चौऱ्यांशींची खाणी तेव्हां चुके ।३॥
नामा म्हणे आतां सद्गुरु वंदुनी । नाम घ्या शोधूनि सत्य मुक्त ।४

(१०४) अहो ब्राम्हणानों व स्त्री पुरुषानों या विश्वामध्यें सर्वांला आधार एक नाम आहे हे निश्चीत समजा ॥१॥ उत्तम गती देण्यांस नामाशिवाय अन्यांचे सामर्थ्य नाहीं असे वैकुंठराय आपल्या मुखानें निवेदन करितात ॥२॥ ज्याच्या योगानें चौऱ्यांशीं लक्ष योनींतून मुक्त व्हाल अशा

ह्या प्रभावशाली नांमाला शोधून पहा ।।३।। तेंव्हा तुम्ही सद्गुरुरायांना वंदन करून नामाचा शोध करून घ्या, म्हणजे तुम्ही नित्य मुक्त व्हाल असे नामदेवराय म्हणतात ।।४।।

ब्राह्मणां न कळे आपुलें तें वर्म । गवसे परब्रह्म नामें एका ।।१।।
लहान थोरांसी करितों प्रार्थना । दृढ नारायणा मनीं धरा ।।२।।
सर्वांप्रति माझी हेचि पैं विनंति । आठवा श्रीपति आपुलें मनीं ।३
केशव नारायण करावें आचमन । तेवीं संध्या स्नान कर्म तया ।४
नामा म्हणे हेंचि करा नित्य भजन । ब्रह्मार्पण साधन याचे पायीं ।५

(१०५) एका नामोच्चरणानें परब्रम्ह प्राप्त होते असे हे अचूक वर्म ब्राम्हणांना समजत नाही ।।१।। तुम्ही आपल्या मनामध्यें नारायणाला दृढ धरा अशी ही प्रार्थना मी अबाल वृद्धांना करितो ।।२।। तुम्ही आपल्या मनामध्ये श्रीपतीचे स्मरण करा । अशी ही विनंती मी सर्वांना करितो ।।३।। केशव नारायण या नामाचे आचमन केल्यानें स्नान संध्यादि अन्हीक कर्म त्यास घडते ।।४।। अशा प्रमाणें नित्य भजन केल्यानें त्याच्या चरणीं सर्व कर्मे ब्रम्हार्पण होतील असे नामदेवराय म्हणतात ।।५।।

नव्हे तुज हित विषय पोशितां । हरी हरी म्हणतां तरशील ।।१।।
माधव श्रीहरी कृष्ण नरहरी । वेगी हा उच्चारी लवलाही ।।२।।
घडतील यज्ञ पापें होतील भग्न । प्रपंच सर्वज्ञ होईल ब्रह्म ।।३।।
नामा म्हणे हरिकथा हरी भव व्यथा । उद्धरसी सर्वथा भाकै माझी ।४

(१०६) हरि हरि या नामोच्चरणानेंच तुझा उद्धार होईल. केवळ विषय सेवन केल्यानें तुझें कल्याण होणार नाहीं ।।१।। माधव, श्रीहरि व कृष्ण नरहरी याचा उच्चार त्वरीत वेगानें करा ।।२।। अशा या क्रियेनें यज्ञ केल्याचे श्रेय प्राप्त होऊन पापें दग्ध होतील आणि हा प्रपंच सर्वज्ञ अशा ब्रम्हरूपानें प्रतीत होईल ।।३।। हरि कथा ही संसारातील दुःखाचे निवर्तक असून त्यायोगें निश्चयें करून तुझा उद्धार होईल असे नामदेवराय म्हणतात ।।४।।

सदाशिवा पुढें कोण अनुष्ठानी । अष्टांग लावूनि नमस्कारी ॥१॥
नाम यज्ञ जप ऋषेश्वर गात । शीतळ ते होत काळकुट ॥२॥
सर्वांमाजी श्रेष्ठ नाम कलियुगीं । रामकृष्ण जगीं नाम नौका ।३।
नामा म्हणे नाम अखंडित स्मरा । पांडुरंग धरा भजा वेगीं ॥४॥

(१०७) या विश्वामध्यें शंकरा सारखा अनुष्ठान करण्यांत चतुर दुसरा कोण आहे बरे ? परंतु तोहि अष्टांगानें या हरिला नमस्कार करितो ॥१॥ नाम हाच जपयज्ञ असून त्याचे गायन ऋषिश्वर करितात त्यांच्या उच्चारणाने काळकुटा मारख्या विषाचा दाह शितल होतो ॥२॥ या कलियुगामध्यें सर्व साधनांमध्यें श्रेष्ठ असे नाम होय. या जगामध्यें पैलपार करण्याला नाम ही जणू काय नौका होय ॥३॥ आणि म्हणून नामाचें अखंड स्मरण करा व पांडुरंगरायाच्या भजनाचें अवलंबन त्वरीत करा असे नामदेवराव म्हणतात ॥४॥

ब्रह्मांडनायक विश्वाचा गोसावी । तो केला पांडवी म्हणियारा ।१
भावाचा लंपट भक्तां पराधीन । सोडोनी अभिमान दास्य करी ।२
भाजीचिया पाना संतोषला हरी । जयाचे उदरीं चौदा भुवनें ।३
जनक श्रुतिदेवें धरियेला दोहीं करीं । दोघांचिये घरीं घेनो पूजा ।४
पुंडलिकें बैसों टाकियेली वीट । तेथेंचि भूवैकुंठ वसविलें ॥५॥
नामा म्हणे तुम्ही विठ्ठलचि धरा । चरणी तुम्हा थारा देईल देखा ।६

(१०८) श्रीकृष्ण हा विश्वाचा स्वामी व धनी खरा परंतु पांडवानें आपल्या भक्ति प्रभावाने त्याला सेवक केला ॥१॥ श्रीकृष्ण हा प्रेमभावाला लुब्ध होणारा आणि भक्ताधिन असल्यानें तो आपल्या ऐश्वर्य व अभिमानाचा त्याग करून भक्तांची सेवा करितो ॥२॥ ज्या भगवंताच्या उदरामध्ये चौदा भुवने सांठवलेलीं आहेत तो भक्तांनीं दिलेल्या फक्त पानाच्यासेवनेनें तृप्त होतो ॥३॥ या देवरायाला जनक व श्रुति देवानें प्रेमानें आपल्या दोन्ही हातांनी धरून घरी नेले असतां तो दोघांच्या येथील सत्काराचा स्विकार करितो ॥४॥ या देवरायाला बसण्या करितां पुंडलीक

रायानें विट फेंकली. असतां यांनीं तेथेच भूवैकुंठ निर्माण केले ।।५।। अहो जनहो तुम्ही विठ्ठलरायाच्या अंकीत व्हा, तो तुम्हाला आपल्या चरणाच्या जवळ आश्रय देईल असे नामदेवराय म्हणतात ।।६।।

केशव कैवल्य कृपाळ । नारायणें उद्धरिला अजामेळ ।
माधव मनीं धरा निश्चळ । गोविंद गोपाळ गोकुळींचा ॥१॥
विष्णु विश्वाचा जिव्हाळा । मधुसूदन माउली सकळां ।
त्रिविक्रमें रक्षिलें गोकुळा । वामनें पाताळीं बळी नेला ॥२॥
श्रीधरें सृष्टि धरिली पृष्ठीं । हृषिकेश उभा भीवरेतटीं ।
पद्मनाभ पुंडलिकासाठीं । दामोदरें गोष्टी पांडवांसी ॥ ३ ॥
संकर्षणें अर्जुनासी संवाद केला । वासुदेवें अवचितां वाली वधिला ।
प्रद्युम्न समुद्रावरी कोपला । अनुरुद्धें छेदिला सहस्त्र बाहो ॥ ४ ॥
पुरुषोत्तमें केला पुरुषार्थ । अधोक्षजे हिरण्यकश्यपा मारिली लाथ ।
नरहरि प्रल्हादा रक्षित । स्मरावा अच्युत स्वामी माझा ॥५॥
जनार्दनें रावणादि वधिले । उपेंद्रें अहिल्येसी उद्धरिलें ।
हरि हरि म्हणतां दोष जळाले । कृष्णें तारिलें गणिकेसी ॥६॥
या चोवीस नामांचे करितां स्मरण । जन्ममरणांचे होय दहन ।
विष्णुदास नामा करी चिंतन । चरण ध्यान मज देई ॥७॥

(१०९) केशवराय हे मोक्ष देणारें असें कृपाळू आहेत. ज्या नारायणाने महा पापी असा जो अजामेळ त्याचाहि उद्धार केला आणि म्हणून या माधवाला तुम्ही आपल्या मनामध्यें अखंड धारण करा जो गोकुळाचा गोविंद गोपाळ आहे ।।१।। विष्णु हा जणूं काय विश्वाचा प्रियकर असून हा मधुसूदन सर्वांची माऊली आहे. या त्रिविक्रमाने गोकुळाचे रक्षण केलें व राजा बळीला पाताळांत नेलें ।।२।। या श्रीधराने आपल्या पाठीवर पृथ्वी धारण केली. जो पद्मनाभ पुंडलीकाकरितां भिवर तिर्थाच्या किनारी विटेवर उभा आहे तोच हा हृषीकेश होय, पांडवासी हाच दामोदर गुज गोष्टी करित आहे ।।३।। या संकर्षणानें अर्जुनासी संवाद केला. वालीचा तर या

वासुदेवानें अवचित वध केला. प्रद्युम्न हा समुद्रावर कोपायमान झाला अनुरुद्धानें सहस्त्र बाहुचा शिरच्छेद केला ॥४॥ खरा पुरुषार्थ या पुरुषोत्तमानें केला, हिरण्यकश्यपाला या अधोक्षजानें लाथा'कीं हो मारल्या वर-हरीनें प्रल्हादाचे रक्षण केलें आणि म्हणून माझ्या या अच्युतस्वामींचें स्मरण करा ॥५॥ या जनार्धनानें रावणादिकांचा नाश केला व अहिल्येचा उद्धार या उपेंद्रानें केला. हरिहरि असा उच्चार केल्यानें सर्व दोषांचा नाश होतो. या कृष्णानें गणिकेचा उद्धार केला ॥६॥ अशा या चोवीस नामाचे स्मरण केले असतां जन्ममरण भस्म होतात अशा भगवंताच्या चरणाचे ध्यान व्हावे म्हणून विष्णुदास नामा चिंतन करितात ॥७॥

येऊनि संसारा । हित वेगी विचारा ॥१॥
स्मरा हृषिकेशी । तो नेईल परलोकासी ॥२॥
गणिका नाम उच्चारी वाचे । जन्म मरण चुकलें तिचें ॥३॥
अजामेळ पापरासी । नामें पावला मोक्षासीं ॥६॥
दूध मागों गेलें लेकरूं । तया दिधला क्षीरसागरू ॥५॥
सापत्नी धुरू दवडिला । तो अढळपदीं बैसविला ॥६॥
गजेंद्र स्मरता तांतडी । त्याची चुकविली सांकडीं ॥७॥
नामा म्हणे नामबळें । उद्धरती कोटी कुळें ॥८॥

(११०) या संसारांत जन्म घेतला असतां आपले खरें हित कशांत आहे याचा त्वरित पूर्ण विचार करा ॥१॥ ऋषीकेशाचे प्रेमानें स्मरण करा तो तुम्हाला स्वर्गांत घेऊन जाईल ॥२॥ गणिका ही वेश्या होती खरी परंतु तिनें वाणीनें नामोच्चार केल्यानें तिची जन्ममृत्युतून सुटका झाली ॥३॥ अजामेळ महापातकी होता खरा परंतु नामोच्चरणानें तो मोक्षास प्राप्त झाला ॥४॥ उपमन्यु हा बालक होता व त्यांनीं फक्त पोटभर पिण्याकरितां दुधाचा हट्ट. घेतला असतां त्यास क्षिरसागराधिपती केले ॥५॥ ध्रुवाला त्याच्या सावत्र आईनें लोटून दिले खरे परंतु या देवरायानें त्याला अढळपद दिले ॥६॥ गजेंद्रानें तुमचे स्मरण केले असतां त्याला मगरमिठीतून मुक्त केले ॥७॥ नाम प्रभावानें कोटयावधी कुळाचा उद्धार होतो असे नामदेवराय म्हणतात ॥८॥

हरिनाम गातां पवित्र । सेवती हरि हर ब्रह्मादिक ॥१॥
नाम तारी नाम साहाकारी । नामें उच्चारी रूपें तुझीं ॥२॥
ऐसीं अनंत नामें तुझीं न वर्णवती देवा । नामा म्हणे केशवा विनवीतसें ॥३॥

(१११) नाम हें पवित्र व मधुर होण्यानें हरिहर आणि ब्रह्मादिक देवतां ह्या त्याची गोडी घेतात ॥१॥ नाम हे तारक असून साहाकारी–साहाकारी होय. तुझ्या रुपाचे वर्णन नामोच्चारणानें होत असते ॥२॥ तुझ्या अनंतविध नामाचे वर्णन देवादिकांनाही होत नाहीं ह्मणून हे केशवा तुला मी विनंती करित आहे असे नामदेवराय ह्मणतात ॥३॥

नाम घेतां भगवंताचें । पाश तुटती भवाचे ॥१॥
जे जे नामीं रत झाले । ते ते केशवें तारिले ॥२॥
गणिका दुराचारी । नामें तारिली अहिल्या नारी ॥३॥
महा पापी अजामेळ । तोहि तारीला चांडाळ ॥४॥
नामें गजेंद्र तारिला । देवें मोक्षपदासी नेला ॥५॥
नाम घेतसे पांचाळी । उभा बाप वनमाळी ॥६॥
नामा म्हणें भाविकांसी । नाम घ्यारे अहर्निशीं ॥७॥

(११२) भगवंताचे नाम स्मरण केलें असतां भवबंधनें नष्ट होतात ॥१॥ ज्या कोणी नामनिष्ट भक्तानें प्रेमानें नामोच्चार केलें, केशवरायानीं त्या सर्वांचा उद्धार केला ॥२॥ महाचांडाळांत चांडाळ असा पापी अजामेळ त्यालाही नामोच्चरणानें सद्‌गती मिळाली ॥३॥ कुकर्मामध्यें निपूण असलेली गणीका होती खरी परंतु तिने नामोच्चरण केल्यानें तिचा उद्धार झाला तसेंच पतिच्या शापानें शिला झालेल्या अहिल्येला देवरायांनी आपल्या पद स्पर्शानें तिला पूर्व रूप दिलें ॥४॥ गजेंद्राचो हि मुक्तता नामोच्चरणानें झाली इतकेच नव्हे तर त्याला या देवरायांनी मोक्षपदावर आरूढ केलें ॥५॥ सति द्रौपदी ही नित्यशा नामोच्चार करित असल्यानें हा वनमाळी सतत तिच्या पाठीराखा झाला ॥६॥ अहो भाविक जनहो तुम्हीं सतत नामोच्चार करा असे नामदेवराय सांगतात ॥७॥

कुटिल कुबुद्धि कुपात्र कठोरी । अंगिकारी हरी अश्वत्थामा ॥१॥
अश्वत्थामा अंबऋषि दुर्योधन । शेवटीं अर्जुन हितकारी ॥२॥
मानी भावभक्ति आश्चर्य सकळ । *शंकर शीतळ होय नामें ॥३॥
नामा म्हणे आधीं नाममंत्र घोका । नाहीं भय धोक किमपिही ॥४॥

(११३) अश्वत्थामा हा कुटील, कुबुद्धी, कुपात्री आणि निर्दय अशा गुणाचा होता खरा परंतु हरिनें त्याला आश्रय दिला ॥१॥ अश्वत्थामा अंबऋषि दुर्योधनाचा यांनीं अंगिकार केला खरा परंतु शेवटीं तो अर्जुनाचा सहकारी झाला ॥२॥ आश्चर्यांत आश्चर्य म्हणजे भावभक्ती ही श्रेष्ठ होय या नामाच्या योगानें दाहयुक्त झालेला शंकर तोहि शीतळ झाला ॥३॥ आणि म्हणून तुम्ही प्रथमतः नामाचें चिंतन करा म्हणजे पुढें तुह्माला कोण-ताहि धोका होणार नाहीं असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

नामाचा प्रताप काय सांगू वाचे । अक्षय सुखाचें स्थान दावी ॥१॥
नामाविण कांहीं नाहीं नाहीं सार । साधरवें सत्वर भले नोहे ॥२॥
अजामेळ पाहा आजन्म पातकी । नामें गेला सेखी वैकुंठासी ॥३॥
कुंटिणी जारणी शूकामिसें गाय । वैकुंठासी जाय तत्क्षणीं ॥४॥
पाहा वाल्ह्या कोळी उफराटचा नामें । भविष्य संभ्रमें वाखाणिलें ॥५॥
नामा म्हणे किती सांगावा निर्धार । साधन सोपारें नाम एक ॥६॥

---

* टिप:-- शिव हलाहलें तापला । तोहि नामें शीतळ झाला ॥ १ ॥ नाम पावन पावन । याहून पवित्र आहे कोण ॥ २ ॥ शिवासी नामाचा आधार । केला कळिकाळ किंकर ॥ ३ ॥ मरण झालें काशीपुरी । तेथें नामेंचि उद्धरी ॥ ४ ॥ अठरा पुराणांची पोथी । नामविण नाहीं रीती ॥ ५ ॥ नामा म्हणे अवघीं चोरे । एक हरिनाम साई रें ॥ ६ ॥

(११४) अक्षय सुखाचे ठिकाण दाखविणारे अशा अपूर्व नाम प्रतापाचे वर्णन वाणीनें काय करावे ? ॥१॥ या नामा शिवाय इतरांत कांहीं तथ्य नाहीं आणि म्हणून ते त्वरित साध्य करा, त्याच्या शिवाय कल्याण होणार नाहीं ॥२॥ जन्मजात असलेला पापी अजामेळ तोहि शेवटीं नामोच्चरणानें वैकुंठास गेला ॥३॥ जार कर्मात निपुण असलेली गणीका खरी परंतु तीहि पोपटाला रामनाम शिकविण्याच्या निमित्तानें वैकुंठास गेली ॥४॥ वाल्या कोळी हा पापी खरा परंतु त्यांनीं उफराटया नामोच्चरणानें श्रीरामरायाच्या पुढील अवतारकार्याचें कथन रामायणद्वारा केले ॥५॥ नाम हेच सुलभ साधन आहे असे किती तरि प्रकारे सिद्ध करावे असें नामदेवराय म्हणतात ॥६॥

नाम न म्हणे आवडी । व्यर्थ वाचे बडबडी ॥१॥
जिव्हा नव्हे ती वाचक । भोगी आळसें नरक ॥२॥
करी आरालिया निंदा । परी न म्हणे गोविंदा ॥३॥
असत्या आवडी । सदा वाचेसी रोकडी ॥४॥
निंदेवांचूनि पातक । सत्य जाणा माझी भाक ॥५॥
गर्जे नामाचे पवाडे । पायां कळिकाळ पडे ॥६॥
निज सहज चैतन्य । नामा म्हणे नाम जाण ॥७॥

(११५) प्रेमानें नामोच्चार न करितां वाणीनें इतर वायफट शद्बाची चावटीं कां करित आहेस ?॥१॥ अशी व्यर्थ बडबड करणारी ती जिव्हा नव्हे किंतु आळसानें नरकवास भोगण्याला ती हेतू होय ॥२॥ अरे मुखा गोविंदाचे नाम न घेतां मनास येईल तशी इतराची निंदा वाणीनें करित आहेस ॥३॥ अशी कां तुझ्या वाणीला सतत मिथ्या भाषण करण्याची प्रत्यक्ष संवय लागली आहे ?॥४॥ खरे पहातां निंदे सारखें दुसरें पातक नाहीं. हे माझे भाषण सत्य समजा ॥५॥ नामाची कीर्ति गाईली असतां कळीकाळ हा चरणीं लोळण घेतो ॥६॥ नाम हे सहज निजचैतन्य-स्वरुप होय असें नामदेवराय म्हणतात ॥७॥

जयासी लागली रामनामीं गोडी । त्यानें केली प्रौढी परमार्थाची ॥१
कलिमाजी नाम सुलभ सोपारें । यालागीं आदरे नामीं धरा ॥२॥
आणिक साधनें आहें ती उदंड । साधितां वितंड कष्ट तेथें ॥३॥
सोवळें ओंवळें उंच नीच वर्ण । नाहीं येथें गुण दोष कांहीं ॥४॥
नामा म्हणे सर्व सिद्धांताचा भाव । प्राणियांचें दैव कोण जाणे ॥५॥

(११६) ज्यांना रामनामाविषयीं प्रेम प्राप्त झाले आहे त्यांनी परमार्थामध्यें मोठा पराक्रम केला असें समजावें ॥१॥ या कलीयुगामध्यें सुलभ सोपे असे नाम होय आणि म्हणून प्रेमानें नामाचे अवलंबन करा ॥२॥ परमार्थ प्राप्त होण्याकरितां इतर पुष्कळ साधनें आहेत खरीं परंतु तीं करित असतां अति कष्ट होतात ॥३॥ मात्र या नामोच्चरणामध्यें सोंवळेंपणा अथवा ओंवळेंपणा किंवा उंच वर्ण व हीनपणा अशा गुण-दोषांचा लवलेशही नसतो ॥४॥ असा अबाधित सिद्धांत आहे खरा परंतु या प्राण्याचे दैव असें कां विकृत झाले आहे की तो या पवित्र नामोच्चरणाकडे प्रवृत्त होत नाहीं असें नामदेवराय म्हणतात ॥५॥

नाम जींही उच्चारण केलें । तींहीं वैकुंठ साधिलें । भवसागर पार पावले । उद्धरले हरीभक्त ॥१॥ नाम दुर्लभ दुर्लभ । तारील हा पद्मनाभ । पुंडलिकें करोनियां स्वयंभ । केशव मूर्ति केली उभी ॥२॥ ऐसें अगाध हरी रूपडें । प्रत्यक्ष पुंडलिकापुढें । भक्तीकाज कैवाडें । भीमातीरीं उभा असे ॥ ३ ॥ वर्णावया न पुरे शेष । वेदां न घालवे कास । तेथें शास्त्र काय घेती भाष । रूपवर्णावया हरीचें ॥४॥ उद्धव अक्रूर द्वारपारीं । त्यासवें खेळले हरी । मग ते उद्धरिले अवधारी । ज्ञान देऊनि श्रीकृष्णें ॥५॥ नामा म्हणे ऐसें नाम । हरी कथेसी धरी प्रेम । तरी तुझा धन्य होईल जन्म । मनुष्य जन्मीं असतां ॥६॥

(११७) ज्या हरिभक्तानें प्रेमानें नामोच्चार केले ते हा भवसागर उल्लंघून वैकुंठास प्राप्त झाले व त्यांचा उद्धार झाला ॥१॥ नाम हे दुर्मिळांत दुर्मिळ होय, पद्मनाभ हा त्याच्या उच्चार करणाराला उद्धार करील. पुंडलिकरायानें स्वप्रेमानें केशव मूर्ति स्वयं उभी केली ॥२॥ हा देवराय भक्तांच्या कार्यार्थ पुंडलिकापुढें भिमे कांठीं उभा आहे ॥३॥ या हरिचेरूप वर्णन करण्यांत जेथें सहस्र मुखाचा शेष स्तब्ध झाला, वेदालाहि जो अगम्य आहे तेथें शास्त्रांचीं काय पाड असणार ? ॥४॥ हा हरि द्वापारामध्यें उद्धव व अक्रूर यांच्याशी प्रेमानें खेळ खेळला पश्चात या कृष्णानें त्यांना ज्ञान देऊन त्यांचा उद्धार केला ॥५॥ असें हे पवित्र नाम आहे आणि म्हणून हरिकथेविषयीं प्रेम धारण करा म्हणजें तुमचा मनुष्य-जन्म सुफल होईल असे नामदेवराय म्हणतात ॥६॥

हरिनाम पाठ हाचि भाव। हरी हरी हाचि देव । हरीविण न फिटे संदेह । सर्व जिवांचा जाण पां ॥ १ ॥ हरी तत्त्व ज्याचे देहीं । तोचि तरला येथें पाहीं । हरीविण या भव डोहीं। तरण कैसे घडेल ॥२॥ रामकृष्ण वासुदेवा। हाचि सर्व जीवांचा विसांवा। येथें पोकारूनियां धांवा। विठ्ठल नाम उच्चारी ॥३॥ नामा जपे हृदयीं सदा। रामकृष्ण हाचि धंदा । हरीनाम परमानंदा । हाचि जप जपतसे ॥४॥

(११८) हरिनाम पाठ हाच भाव होय व देव असेल तो हरि हरि होय. हरिनामोच्चरणा शिवाय सर्व जिवांचा संशय केव्हांहि नष्ट होणार नाहीं हे निश्चित समजावें ॥१॥ ज्याच्या अंतःकरणामध्यें हरिचे वास्तव्य आहे तोच तरला जातो. हरि उच्चारणा शिवाय या भवसागरांतून कसें उल्लंघन होईल बरे ? ॥२॥ रामकृष्ण वासुदेव हाच जिवाचें विश्रांती स्थल होय आणि म्हणून उच्च स्वरानें विठ्ठल नामाचा घोष करा ॥३॥ नामदेव हे या नामाचा अंतःकरणांत सतत उच्चार करित आहेत रामकृष्ण जप करणें हाच त्याचा धंदा आहे आणि ह्मणून तो परमानंद स्वरूप असा हरिनामाचा निश्चयशा जप करित आहे ॥४॥

भवाब्धि तारण रामकृष्ण नांव । रोहणीची मावं सकळ दिसे ॥१

नाम हेंचि थोर नाम हेंचि थोर । वैकुंठीं बिढार रामनामें ॥२॥

राम हे निशाणी जपतां अढळ । वैकुंठ तत्काळ तया जीवा ॥३॥

नामा म्हणे वैकुंठ नामेंचि जोडेल । अंतीं तुज पावेल नाम एक ॥४॥

(११९) या भवसागरांतून तरण्याकरितां रामकृष्ण हें नांव होय, नामोच्चारणाने हे दृश्य सर्व मृगजलवत प्रतित होते ॥१॥ नाम हेंच श्रेष्ट होय असें द्विरुक्तीने सांगत आहे कारण या रामनामाचे योगे वैकुंठांत वास्तव्य होते ॥२॥ राम नाम हीं ध्वजा होय, त्याचा निष्ठेनें जप केला असतां त्या जिवाला त्वरित वैकुठ प्राप्त होईल ॥३॥ अंतःकाळी नाम हेच साह्यभूत होऊन ह्या एका नामानें वैकुंठाची प्राप्ती होईल असे नामदेवराय ह्मणतात ॥४॥

तप तीर्थ दान हें सर्व कुवाडें । नाम एक वाड केशवाचें ॥१॥

मुमुक्षु साधकी सदा नाम गावें । तेणेंचि या व्हावें अखंडित ॥२॥

विपत्तीचे बळें न होतां विन्मुख । नाम मात्र एक धरा वाचे ॥३॥

जीवन्मुक्त शुकमुनी ध्रुवादिक । तयासी आणिक ध्यास नाहीं ॥४

नामयाची वाणी अमृताची खाणी । घ्यावी आतां धणी सर्वत्रांहीं ॥५॥

(१२०) नाम हेच सामर्थ्यवान होय व इतर जी जप तप दानादिक साधने ही कष्ट दायक होत ॥५॥ मुमुक्षु आणि साधकानें नामाचें गान करावे व पूर्णता प्राप्त करून घ्यावी ॥२॥ अनेक कष्टाच्या योगें न दवतां वाणीला नामाचाच छंद करा ॥३॥ शुक, मुनी, ध्रुवादिक जे जीवमुक्त भक्त झाले त्यांना नामा शिवाय दुसरा ध्यास नव्हता ॥४॥ नामदेवरायाची वाणी ह्मणजे जणूंकाय अमृताची खाणच होय, तिचा स्वाद सर्वत्रांनी पोट-भरून घ्यावा ॥५॥

केशव नाम गाय केशव नाम गाय। केशव नाम गाय कामधेनु ॥१
वेणुनादीं चरे पाणी पी भीवरे। ती गाय हंबरे भक्तांलागीं ॥२॥
भक्ती सुखें धाय प्रेमें ते पान्हाय। भुकेलिया खाय पातकांसी ॥३
नामा म्हणे गाय ते पंढरीस आहे। पापिया न साहे पाठीलागे ॥४॥

(१२१) केशवरायाचें नाम म्हणजे जणूं कामधेनुच होय. केशवाचे नाम हे जणूंकाय गायच होय असे द्विरुक्तीने सांगतो ॥१॥ ही गाय वेणूनादाच्या ठिकाणीं चरते आणि भिवर तिर्थाचे पाणी पिते अशी ही गाय भक्ता करितां हंबरते ॥२॥ भक्तीच्या सुखानें तृप्त होते आणि प्रेमानें पान्हावते आणि तिला भूक लागली असतां पापाचे भक्षण करिते ॥३॥ अशी ही गाय पंढरीक्षेत्री वास्तव्य करिते मात्र पापी पुरुषांचें ती वारेहि सहन करित नाहीं. किंबहुना ती त्याचा पाठलाग करिते असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

आदरे जपतां केशवाचें नाम। वैकुंठ हें धाम पायां पडे ॥१॥
आणीक सायास करूनि कदापि। चौऱ्यांशींच्या सिपीं गुंफो नका २।
याजसाठीं हरिनाम निरंतरी। तारील निर्धारीं भाक माझी ॥३॥
भाव भक्ति क्रिया नलगे आणिक ! कीर्तन तारक म्हणे नामा ४।

(१२२) प्रेमानें केशवरायाचे नामाचा जप केला असतां वैकुंठ धाम हे त्याच्या चरणीं लोळण घेते ॥१॥ तुम्ही इतर कष्टतर साधनाचे अवलंबन करून चौऱ्यांशी योनीच्या शिपल्यामध्यें गुंतू नका ॥२॥ तुमच्या उद्धाराला समर्थ एक हरिनामच आहे असे मी शपथ घेऊन सांगतो ॥३॥ नामसंकिर्तन करणे हेंच तारक आहे. इतर भावभक्ती क्रिया ही व्यर्थ होत-निष्प्रभ होत, असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

केशव म्हणता क्लेश जातातीपरते। त्याहूनि सरतें आणिक नाहीं ॥१।
वेद कां पढसी शास्त्रें कां शिणसी ।उदंड वाचेसी हरी म्हणा ॥२॥
याहूनि पैं सार नाहीं हो दुसरें। भीष्में युधिष्टिर उपदेशिला ।३।
नामा म्हणे धरा केशवीं विश्वास। तुटे गर्भवास नामें एकें ॥४॥

(१२३) केशव नामाचा उच्चार करितांच कष्ट दूर होतात त्याची बरोबरी करणारें असें दुसरे साधन नाहीं ॥१॥ बाबारें वाणीनें अखंड हरिनाम उच्चारा. व्यर्थ कां वेदाध्ययन व शास्त्राच्या पठणानें शिणवटतोस ॥२॥ याच्या शिवाय दुसरें साधन नाहीं असें भीष्मानें युधिष्ठिरास उपदेश केला ॥३॥ तुम्ही, केशवरायांच्या ठायीं पूर्ण विश्वास ठेवा. तुम्ही या एका नामाच्या योगें गर्भवासांतून मुक्त व्हाल असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

शेतीं बीज नेतां थोडें । मोठें आणिताती गाडे ॥१॥
एक्या नामें हरि जोडे । फिटे जन्माचे सांकडें ॥२॥
भाळे भोळे जन । सर्व तरती कीर्तनें ॥३॥
नामा म्हणे नेणें मूढें । नाम स्मरावें साबडें ॥४॥

(१२४) शेतामध्यें पेरण्याकरितां नेलेले बीज थोडे खरें परंतु पीक झाले असतां गाडेचे गाडे धान्य येते ॥१॥ फक्त एका नामाच्या योगें हरिची प्राप्ती होते इतकेंच नव्हें तर जन्म मरणाची संकटे दूर होतात ॥२॥ नामसंकिर्तनाच्या योगे अज्ञ मूर्ख इत्यादिक सर्व जनांचा उद्धार होतो ॥३॥ सुलभ अशा नामाचें स्मरण करावे याची मूर्ख लोकांना पूर्ण जाणीव नसतें असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

तोडीं हें बीरडें मोह ममता आधी । विषय बाधा कधीं गुंफों नको ।१
असे घराश्रमीं भजे सर्वांभूतीं । मी माझे पुढती म्हणो नको ॥२॥
तूं तंव लटिका आलासी कोठूनी । मी माझें म्हणोनी म्हणतोसी ३।
नामा म्हणे मूळ राम परब्रह्म । जगाचा विश्राम त्यासी भजे ४।

(१२५) प्रथम तूं या मोह ममतेचे बंधन तोड आणि विषय सुखाच्या चक्रामध्यें कधींहि सांपडूं नकोस ॥ १ ॥ गृहस्थाश्रमामध्यें असतांहि सर्वत्र परमात्मा आहे असा भाव ठेव आणि मी माझे असा उच्चार करूं नकोस ॥२॥ तूं पहातां मूळचा खोटा असें असतां कोठून रे हा मीपणाचा संबंध आणला, आणि त्यायोगें मी माझें असे बरगळतोस ॥३॥ वस्तुतः पहातां जगाचे विश्रामधाम हे श्रीराम परब्रह्म होय त्याचे भजन करा असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

मी म्हणतां अहंता होईल पूर्णता । भजन सर्वथा न घडे येणें १।
आपुलें आपण विचारावें धन । हरि हाचि पूर्ण भजें करि ॥२॥
हेंचि भजन थोर करीं निरंतर । नाम हें सधर मनें गिळी ॥३॥
नामा म्हणे अपार नाम पारावार । श्रीराम सुंदर जप करी ॥४॥

(१२६) मी म्हणण्यानें अहंकाराचा विकास होईल परंतु अशा कृतिनें भजन मात्र होणार नाहीं ॥१॥ आपला ठेवा कोणता आहे याचा आपणच अंतर्मुख होऊन विचार करावा. हरि हाच पूर्ण होण्यानें त्याचे भजन कर ॥२॥ नाम हेंच श्रेष्ट आहे, मनानें त्याचे आकलन कर, आणि असे हे श्रेष्ठ भजन सतत कर ॥३॥ नाम हेंच अपरंपार श्रेष्ट आहे आणि म्हणून सर्व सुन्दर अशा श्रीरामाचा जप कर असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

विषय खटपट आचार सांगसी । विठ्ठलीं न भजसी अरे मूढा ॥१॥
पूर्ण ब्रह्म हरी विठ्ठल श्रीहरी । अंतीं हा निर्धारीं तारील सत्य २।
न लगे सायास करणें उपवास । रामाचा विश्वास ऐसा धरी ॥३॥
नामा म्हणे नाम धरीं तूं सप्रेम । विठ्ठल हाचि नेम दिननिशीं ४।

(१२७) हे मुर्खा विषयाच्या खटपटीचे रसभरित वर्णन करितोस मात्र विठ्ठलरायाचे भजन करित नाहींस ॥१॥ जो पूर्ण परब्रह्म हरि, विठ्ठल श्रीहरि आहे तोच खरोखर तुला निदानी तारक होईल ॥२॥ श्रीरामाच्या ठायीं पूर्ण विश्वास ठेव मग तुला उपवासादिक सायासाचि कांहीं आवश्यकता राहणार नाही ॥३॥ प्रेमानें श्रीरामाचा ध्यास धर आणि रात्रंदिवस विठ्ठल नामोच्चाराचाच नियम कर असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

एकांत एकला सर्व आहे हरी । ऐसेंचि अहर्निशीं ध्याइजे तूं ॥१॥
सर्वांभूतीं विठ्ठल आहे आहे साचें । हें तंव वेदींचें वचन जाण २।
मार्ग हाचि सोपा गेले मुनिजन । जनीं जनार्दन हाचि भावो ॥४॥
नामा म्हणे नाम प्रेम उच्चारण । सर्वही कारण होईल तुझें ४।

(१२८) हरि हा एकान्त असा एकला पूर्ण आहे. अशा प्रकारें त्याचे सतत ध्यान धर ॥१॥ खरोखर पहाता विठ्ठल हा सर्व भूतमात्रामध्यें आहे असे हें वेदांचे प्रमाण आहे ॥२॥ जनी जनार्दन आहे अशाच सुलभ शुद्ध मार्गाचे अवलंबन मुनीजनानें केले ॥३॥ तुम्ही नामाचें प्रेमानें उच्चारण करा तेच तुम्हाला सर्व प्रकारें हितकर होईल असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

उपदेश सुगम आईकरे एक । नाम हें सम्यक विठ्ठलाचें ॥१॥
जनीं जनार्दन भावचि संपन्न । विठ्ठल उद्धरण कलीमाजी ॥२॥
साधेल निधान पुरेल मनोरथ । नामेंचि कृतार्थ होसी जना ॥३॥
नामा म्हणे नाम घेई तू झडकरी । पावसी निर्धारी वैकुंठपद ॥४॥

(१२९) विठ्ठलरायाचे सम्यक नाम घेणें हाच सुलभ असा उपदेश तुला सांगत आहे त्याचे श्रवण कर ॥१॥ जनी जनार्दन असा पूर्ण भाव धर, कारण कलियुगामध्यें विठ्ठलराय हाच तारक आहे ॥२॥ या योगें तुला निज ठेवा सांपडेल आणि तुझें मनोरथ सपूर्ण होतील. अहो जन हो नामाच्या योगेच तुम्ही कृतार्थ व्हाल ॥३॥ आणि ह्मणून त्वरीत नामोच्चार करा तुम्हाला याच्या योगें निश्चये करून वैकुंठपद प्राप्त होईल असें नामदेराय ह्मणतात ॥४॥

एकचि क्षरलें एकचि देखिलें । ब्रह्म हें संचरलें हरिनामें ॥१॥
एक एकाकार सर्वही आकार । राम हा साकार सर्वांघटीं ॥२॥
असोनि निराळा सुमनाचा वास । तैसा हृषिकेश जिवां सकळां ३।
नामा म्हणे सुमन कळिकाळें एक । तेंचि निजसुख घेई जना ॥४॥

(१३०) ऐक्याचा विकास काय अथवा ब्रह्म हेंच सर्वत्र व्याप्त आहे अशा अद्वैत रूपानें पहाणें काय याचे हरि नामाच्याच ठायीं समावेशन होते ॥१॥ हा सर्व अकार अद्वैत रूपानें अविष्कारलेला असला तरी आमचा हा राम साकार रूपानें आहे ॥२॥ फुलांतील सुगंधी ही त्याहून निराळी असते, तद्वत, हा हृषीकेषी सर्व जिवाहून निराळा आहे ॥३॥ अनेक पाकळ्या असल्या तरीं पुष्प एक असते. अहो जनहो अशा या निज सुखाचा अनुभव घ्या असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

प्रसन्न वदन सदावेळ आहे । कां करिसी उपाय कर्म जाड ॥१॥
मंत्रांचा पै मंत्र बीज नाम हरीचें । तेंचि हें शिवाचें रामनाम ॥२॥
तुटेल भवकंद जासील निजपंथें । म्हणीं तूं दुश्चितें करीसी चित्त ॥३॥
नामा म्हणे भजन सर्व हरीचें करीं । होईल बोहरी प्रपंचाची ॥४॥

(१३१) मुख प्रसन्न आहे आणि सवडहि पुष्कळ आहे अशा समयीं अनेकविध जड कर्मांचा उपाय कां करित आहेस ? ॥१॥ हरिनाम हे मंत्रांतील बीजभूत मंत्र होय आणि हे रामनाम शिवाचें ध्येय होय ॥२॥ त्याचे अवलंबन केलें असतां सर्व बंधनातून मुक्त होऊन निजस्थानाला प्राप्त होशील आणि म्हणून चित्ताला विक्षेप आणूं नका ॥३॥ नित्यकाळ हरिचे भजन करा त्या योग या प्रपंचाची निवृत्ती होईल असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

एक तत्त्व हरी निर्धार तूं धरी । प्रपंचा बोहरी एका नामें ॥१॥
अच्युत गोविंद परमानंद छंद । नित्य तो आल्हाद हरिनामीं ॥२॥
ऐसा तूं विनटें हरी नाम पाठें । जासील वैकुंठें तात्काळीच ॥३॥
नामा म्हणे तत्त्व नाम गोविंदाचें । हेंचि धरी साचें येर वृथा ४।

(१३२) हरि हेच एक तत्व आहे, त्याच्या ठिकाणीं निश्चय धरा त्या एका नामाच्या योगें प्रपंचाचा नाश होईल ॥१॥ परमानंदरूप जो अच्युत गोविंद त्याचा छंद धरा. हरिनामाच्या योगें नित्यानंद प्राप्त होईल ॥२॥ अशा दृढ निश्चयानें हरिनामाच्या पठणामध्यें रत होण्यानें त्वरित वैकुंठास प्राप्त व्हाल ॥३॥ गोविंदाचे नाम हेच एक तत्व आहे त्याच्याच ठिकाणीं निश्चय करा. त्याहुन भिन्न सर्व व्यर्थ आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

शरीर संपत्ती मायेचे टवाळ । वायाच पाल्हाळ मिरवितोसी ॥१॥
नाम हेंचि तारी विठ्ठल निर्धारी । म्हणे हरी हरी एकी हेळा ॥२॥
स्मरतां गोपाळनाम वंदील काळ यम । न लगती नेम मंत्रबाधा ३।
नामा म्हणे सार मंत्र तो उत्तम । राम हेंचि नाम स्मरें ॥४॥

(१३३) शारीरादिक संपत्ती ही मिथ्या असतां व्यर्थ. त्यांची प्रौढी कां मिरवीत आहेस ? ॥१॥ विठ्ठल नाम हेंच तारक होण्यानें त्याच्या ठायीं निश्चय कर आणि हरि हरि या नामाचा त्वरित उच्चार कर ॥२॥ गोपाल नामाचा उच्चार केला असतां काळ यमादिक तुझें वंदन करतील, आणि इतर नियम मंत्रादिकांचा उपसर्ग होणार नाहीं ॥३॥ नाममंत्र हा सारभूत असून उत्तम आहे आणि म्हणून रामनामाचेच स्मरण कर असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

सर्वांमाजी सार नाम श्रीहरीचें । अखंडीत वाचे जप करी ॥१॥
निशिदिनीं हृदयीं ध्यातो शूळपाणी । पाविजे निर्वाणीं मोक्षपद ॥२
नामा म्हणे ऐसें स्मरे कां निधान । पावेल साधन वैकुंठीचें ॥३॥

(१३४) श्रीहरिचे नाम हेंच सर्वांमध्ये सार आहे आणि म्हणून त्याचेच मुखानें अखंडित स्मरण कर ॥१॥ शंकर हा ही आपल्या हृदयामध्यें याचेच रात्रंदिवस ध्यान करितो. याच्या योगें शेवटीं तूं मोक्षपदाला प्राप्त होशील ॥२॥ वैकुंठाला प्राप्त होण्याचे साधनभूत जो ठेवा अशा हरिचे स्मरण कर असे नामदेवराय म्हणतात ॥३॥

विठ्ठलासी पाहे विठ्ठलासी ध्याये । विठ्ठलासी गाये सर्वकाळ ॥१॥
विठ्ठल हा वृत्ति विठ्ठल जपणें । चित्त वित्त मनें सर्वकाळ ॥२॥
सबाह्य विठ्ठल दाटे घनवट । दशदिशा अफाट विठ्ठलची ॥३॥
नामा म्हणे तुम्ही विठ्ठल होऊन । अभंग भजन करीतसां ॥४॥

(१३५) अहर्निशी विठ्ठलालाच पहा व विठ्ठलाचेच ध्यान कर तसेंच विठ्ठलाचेच गान कर ॥१॥ चित्त वित्त आणि मनानें अहर्निशी विठ्ठलाचाच जप कर किंबहुना जीवन विठ्ठलमय कर ॥२॥ हा विठ्ठल अंतर्बाह्य सर्वत्र व्याप्त आहे, अफाट अशा दाही दिशांमध्यें विठ्ठलराय हाच दाटलेला आहे ॥३॥ तुम्ही स्वतः विठ्ठलराय होऊन नित्यशः भजन करा असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

सार पैं नाम विठ्ठलाचें आहे । दिननिशीं सोय मना लावी ॥१॥
गुंपेजेल मन जोडती पाउलें । तुटती घेतले मायाजाळ ॥२॥
नामचि कारण जप पै सफळ । उद्धार निर्मळ सकळ जीवां ॥३॥
नामा म्हणे तो हा बिठ्ठल पंढरिये । नाम अमृतमय चराचरीं ।४

(१३६) या विश्वामध्यें सारभूत असें विठ्ठलाचे नाम होण्यानें तुझ्या मनाला त्याचा छंद लाव ॥१॥ त्यायोगें तुझें मन विठ्ठलाचे पायीं रममाण होईल आणि मायाजाळाचीं बंधनें नष्ट होतील ॥२॥ फलद्रुप असे नामच होय आणि ते सर्व जीवांना शुद्ध करणारें आहे ॥३॥ तो विठ्ठलराय पंढरी क्षेत्री असून त्याचे नाम या विश्वामध्यें अमृतमय असे आहे असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

विठ्ठनामीं आळस न करीं गव्हारा । वांयांचि येरझारा शिणतोसी १
हरी उच्चारण करी हा विचार । नामचि साचार उद्धरण ॥२॥
मी म्हणतां अहंता वाढे हे सर्वथा । परी भजना परता नाहीं मार्ग ।३
मायाजाळ विषय तोडीं तोडीं सांठा । विठ्ठल नाम पाठा बोळगे जना ॥४॥
सर्व हें लटिकें मोहजाळ फिकें । नामेंविण एके नाहीं दुजें ॥५॥
नामा म्हणे उपदेश भजें केशवास । वैकुंठ निवास बोळगें तुज ।६

(१३७) अरे मूर्खा विठ्ठल नाम उच्चारण्यास आळस करूं नकोस. कां व्यर्थ या जन्म मृत्युच्या चक्रामध्ये भ्रमण करित आहेस ? ॥१॥ हरि उच्चार करण्याचाच विचार कर कारण नाम हेंच खरोखर उद्धारक आहे ॥२॥ मी म्हणण्यानें अहंतेचा विशेष अविष्कार होईल, परंतु भजना शिवाय मुक्त होण्याला दुसरा मार्ग नाहीं ॥३॥ हे जना, हे मायाजाळ व विषयाचा संग्रह तोड आणि विठ्ठल नामाच्या पठणाकडे वृत्तीला आकर्षित कर ॥४॥ हा सर्व दृश्य पसारा मिथ्या असून हें मोहजाळ तुच्छ होय. या नामा शिवाय श्रेष्ठ असे अन्य नाहीं ॥५॥ केशवरायाचे भजन कर आणि वैकुंठ निवासी याला शरण जा हाच मुख्य उपदेश आहे असे नामदेवराय म्हणतात ॥६॥

तुझें तुज सांकडे पडलें थोर कोडें । तें करीं माजीवडे ब्रह्मार्पण १।
ब्रह्म हरी ध्यांई मन ठेवीं ठायीं । विठ्ठलाच्या पायीं दिननिशीं २।
अनुभव रहणी विठ्ठल निशाणी । घडेल पर्वणी नित्यकाळ ॥३॥
नामा म्हणे सुघड मन करीं वाड । इंद्रियांची चाड धरूं नको ॥४॥

(१३८) तूं आपल्या कल्पनेला वश होण्याने हे संकट उभें राहिले असून तें कोडें वजा झालें आहे. ते सर्व ब्रह्मार्पण कर ॥१॥ ब्रम्हरूप असलेला हरि त्याचे ध्यान कर आणि विठ्ठलाचे पायीं अखंड मन स्थिर कर ॥२॥ अनुभवानें क्रिया कर आणि विठ्ठलाची निशाण धर त्या योगें सतत पर्वणी घडेल ॥३॥ इंद्रियांकित न होतां शुद्ध मनाचा विकास कर असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

नामाचेनि पाठें जातील वैकुंठें । तो पुंडलीक पेठे प्रगट असे ।१॥
विठ्ठल विठ्ठल मंत्र सांगतसे शास्त्र । आणिक नाहीं शस्त्र नामेंविण ॥२॥
पुराण व्युत्पत्ति न लगती त्या श्रुती । हरीनाम पंथीं मुनि गेले ।३
नामा म्हणे हरीं नामेंचि उद्धरी । जन्माची येर झारी हरे नामें ।४

(१३९) ज्याच्या नामोच्चरणानें वैकुंठ प्राप्त होतें ते पुंडलीकाच्या पेठेंमध्यें (पंढरी क्षेत्रीं) उभे आहे ॥१॥ शास्त्र हें विठ्ठल विठ्ठल मंत्राचाच आदेश देत आहे. नामा शिवाय दुसरें शस्त्र नाहीं ॥२॥ मुनीजन या हरिनामाच्या मार्गानें गेलें असल्यानें तेथें पुराण व व्युत्पत्ति व श्रुति याची आवश्यकता नाहीं ॥३॥ नाम हे उद्धारक आहे व नामं हेच जन्म मृत्युच्या चक्रांतून मुक्त करणारे आहे असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

ज्याचे मुखीं नाम तोचि एक धन्य । त्याचें शुद्ध पुण्य इये जनीं ।१
नामसंकीर्तन नित्य नाम वाचे । दहन पापाचें एका नामें ॥२॥
ऐसा जो अखंड जपे रामनाम । नाहीं तयासम दुजें कोणी ॥३॥
नामा म्हणे नाम विठ्ठलाचें जपा । हाचि मार्ग सोपा परब्रह्मीं ।४

(१४०) ज्यांच्या मुखामध्यें नाम आहे तोच धन्य असून जगामध्यें त्याचेच शुद्ध पुण्य होय ।।१।। नाम संकिर्तन करणारा आणि नित्य वाचेने नाम घेणारा त्याच्या सर्व पापांचा नाश नाममात्रें करून होतो ।।२।। अशा प्रकारें जो अखंड राम नामाचा जप करितो त्याला दुसरी उपमा देता येत नाहीं ।।३।। परब्रम्ह प्राप्त होण्याला हाच मार्ग सुलभ आहे आणि म्हणून विठ्ठल नामाचा जप करा असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

सकळ साधनाचें सार । रामकृष्ण हा उच्चार ।।१।।
म्हणा गोविंद नरहरी । सकळ जीवा तोचि तारी ।।२।।
नाम घेतां हरी माधव । तरताती सकळ जीव ।।३।।
नामा म्हणे केशव वाचे । धन्य जीवीत वैष्णवांचें ।।४।।

(१४१) रामकृष्ण नामोच्चार करणें हेंच सर्व साधनात श्रेष्ट आहे ।।१।। तोच सर्व जिवांना तारक असल्यानें गोविंद नरहरी अशा नामाचा उच्चार करा ।।२।। हरि माधव अशा नामाचा उच्चार केला असतां सर्व जीव तरले जातात ।।३।। जे वैष्णव वाणीने केशवाचे नाम घेतात त्यांचे जिवन धन्य होय असे नामदेवराय म्हणतात ।।४।।

रामकृष्ण माळ घाली कां अढळ । तुटेल भवजाळ मायामोह ।।१।।
होशील तूं साधु न पवसी बाधु । पूर्ण ब्रह्मानंद पावेल तुज ।।२।।
जपतां रामनाम पुरती सर्व काम । आदि अंतीं नेम साधेल तुंज ३।
नामा म्हणे कृतार्थ पूर्ण मनोरथ । न लगती ते अर्थ मायाफांसे ४।

(१४२) रामकृष्ण या नामाचे अखंड अनुसंधान केलें असतां मोह मायादिक संसार बंधनें नष्ट होतील ।।१।। अशा साधनांचे अवलंबन केले असतां तुला साधुत्व प्राप्त होऊन कोणतिहि बाधा स्पर्श करणार नाहीं इतकेच नव्हे तर तुला पूर्ण ब्रम्हानंद प्राप्त होईल ।।२।। राम नामाचा जप केला असतां तुझ्या सर्व कामना पूर्ण होऊन तुजला नित्य नियम हि आदि अंती साध्य होतील ।।३।। तुझी मनोकामना पूर्ण होऊन कृतार्थ होशील आणि तुला अर्थ व मायादिकांचे गळफांस लागणार नाहीं असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

नको नको माया सांडी लवलाह्या । पुढील उपाया झोंबें कांरे १।
रामनाम म्हणें तुटेल बंधन । भवबंध मोचन एका नामें ॥२॥
स्मरतां पतीत उद्धरले यथार्थ । नाम हाचि स्वार्थ तया झाला ३।
नामा म्हणे जप करी तूं अमूप । नामें चुकवी खेप ह्ये जनीं ।४

(१४३) मायेंच्या सौंदर्याला न भुलतां तिचा त्वरीत त्याग कर, व पुढील कर्तव्याचा प्रयत्न कर ॥१॥ राम नामोच्चार करण्यानेंच सर्व बंधनें नष्ट होतील हेच एक नाम संसार बंधनाचे निवृतक आहे ॥२॥ पापी जीवाचा उद्धार केवळ नाम स्मरणानें झाला व नाम हेच त्यांचा स्वार्थ झाला ॥३॥ हा जप अगणीत कर, या रामनामाच्या योगे जन्म मृत्यु परंपरा नष्ट होतील असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

करूं हें कीर्तन राम नारायण । जनीं जनार्दन हेंचि देखें ॥१॥
जगाचा जनक रामकृष्ण एक। न करितां अविवेक स्मरें राम ॥२॥
तुटेल भवजाळ कां करिसी पाल्हाळ। सर्व मायाजाळ इंद्रीय बाधा।३।
नामा म्हणे गोविंद स्मरें तूं सावध। न्व्हे तुज बाध नाना विघ्नें ॥४॥

(१४४) राम नारायणाचेच किर्तन करूं आणि जनार्धन हाच विश्वामध्यें व्याप्त आहे असे पाहूं ॥१॥ श्रीरामकृष्ण हाच जगोत्पादक आहे आणि म्हणून अविवेकाचा त्याग करून श्रीरामाचे स्मरण करा ॥२॥ या योगेंच भवबंधनें नष्ट होणारी आहेत तेव्हां अन्य शद्वाची चावटी कां करित आहांत ? कारण नाम स्मरणाशिवाय इतर सर्व मायाजाळ असून इंद्रियांना बाधा देणार आहेत ॥३॥ तूं सावध हो आणि गोविंदाचे स्मरण कर. त्यायोगें विघ्नाचा आणि दुःखाचा तुला स्पर्श होणार नाहीं, असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

तपांचें पैं तप राम हें अमुप । करीं कांरे जप राम नामीं ॥१॥
रामकृष्ण म्हणे वाचे नारायण । तुटेल बंधन यमपाश ॥२॥
साधील साधन होती कोटी यज्ञ । नाम जनार्दन जप करी ॥३॥
नामा म्हणे जिव्हे नाम स्मरण करी । म्हणे नरहरी एक भावें ४।

(१४५) श्रीराम हाच तपाच्या अगणित राशी होय आणि म्हणून रामनामाचा जप करा ॥१॥ श्रीरामकृष्ण, नारायण अशा नामाचा वाणीनें उच्चार केल्यानें यमपाशाची बंधनें नष्ट होतील ॥२॥ जनार्दन या नांवाचा जप केला असतां अनेक साधनें हस्तगत होऊन कोटयावधी यज्ञाचे फळ लाभेल ॥ ३ ॥ हे जिव्हे तूं नामाचा जप कर व एकविध भावनेनें नरहरी असा उच्चार कर असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

म्हणा श्रीराम जयराम । भवसिंधु तारक नाम ॥१॥
नाम पतीत पावन । नाम जिवांचें साधन ॥२॥
नाम शिवाचें ध्यान । नाम नारदा गायन ॥३॥
नामा म्हणे हरीचें नाम । नाम तारक परब्रह्म ॥४॥

(१४६) भवसागरांतून मुक्त करणारे अशा श्रीराम जयराम या नामाचा उच्चार करा ॥१॥ नाम हे पतितांना पावन करणारे होय. जिवांना परमार्थाचे मुख्य साधन नाम होय ॥२॥ नाम हे शिवाचे ध्यान असून नारद हेहि या नामाचे गायन करितात ॥३॥ परब्रह्मरूप असा जो हरि त्याचेच नाम हे तारक होय असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

सोपा हा सुगम उपावो परीस । धरी तूं विश्वास नाम मुहीमें ॥१॥
नाम हेंचि गंगा नाम हेंचि भीमा । अंतरीं श्रीरामा जपिजेसु ॥२॥
अमृत सुरस रामनाम एक । वाचेचें वाचक मनःकरीं ॥३॥
नामा म्हणे सुरस सेवीं सुधारस । ध्यायीं केशवास दिंननिशीं ॥४॥

(१४७) नाम महात्म्याच्या ठिकाणी पूर्ण श्रद्धा ठेव. हा मार्ग सुलभ आणि धोपट होण्यानें याचें अवलंबन कर ॥१॥ नाम ही गंगा तसेंच नाम ही भीमा होय, म्हणून हृदयांत श्रीरामाचा जप कर ॥२॥ रामनाम हे मधूर असें अमृतरूप होय. एकाग्र मन करून वाचेने त्याचा उच्चार कर ॥३॥ रामनाम हे मधूर अमृत होय म्हणून नित्यशा केशवरायाचे ध्यान करं असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

भावेंचि भजन जनीं जनार्दन । नित्य हें वचन रामनाम ॥१॥
खुंटतील योनी तुटेल यातना । भक्ति नारायणा पावेल तुझी ॥२॥
स्मरें सदा कांरे न लगती पाल्हाळ । वसीजे गोपाळ सर्वांभूतीं ॥३॥
नामा म्हणे ब्रह्म सर्व हरी । येकु चराचरीं जनार्दन ॥४॥

(१४८) जगामध्यें जनार्दनाची व्याप्ती आहे अशा भावनेनें भजन करा आणि वाचेनें रामनाम याचा सतत जप करा ॥१॥ त्यायोगें जन्ममृत्यूच्या अनंत योनीचें दुःख निवृत्त होऊन तूं केलेले भजन नारायणास मान्य होईल ॥२॥ सर्व भूतमात्रामध्यें ज्याचे वास्तव्य आहे त्याचे नित्यशः स्मरण करा, अन्य बडबड करूं नका ॥३॥ ब्रह्मरूप हरीच सर्वत्र विलासलेला आहे किंबहुना या चराचरामध्यें जनार्दनच व्याप्त झालेला आहे असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

सर्वांभूतीं भजन हेंचि पैं चोखडें । ब्रह्म माजीवडे करोनी घेई ॥१॥
सफळ सर्वदा जप हा गोविंदा । न पावाल आपदा नाना योनी ॥२॥
नाम संजीवनी अमृत सरिता । परिपूर्ण भरिता सिंधु ऐसा ॥३॥
नामा म्हणे चोखडें नाम हेंचि गाढें । चुकवील कोडें जन्ममरण ॥४॥

(१४९) 'सर्व भूतमात्रामध्यें एक हरिच आहे' असा बोध होणें हेच शुद्ध भजन होय. अशा भजनाने ब्रह्मरूपता आत्मसात करा ॥१॥ गोविंदाचा जप करणें हे नित्यशः फलद्रुप देणारे आहे, त्याचें स्मरण केल्यानें तुम्हाला अनंत योनीचे होणारे दुःख स्पर्श करणार नाहींत ॥२॥ नाम हें संजिवनी असून ते जणूं काय अमृताची नदीच होय किंबहुना तो पूर्ण सागर होय ॥३॥ शुद्ध नाम हेच श्रेष्ट होय, त्या योगें जन्म मृत्यूचे दुःख नष्ट होईल असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

जळाचा जळबिंदु जळींच तो विरे । तैसें हें विचरे पांचा ठायीं ॥१॥
जीवशीव उच्चार राम हें मधुर । जिव्हेसी उच्चार रामनाम ॥२॥
रामनाम तारक शिव षडाक्षरी । तैसीं वाचा करी अरे मूढा ॥३॥
नामा म्हणे ध्यान शिवाचें उत्तम । मंत्र हा परम रामनाम ॥४॥

(१५०) जळांतील तरंग हा जसा जळांत विरघळतो तद्वत हा पंच भूतात्मक देह पंचभूतांमध्यें समावेशन होतो ॥१॥ श्रीरामाचें मधूर नामोच्चारण करणे हेच जीव शिवांना योग्य होय. रामनाम हाच जिव्हेचा विषय होय ॥२॥ रामनाम आणि शिव षडाक्षरीं मंत्र हाच तारक होय. अरे मूर्खा वाणीनें त्याचा उच्चार कर ॥३॥ रामनाम हा परम मंत्र असून ते शीवाचे उत्तम ध्यान होय असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

नीसुगा नीदसुरा झणीं तूं बा होसि । नाम हृषकेशी घाली मुखीं ।१।
गोविंद हरे कृष्ण विष्णु हरे । अच्युत मुरारे जनार्दन ॥२॥
करितां नामपाठ चुकती भवजाळ । तुटतील ते वेल मायामोह ॥३॥
नामा म्हणे ऐसा उपाव सुगम । दिननिशीं नेम राम म्हणे ॥४॥

(१५१) हे कोडग्या, तूं असा भ्रमिष्टा सारखा कां होतोस ? मुखानें हृषीकेश या नामाचा उच्चार कर ॥१॥ गोविंद हरे कृष्ण विष्ण हरि अच्युत मुरारी जनार्धन ॥२॥ अशा नामाचा उच्चार केला असतां संसार पाशातून मुक्त होऊन माया मोहादिक वेली नष्ट होतील ॥३॥ असे हे सुलभ साधन होण्यानें सतत श्रीराम म्हणण्याचा नियम कर असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

केशवाचे प्रतापें गोसावी होसी । दास्यत्व करोनि सर्वस्व पोशी ॥१॥
अर्जुनाचा सारथी बळीचा सांगाती । द्रोपदीच्या आकांतीं धांवोनि पावे ॥२॥
चातका जळधरू मच्छा जीवन नीरू । प्रल्हादा कैवारू दास म्हणोनि ॥३॥
नामा म्हणे तुम्ही न करा आळसु । नाममंत्र दिवसु अश्वासिजे ॥४॥

(१५२) केशवाच्या कृपा प्रसादाने तूं विश्वाचा मालक होशील इतकेंच नव्हे तर तो केशव तुझा दास होऊन सर्व प्रकारे पालन करील ॥१॥ पहा त्या देवानें अर्जूनाचे सारथीपण केलेना ! बळीचा तर तो सांगातीच (द्वारपाल) झाला, द्रौपदीनें धांवा करितांच तो धांवत आला ॥२॥ चातकाला

असा मेघ, मासांना असे पाणी तसा भक्त प्रल्हादाचा हा कैवारी झाला ॥३॥ नाम मंत्राचा जप अहर्निशी करा. या संबंधीं आळस करूं नका असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

कां करितोसी शीण वाचे नारायण। जपतां समाधान होईल तुज ॥१॥
रामकृष्ण हरी गोविंद गोविंद। वांचेसी हा छंद नामपाठ ॥२॥
वंदितील यम कळिकाळ सर्वदा। न पावसी आपदा असतां देहीं ॥३॥
नामा म्हणे ओळंगे सीण झाला सांगें। प्रपंच वाउगे टाकी परते ।४

(१५३) नारायण नामाचा उच्चार केला असतां तुला समाधान प्राप्त होईल. तेव्हां व्यर्थ कां कष्ट घेत आहेस ॥१॥ तुझ्या वाणीला राम कृष्ण हरि गोविंद गोविंद या नाम पाठाचा छंद लाव ॥२॥ अशा साधनाचे तूं अवलंबन केले असतां कळीकाळ जो यम तो सतत तुझे वंदन करील आणि या देहांत असतांना तुला कोणत्याहि प्रकारचें दुःख होणार नाहीं ॥३॥ ज्याच्या योगें तुला कष्ट होत आहे अशा संसाराचा त्याग कर असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

पांडुरंगे प्राप्त होईल सकळ। चरण कमळ ध्यारे मनीं ॥१॥
मनी भानसिक न करावा कधीं। नाम घ्यारे आधीं केशवाचें ॥२॥
केशवाचें नाम पावन पवित्र। महाभाष्यसूत्र हेंचि सांगे ॥३॥
नामा म्हणे तुम्ही करावें कीर्तन। पंढरीचें ध्यान चुकों नका ॥४॥

(१५४) पांडुरंगाच्या कृपेनें तुझ्या सर्व कामना पूर्ण होतील आणि म्हणून तूं आपल्या मनामध्यें त्याच्या चरण कमलाचें ध्यान कर ॥१॥ प्रथम केशवाचे नाम घे, मनामध्यें मानसिक त्रास आणूं नकोस ॥२॥ केशवरायाचे नाम हे परम पावन होय असा महाभाष्यकारांनीहि निर्वाळा दिला आहे ॥३॥ अहो जनहो तुम्ही केशवरायाचे किर्तन करा व पंढरीचे ध्यान करण्यास हयगय करूं नका असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

केशव नारायण हा जप आमुचा । सर्व हा मंत्राचा आत्माराम ॥१॥
माधव गोविंद सर्वशास्त्रीं आहे । उभारूनि बाहे वेदु सांगे ॥२॥
नामाचेनि पाठें तरू हा भव सागरू । आणिक विचारू नेणो आम्ही ॥३॥
विष्णु मधुसूदन हें दैवत आमुचें । नित्य पैं नामाचें सारआम्हां ।४
त्रिविक्रम वामन सर्व ब्रह्मांड नायकु । हाचि जप सम्यकु आम्हा घटीं ॥ ५॥
श्रीधर हृषिकेश मंत्रराज जपा । पावाल स्वरूपा विष्णुचिया ॥६॥
पद्मनाभ दामोदर हा नामचा विस्तार । करितां विचार तरले जीव ॥७॥
संकर्षण वासुदेव पंढरीचा राणा। सांगितल्या खुणा खेचररायें ॥८॥
प्रद्युम्न अनिरुद्ध दैवत कुळींचें । पुंडलीक तयाचें तप सार ॥९॥
पुरुषोत्तम अधोक्षज वैकुंठ निर्मळ। जपता सकळ पापें जाती ॥१०॥
नरसिंह अच्युत नामाचें कवच । जपतां होय वेंच संसारासी ॥११॥
जनार्दन उपेन्द्र नाम हें अमृत । शंकर निवांत जपें सदा ॥१२॥
हरीकृष्ण विष्णु सर्व घटीं नांदे । तोचि पैं आल्हादु उच्चारिजेसु ॥१३॥
ऐसा नाम महिमा उपदेशु गोमटा । नामेंचि वैकुंठा भक्त गेले ॥१४॥
नामा म्हणे ते मूर्ति पंढरीये गोमटी । नामें उठाउठी भेटी देती ॥१५॥

(१५५) केशव नारायण हा आमचा जप होय, जो सर्व मंत्राचा आत्माराम आहे ॥१॥ सर्व शास्त्रामध्ये माधव गोविंद आहे असें वेद हा बाह्या उभारून सांगत आहे ॥२॥ हा भवसागर नामोच्चारानेंच तरून जाऊंया पेक्षां आम्ही इतर कांहीं विचार जाणणार नाहीं ॥३॥ नामाचा मथितार्थ जो विष्णु मधुसूदन तेच आमचे सतत दैवत होय ॥४॥ सर्व ब्रह्मांडांचा धनी जो त्रिविक्रम वामन त्याचाच आम्हाला, सर्व घटामध्यें सम्यक जप होय ॥५॥ श्रीधर हृषीकेश याच मंत्रराजाचा जप करा, त्या

येथें तुम्ही विष्णु स्वरूपाला प्राप्त व्हाल ॥६॥ पद्मनाभ व दामोदर हा नामाचा अविष्कार होय, याचा विचार करणाऱ्या जिवांचा उद्धार होतो ॥७॥ संकर्षण व वासुदेव हाच पंढरी राय होय असे वर्म खेचर रायानें आम्हाला सांगितले ॥८॥ प्रद्युम्न व अनिरुद्ध हे आमच्या कुळीचे दैवत होय आणि त्यांच्या तपाचे मथितार्थ म्हणजे पुंडलिकराय होय ॥९॥ शुद्ध वैकुंठ म्हणजे पुरुषोत्तम अधोक्षज होय त्याचा जप केला असतां सर्व पापें भग्न होतात ॥१०॥ नरसिंह व अच्युत हे नाम जणूं काय कवच होय त्याचा जप केला असता संसाराचा नाश होतो ॥११॥ जनार्दन व उपेंद्र हे नाम जणूं काय अमृत होय ज्यांचा जप शंकरराय शांत मनानें करितात ॥१२॥ हरि विष्णु यांचा सर्व स्थळीं वास आहे त्यांचा नामोच्चार केला असतां नित्य उल्लास अविष्कारला जातो ॥१३॥ असा हा सुंदर नाम महिमा आहे. भक्त हे या नामाच्या अनुकरणानेंच वैकुंठ स्थळीं स्थित झाले ॥१४॥ अशा ह्या सुंदर मुर्तीचे वास्तव्य पंढरी क्षेत्री आहे त्यांच्या नामोच्चरणानें त्याची भेट त्वरीत होते असे नामदेवराय म्हणतात ॥१५॥

माया पुरातनु तूंचि वो जननी । नाम संजीवनी विठ्ठल वो ॥१॥
तेंचि हें वोळलें पूर्ण प्रेम आम्हां । लोलंगित ब्रह्मा पंढरीये ॥२॥
धांव पाव वेगीं येई सांभाळीं तूं । नाम हा संकेतु पांडुरंगे ॥३॥
क्षुधा तृषा आशा तुज लागीं चिंतिती । जीवन हें मागुती नाम तुझें ४।
अनंत अच्युत नाम हेंचि नित्य । तेणें कृतकृत्य प्राण माझा ॥५॥
नामा म्हणे देवा तूं जीवन आमुचें । आतां मज कैचें क्रियाकर्म ६।

(१५६) विठ्ठल नाम हे संजिवनी होय, तूंच अनादि अशी माया जननी होय ॥१॥ ब्रम्हदेव ज्या पंढरीनाथाला लोटांगण घालतो त्याचे पूर्णप्रेम आमच्याकडे अकर्शिले गेले ॥२॥ पांडुरंगराय नाम हा ज्याचा संकेत आहे असे हे देवते तूं त्वरित धावत ये आणि आमचे रक्षण करून पावन करू ॥३॥ क्षुधा, तृषा, आशा ह्या तुझेंच चिंतन करितात आणि तुझ्या नामाच्या जीवनाची अपेक्षा करितात ॥४॥ अनंत अच्युत हेच नाम नित्य होय त्याच्याच योगानें माझा जन्म कृत्य कृत्य झाला ॥५॥ हे देवराया तूंच आमचे जिवन होय. आतां आम्हाला दुसरे क्रिया कर्म उरलें नाहीं असे नामदेवराय म्हणतात ॥६॥

मायेचा कळवळा मायाची जाणे । तैसें मी तान्हें माउलियें ॥१॥
विठ्ठल श्रीरंग डोळस प्रसन्न । नित्य अमृतघन वोळला सदा ॥२॥
जननी जनक तूंचि वो मुकुंदा । नाम हें गोविंदा शुद्ध रसु ॥३॥
येईवो केशवे नित्य नामरूपें । मी तुज आलापें आळवीत ॥४॥
माधवा श्रीधरा वेगीं येई त्वरें । मज वो नावरे प्रेम वेधु ॥५॥
नामा म्हणे तू जीवन ओमुचें । नित्य केशवाचें प्रेम मज ॥६॥

(१५७) मातृहृदयाच्या प्रेमाची जाणीव आईच जाणूं शकते हे विठ्ठल माय, मी तुझा पुत्र आहे ॥१॥ विठ्ठलराय, हा डोळस व प्रसन्न असून तो अमृताचा वर्षाव भरपूर करितो ॥२॥ हे मुकुंदा तूच माझी माता पिता असून गोविंद हे नाम शुद्ध रस होय ॥३॥ हे केशवराया, मधुर स्वराने तुला आळवित आहे तेव्हां तू नित्य नाम रूपासहित धांवत ये ॥४॥ हे माधवा, श्रीधरा तुझ्या विषयीचे माझे प्रेम अनावार झाले आहे. तेव्हां तू लवकर धावत ये ॥५॥ केशव हाच माझ्या सतत प्रेमाचा विषय झाला असून तोच माझे जीवन होय असे नामदेवराय म्हणतात ॥६॥

केशवासी पाहे केशवासी ध्याये । केशवासी गाये सर्वकाळ ॥१॥
केशव हाचि वृत्तिसह मन । केशवासी ध्यान सर्वकाळ ॥२॥
सबाह्य अंतरी गांडिना कोणासी । जाणें अंतरासी साक्षभूत ॥३॥
नामा म्हणे तुम्ही केशव होऊनी । पंढरीं पाटणी नांद बापा ॥४॥

(१५८) केशवरायाला सतत पहा व त्याचेच चिंतन आणि गायन करा ॥१॥ सर्व वृत्ति सहित मनाचा विषय केशवराय करा व त्याचेच सतत ध्यान करा ॥२॥ हा केशवराय अंतर्बाह्य व्यापक होण्यानें तो कोणाचा त्याग करित नाही कारण तो साक्षभूत होण्यानें सर्वांच्या अंतरातील जाणतो अहो जन हो तुम्ही स्वत केशवराय होऊन आनंदानें पंढरी क्षेत्रीं रहा असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

वेदांचें महिमान जनी जनार्दन । नित्य हे वचन रामनाम ॥१॥
भूतीं दया धरा भक्तिभाव करा । भजन हरिहरां वेद सांगे ॥२॥

सर्व हेंचि सार ब्रह्ममय खरें । आणिक दुसरें न दिसे आम्हां ॥३॥
नामा म्हणे समर्थ वेद तो आमुचा । सांगे नित्य जपा रामकृष्ण ॥४

(१५९) 'जनीं जनार्दन आहे' व 'वाणीनें सतत नामोच्चार करावा' याचेच महात्म वेदामध्यें ग्रंथीत केल्यानें वेदाला महत्व आलें ॥१॥ भूतमात्राच्या ठिकाणी दया करा आणि भक्तिभावें आत्मसात करा आणि हरि हराचे भजन करा असे वेद प्रतिपादन करितो ॥२॥ विश्व हे ब्रम्हमय आहे हाच खरोखर मतितार्थ आहे यापेक्षां आम्हाला इतर कांहीं मान्य नाहीं ॥३॥ वेद हाच आमचा समर्थ आहे. रामकृष्णाचा जप करा असे तो आम्हाला शिकवणूक देत आहे असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

पाहतां ये परिपाठीं आणीक नाहीं सृष्टीं । नामेंविण दृष्टी न दिसे माझ्या ॥१॥
नामचि समर्थ नामचि मधात । शंकरासी हेत रामनामीं ॥२॥
पुरती सर्व काम वाचे रामनाम । न लगती नेम कर्मजाळ ॥३॥
नामा म्हणे उच्चार करीं तूं वारंवार । तुटेल येरझार नाना योनी॥४

(१६०) या सृष्टीच्या घडामोडी मध्यें नामाशिवाय दुसरे कांही महत्वाचें आहे हे आम्हाला प्रतीत होत नाही ॥१॥ नाम हेंच समर्थ आणि सार आहे आणि म्हणून राम नामाच्या ठायीं शंकराचे प्रेम आहे ॥२॥ वाणीनें राम नामाचा उच्चार केला असतां सर्व मनोरथ पूर्ण होतात आणि इतर कर्म जंजाळाचा स्पर्श होणार नाहीं ॥३॥ आणि म्हणून अहो जन हो तुम्ही वाणीनें सतत नामोच्चार करा त्या योगें तुमच्या मागें लागलेल्या नाना योनीचे दु:ख नष्ट होतील असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

साधन साधितां होताती आपदा । म्हणोनि गोविंदा स्मरे कां रे ॥१॥
कृष्ण कथा सार सांगे कां सधर। तुटेल येरझार जन्म मरणा ॥२॥
निष्फळ निखळ भावीं तूं सफळ । भजन केवळ सर्वांभूतीं ॥३॥
नामा म्हणे भक्ति होईल विरक्ति । तुटेल यातायाती जन्ममरण ॥४॥

(१६१) अहो जनहो परमार्थ प्राप्त होण्याकरितां तुमच्या साधनाचे अवलंबन केले असतां अनेक दुःखें प्राप्त होतात ह्मणून तुम्ही फक्त गोविंदरायाचे स्मरण करा ॥१॥ कृष्ण कथेचे प्रेमानें निरूपण केले असतां तुमच्या जन्म मरणाच्या येरझाऱ्या खुंटतील ॥२॥ सर्वभूती परमात्मा आहे हेच फलप्रद भजन होय इतर सर्व वायफट आहे असा निश्चय कर ॥३॥ भक्तीचे अनुकरण केल्यानें तुझ्या ठिकाणीं विरक्तीचा अविष्कार होऊन जन्म मरणाचे दुःख नष्ट होईल असे नामदेवराय ह्मणतात ॥४॥

भवसिंधुचा पार तरे तो पोहणार। बळिया परम धीर धन्य तोची ।१
नामाची सांगडी लावूनि अभ्यास । हृदयीं प्रेमरस वोसंडती ॥२॥
सत्त्वाचा सुभट असंग एकट । वैराग्य उद्भट निर्वासन ॥३॥
काम क्रोध जेणें घातलें तोरडीं । निर्दाळीले वैरी लोभ दंभ ॥४॥
रज तमाचे जेणें तोडीले अंकुर । केला अहंकार देश धडी ॥५॥
नामा म्हणे जया नामी अनुसंधान । तोचि परम धन्य त्रिभुवनीं ।६।

(१६२) या संसार सागरांतून पोहून पैल तिराला जाणारा तोच धीर व शूर होय व त्याचीच धन्यता होय ॥१॥ ज्याच्या अभ्यासाला नामाची नांव लागलेली आहे अर्थात नामाचा ध्यास लागलेला आहे त्याच्या हृदयातून प्रेम रस उफळून येतो ॥२॥ जो सत्वाचा योद्धा असून असंग आणि एकटा आहे ज्याच्या ठिकाणी ज्वलंत वैराग्य होण्यानें तो इच्छारहित झाला आहे ॥३॥ ज्यांनी काम क्रोधांना बंदिस्थ केलें आहे आणि लोभ दंभादिक शत्रुनां ठार केले आहे ॥४॥ ज्यांनी रज व तम गुणाचें अंकूर उखडून टाकले आहे आणि अहंकाराची हकालपट्टी केली आहे ॥५॥ नामांच्या ठिकाणीं ज्याचे अनुसंधान आहे तोच सर्व श्रेष्ठ व धन्य होय असे नामदेवराय ह्मणतात ॥६॥

भवसिंधूचा पार तरावया लागीं । साधन कलियुगीं आणिक नाहीं १
अहर्निशीं नाम जपा श्रीरामाचें । जें सकळ धर्माचें मुगुटमणि ।२
न चले वर्णाश्रम धर्म आचरण । न घडे व्रत दान तप कोणा ॥३॥
नव्हे तिर्थाटन पुराण श्रवण । नव्हे ब्रह्मज्ञान शास्त्रबोध ॥४॥

नव्हे ध्यान स्थिति भावेंविण वोजा । न घडे देवपूजा एकनिष्ठ ।५।
नामा म्हणे नाम राघोबाचें गानां । ब्रह्म सायुज्यता घर रिघे ।६।

(१६३) भवसागरांतून तरण्या करितां या कलियुगामध्यें नामासारखे दुसरे साधन नाहीं ।।१।। तेव्हां सर्व धर्माचें मुकुटमणी अशा श्रीराम नामाचा सतत जप करा ।।२।। या कलियुगा मध्यें वर्णाश्रम धर्माचें आचरण आणि व्रत, दान, तपादिक साधनें कोणाकडून योग्य रितीनें अवलंबिले जात नाहींत ।।३।। ना तिर्थाटन ना पुराण श्रवण ना ब्रह्मबोध ना शास्त्र-बोध साध्य होत नाही ।।४।। ना योग्य भावनेने ध्यानावस्था व एक-निष्ठेने देव पूजाहि घडत नाही ।।५।। तुम्ही राघोबाचे नाम गाईले असतां ब्रह्म सायुज्जताही तुमच्या घरी ओळंगेल असे नामदेवराय म्हणतात ।।६।।

तुटे मायाजाळ विघडे भवसिंधु । जरी लागे छंदु हरिनामाचा ।।१।।
येर कर्म धर्म करितां या कळी । माजी कोण बळी तरला सांगा ।२।
न पढवे वेद नव्हे शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा ।।३।।
नव्हे अनुष्ठान न कळे ब्रह्मज्ञान । करावीं सोपान कृष्ण कथा ।।४।।
न साधे हा योग न करवे वैराग्य । साधा भक्ति भाग्य संत संगे ।।५।।
नामा म्हणे साधन न लगे आणिक । दिधली मज भाक पांडुरंगें ।।६।।

(१६४) हरिनामाचा ध्यास लागला असतां माया जंजाळ नष्ट होतात आणि संसार सागरहि आटला जातो ।।१।। या कलियुगामध्ये इतर कर्म धर्मादिकाच्या साधनानें कोण सामर्थ्यवान तरला गेला हे सांगा बरें ।।२।। या कलियुगामध्यें ना वेद पठण होते ना शास्त्रबोध होतो आणि म्हणून जनहो तुम्ही नामोच्चार सतत करा ।।३।। अनुष्टानादि कृति घडत नाहीं आणि ब्रह्मज्ञानहि उमगत नाहीं तेव्हां सुलभ रामकृष्ण कथा करा. ।।४।। ना योग साध्य होतो ना वैराग्य अंगिकारले जाते आणि म्हणून संत संगति द्वारा भक्ति भाग्याची प्राप्ती करा ।।५।। पांडुरंगरायानें मला असें आश्वासन दिलें आहे कीं श्री हरी प्राप्ती करितां नामाशिवाय दुसऱ्या साधनाची आवश्यकता नाहीं असें नामदेवराय म्हणतात ।।६।।

पंढरीचा राजा उभा भक्तकाजा । उभारूनि भूजा वाट पाहे ।१
घ्यारे नाम सुखें प्रेमें अलोलिक । साधनें आणिक करूं नका ॥२॥
मनाचेनि मनें हृदयीं मज धरा । वाचेनें उच्चारा नाम माझें ॥३॥
बोलोनियां ऐसा उभा भीमा तीरीं । नामा निरंतरीं चरणापाशीं ।४

(१६५) भक्तांच्या कार्यार्थ हा पंढरपूर नगरीचा राजा विटेवर निष्टत उभा असून तो बाह्या उभारून भक्ताच्या भेटीची वाट पहात आहे ॥१॥ बाबांनो इतर साधने न करितां अलौकिक प्रेमानें व सुखा समाधानानें नामोच्चार करा ॥२॥ मला तुम्ही आपल्या हृदयांत मनाच्या मनानें धारण करा आणि माझे नाम वाणीनें उच्चारण करा ॥३॥ अशी आज्ञा करून पांडुरंगराय भीमातीरी तिष्टत उभा आहे व नामदेवरायानें त्यांच्या पायाजवळ नित्य वास्तव्य केले आहे ॥४॥

हरि हर ब्रह्मा इंद्रादिका देवां । इच्छिताती केशवा पाय धुळी ।१
यावरी गोपाळ आनंदें नाचती । भूषणें श्रीपति शोभायमान ॥२॥
पाहोनियां सुख आले सर्व देव । पंढरीचा राव पाहावया ॥३॥
नामा म्हणे मिषें गोपाळ काल्याचे । निरंतर वाचे घेत नाम ।४

(१६६) केशवरायाच्या चरण रजाची अपेक्षा शंकर विष्णु ब्रम्हदेव आणि इंद्रादिक देवता करितात ॥१॥ श्रीपतीचे शोभायमान भूषणें पाहून गोपालवर्ग हे आनंदाने नाचतात ॥२॥ पंढरीरायाच्या ठिकाणी अविट सुख केंद्रिभूत झालेले पाहून सर्व देवता तेथें आल्या ॥३॥ गोपाळ काल्याच्या निमित्तानें ते वाचेनें सतत नाम घेतात असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

वदनीं तुझें नाम अमृत संजीवनी । असतां चक्रपाणी भयकवण ॥१॥
या जन्म मरणाची कायसी मग चिंता । तुझिया शरणांगता पंढरिनाथा ॥२॥
हृदयीं तुझें रूप बिंबले साचार । तेथें कवण पार संसाराचा ॥३॥
नामा म्हणे तुझें नाम वेळोवेळ । म्हणतां कळिकाळ पायीं पडे ॥४॥

(१६७) हे चक्रपाणी, अमृत संजिवनी असें जे तुझें नाम तें मुखामध्यें असतां आम्हाला कशाची भीती आहे ? ॥१॥ हें पंढरीनाथा तुला जे शरणांकित झाले आहेत त्यांना जन्म मृत्युची कशी ही चिंता असणार ॥२॥ तुमचें स्वरूप हृदयांमध्यें प्रतिबिंबीत होण्यानें तेथें संसाराची काय ही किंमत ? ॥३॥ हे देवराया, तुमचे नाम सतत उच्चार केल्यानें कळीकाळ हा पायावर लोळण घालतो असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

नाहीं भक्ति नामीं तो चांडाळ पातकी। तोचि जाणा लोकीं दुष्टनष्ट १
प्रपंचीं कुकर्मीं गढोनियां ठेले। न निघती बोले संताचिया ॥२॥
काढितां त्या वाटे प्रपंच्याचें दुःख। विषयाचें सुख हर्ष बहू ॥३॥
पुत्र वित्त कांता मानी भरवंसा। पडे मोह फांसा जन्मवरी ॥४॥
नामदेव म्हणे अंतीं आहे कोण। कळा नामाविण नानापरी ॥५॥

(१६८) ज्यांना नामाच्या ठायीं प्रेम नाहीं ते या जगामध्ये चांडाळ, पातकी, दुष्ट आणि नष्ट होत ॥१॥ प्रपंचाच्या कुकर्मामध्यें रत असणाऱ्यांना संतानी उपदेश केला असतांहि तेथून ते उपरामाला पावत नाहीं ॥२॥ विषयसुखा मध्यें रंगलेल्यांनां तेथून मुक्त करण्याचा प्रयत्न केल्यास ते दुःखी होतात पुत्र, धन व स्त्री हीच आपल्या जिव्हाळ्याची होत असा त्यांचा भरंवसा होण्यानें ते जन्मोजन्मी मोहपाशामध्यें गुंतून रहातात ॥४॥ हे मूढा तुला अंतकाळी नामाशिवाय दुसरी कोणती नाना कलादिक साधनें साह्यभूत होणारी आहेत बरे ? असे नामदेवराय म्हणतात ॥५॥

नाम हें अमृत भक्तांसी लाधलें। आपण घेतलें बौध्यरूप ॥१॥
नाम हें आळवा नाम हें आळवा। होईल दोहावा कामधेनु ॥२॥
न बाधेल विघ्न प्रपंच हें भान। नाम हेंचि खूण वैकुंठीची ॥३॥
नामा म्हणे जडजीव ब्रह्म असे सर्व। हा गीतेमाजी भाव सांगितला ॥४॥

(१६९) देवरायानी बौद्धरूप धारण केले खरें परंतु भक्तांना नामामृत प्राप्त झालें ॥१॥ नामाचेच गान करा नामाचेच गीत गा, त्या

घोमे वा कामधेनुला पान्हा फुटेल ॥२॥ व विघ्नाचा स्पर्श होणार नाही किंबहुना प्रपंचाचेहि भान रहाणार नाहीं. जणुं काय वैकुंठाचे चिंन्ह म्हणजे नाम होय ॥३॥ जड जीव (चिद) असो ते सर्व ब्रम्हरूप आहे असा गीतेमध्यें भावार्थ सांगितला आहे असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

आसनीं शयनी जपतां चक्रपाणी । लाविली निशाणी वैंकुंठीची ॥१॥
कैचेंरे बंधन आम्हां जीवन्मुक्तां । गाणीं गुण गातां विठोबाचे ॥२॥
भवसिंधूची जिवां झाली पायवाट । जे गर्जती उद्भट नामघोष ॥३॥
प्रेमें ओथरत नामें पिटूं टाळीं । नाम हृदयकमळीं विठोबाचें ॥४॥
नाहीं कांहीं क्लेश न करीं सायास । दृढ धरी विश्वास हरिनामी ॥५॥
नामा म्हणे साधन नलगे अनेक । दिली मज भाक पांडुरंगें ॥६॥

(१७०) बसतांना व झोपताना चक्रपाणी याचा जप केल्यानें वैकुंठामध्यें ध्वज फडकविला गेला ॥१॥ गोविंदाच्या गुण गाणाऱ्या आम्हां जीवन्मुक्तांना कोणतो बंधने असणार ? ॥२॥ प्रेमानें नामोच्चार करणारांना भवसागर हा जणूं काय पायवाटच होय ॥३॥ नामोच्चाराच्या प्रेमाविष्करणानें टाळ्या वाजवूं आणि हृदय कमळा मध्यें विठोबाचे नाम धारण करूं ॥४॥ अन्य साहस न करितां फक्त हरिनामाच्या ठिकाणीं दृढ विश्वास ठेव म्हणजे तुला कोणतेहि क्लेश होणार नाहीं ॥५॥ अन्य साधनाच्या खटपटींत न पडण्याविषयीं पांडुरंगरायाची आज्ञा आहे असे नामदेवराय म्हणतात ॥६॥

राम मंत्राचिया आवृत्ति । घडती जयासी पुढतोपुढती ।
त्याचा जन्म धन्य ये क्षिती । सर्व कुळाशी तारक ॥१॥
राममंत्रें आवडे जीवा । हाचि उद्धार सर्व जीवा ।
शिवा सही विसांवा । पार्वती सहीत ॥२॥
रामकृष्ण उच्चारें । तरती जड पामरें ।
ऐसें हें व्यासें निर्धारें । नाना ग्रंथीं सांगितलें ॥३॥
नामा जपे नाम मंत्र । आणिक नेणे नाना शास्त्र ।
राम नामें नित्य वक्त्र । हरी रंगें रंगले ॥४॥

(१७१) जो राम नामाच्या मंत्राचे नित्य पारायण करितो, या लोकीं त्याचा जन्म धन्य होय व तो सर्व कुळांना तारक होतो ।।१।। नाम मंत्रावर जिवाचे प्रेम जडले असतां त्यांचा उद्धार होतो, राम मंत्र हा शिव पार्वती यांचे विश्रांती स्थळ होय ।।२।। पामरादिक अज्ञ जीव असो परंतु त्यांनी नामोच्चार केला असतां त्यांचा उद्धार होतो असे व्यासांनी पुष्कळ ग्रंथामध्यें प्रतिपादन केले आहे ।।३।। नामदेवराय हे नाम मंत्रा शिवाय दुसरे शास्त्र जाणत नाहींत. राम नामाच्या मर्ते उच्चारानें ते हरि रंगामध्यें रंगून गेले ।।४।।

हाचि नेम सारी साधेल तो हरी । नाम हें मुरारी अच्युताचें ।१
गोविंद हरे गोविंद हरे । यादव मुरारे रामनाम ।।२।।
न लगती कथा नाना विकलता । नामचि स्मरतां नाम वाचे ।।३।।
नामा म्हणे राम आम्हां हाचि नेम । नित्य तो सप्रेम जप आम्हां ।४

(१७२) मुरारी, अच्युत या नामाचा उच्चार नियमानें केला असतां त्यास हरिचा प्राप्ती होते ।।१।। गोविंद हरि, गोविंद हरि यादव मुरारी हेच रामनाम होय ।।२।। ज्यांत न्यूनता आहे अशा कथेचा येथे अनुपयोग आहे. नाम स्मरण व नामोच्चार हीच उपयुक्त साधनें होत ।।३।। सप्रेम व सतत नामोच्चार करणें हाच आमचा नियम आहे असे नामदेवराय म्हणतात ।।४।।

विठोबाचे पाय जन्मोनी जोडावे । संबंध तोडावे काम क्रोध ।।१।।
ऐक्य सुख घ्यावें एकविध भावें । प्रेम न सांडावें आवडीचें ।।२।।
अनंत जन्मा यावें ऐसें भाग्य व्हावें । एकवेळां जावे पंढरीसी ।।३।।
वृत्तिसहित मन पायींच ठेवावें । अद्वैत भोगावें प्रेमसुख ।।४।।
देहीं देहभाव प्रकृति दंडावे । सांडणें सांडावें ओवाळुनी ।।५।।
नामा म्हणे ऐसा हेतु माझ्या जिवें । विठो पुरवावे आर्त माझे ।।६।।

(१७३) विठ्ठलरायाच्या चरणांची प्राप्ती व काम क्रोधाची निवृत्ती करणें यांतच जन्माची साफल्यता आहे ।।१। एकविध भावनेनें

ऐक्यतेचा भोग घ्यावा आणि आवडीच्या ध्येयाच्या प्रेमाचा त्याग करूं नये ॥२॥ अनंत जन्म घडो परंतु एक वेळेस तरी पंढरीस जाण्याचे भाग्य लाभो ॥३॥ सर्व मनोवृत्तींना विठ्ठल चरणीं स्थित करून अद्वैत सुखाचा अनुभव घ्यावा ॥४॥ प्रकृतीचे नियंत्रण करून देहाविषयीची 'अहं भावना निवृत्त करावी आणि त्याज्य वस्तु ह्या ओवाळून टाकून द्याव्या ॥५॥ हे विठ्ठलराया अशी माझी अंतस्थ इच्छा आहे ती आपण पूर्ण करावी असे नामदेवराय म्हणतात ॥६॥

तुझाचि अहंकार तुजचि नाडील । मागुता मांडील संसारू हा ॥१॥
सांडी सांडी मोहो विषय टवाळ । वाचेसी गोपाळ उच्चारींरे ॥२॥
सर्व हे भूल मायेचे घरकुलें । अहंकारें नाथिलें नानायोनी ॥३॥
नामा म्हणे भजन हरीचें करीन । नित्य ते सेवीन चरणरज ॥४॥

(१७४) तुझ्या ठिकाणचा अभिमान हाच प्रतिबंधक असून वारंवार जन्म मृत्यु प्राप्त करणारा आहे ॥१॥ गोपाळ या नामाचा उच्चार वाचेने कर आणि या मिथ्या विषयाचा त्याग कर ॥२॥ हे दृश्य पदार्थ म्हणजे मायेची घरकुलें होत हे खरे, परंतु अहंकारामुळेंच नाना योनीच्या चक्रामध्यें जखडले आहेत ॥३॥ मी नित्यशा हरीचे भजन करीन आणि संत चरणाची धूळ मस्तकी धारण करीन असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

देहीं धर्मी हित करीं । द्वैत भाव चित्तीं न धरीं ।
सर्वांभूती नमस्कारीं । एक आत्मा म्हणोनियां ॥१॥
एक तत्त्व एक हरी । एक चित्तें नमस्कारीं ।
आदि अंतीचा नरहरी । सकळ कुळांसी तारील ॥२॥
पवित्र त्याचें हे कुळ । आचार त्याचाचि सुशिळ ।
अखंड जप सर्वकाळ । रामकृष्ण नरहरी ॥३॥
नामा जपे नाम मंत्र । अखंड हरिनाम सहस्त्र ।
हाचि आमुचा निजमंत्र । रामकृष्ण गोविंद ॥४॥

(१७५) देहाच्या ज्या धार्मीक कृति आहेत त्यामध्यें हितकारक गोष्टीचा स्वीकार कर, चित्तामध्यें द्वैत भाव स्फुरूं देऊं नकोस, सर्वांभूती एक परमेश्वर वास्तव्य करित आहे आणि म्हणून भूत मात्रांना नमस्कार कर ॥१॥ हरि हाच एक तत्व ध्यानें स्थित होण्यानें त्याला एकाग्र चित्तानें नमस्कार कर. नरहरि हाच आदि अंतीचा साह्यकारी असून तोच सर्व कुळांचा उद्धार करील ॥२॥ जो राम कृष्ण, नरहरी नामाचा अखंड जप करितो त्याचे कुळ पवित्र असून त्याचाच आचार सद्भिरुचिकार आहे ॥३॥ रामकृष्ण गोविंद हाच आमचा मुख्य मंत्र आहे आणि म्हणून सतत सहस्र हरिनामाच्या महामंत्राचा नामदेवराय जप करितात ॥४॥

सुलभ सोपारें नाम केशवाचें । आठवितां वाचे दोष जाती ॥१॥
अनाथाचा सखा उभा नामापासीं । ऐसा तो प्रेमासी भुललासे ॥२
जातिवंत आम्ही वेदाचे पाठक । तरी सर्व फिकें नामाविण ॥३॥
नामा म्हणे नामीं रंगलों सतत । म्हणोनि अनंतें दिधली भेटी ॥४

(१७६) केशवरायांचें नाम हे अति सुलभ आहे, त्याचे वाणीनें स्मरण केले असतां सर्व दोष नष्ट होतात ॥१॥ अनाथाचा प्रियकर जो हरि तो नाम घेणाराजवळ तिष्ठत आहे असा हा देवराय प्रेमानें वश होतो ॥२॥ आम्हो वेदाचें जातिवंत पठण करणारे खरे परंतु नामाच्या तेजापुढें हे सर्व फिके आहे ॥३॥ नामाच्या ठिकाणीं आम्ही तल्लीन होण्यानें अनंतानें आम्हाला भेट दिली असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

विसांवा विश्वाचा जो प्राण भक्ताचा । तोचि नित्य वाचा जपों आम्ही ॥१॥
गोविंद वामन भावयुक्त भजन । सर्व जनार्दन हाचि भाव ॥२॥
चैतन्य अचेतन नाम हेंचि सत्य । नित्यता कृतार्थ विठ्ठल नामें ॥३॥
नामा म्हणे उद्धरण आणिक नाठवे । केशवांचि सर्वे पुरे आम्हां ॥४

(१७७) जो अखंड विश्वाचे विश्रांती स्थान आहे व भक्ताचा जीव कीं प्राण आहे, त्याचेच आम्ही वाचेनें जप करूं ।।१।। गोविंद वामन याचे प्रेमानें भजन करणार आणि या विश्वरूपानें जनार्धन व्याप्त आहे अशी भावना करणार ।।२।। अचिन्त्य जे चैतन्य तेच यथार्थ नाम होय. विठ्ठल नामाने अबाधीत कृतार्थता होते ।३।। केशवराया शिवाय दुसरे कोणी उद्धारक आहे याचे आम्हाला स्मरणहि नाहीं आणि म्हणून त्यांच्याच संगती मध्ये समाधान आहें असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

आलिया संसारीं आत्माराम मुखीं । घेतलिया सुखी त्रिभुवनीं ।।१।।
जाणोनियां नाम आपुलेचि आधीं । मग सोहं सिद्धि सर्वसाधे ।।२।।
सर्व हरी मग नाहीं दुजा भाव । प्रपंचिक गर्व दिसेचिना ।।३।।
नामदेव म्हणे सर्वदा साधनें । भरे जन वन नानापरी ।।४।।

(१७८) संसारांत येऊन ज्यानें आपल्या मुखानें आत्मारामाचा उच्चार केला तो या त्रिभूवनामध्यें सुखी होय ।।१।। आपल्या नामाचे स्वरूप काय आहे हें प्रथम ओळखा म्हणजे आपोआपच सोहं इत्यादिक सिद्धी हस्तगत होतील ।।२।। जेथें द्वैत भावाचा संपर्क नसून केवळ एक हरिच अविष्कारलेला आहे त्या ठिकाणीं प्रपंचाचा अहंकार कसा प्रतित होणार? ।।३।। या जन वनामध्ये भिन्नभिन्न प्रकाराची साधनें भरलेली आहेत असे नामदेवराय म्हणतात ।।४।।

*व्यापक तें नाम तेव्हांच होईल । जेव्हां ओळखेल मीपणासी ।।१।
आपुलेंचि नाम न ओळखिलें । व्यापक साधिलें जायेचिना ।।२।।
आपुलीच ओळख आपणासी पडे । मग सर्वत्र जोडे नाम तेव्हां ।३
नामाविण नाम नेंचि होय विभ्रम । नामदेव म्हणे संतां पुसा ।।४।।

* **टीप**—सद्संगती पासून प्राप्त झालेल्या ज्ञानानेंच यथार्थ नाम स्मरण होणार आहे अशी स्पष्ट जाणीव या अभंगात नामदेवरायांनी दिली आहे. ज्ञान व नाम यांचा अनन्य संबंध असल्याचा हा सबळ पुरावा असतांहि कांहीं बुद्धी भेद करणारा वंचक वर्ग जन्म संस्कारानें विकृत लिखाण करितात, सज्जनानें तिकडे दुर्लक्ष करावें.

पवित्र नाम हे द्वैताद्वैत विरहित असून स्वयंमत्वानें उपलब्ध आहे तेच अखिल त्रिभुवनामध्यें अविष्कृत झाले आहे ॥४॥ नाम हे साक्षात परब्रम्ह होय. त्या ठिकाणीं द्वैतोत्पादक अशा क्रिया कर्मांचा संबंध नाहीं असे नामदेवराय म्हणतात ॥५॥

* सद्गुरुवांचूनि नाम नये हातां । साधन साधितां कोटी गुणें ॥१॥
जैसा कांतेविण करणे संसार । तैसा हा व्यापार साधनाचा ॥२॥
जंव सद्गुरु नाहीं केला भ्रतार । साधन विचार व्यर्थ गेला ॥३॥
नामदेव म्हणे सद्गुरुपासोनी । नाम घ्या जाणोनी नाना कांहीं ॥४॥

(१८४) कोटयावधी साधनाचे अवलंबन केले असतांहि सद्गुरुच्या अंकित झाल्याशिवाय हे नाम हातो येणार नाहीं ॥१॥ स्त्री शिवाय संसार करणें जसें व्यर्थ होय तद्वत् नामाशिवाय इतर साधनाचे अवलंबन करणें फोल होय ॥२॥ सद्गुरुला पति केल्याशिवाय केलेली सर्व साधनें व्यर्थ होत ॥३॥ म्हणून इतर बहुविध कृतिच्या उठाठेवीत न पडतां सद्गुरु पासून नामाचे यथार्थ स्वरूप जाणून घ्या असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

चंद्रभागेतीरीं उभा राहिलासी । भक्तांचे मानसीं भावमात्र ॥१॥
काय पुंडलिके केल्या तपरासी । जाणोनी मानसीं भावमात्रें ॥२॥
भावेंविण देवा सर्वथा नातुडे । नेणती बापुडे बद्धजन ॥३॥
नामा म्हणे माझें माहेर पंढरीं । भेटती महाद्वारीं संतजन ॥४॥

---

* **टीप**-नामदेवराय हे नाम संकीर्तनाचे अध्वर्यु, प्रेमाचार्य आणि सत्क्रिया चरणी होत. 'नामदेवाठायी प्रेम. मार्गी आडविले ब्रम्ह' नामदेवरायानीं या नाम महात्म्यामध्यें नाम संकीर्तनाचा सांग पाठ संग्रहीत केला आहे. धुळाक्षरापासून तो उच्च शिक्षणापर्यंत मध्यंतरी निरनिराळे वर्ग असतात तद्वत नाम संकीर्तनामध्यें भिन्न भिन्न अपलेल्या कक्षा त्याचे सांग प्रकारें विवरण केल आहे. अशा महाभगवद्भक्तयांच्या वांङ्मयाच्या पाठशाळा, सत्वाङ्मय संशोधन मंडळ आणि ग्रंथालय होणे अगत्य नव्हे काय ?

नामदेवरायाच्या वांङ्मय संशोधना संबंधी सांप्रदायीक व ज्ञातीनिष्ट वर्गानें घोषणा केल्या आहेत खऱ्या तथापि अद्याप त्या व्यवहारांत आल्या नाहींत तरी नामदेवरायाच्या साहित्याची पूर्ण शुद्ध प्रत उपलब्ध करण्याची त्यांना सुबुद्धी होवो हीच अपेक्षा.

(१८५) 'भक्तांच्या मनांतील शुद्ध भावना पाहून विठ्ठलराय चंद्र-भागेच्या कांठी तिष्ठत उभा राहिला आहे ।।१।। पुंडलिकरायानें अनेकविध तपाचरण केले होते.काय ? केवळ त्याच्या शुद्ध मनाच्या भावनेनेच ना तो पुंडलीक रायाच्या सन्मख उभा राहिला ।।२।। देवराय हा शुद्ध भावनेशिवाय केव्हांहि अकलंन होत नाही परंतु हे वर्म बिचारे बद्ध जीव जाणत नाहींत ।।३।। पंढरी क्षेत्र हे माझे माहेरघर होय त्या ठिकाणीं असलेले जे महाद्वार तेथें संत जनांच्या भेट्री घडतात असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

देवाचे हे आत्मे ते हे जाणावे संत । त्यांचेपदीं व्हावें रत सदादृढ ।१
श्रीहरीची भेटी सहजचि होय । श्रम लया जाय झाला आधीं ।२
पापाचे पर्वत भस्म नामाग्नीने । अभक्तांसी हाण नामाविण ॥३॥
नामदेव म्हणे नामाग्नीच्या पोटीं । नाना पाप कोटीं दग्ध होती ।४

(१८६) संतजन हें खरोखर देवरायाचें आत्मे होत आणि म्हणून त्याच्या चरणकमळी दृढ भावनेने समरस व्हावें ।।१।। त्यायोगें श्रीहरि रायाची भेट सुलभतेनें होऊन आतांपर्यंत जे कांहीं कष्ट झाले आहे त्याचा परिहार होईल ।।२।। नामोच्चाराने पापाचे डोंगर भस्म होतील नामाशिवाय अभक्तांचा मोठा नुकसान होईल ।।३।। नामाग्निच्या अविष्करणानें कोटयावधी घडलेल्या पापाचा नाश होतो असें नामदेवराय म्हणतात ।।४।

अवघे ते दैवाचें विठ्ठल म्हणती वाचे । अवघे कुळ त्यांचें पुण्यवंत १
अवघेचि संसारीं जाणावे ते धन्य । ज्यांचे प्रेमपूर्ण पांडुरंगीं ॥२॥
अवघा विठ्ठल भोगिती दिनराती । वोळगे किंकरवृत्ति नामा त्यांतें ।३

(१८७) विठ्ठलरायाच्या नामाचा जे उच्चार करितात ते पूर्ण भाग्यवान होत, त्यांचे कुळ पुण्यवंत होय ।।१।। पांडुरंग रायाच्या ठिकाणीं ज्याचे पूर्ण प्रेम आहे तेच या संसारामध्यें धन्य होत ।।२।। जे कोणी या विठ्ठलरायाच्या ठिकाणी रात्रंदिवस शुद्ध भावनेनें समरस होतात नामदेवराय हे त्यांचे अनन्यभावानें दास्यत्व करितात ।।३।।

सर्वांभूतीं भज नमन करीं संता । नित्य त्या अंच्युता स्मरण करीं १
ऐसें भजनीं विनट सांपडेल वाट । रामकृष्ण नीटें वैकुंठींची ॥२॥
न लगती साधनें वांयांचि बंधनें । एका नामें होणें चतुर्भुज ॥३॥
नामा म्हणे थोर नामेंचि सधर । वैकुंठीं बिढार तया भक्तां ॥४॥

(१८८) सर्व भूत मात्रामध्यें श्रीहरि आहे अशा शुद्ध भावनेनें त्याचे भजन करा आणि संतांना नमस्कार करा व अच्युतरायाचें स्मरण नित्य करा ॥१॥ रामकृष्णाच्या भजनाच्या योगें तुम्हांला वैकुंठाचा राजमार्ग हस्तगत होईल ॥२॥ इतर साधनें ही बंधनाला हेतू होण्यानें त्यांची आवश्यकता राहाणार नाहीं. फक्त एका नामाचें अनुकरण केल्यानें चतुर्भूज जो परमात्मा त्या रूपानें तुम्ही व्हाल । ३॥ नाम हेच श्रेष्ठ होय. त्याचें अनुकरण करणारा भक्त हा वैकुंठाधिपति होतो असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

म्हणे दीन बंधु तुम्ही सावध व्हावें । संतांसी नमन नाम वाचे जपावें १ नामाविण साधन नाहीं या कलियुगीं । व्यर्थ श्रम भोगी पाहातां मतें ॥१॥ मताभिमान करोनी तुम्ही जाल आडवाटां । अभिमानें ठकविलें नारदादि श्रेष्ठा ॥३॥ आलिया जन्मास आतां न करीं आळस । नामदेवालागीं सांगे जगन्निवास ॥४॥

(१८९) अहो प्रिय भक्तांनो, तुम्ही जाग्रत व्हा व संतांना नमस्कार आणि मुखानें नामोच्चार करा असे दीनबंधु म्हणतात ॥१॥ या कलियुगामध्यें नामोच्चाराशिवाय दुसरे श्रेष्ठ साधन न होण्यानें अनेक मतांतराचा शोध करणें म्हणजे व्यर्थ श्रम होय ॥२॥ तुम्ही मताभिमानाने आडरानांत गेला असतां फुकट नागवले जाल ॥३॥ जन्मास आल्यानंतर नामोच्चार करण्यास आळस करूं नका, असे जगन्निवासाने नामदेवरायांना सांगितलें ॥४

सकळ संतजन देखोनि नयनीं । टाळिया पिटोनि गाती नाम ॥१॥ म्हणती धन्य भक्त निधडा वैष्णव । ब्रह्मादिकां माव न कळे याची २ कैसा ऋणिया केला पंढरीनाथ । आहे सदोदित याचे जवळीं ॥३॥ पूर्वीं तो प्रल्हाद श्रवणीं ऐकिला । किंवा हा देखिला संतामधीं ॥४॥ नामा येऊनियां चरणासी लागला । हृदयीं आलिंगिला भक्तराज ॥५॥

(१९०) (नामदेवरायांना) सर्व संतांनीं डोळ्यांनीं पाहतांच हर्षोल्हासित झाले आणि ते प्रेमानें टाळ्या वाजवीत गान करूं लागले ॥१॥ ज्याच्या प्रेमाचें आकलन ब्रम्हादिक देवांनाहि होत नाहीं अशा या शूर भक्ताची धन्य होय ॥२॥ पंढरीनाथाला यांनी कसा हा ऋणी करून ठेवला तो याच्या समागमें सतत असतो ॥३॥ नामदेवराय हे प्रेमानें संतांच्या समुहाकडे येऊन पाया पडत असतांना त्यांनीं या भक्त राजाला कवटाळून अलिंगन दिले ॥४॥

— ० —

– सांग नामपाठ –

ऋतूंपरत्वे फलांचा मोसम असतो. तद्वत युगपरत्वे निरनिराळ्या साधनांना महत्व असते.

श्लोक– कृतें यत् ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः ।
द्वापारे परिचर्यायां कलौ तत् हरिकीर्तनत् ॥

वृक्षाची टवटवी त्यांना येणारा फलपुष्पांचा भर. याला हेतु जल आहे. तद्वत् वैचित्र्य साधनाच्या पूर्ततेस प्रेम हेतु आहे. नामदेवरायांनी स्थाई भाव प्रेम होता.

नामदेवा ठायीं प्रेम । मार्गी आडविले ब्रम्ह ॥

इतकेच नव्हे ते नामसंकीर्तनाचे आचार्य होते आणि म्हणून नाम-महात्म्य प्रकरणांत त्यांनी नामपाठाचे यथासांग मार्गदर्शन केले.

धुळाक्षरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत पारंगत व्हावे म्हणून जो मुलांना खेळाडू वृत्तीने व बालबोधपणे शिक्षण देतो तोच खरा आचार्य होय. तद्वत सामान्य जीवापासून तो ब्रम्हविदापर्यंत असलेल्या सज्जनांना नामाचे सांग शिक्षण मिळावे व त्यांनी त्यांत रंगून जावे म्हणून नाममाहा-त्म्यामध्यें अनेक पौराणिक दाखल्यासहित मार्गदर्शन नामदेवरायांनी केले. इतकेच नव्हे तर त्यांनी या नामसंकीर्तनाचे मुख्य व अमुख्य अंगाने स्वतः आ-चरण हि केले.

खेळाकडे ओढ असणे हे बाल्यावस्थेचे लक्षण होय. तद्वत दृश्य विष-याकडे आकर्शित होणे हे जीवाचे स्वरुप होय.

अशा या जीवांना परमात्मस्वरुप होण्याकरितां नामसंकीर्तनाचा पाठ सांगितला आहे

नाममहात्म या प्रकरणातील तपशील पुढील प्रमाणे.

नाममहात्म्य :— अभंग १ ते ५, ४९, ६८, ८१, ९०, ९३, ९७, १००.
नामाचा अधिकारी :— अ. ६, ७६, ९१.

आम्हां वारकरीयांमध्यें नामसंकीर्तनाला महत्व आहे. त्याजबरोबर पंढरीचे वारीलाहि महत्व आहे. सगुण व निर्गुण ही असलेली परमेश्वराची स्वरुपे, त्यांमध्यें साम्यता बुद्धि असून ज्ञान व भक्तिचा समन्वयहि केला आहे आणि परमात्मा व गुरुच्या ठायीं ऐक्य बुद्धिचे शिक्षणहि दिले आहे. आणि म्हणून परमेश्वराप्रमाणें गुरूचीहि आवश्यकता आहे असा स्पष्ट निर्वाळा खालील अभंगामध्यें दिलेला आहे.

सद्‌गुरु वांचूनि नाम न ये हातां । साधन साधितां कोटी गुणे ॥१॥
जैसा कांतेवीण करणे संसार । तैसा हा व्यापार साधनाचा ॥२॥
जंव सद्‌गुरु नाहीं केला भ्रतार । साधन विचार व्यर्थ गेला ॥३॥
नामदेव म्हणे सद्‌गुरुपासोनी । नाम घ्या जाणोनी नाना कांहीं ॥४॥

परंतु कांही वर्ग हा वारकरी संप्रदायामध्यें प्रवेश करून आपल्या पूर्व संस्काराचें व वृत्तीचे प्रदर्शन करीत असतात. ते आपणाला जरी वारकरी म्हणवित असले तरी संप्रदायाच्या नियमाला ते पाठमोरें झालेले प्रतीत होतात.

'आषाढी कार्तिकी विसरूं नका मज । सांगतसे गुज पांडुरंग ॥'

नामदेव

'माझ्या मनीचि आवडी । पंढरपुरा नेईन गुडी ॥'

ज्ञानदेव

या संत शिकवणुकीचा असा हा पंचरंगी वर्ग अव्हेर करून भक्तिची वकीली करीत असतात. आणि आपल्या बुद्धी कुशलतेने संतवाङ्मयाचा विपर्यास करून अज्ञ जीवाचा बुद्धिभेद करीत असले तरी सात्विक वैष्णवानें जाग्रत असावें.

'ऐका जी तुम्हीं भक्त भागवत । कराल ते हीत सत्य करा'

॥ तुका० ॥

परिशिष्ट

केसरी दि. २८-६-५५ च्या अंकामध्यें विद्या निधी श्री सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांचे तर्फे दशावतारांच्या जन्मस्थळांबद्दल प्रगट विनंती केली होती त्या विनंतीस मान्यता देऊन कांहीं विदवद्‌जनांनीं उत्तरें पाठंविली त्यांचा नामनिर्देष करणे माझे कर्तव्य आहे श्री. द्. सी. नामजोशी, श्री. जी. बी पळसुळे श्री. संपादक कल्याण मासिक, श्री. नारायण रामचंद्र टिल्लु, श्री. द्रवीड शास्त्री, श्री. किर्तन केसरी बडोदकर.

श्री. जी. बी. पळसुळे, यांचेकडून

भागवत (१-३-१५) स्कं. ८ अ. २४

(१) रूपं स जगृहे मात्स्यं चाक्षुषोदधिसंप्लवे ।
नाव्यारोप्य महीमय्यामपाद्वैवस्वतं मनुम ।। १५ ।।
स्कं ८ अ. ७ श्लो, ८-१०

(२) सुरासुराणामुदधिं मथ्नतां मंदराचलम
दध्रे कमठरुपेण पृष्ठ एकादशे विभुः ।। १६ ।। (१-३-१६)

(३) द्वितीयं तु भवा यास्य रसातलगतां महीम ।। ३।१८ स्कंध,
उद्धरिष्यैन्नुपादत्त यज्ञेशः सौकरं वपुः ।।७।। १-३-७ स्कं ७-८

(४) चतुर्दशं नारसिंह बिभ्रद्दैत्येन्द्र मूर्जितम
ददार करजैर्वक्षस्येरकां कटकृद्यथा ।। १८ ।।
१-३-१८ स्कं.

(५) पंचदशं वामनकं कृत्वागादध्वरं बलेः । ८ अ. १८
पदत्रयं याचमानः प्रत्यादित्सुस्त्रिविष्टपम ।। १९ ।।
१-३-१९ स्कं. ९-१५

(६) अवतारे षोडसमे पश्यन्ब्रह्मद्रुहो नृपान ।।
त्रिःसप्त कृत्वः कुपितो निःक्षत्राम करोन्महीम ।। २० ।।
१-३-२० स्क. ९-१०-११

(७) नरदेव त्वमापन्नः सुरकार्यं चिकीर्षया ।।
समुद्र निग्रहा दीनिचक्रे वं र्याण्यतः परम ।। २२ ।।
१-३-२२ स्कं.

(८) एकोनविंशे विंशतिमे वृष्णिषु प्राप्य जन्मनी ॥
रामकृष्णा वितिभुवो भगवान हरद्भुरम ॥ २३ ॥
भागवत (१-३-२३) स्कं. १०-३

(९) ततःकलौ संप्रवृत्ते संमोहाय सुरद्विषाम् ॥
बुद्धो नाम्नाऽजनसुतः कीकटेषु भविष्यति ॥ २४ ॥
भागवत (१-३-२४)

(१०) अथासो युग संध्यायां दस्यु प्रायेषु राजसु ॥
जनिता विष्णु यशसो नाम्ना कल्किर्जगत्पति ॥ २५ ॥
१-३-२५ स्कं. १२-२-१८-२०

		स्कं. अ. श्लो.
१. मत्स्य अवतार		८ – २४
२. कूर्म	,,	८ – ७ – ८
३. वराह	,,	३ – १८
४. नारसिंह	,,	७ – ८
५. वामन	,,	८ – १८
६. परशुराम	,,	९ – १५
७. राम	,,	९ – १० – ११
८. कृष्ण	,,	१०– सम्पूर्ण जन्माध्याय ३
९. बुद्ध	,,	१ – ३ – २४
१०. कल्कि	,,	१२ – २ – १८ – २०

श्री· संपादक महाशय कल्याण मासिक,
पोष्टः– गीताप्रेस, गोरखपूर.

१. मत्स्य– इनका आविर्भाव प्रलय पयोघिमें हुआ
२. कच्छप– क्षीरसागर में हुआ
३. वराह– प्रलय के पश्चात सृष्टिके प्रारंभ मे ब्रह्म लोक में हुआ
४. वामन– महर्षि कश्यप के आश्रम में हुआ। कश्यपाश्रम कहाँ है
यह निर्विवाद रूपसे ज्ञात नहीं

५. नृसिंह–इनका अवर्भाव श्रीमद् भागवतके अनुसार तो स्वर्ग मे जहाँ हिरण्यकशिपु अधिकार जमाये हुआ था दक्षिण भारत में नृसिंहावतार के दो तीर्थ कहे जाते हैं उनमें कौनसा अवतार तीर्थ है कहना कठिन है.

६. परशुरामजी का अविर्भाव कुछ लोग जौनपुरमें मानते हैं। कुछ लोग भृगु कच्छ (भंडोच) में

७. श्रीराम– अयोध्या

८. श्रीकृष्ण– मथुरा

९. बुद्ध– पुराणवर्तित बुद्ध का अविर्भाव कीकट देशमे कहीं हुआ था। स्थानका पता नहीं। निश्चयही गौतमबुद्ध ये नहीं हैं। गौतमबुद्ध का जन्म गोरखपूरके पास लुंबिनीमें हुआ था।

१०. कलंकी– सम्भला ग्राम (पर कौनसा है यह संबल ग्राम पतानहीं)

दशावताराची जन्मस्थळें

श्री. द. सी. नाथ जोशी पं. कर्तें रामलिंग मंदिर, मिरज.

मत्स्य :– गजापूर–नागपूर अथवा हस्तनापूर
कच्छ :– विद्यापूर–काशी
कराह :– मर्गच्छपूर–मारवाड अगर कानपूर
नारसिंह :– कर्पूर पट्टण–कर्पूर संस्थान, कानपूर
वामन :– महेंद्रपूर–इंद्रप्रस्थ–दिल्ली
परशराम :– रेणुपुरी–संवदत्ती अंकळी
रामचंद्र :– अयोध्या
कृष्ण :– मथुरा
बौद्ध :– कार्तापूर–वायव्य प्रांत, कानपूर
कलंकी :– शबलापूर–शबलदैत्य राज्य कर्नाटक, करवीर

ज्यो. रा. अमृतराव वाघोलीकर, रा. यशवंत प्रधान, रा. चिंतामणराव वैद्य इत्यादि संशोधक ज्ञात्यांनी देशांची आजकाल रूढ नांवें प्रकाशित केली त्यांत सर्व देशांची नांवें आली नाहींत उदाहरणार्थ मेश राशीचे सदरा. खालील देश :––

मद्रास, नेपाळ, उज्जयनि, बडोदे, म्हैसूर, लंका. वृषभ राशी खालील थोडे देश दिले आहेत. वास्तविक वराह संहितेत विस्तार आहे. वराह संहितेत भरत खंडाचे कूर्मचक्राप्रमाणें ९ भाग ८ दिशा व मध्यभाग मिळून ९ करून कृत्तिकादि २७ नक्षत्र समूहाखाली देशांची जुनी नांवें फक्त दिली आहेत. सांप्रत देशांची नवी नांवें ज्ञात नाहींत.

१ ओड, २ प्राक्क५ ३भरु४ज्योति ,,५छ गोपराष्ट्र, ५अपरात' ६ आनर्त ७ परांत, ८ यवनशूर

नद्या :- परुष्णी, २ असिक्नी, लोहिया, चर्मण्वती.

श्री. किर्तन केसरी बडोदकर यांच्याकडून

१ मच्छावतार :-- गजापूर (हास्तनापूर)
२ मच्छ कच्छ अवतार :-- समुद्रांत क्षिरसमुद्र (भागवत)
३ वराह अवतार :-- महाअरण्य-अमरकंटकाच्या खाली लागते.
४ नरसिंह अवतार :-- उखामठ-बद्रीनारायणाच्या मार्गावर
५ वामन अवतार :-- नर्मदा किनारा कोरळ
६ परशराम अवतार :-- सह्याद्रि
७ बौद्धावतार :-- पंढरपूर
८ कलंकी अवतार :-- अफगाणिस्थानाकडे

कल्याण मासिक 'तिर्थांक" --

रेणूकातीर्थ :-- सीमला ते नाहान-दहादू ते रेणूका तीर्थ ५ फर्लांग
बक्सर सिद्धाश्रय :-- वामनाश्रय, मोगलसराई परना लाईनवर
परशराम तीर्थ :--जि. रत्नागिरी ता. चिपळून, बंदरमाई गोपाळ द्वारे ते रेणूकापूर

बौद्ध :-- लुंबिनी, गोरखपूर ते नैनीताल, नौजना स्टेशन.

पैल ते पंढरी पैल ते पंढरी । पांढरीया वरी काळी बैसविली ।।

या अभंगाच्या चरणाचा अर्थ विद्वानाकडून आलेला तो पुढे दिग्दर्शित करीतो.

श्री. प्रा. ग. श्री. हुपरीकर :

या अभंगाचा केवळ लौकीक अर्थ सांगावयाचा नाहीं, पंढरीची आध्यात्मिक महती गावयाची आहे, यांत पैल = पलीकडे म्हणजे लौकिक जीवनापलीकडे, 'पांढरे = शुद्ध = निर्गुण व 'काळी' म्हणजे सांवळी–सगुण मूर्ति ही पदें महत्वाची आहेत, समग्र अर्थ यथामति असा-संसारिक जीवना-पलिकडे शुद्ध निर्गुण अधिष्टान जे आहे त्यावरच सांवळया सगुण मूर्तिची स्थापना झाली आहे. पंढरीतील सगुण माहात्म्याला उद्देशून या गर्भित हेतूनें हे शब्द वापरले आहे.

श्री. डॉ. ग. वि. तुळपुळे––

हा अभंग अलंकारिक साक्षात्कार पर आहे असे मला वाटते, स्थूल पंढरीचा येथें संबंध दिसत नाहीं. सुनील ब्रम्ह, विद्युतलताब्रम्ह, विठ्ठल हा डोळा, अर्थ मात्रे जवळा. हे सर्व साक्षात्काराचे संबंध आहे.

श्री. डॉ. पारनेरकर––

हे डोळयाचे वर्णन घेऊन ध्यान योगांत प्रकाश बिंदूमधें जो काळा बिंदू दिसतो ते म्हणजे पंढरपूर असे रुपक आहे.

नजर चुकीनें कांहीं चरणाचा अर्थ लिहिण्याचा राहिला तो पुढील प्रमाणें पहावा :––

हा चतुर्भूज हरि दाहि दिशेला दिसूं लागला, असे नामदेवराय म्हणतात ।। ३–५५३ ।। (ना० च०) ।। पृ. ७८ ।।

पूर्वी प्रल्हाद हा श्रेष्ठ भक्त होता असें पुराणांतून श्रवण केले खरे परंतु हा नामा सर्व संतांमध्यें श्रेष्ट पहाण्यांत आला ।।४-१९०।। ना. म. ।।पृ.९६।

गळयामध्यें हार व मस्तकावर तुळशीच्या मंजुरीचा तुरा शोभा देत आहे. ।। ३–११३ ।। वि. म. ।। पृ. १४७ ।।

ठळक मुद्रण दोषांचे शुद्धीपत्र

श्री नामदेव रायाचे चरित्र—

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	५	बाप	बाप
५	२	कोणाची	कोणावो
७	१२	बळवत	बालकवत
१२	१६	वरू	करूं
१३	१४	कमीचे	कर्माचे
१३	२३	वर	कर
१९	१२	काकीळेचे	कोकीळीचे
२०	१५	कामासी	कामासी
२१	५	चित्तला	चित्ताला
२४	१२	तझे	तुझे
२५	४	आलो	आलो
२५	१३	आपण	आणि
२७	२४	क्षेज्ञा	क्षेत्रज्ञ
२८	८	तुझ	तुझें
२९	२५	लोहो	लोह
३०	२	आय	आश्रय
३१	५	भेटला	भेटली
३३	१७	जी	जिने
३४	१४	आपुल्याचे	अपत्याचे
३७	१३	गुणराय	गुणरया
३९	२२	वाईट	उद्धर
३९	१	होत	होते
४२	८	मामाचा	भक्तीचा
४२	१६	पितियाचे	पितयाचे
४५	१२	कोड	कोडी
४८	१४	ह्मणत	ह्मणती
६०	१२	कालत्र	कलत्र
६१	१०	मोडी	गोडी
६१	११	पडिये	पढीये
६२	२५	बिढळा	निढळा
६५	१४		तुझेचरण हृदयी असावे हेच माझे सर्वस्व आहे
६८	६	निश्चय	निश्चळ
६९	१२	चरण	चर्वण
७०	१४	कोणी कोणाला	कोणा कोणाला
७४	२६		तुझ्या विटे सहित चरणाला ओवाळीन
७५	१३	सुलले	खुलले होते
७६	२२	५६५	३
७७	२४	असून	असून रामरूप झाली होती
७९	५	५६८	६
७९	२४	बो	बोध
८०	२५	असेना	नामयाच्या आपुला पहाशील
८१	९	राहातो	राहीला

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८२	६	कर्पलाकार	नेत्रापर्यंत शोभा देत आहे
८९	१८	सपाट	रुंद
९१	८	संगीतानें	योगे मिळाली
९४	८	डोळा	ज्वाळा
९५	१	हनुता	हनुमन्त
९६	२९	श्यामरगा	मुखाला अग्निला गेल्यानें तोश्याम रंगी झाला
९८	१५	सिद्धी	सिद्ध
१०२	१५	घ्यासा	घ्यासानें
११०	१०	बेळणें	बोलणें
११२	६	धर्मशीस्त्र	धर्मशास्त्र
१२४	१२	जेस	जैसा
१२५	२५	कोणाला॑हि	शेषालाहि
१२६	८	मलाचि	मुलांचि
१२९	१	श्रष्ट	श्रेष्ट
१३१	११	मूळप्राम	मूळग्राम
१३३	२	भवन	भुवन
१३३	१८	वितडंदादानें	वितंडवादाने
१३३	२२	भिभ	भिन्न
१३४	१८	चित्तदा	चिद आनंद
१३४	२३	देव	वेद
१३५	२४	प्रघृत	प्रवृत
१३६	५	निवार्ण	निर्वाण
१३८	५	तेसा	तैसा
१३९	७	ब्रह्मा	ब्रह्माचि

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१४१	२६	सकला	सकलां
१४२	२०	अव्यस्त	अव्यक्त
१४४	१७	सावली	सावळी
१४४	१०	म्हणन	म्हणून
१५०	२०	विठठराय	विठ्ठलराय
१५७	१	ब्रम्हदोवनें	ब्रम्हदेवानें
१५९	६	करितातात	करितात
१५९	१५	घ्यावा	घ्यावा
१७७	९	यिमला	यमला
२८२	२३	डोळ	डोळे
१८७	५	अपरंपरा	अपरंपार
१८७	२०	वरीत	करीत
१८८	१३	वेढावला	वेडावला
१८८	१६	देवरायी	देवराया
१८९	७	निधीन	निधान
१८९	१८	डोळचानें	डोळयाचे
१९५	१९	सादि	रिद्धी
१९४	१०	धाविलिला	धाविन्नालीं
१९५	१९	सादि	रिद्धि
२०९	६	कवणा	कवण
२०९	१३	अंतुक	अंतकु
,,	२५	खायवा	खावया
२००	१९	नाम	नाभा
२३१	२५	स्यान	स्थान
२३५	८	गाण्यावे	गाण्याच्या
२३९	२६	सव	सर्व
२४८	२	गेड	गोड
२४८	५	वाही	बाही

नाम माहात्म्य

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३	१९	करीन	करील
५	१	हाताला	मुखाला
५	१६	कापूरा	दोषरूपी कापूरा
७	७	पंढरीराथ	पंढरीराय
७	१०	नामाची	नामची
७	२३	पतित्व	पतितत्व
९	१२	यादेवराय वैकुंठांत घेऊन गेलें	या देवरायानें वैकुंठांत नेलें
९	२६	देव की	(देवकी)
१०	२	धरिले	धरिले नको आहे
१०	९	शेवटास	शेपटास
१०	२२	उद्धारिलें	उद्धरिलें
११	२४	नामाचि	नामचि
१३	२६	कर्मं	कर्में
१३	१०		॥ १ ॥
१७	७	पताकाचा	पताकाची
२१	१५	अक्राल	अक्राळ
२२	१०	जिवाला	जिव्हेला
२२	१३	सामग्री	सौमुग्री
२३	३	हा	हरि
२३	७	असें	ऐसें
२३	२०	परमानंद	परमपद
२४	१०	श्रीहरी	मुरारी
२५	२	देणारे	देणाऱ्या
२५	२६	पुढें	सह
२७	२०	पाटीं	प्रोटीं
२८	१२	द्वैताचा	मर्यादा
२९	१८	अलौलीक	अलौकीक
३१	१६	शरणाचा	अर्थ पाहिजे
३२	२	फुटीवृत्ती	फुटीरवृत्ती
३२	८	लक्ष्मी	(शद्ध पाहिजे)
३२	१३	॥ ६ ॥	(अंक पाहिजे)
३२	२३	गाजीरे	गोजीरे
३४	७	आहेत	आहेस
३५	३	प्रेम	सप्रेम
३५	३	दटातिस	दाटती
३५	२१	देतील	देईल
३७	१८	लावलादे	लावला हो
४०	७	कळती	फळती
४०	१४	आहे	—
४०	२३	ती	ते
४१	८	नामाचा	नामाच्या
४२	१६	वाचना	वासना
४४	२२	ध्वंस	विध्वंस
४६	१५	जनामधें	जन्मामधें
४६	२०	प्रबुध	प्रबुद्ध
४७	४	जाति	जातीं
४८	७	अलतां	असतां
५०	२२	हरि	—

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५२	१२	लॅक्ष	क्षण
५२	१९	स्थिदि	स्थिर
५२	२१	नामांचा	नामाच्या
५३	२	बाप	बापा
५३	२४	२०९	२०१
५४	२२	सत्य	नित्य
५९	१५	बाप	समीप
६०	४	धोक	धोका
६५	४	ते	तो
५६	२६	उपदेसिला	उपदेशीला
६६	२६	बरगळतोस	बरळतोस
६८	१५	नामदेराय	नामदेवराय
७७	१२	विष्ण	विष्णु
८१	२३		॥ ई ॥
८२	१२	मथात	मथांत
८७	१८	आज्ञा	वचन
९०	१७	जाम्ही	आम्ही
९३	१५	जळाध्येंच	जळामध्येंच
९५	४	सन्मुख	सन्मूख
९५	१५	मतांतराच	मतांतराचा
९६	२८	चौथ्या चरणाच्या अर्थ परीशिष्ट मध्यें पहा.	